(सभापतीस्थानी मा. उपसभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

वरुड तालुक्यातील भुगर्भिय पाण्याच्या अतिशोषीत भागासाठी वर्धा डायव्हर्शन कॅनॉल प्रज ल्प

(१) * १७९७ प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते , प्रा. शरद पाटील दिनांक १६ डिसेंबर, २००३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या तारांकित प्रश्नोत्तराच्या दि.१५ डिसेंबर, २००३ रोजीच्या यादीतील तारांकित प्रश्न क्रमांक ३६७३२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९९५ मध्ये केंद्र शासनाच्या भूजल सर्वेक्षण विभागाने सखोल अभ्यास करुन वरुड तालुक्याचा जो भूभाग भुगर्भिय पाण्याचा अतिशोषित भाग म्हणून जाहिर केलेला आहे त्याला लाभदायक ठरणाऱ्या वर्धा डायव्हर्शन (WRII Canal Project) कॅनॉल प्रकल्पाच्या सर्वेक्षणाचे काम पुर्ज झाले आहे काय,

(२) असल्यास विस्तृत सर्व्हेक्षणानंतर प्रकल्प प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे ज ाय,

(३) असल्यास त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. सुनील देशमुख,श्री.अजित पवार यांच्याकरिता : (१) होय.
जुलै २००४ मध्ये सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले आहे.

(२) नाही. तथापि, मसुदा प्रकल्प अहवाल तयार झाला असून त्याची क्षेत्रिय स्तरावर छाननी सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : छापील उत्तरामध्ये "जुलै 2004मध्ये सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले आहे" असे उत्तर देण्यात आलेले आहे. म्हणजे जवळ जवळ 8-9 महिन्यांचा काळ हा सर्वेक्षण पूर्ण होऊन झालेला आहे.मुख्यअभियंत्यानी दोन अडीच वर्षापूर्वी जे मानचित्र पाठवले होते त्याप्रमाणे त्यांनी त्यावेळेला असे म्हटले होते की, हा प्रकल्प अतिशय चांगला प्रकल्प आहे आणि गुणवत्तेवर त्यांनी शासनाला कळवले होते की, वनक्षेत्राशी बाधित होणा-या क्षेत्राची टक्केवारी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केवळ 9.46 आहे. प्रकल्पाचे लाभव्यय गुणोत्तर 1.4 आहे. प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात पंढरी हे गावठाण येत असून सदर गाव ओसाड आहे. असे मानचित्रावरुन दिसून येते. सविस्तर सर्वेक्षणानंतर याचे लाभव्यव गुणोत्तर याहूनही आकर्षक असण्याची शक्यता आहे. त्यावेळी मा.श्री. बाळासाहेब थोरात हे राज्यमंत्री होते. ते 13 मार्च 2003ला ,ता.प्र.क्र.30272 ला उत्तर देताना असे म्हणाले की, हा अत्यंत चांगला प्रकल्प आहे. आता आपण लिफ्ट करतो. परंतु ग्रॅव्हीटीने तलाव भरुन पुनर्भरण करता येणारा हा प्रकल्प आहे. सर्वेक्षण पूर्ण झालेले आहे. मुख्य अभियंत्यांनी आपले म्हणणे मानचित्रावरुन सांगितलेले आहे. श्री. बाळासाहेब थोरात यांनी अंदाजाने ही माहिती दिली होती. म्हणून मला दोन प्रश्नांची उत्तरे पाहिजेत. पहिला प्रश्न असा आहे की, सर्वेक्षण जर पूर्ण झालेले आहे तर हा प्रकल्प पूर्वी सांगितल्या प्रमाणे तांत्रिकदृष्ट्या अत्यंत योग्य आहे की नाही? दुसरा प्रश्न असा आहे की, याबाबतची प्रशायकीय मान्यता केव्हा देण्यात आलेली आहे ? देण्यात आलेली नसेल तर ती केव्हा देण्यात येणार आहे.?

डॉ. सुनील देशमुख : हा प्रकल्प तांत्रिकदृष्टया एकदम योग्य असा प्रकल्प आहे. त्यामध्ये काहीही अडचण नाही. ही गोष्ट खरी आहे की, सात महिन्यापूर्वी या प्रकल्पाचे सगळे अहवाल तयार करुन ते क्षेत्रिय अधिका-याकडे पाठविले होते. प्रचलित पध्दत अशी आहे की, आपण क्षेत्रिय पध्दतीचा ढोबळ आराखडा तयार करतो आणि त्यावरुन जो अहवाल दिला जातो त्या अहवालाला प्रशासकीय मान्यता दिली जाते. त्यानंतर हा प्रकल्प कार्यान्वीत करण्यासाठी सीडीओ नाशिककडून त्याचे डिझाईन आणि ड्राईंग तयार करण्यात येतात. त्यानंतर तो प्रकल्प सुरु होतो. हा थोडासा वेगळया प्रकारचा प्रकल्प होता. या प्रकल्पामध्ये स्टोरेजच्या ऐवजी डाव्हर्शन होते. त्यामुळे सविस्तर प्रकल्पाचा जो टप्पा आहे तो सीडीओ कडून प्रथम मान्य करुन घेतला. त्यानंतर ज्या कामासाठी सात-आठ महिन्याचा कालावधी नंतर लागणार होता ते काम पहिले करुन घेतले.. प्रशासकीय मान्यतेला काहीही विलंब लागणार नाही. ज्या दिवशी प्रशासकीय मान्यता मिळेल त्या दिवशी तो प्रकल्प ताबडतोब कार्यान्वीत करु शकू. जो सात महिन्याचा कालावधी नंतर लागणार होता त्यासंदर्भात पहिल्यांदा आपण कार्यवाही केलेली आहे. त्या प्रकल्पाचे डिझाईन आणि ड्राईंग अगोदर केल्यामुळे या प्रकल्पाला थोडा विलंब झालेला आहे. दुसरी बाब अशी की, त्यामध्ये आपण थोडासा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 1797 पुढे सुरु...) (डॉ. सुनील देशमुख...

बदल केलेला आहे. सध्याच्या व्याप्तीनुसार या प्रकल्पामुळे 11712 हेक्टरला लाभ मिळणार आहे. 10 हजारापेक्षा जास्त क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार असेल तर त्याबाबतीत आपणाला केन्द्राकडून परवानगी घ्यावी लागते. सीडब्ल्यूसीचे क्लिअरन्स घ्यावे लागते. केन्द्रीय पर्यावरण विभागाची परवानगी लागते. म्हणून यामध्ये आपण थोडा बदल करीत आहोत. जो पांढरी तलाव आहे त्याचे लाभक्षेत्र 8150 हेक्टर आहे. म्हणून या प्रकल्पाला आपण पहिल्यांदा 10 हजार हेक्टर सिंचन क्षमतेच्या खाली आणून त्यासाठी प्रथम मान्यता घेऊ. त्यामुळे आपणाला दिल्लीला जाण्याची गरज पडणार नाही. या प्रकल्पाला केव्हा प्रशासकीय मान्यता देण्यात येईल असा प्रश्न विचारलेला आहे. क्षेत्रिय स्तरावरुन हा प्रस्ताव शासनाला 15.4.2005 पर्यन्त सादर करु. शासन स्तरावर त्याची छाननी व शेरेपूर्तता 15.5.2005 पर्यत्न पूर्ण करुन कोणत्याही परिस्थिती प्रशासकीय मान्यता 31.5.2005ला देण्याचा प्रयत्न करु.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख :सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले त्यावरुन त्यांनी यासंदर्भात दोन भाग केल्याचे दिसतात. त्यांनी जे कारण सांगितले आहे ते कारण सुध्दा मान्य होण्यासारखे आहे. ते मान्यतेमध्ये अडकून पडण्यापेक्षा 8 हजार हेक्टरच्या पांढरी प्रकल्पाला 31 मे पर्यंत प्रशासकीय मान्यता शासनाकडून देण्यात येणार आहे. माझे म्हणणे अत्यंत स्पष्ट आहे. 31 मे पर्यन्त पांढरी प्रकल्पाला मान्यता दिली जाईल. उरलेले जे छोटे छोटे प्रकल्प होणार आहेत त्या प्रकल्पांच्या मान्यतेचे टाईम टेबल आम्हाला कळले पाहिजे. खरे म्हणजे मी असे म्हणणार होतो की, हा एकच प्रकल्प आहे असे समजून मान्यता दिली पाहिजे होती, पण मी तसे म्हणत नाही. माझे म्हणणे असे आहे की, 8 हजार हेक्टरचा पांढरी प्रकल्पाचा भाग केला आहे त्यास 31 मे पर्यन्त ठामपणाने मान्यता दिली जाईल अशा प्रकारचे आश्वासन माननीय मंत्री महोदय देतील काय ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय,पांढरी प्रकल्पास 31 मे पर्यन्त कोणत्याही परिस्थितीत मान्यता देण्यात येईल. राहिलेल्या दोन प्रकल्पांना 31 ऑगस्ट पर्यन्त कोणत्याही परिस्थितीत मान्यता देण्यात येईल.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वेंगुर्ला (जि.सिंधुदूर्ग) शहर पाणीपुरवठा योजना टप्पा क्र.२ च्या कामास निधी मिळण्याबाबत

(२) * ४३४६ मेजर सुधीर सावंत : सन्माननीय पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेंगुर्ला (जि.सिंधुदूर्ग) शहर पाणीपुरवठ्यासाठी टप्पा क्र.२ च्या मंजूर कामांपैकी धरणाची उंची वाढवून पाणीसाठा वाढविण्याबाबत लोकप्रतिनिधी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ९ ऑगस्ट, २००२ रोजी वा त्या दरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर निवेदनावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.रणजित कांबळे,श्री.अजित पवार यांच्याकरिताः (१) होय.

(२) सदर निवेदनात वेंगुर्ला शहरासाठी अस्तित्वात असलेल्या धरणाची उंची वाढवून साठवण क्षमता वाढविण्याची विनंती करण्यात आली होती. तथापि प्राप्त होत असलेल्या निधी अभावी आणि सदर काम करण्यासाठी येणा-या संभाव्य तांत्रिक अडचणी विचारात घेता या कामास पर्याय म्हणून अस्तित्वातील नारायण तलाव उद्भवावर आधारित रु.११७.५२ लक्ष ढोबळ किंमतीच्या योजनेस वर्धित वेज नागरी पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाने व राज्य शासनाने मंजुरी दिली असून त्या योजनेनुसार तलावातील गाळ काढून तलावाची दुरुस्ती करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत -नाही.

मेजर सुधीर सावंत : सभापती महोदय, वेंगुर्ला शहर हे महाराष्ट्रातील पर्यटकांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे असे म्हटले तर ते काय अयोग्य होणार नाही. या शहरास पाण्याचा प्रश्न कायम स्वरुपी भेडसावत आहे. या शहरात एप्रिल आणि मे महिन्यापासून या ठिकाणी पाण्याचा तुटवडा भासत असतो. या कालावधीत पर्यटक मोठया प्रमाणात येतात. शहरामध्ये पाण्याच्या संदर्भात प्रत्येक व्यक्तीसाठी 60 लिटर असा निकष असताना या शहरासा पाण्याच्या योजनेच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संदर्भात व्यक्ती 40 लिटर पाण्याचा चुकीचा निकष का लावण्यात आला ? या ठिकाणी निषान तलावाची योजना होती ती हाती न घेता नारायण तलावाची योजना हाती का घेण्यात आली ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, वेंगुर्ला शहरासाठी योजनेचे डिझाईन प्रति व्यक्ती 70 लिटर प्रमाणे करण्यात आलेले आहे. निषान तलावा ऐवजी नारायण तलावाचे काम हाती घेण्याचे कारण असे आहे की, जवळ जवळ ही योजना 117 कोटीची आहे. पाणी पुरवठा योजनेसाठी 10 टक्के लोकवर्गणी भरावी लागते. या योजनेची किंमत लक्षात घेऊन नगरपालिकेने लोकवर्गणी भरण्याची तयारी दर्शविली व तसा वेगळा ठराव दिला आपण म्हणता त्या योजनेच्या कामास सुरुवात करता येऊ शकते. सध्या नारायण तलावातील गाळ काढण्याचे तसेच दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे.

मेजर सुधीर सावंत: प्रति व्यक्ती 60 लिटर प्रमाणे योजनेचे डिझाईन करण्यात आलेले नाही अशी माझी माझी माहिती आहे. या शहरास प्रति व्यक्ती 40 लिटर प्रमाणे योजनेचे डिझाईन करण्यात आलेले आहे.सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे आज निषान तलावास कोणत्याही प्रकारचे संरक्षण नाही. त्या तलावातील पाण्यात मोठया प्रमाणात प्रदुषण होत आहे. त्या तलावास कंपाऊंड नाही. निषान तालवातील पाणी प्रदुषीत होऊ नये म्हणून शासन कोणती पाऊले उचलणार आहे ?

श्री. रणजित कांबळे : या शहरात दोन वेगवेगळे तलाव आहेत. वेंगुर्ला येथील वॉटर सल्पाय स्कीमच्या दुस-या टप्पाचे काम आहे. त्यातील चौकीदारास क्वॉटर्स, इलेक्ट्रीफिकेशन इत्यादी कामे झ ालेली आहेत..

मेजर सुधीर सावंत : सभापती महोदय, निषान तलावातील पाणी मोठया प्रमाणात प्रदुषित होत आहे. मंत्री महोदय हे अपूर्ण माहिती या ठिकाणी देत आहेत. त्यांनी चुकीची माहिती या ठिकाणी देऊ नये.

श्री. रणजित कांबळे : माझ्याकडून चुकीची माहिती दिली गेलेली आहे. सध्या या तलावात डिसेल्डींगचे काम चालू आहे.या ठिकाणी फेन्सीगचे काम प्रस्तावित आहे. डिसेल्डींगची कामे होतील त्या प्रमाणे त्या ठिकाणची कामे पूर्ण करण्यात येतील.

यानंतर श्री. कानडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खालापूर तालुक्यातील मोरबे धरणाचे पाणी नव्या मुंबईने विकत घेण्याच्या कराराबाबत

(३) * १८४७ श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील , श्री. विनायकराव मेटे , श्रीमती मंदा म्हात्रे दि□ांज १६ डिसेंबर, २००४ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या पंधराव्या यादीतील प्रश्न क्रमांक ४३८६४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील मोरबे धरण पाणी पुरवठा योजना शासनाने नवी मुंबई महानगरपालिकेला मालकी तत्वावर हस्तांतर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने हे हस्तांतर करताना प्रकल्पग्रस्त शेतकरी व प्रकल्पग्रस्त कर्मचारी यांचेसंबंधी नवी मुंबई महानगरपालिकेबरोबर शासनाने करार केला आहे काय,

(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, मोरबे धरण पाणी पुरवठा योजनेसाठी ज्या गावाचे पुनर्वसन केले आहे त्या गावांना -ागरी सुविधा देज्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

डॉ. सुनील देशमुख, श्री.अजित पवार यांच्याकरिता : (१) होय.

(२) -ाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) मोरबे धरण योजनेअंतर्गत बुडीत क्षेत्रात येणाऱ्या सहा गावे व वाड्यांचे शासनाच्या पुनर्वसन कायदयानुसार व महसूल खात्याच्या मार्गदर्शक तत्वानुसार पुनर्वसन करण्यात आले असून अपूर्ण राहिलेल्या नागरी सुविधा (किरकोळ गटाराची) कामे पूर्ण करुन देण्यासाठी रु.४१.७४ लक्ष इतक्या निधीची मागणी नवी मुंबई महापालिकेकडे करण्यात आली आहे. निधी प्राप्त होताच कामे पूर्ण करण्यात येतील. तसेच हस्तांतरीत झालेल्या नागरी सुविधांची दुरुस्ती करण्याबाबत जिल्हा परिषदेस कळविण्यात आले आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात लक्षवेधी सूचना लागली असल्यामुळे माझे समाधान झाले आहे.

ता.प्र.क्र. 4259

(मा. सदस्य अनुपस्थित)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीतील गैरव्यवहाराबाबत

(५) * १८९३ श्री. विलास अवचट , श्री. अरविंद सावंत , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. अनिल परब , श्री. अनंत तरे , श्री. जगन्नाथ शेवाळे , श्री. वसंतराव चव्हाण , श्री. जितेंद्र आव्हाड , डॉ. वसंत पवार दि□ांज १६ डिसेंबर, २००४ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या चौदाव्या यादीतील प्रश्न क्रमांक ४२११९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय पणन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीतील गैरव्यवहाराबाबतचा चौकशी अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(२) असल्यास, अहवालानुसार शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) -ासल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर, श्री.हर्षवर्धन पाटील यांच्याकरिता : (१) होय.

(२) छाननी चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, दि. 16.6.2004 रोजी यासंदर्भात प्रश्न विचारला होता. त्यावेळी उत्तर देताना मंत्रीमहोदयांनी सांगितले होते की, चौकशी पूर्ण करण्यासाठी कालावधी दिलेला आहे. चौकशी पूर्ण झालेली आहे आणि अहवाल प्राप्त झालेला आहे. संचालक मंडळाने केलेल्या भ्रष्टाचारामुळे या बाजार समितीची दुरावस्था झालेली आहे. चौकशी करण्याचे आश्वासन दिलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, अहवाल सादर झाला काय ? झाला असल्यास केव्हा सादर झाला आणि सभागृहापुढे केव्हा सादर करण्यात येणार आहे ?

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर : सभापती महोदय, 28.5.2004 रोजी पणन संचालक यांच्याकडे चौकशी अहवाल प्राप्त झाला आणि 3.5.2004 रोजी शासनाकडे अहवाल प्राप्त झाला असून त्याची छाननी चालू आहे. मार्केट समितीचे काय म्हणणे आहे हे जाणून घेण्यासाठी त्यांना पत्र पाठविले होते. त्यांचे म्हणणे प्राप्त झालेले आहे.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, एक वर्ष झाला अहवालावर कार्यवाही झालेली नाही. अजूनही किती कालावधी लागणार आहे ?

(उत्तर नाही.)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये जो गैरव्यवहार झाला त्याचे स्वरुप काय आहे ? अहवाल केव्हा प्राप्त होणार आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1893 पुढे सुरु..

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर : सभापती महोदय, गैरव्यवहार म्हणण्यापेक्षा अनियमितता बरीच झालेली आहे. परवानगी न घेता प्रोसिजरल गोष्टी केलेल्या आहेत. अहवाल मोठा आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या बाजार समितीमध्ये भ्रष्टाचार झालेला आहे हे शासनाला मान्य झाले आहे. म्हणूनच चौकशी सुरु केली आहे. कोणत्या स्वरुपाचा गैरव्यवहार झाला आहे आणि त्यात कोणत्या बाबी आढळून आल्या आहेत ?

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर : सभापती महोदय, अहवालामध्ये साखरेच्या बाबतीत आक्षेप आहेत. अनुशेषाबाबत आक्षेप आहेत. सुरक्षा व्यवस्थेच्या बाबतीत आक्षेप आहेत. अनियमितता झालेली आहे. अजून अहवाल शासनाकडे आलेला नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अनुशेष भरतीच्या संदर्भात उमेदवारांकडून मोठया प्रमाणावर पैसे मागितले गेले आणि तक्रारी झालेल्या आहेत हे खरे आहे काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, अनुशेष भरतीच्या संदर्भात एक एजन्सी नेमली होती. एजन्सीमार्फत ज्या जागा भरावयाच्या होत्या त्यासंदर्भात अर्ज मागविण्यात आले. मोठया प्रमाणात अर्ज आल्यानंतर मंत्रालयीन स्तरावरच अनुशेष भरतीच्या संदर्भात नेमलेल्या कन्सलटन्सी एजन्सीच मार्फत कोठेही नोकरभरतीचे काम केलेले नाही.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1893..

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय,अनुशेष भरत असतांना काही तक्रारी करण्यात आल्या होत्या. मोठया प्रमाणावर रकमेची मागणी करण्यात आली होती अशीसुध्दा त्यामध्ये एक तक्रार होती.आपण ही एजन्सी कशासाठी नेमली आहे ? आपल्याकडे एवढी मोठी यंत्रणा असतांना एजन्सी नेमण्याची कारणे काय आहेत ?

श्री.हर्षवर्धन पाटील : ही एजन्सी आपण नेमलेली नाही. मार्केट कमिटीने ही एजन्सी नेमलेली होती. या एजन्सीच्या संदर्भात तक्रार आली होती.त्याचबरोबर वीस हजारापेक्षा जास्त अर्ज आलेले असल्यामुळे सर्व उमेदवारांना एकदम मुलाखतीसाठी बोलविणे शक्य नव्हते.त्यामुळे स्क्रुटिनी करण्यासाठी एजन्सी नेमण्यात आली होती. परंतु त्या संदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या. त्याचबरोबर सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्या तक्रारीमध्ये पैसे मागितले गेल्याचा सुध्दा मुद्दा होता त्यामुळे हे सगळे प्रकरण आता थांबविण्यात आले असून त्यासबंधीची चौकशी सुरु आहे. चौकशीचा अंतिम अहवाल आल्यानंतर पुढची कारवाई करण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, कृषी उत्पन्न बाजार समिती हा भ्रष्टाचाराचा मोठा अड्डा बनलेला आहे.तेथील सचिवांची बदली होत नाही.संचालक मंडळाचा गैरव्यवहार कसा चालू आहे हे सर्व जनतेला माहीत आहे. राज्य कोणाचेही येवो परंतु कृषी उत्पन्न बाजार समित्यावर ज्यांचे राज्य आहे ते सुखरुप चालू आहे अशी स्थिती आहे. या ठिकाणच्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये भ्रष्टाचार चालू आहे.पणन मंत्र्यांचे बजेटसुध्दा तोकडे पडेल एवढा तेथे भ्रष्टाचार चालू असतो. या कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्षपद मिळाले तर ते मी घेईन परंतु मंत्री पद नको. इतक्या मोठया प्रमाणावर तेथे लक्ष्मी दर्शनाचा कार्यक्रम सुरु असतो.या .संदर्भात शानाकडे वेळोवेळी तक्रारी करण्यात आल्या होत्या. त्या ठिकाणी एका व्यक्तीचा खूनसुध्दा झाला आहे.त्यात एकमेकांचे हात गुंतलेले आहेत. मला माननीय मंत्रिमहोदयांना एक प्रश्न विचारावयाचा आहे. या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आर्थिक अनियमिता,भ्रष्टाचार, फ्रॉड इत्यादीच्या संदर्भात आपल्याकडे तक्रारी आल्या होत्या काय ? आणि त्या तक्रारीच्या बाबतीत समितीची चौकशी करण्यात आली होती काय ? या समितीची वेळोवेळी चौकशी चालूच असते परंतु सरकार त्याबाबतीत काहीच] संचालक मंडळावर आणि अध्यक्षांवर कारवाई करण्याची हिंमत सरकार आणि मंत्री दाखवत नाही.या कृषी बाजार समितीच्या बाबतीत ज्या तक्रारी आल्या होत्या त्या तक्रारीची

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1893 श्री.गडकरी....

चौकशी करुन त्या पैकी काही तक्रारी पोलिसांकडे वर्ग करुन संबंधिताच्या विरुध्द गुन्हा दर्ज करण्याची गरज आहे तेव्हा त्याप्रमाणे कारवाई केली जाईल काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील :सभापती महोदय,सचिवांची बदली होत नाही असे सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मघाशी सांगितले होते. त्या सदर्भात मी त्यांना सांगू इच्छितो की, चार महिन्यापूर्वी तेथील सचिवांची बदली करुन मंत्रालयीन स्तरावरील उप सचिवांची त्या ठिकाणी नेमणूक केलेली आहे. तक्रारीच्या बाबतीत जो मुद्दा उपस्थित करण्यात आला होता त्या बाबतीत आजच डायरेक्टर, मार्केटीगला आदेश काढले जातील. चौकशीच्या संदर्भातील प्राथमिक अहवाल शासनाला प्राप्त झालेला आहे त्या अनुषगाने या चौकशीत जे मुद्दे प्राप्त झालेले आहेत त्या संदर्भात संचालकांकडून खुलासा मागवला जाईल. या प्रकरणी संपूर्ण चौकशी झाल्यानंतर त्यामध्ये जे कोणी दोषी आढळून येतील त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.त्याचबरोबर या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संदर्भात शासन स्तरावरील दोन वरिष्ठ अधिका-यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.शासनाचे जे नियम आहेत त्या नियमाप्रमाणे जर संचालक मंडळ काम करणार नसेल तर सेक्शन 45 ची सुध्दा तरतूद करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर मध्यतरी त्या ठिकाणी एका अधिका-याचा खून झाला होता आणि त्याची सी.आय.डी.मार्फत चौकशी सुरु आहे..खुनाचे कारण वेगळे आहे.कोणंत्याही परिस्थितीमध्ये गैरव्यवहार करणा-यांना शासन पाठीशी घालणार नाही.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, हजारो शेतक-यांच्या आणि गावक-यांच्या जीवनाशी सबंधित हा प्रश्न आहे.मला असे विचारावयाचे आहे की,या समितीसाठी जेवढा कार्यकाल ठरविण्यात आला होता त्यापेक्षा सुध्दा जास्त कार्यकाल लोटला आहे.जे संचालक किंवा जे अधिकारी या भ्रष्टाचाराला जबाबदार असतील त्यांनी हा भ्रष्टाचार पुढे चालू ठेवू नये यासाठी ताबडतोबीने त्यांच्या विरुध्द शासनाने आता काय कारवाई केलेली आहे ? जर शासनाने कारवाई केलेली नसेल तर ती कारवाई शासन कधी करणार आहे ?

श्री.हर्षवर्धन पाटील :या चौकशीमध्ये दोन महत्वाचे विषय आहेत. त्यापैकी अनियमितता हा एक विषय असून आर्थिक गैरव्यवहाराच्या संदर्भात ज्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत .त्याची चौकशी सुरु आहे त्यासंबंधीचा दुसरा विषय आहे. साधारणपणे कृषी उत्पन्न बाजार समितीला कोणतेही काम करावयाचे असले तरी सेक्शन 12(1) प्रमाणे परवानगी घ्यावी लागते.

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

परंतु या संदर्भात 12(1) ची परवानगी घेतली गेलेली नाही. तो अनियमिततेचा भाग आहे. त्याचे पुरावे मागितले आहेत. तसेच गैरव्यवहारासंबंधात माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले आहे त्याच्या बाबतीत चौकशी सुरू आहे आणि त्याचे अंतिम खुलासा डायरेक्टरकडून मागविणार आहोत.

श्री. जयंत प्र. पाटील : अध्यक्ष महाराज, या कृषी उत्पन्न बाजार समितीने नोकर भरती करण्यासंबंधात एजन्सी नेमल्याचे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे. तर कृषी उत्पन्न बाजार समितीची अशी एजन्सी नेमण्याचा अधिकार संचालक मंडळाला आहे काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : अध्यक्ष महाराज, त्या संदर्भातील हिअरींग माझ्याकडे, माझ्या दालनात चालू आहे. म्हणून याबाबतीतील जो एपीएमसी ॲक्ट आहे त्यामध्ये निरनिराळ्या प्रकारच्या कामकाजामध्ये एजन्सी नेमता येऊ शकतात. परंतु नोकर भरतीसाठी एजन्सी नेमली जाऊ शकते काय याची स्पष्टता होत नाहीए. मात्र एपीएमसी ॲक्टमध्ये अशा बऱ्याचशा तरतुदी आहेत, विशेषत: मागासवर्गीयांच्या नोकर भरतीच्या बाबतीतील हा प्रश्न असल्याने त्याबाबत कायद्याप्रमाणेच अमलबजावणी केली जाईल.

मेजर सुधीर सावंत : अध्यक्ष महाराज, यामध्ये भ्रष्टाचाराचे सर्वात उत्तम उदाहरण आहे आणि ते म्हणजे गुप्त पध्दतीचा लिलाव. तत्कालीन मुख्यमंत्री जेव्हा सन्माननीय श्री.विलासराव देशमुख होते त्यावेळी त्यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये आले असताना स्पष्ट आश्वासन दिले होते की, एपीएमसीमध्ये ओपन पध्दतीने लिलाव केला जाईल, आणि त्यादृष्टीने तेव्हा कायदाही करण्यात आला. परंतु अजूनही तेथे गुप्त पध्दतीनेच लिलाव चालू आहे. तर भ्रष्टाचाराचे हे जे उदाहरण आहे ते आपल्या चौकशी अहवालामध्ये आहे काय ? आणि ओपन पध्दतीने लिलाव तेथे केव्हा सुरू केला जाईल ?

श्री. हर्षवर्धन पाटील : अध्यक्ष महाराज, शेतकऱ्यांनी आणलेल्या मालाचा लिलाव हा खुल्या पध्दतीने झाला पाहिजे असा कायदा आहे. म्हणूनच आम्ही याबाबतीतील आदेश पुन्हा निर्गमित करीत आहोत. मुंबईच्या कृषी उत्पन्न बाजार समितीने या चालू हंगामामध्ये 12 तारखेपासून जो आंब्याचा लिलाव सुरू होणार आहे तेव्हापासून खुल्या पध्दतीनेच लिलाव करण्यात येईल. आणि त्याची सुरूवात आंब्यापासून करण्यात येईल.

****

..... इ 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तापी सिंचन विकास मंडळाअंतर्गत शेळगांव बॅरेजचे वाघुर, वाघोद तसेच दुन्हा लिमजेंडी उपसा सिंचन योजनेचे बांधकाम अपूर्ण असल्याबाबत

(6)* 3634 श्री. गुरुमुख जागवानी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन जडकरी , श्री. प्रतापराव सोनवजे , श्री. विनोद तावडे , श्री. श्रीकांत जोशी , श्री. मधुकर चव्हाण : सन्मानीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री पुढील जोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) तापी सिंचन विकास मंडळाअंतर्गत शेळगांव बॅरेजचे वाघुर, वाघोद तसेच दुन्हा निमजेंडी उपसा सिंचन योजनेचे बांधकाम सुमारे 5 वर्षापासून अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त योजनांचे बांधकाम अपूर्ण अवस्थेत राहण्याची कारणे काय आहेत,
(3) असल्यास, उक्त योजनांचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(4) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ.सुनील देशमुख, श्री. अजित पवार यांच्याकरिता : (1) होय, तापी महामंडळांतर्गत शेळगांव बॅरेज, वाघूर प्रकल्प व दुन्हा वढोदा उपसा सिंचन योजना प्रगतीपथावर आहेत.
वाघोद नावाचा कोणताही प्रकल्प तापी पाटबंधारे विकास महामंडळाच्या कार्यक्षेत्र नाही.
(2) मा.राज्यपाल यांच्या अनुशेषा संदर्भातील जिल्हानिहाय उपलब्ध तरतुदी अंतर्गत प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत.
(3) मा.राज्यपाल महोदयांच्या अनुशेषासंदर्भातील निर्देशानुसार जिल्हानिहाय होणाऱ्या निधीच्या उपलब्धतेनुसार या योजनांची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. गुरूमुख जागवानी : सभापति महोदय, तापी सिंचन विकास मडल के अन्तर्गत शेळगांव बॅरेज का प्रोजक्ट पिछले 5 साल से बंद है, इसलिए भुसावल तालुका के बासोदा, रावदा इत्यादि गांवों में पीने के पानी की इतनी तकलीफ है कि जानवरों को पिलाने के लिए भी पानी नहीं है. अगर यह प्रोजक्ट पूरा नहीं हुआ तो लगभग 40 हजार की जनसंख्या मायग्रेशन करने के लिए तैयार है. पानी की कमी होने से भुसावल का वेस्ट वाटर इन गांवों में सप्लाय किया जाता है, यह गंदा पानी है. मेरा पहला सवाल यह है कि शेळगांव बॅरेज प्रकल्प को पूरा करने के लिए कितना प्रोवीजन किया गया है ? मेरा दूसरा प्रश्न वाघुर प्रकल्प के बारे में है. 1978 में इस योजना को मंजूरी मिली थी. उस समय इस प्रकल्प की कॉस्ट 34 करोड़ रुपए थी, जो कि आज

..... इ 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जागवानी .... ता.प्र.क्र. 3634 ...

400 करोड़ रुपए हो गई है. जलगांव में पीने के पानी की टंचाई है, अगर यह प्रकल्प पूरा हो गया तो वहां पर पीने के पानी की तकलीफ खत्म हो जाएगी. मेरा प्रश्न यह है कि वाघुर प्रकल्प के लिए कितने पैसे की आवश्यकता है और इस प्रकल्प को पूरा करने के लिए शासन की तरफ से कौन से उपाय किये गये हैं ?

डॉ. सुनील देशमुख : अध्यक्ष महाराज, वाघूर प्रकल्पासाठी सध्याच्या परिस्थितीत 131 कोटीची अजून आवश्यकता आहे आणि एआरडीपीमध्ये हा प्रकल्प घेतलेला असून 2004-05 मध्ये या प्रकल्पासाठी 5.41 कोटी इतका निधी दिला होता आणि त्यापैकी 4.41 कोटी खर्च केलेला आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार, म्हणजे निधी व्यवस्थित असेल तर 2007-08 पर्यंत हा प्रकल्प पूर्ण होईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : अध्यक्ष महाराज, या ठिकाणी आम्ही प्रश्न 1 मध्ये विचारले आहे की, तापी सिंचन विकास मंडळांतर्गत शेळगाव बॅरेजचे वाघूर, वाघोद तसेच कुऱ्हा निमखेंडी उपसा सिंचन योजनेचे बांधकाम सुरू 5 वर्षांपासून अपूर्ण आहे हे खरे आहे काय ? तर त्याला उत्तर देताना 'होय, खरे आहे' असे उत्तर दिलेले आहे आणि पुढे सांगितले आहे की, तापी महामंडळांतर्गत शेळगाव बॅरेज, वाघूर प्रकल्प व कुऱ्हा वढोदा उपसा सिंचन योजना प्रगतीपथावर आहेत. म्हणजे हे प्रकल्प अपूर्ण आहेत काय विचारले असता, हे खरे आहे असे सांगत आहेत आणि दुसऱ्या बाजूला ते प्रगतीपथावर आहेत असेही सांगत आहेत. तर आम्ही यामध्ये खरे काय समजायचे ? ...

(यानंतर श्री.जागडे .... एफ 1 ...

अशुद्धीत प्रत / परिपक्वीसाठी नाही

....3634....

श्री. पांडुरंग फुंडकर...

माझा दुसरा प्रश्न असा आहे की, 2003-04 आणि 2004-05 या आर्थिक वर्षात या प्रकल्पासाठी किती रकमेची तरतूद करण्यात आली होती ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, प्रश्नाला दिलेले उत्तर बरोबर आहे. प्रकल्प अपूर्ण आहे. या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे हा प्रकल्प 2007-08 मध्ये पूर्ण करण्यात येणार आहे. 2004-05 मध्ये 5.41 कोटीचा नियतव्यय दिला होता. त्यापैकी 4.41 कोटी रुपये खर्च झाले आहेत. यामध्ये एक कोटी रुपये शिल्लक आहेत. त्याच्या मागील वर्षी 10.68 कोटी रुपये आणि त्याच्या मागील वर्षी 12.15 कोटी रुपये दिले होते. आता पैसे उपलब्ध झाल्यानंतर 2007-08 मध्ये हा प्रकल्प पूर्ण करणार आहोत.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या ठिकाणी जे उत्तर देण्यात आले आहे, ते बरोबर नाही. उत्तरामध्ये असे म्हंटले आहे की, " मा. राज्यपाल यांच्या अनुशेष संदर्भातील जिल्हानिहाय उपलब्ध तरतुदी अंतर्गत प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत." तसेच प्रश्न क्र. 3 ला असे उत्तर दिले आहे की, " मा. राज्यपाल महोदयांच्या अनुशेषासंदर्भातील निर्देशानुसार जिल्हानिहाय होणा-या निधींच्या उपलब्धतेनुसार या योजनांची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे." आता जर या ठिकाणी निधी उपलब्ध झाला नाही तर या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे, असे कसे म्हणता येईल ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, या प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून पैसा येत आहे. त्याप्रमाणे पैसे आले तर त्या पैशातून हे काम करु.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपणाला जो काही निधी द्यावयाचा आहे तो द्या. परंतु सभागृहाची दिशाभूल करु नका. या ठिकाणी असे उत्तर देण्यात आले आहे की, " मा राज्यपाल यांच्या अनुशेषा संदर्भातील जिल्हानिहाय उपलब्ध तरतुदी अंतर्गत प्रकल्पाची कामे पूर्ण करण्याच नियोजन आहे. " आता आपण राज्यपालांच्या निर्देशाचे कितपत पालन केले आहे, हे मी नंतर अर्थसंकल्पावर बोलत असताना सांगणार आहे. या जिल्ह्याचे बॅकलॉगचे पैसे आपण दिलेले नाहीत. या वर्षाच्या अर्थसंकल्पामधून पाटबंधा-यावरील बजेटच गायब करण्यात आले आहेत. केंद्र सरकारकडून मिळणारा आणि इतर ठिकाणाहून मिळणारा निधी याचा विचार करता शासन यासाठी किती रकमेची तरतूद करणार आहे. मा. राज्यपालांनी निर्देश दिले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.....

असताना या प्रकल्पासाठी गेल्या तीन वर्षात त्यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे पैसे दिले नाहीत. या जिल्ह्यातील बॅकलॉग दूर करण्यासाठी पैसे दिले नाहीत. आता आपण या वर्षी तरी या प्रकल्पासाठी निधी देणार आहांत काय ? मा. राज्यपालांनी दिलेले निर्देश आपणावर बंधनकारक होते. त्यांनी दिलेल्या निर्देशानुसार या प्रकल्पासाठी रकमेची तरतूद करण्याची आवश्यकता होती. तशा प्रकारची तरतूद आपण करणार आहांत काय ? जर तेवढी तरतूद आपणाला करता येणे शक्य नसेल तर या ठिकाणी मा. राज्यपालांचे नांव घेऊ नका. मा. राज्यपालांचे नाव घेऊन आपण सभागृहाची दिशाभूल करु नका. आपण राज्यपालांच्या आदेशांना केराची टोपली दाखविली आहे. मा. राज्यपालांनी निर्देश दिले असतानाही त्या निर्देशांचे पालन गेली चार वर्षे झालेले नाही. आता आपल्यात हिम्मत असेल तर असे सांगा की, आम्ही मा. राज्यपालांच्या निर्देशाचे पालन केलेले आहे. तेव्हा चुकीची माहिती देवून कृपया सभागृहाची दिशाभूल मा. मंत्रिमहोदयांनी करु नये. या ठिकाणी उत्तरामध्ये आपण असे सांगितले आहे की, " मा. राज्यपाल महोदय यांच्या अनुशेषा संदर्भातील जिल्हानिहाय उपलब्ध तरतुदी अंतर्गत प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत. " घटनेच्या कलम 371 नुसार मा. राज्यपालांनी हे निर्देश दिले आहेत. तेव्हा माननीय राज्यपालांनी जे निर्देश दिले आहेत, त्याप्रमाणे तरतुद करण्यात आलेली नाही. त्यामुळे गेल्या तीन वर्षात जी रक्कम दिलेली नाही, ती रक्कम आणि या वर्षाची रक्कम कोणत्याही परिस्थितीत या प्रकल्पासाठी देण्यात येऊन या प्रकल्पाची कामे करण्यात येतील, असे आपण उत्तर द्या. नाहीतर मा. राज्यपालांचे नाव घेऊ नका. तीन वर्षे आपण दिलेल्या आश्वासनाप्रमाणे वागला नाहीत. तर आपण असे आश्वासन का देता. सभापती महोदय, चुकीची माहिती रेकॉर्डवर राहता कामा नये.

(यानंतर श्री. सरफरे...

अशुद्धीत पत्र / शुद्धीपत्र नाही

ता.प्र.क्र. 3634....

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी तीन वर्षाची माहिती मागितली आहे ती माहिती घेऊन मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

श्री. नितीन गडकरी : कशासाठी पटलावर ठेवता? माझ्याजवळ ती माहिती आहे. गेल्या तीन वर्षामध्ये माननीय राज्यपालांनी उत्तर महाराष्ट्रासाठी, या जिल्हयासाठी अनुशेषाच्या संदर्भात जिल्हा निहाय किती रक्कम दिली याची माहिती आहे. अर्थसंकल्पावरील भाषणाच्या वेळी ती माहिती मी देणार आहे. तुम्ही दिलेल्या आकडेवारीनुसार आणि माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशानुसार केलेली तरतूद आणि उरलेली रक्कम हा खर्चाचा तपशील आहे. त्यामध्ये जळगाव जिल्हयाची तीन वर्षाची आकडेवारी दिली आहे. मी आपल्याला ही तरतूद या ठिकाणी काढून दाखवितो. आपण मला एवढे सांगा की, मागील तीन वर्षात माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार जेवढी तरतूद होती तेवढी तरतूद तुम्ही या जिल्हयाला दिलेली नाही. हे माझे म्हणणे खरे आहे की चुकीचे आहे? हे सांगा. माननीय राज्यपालांनी चौथ्या वर्षाची रक्कम धरुन तेवढी रक्कम यावर्षी पुन्हा आली, त्याची आकडेवारी दिली आहे. तेवढी तरतूद या वर्षी या जिल्हयाला देऊ असे ठाम आश्वासन देणार असाल तर द्या. अन्यथा, या उत्तरामध्ये दुरुस्ती करा. आम्ही निदेशाचे पालन करतो असे कशासाठी सांगता? तीन-चार वर्षे आपण माननीय राज्यपालांच्या निदेशांना केराची टोपली दाखविली. मा. राज्यपालांच्या निदेशाप्रमाणे नियोजन करु असे म्हणता परंतु करीत नाही तर मग कशाला बोलता?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी या जिल्हयासाठी दिलेल्या निदेशाचे पुरेपूर पालन करु, त्यामध्ये अडचण येणार नाही. जेवढे पैसे देय आहेत तेवढे पैसे त्या जिल्हयासाठी देणार आहोत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मंत्रिमहोदय सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. तरतूद केल्यावर तिचे पालन न करणे ही वेगळी बाब आहे. परंतु 2005-06 या वर्षासाठी 4685.46 कोटी रुपयांची तरतूद करण्याचे निदेश माननीय राज्यपालांनी दिनांक 25 फेब्रुवारी 2005 रोजी दिले. परंतु या वर्षीच्या परवाच्या अर्थसंकल्पामध्ये तशी तरतूद केली नाही. म्हणून मी स्पेसिफिक प्रश्न विचारतो की, माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशानुसार 4685.46 कोटी तरतूद

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पाटबंधारे खात्यासाठी करण्यासाठी निदेश दिले हे खरे आहे काय? ही तरतूद केली असेल तर या अर्थसंकल्पामध्ये 4685.46 कोटींची तरतूद पाटबंधारेसाठी केली आहे काय? तिसरा प्रश्न असा की, उत्तर महाराष्ट्रातील जळगाव जिल्हयासाठी किती कोटी रुपयांची तरतूद केली आहे?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी जे निदेश दिले त्याप्रमाणे 4685.46 कोटी रुपयांची तरतूद करण्याचे महाराष्ट्र सरकारला कळविले. परंतु महाराष्ट्र सरकारचा जो ॲन्युअल प्लॅन आहे तो 11 हजार कोटी रुपयांपर्यंत सीमित करण्याचे ठरविले असल्यामुळे त्या अनुषंगाने सर्व खात्यांवर पैसे खर्च करणे अभिप्रेत होते.

श्री. नितीन गडकरी : तुम्हाला द्यायचे नसतील तर देऊ नका. महाराष्ट्राचे ॲडव्होकेट जनरल यांनी महाराष्ट्र विधान परिषदेत येऊन त्यांनी त्यावेळी दिलेली प्रतिक्रिया रिटर्न मत घटनेच्या 371(2)(8) खाली तुम्हाला दिलेले निदेश तुमच्यावर बंधनकारक आहेत. तुम्ही गेल्या तीन वर्षात बजेटमध्ये त्याचे पालन केले नाही. तुम्ही त्यांना केराची टोपली दाखविली. या वर्षी 4685.46 कोटी रुपयांची तरतूद करण्याचे निदेश 25 फेब्रुवारी रोजी माननीय राज्यपालांनी दिले. तर तुम्ही किती तरतूद केली? फक्त 1900 कोटी रुपये . मला सांगा तुम्ही माननीय राज्यपालांच्या म्हणण्यानुसार त्यांच्या आदेशाचे पालन करीत नाही. तीन वर्षात पालन केले नाही. या वर्षी जेवढी रक्कम आहे तेवढी तरतूद केली नाही. आणि उत्तरामध्ये आपण कशासाठी सांगता? तुम्ही मोकळेपणाने सांगा की, माननीय राज्यपालांनी काय निदेश दिले? आम्हाला माहीत नाही, भारताची राज्यघटना आम्हाला माहीत नाही जे दिले ते दिले, त्याला केराची टोपली दाखविली, त्यांना त्याचे घेणे नाही. तुम्हाला जे करायचे आहे ते तुम्ही करुन घ्या.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 3634 . . . .

श्री.नितीन गडकरी . . . .

विदर्भ,मराठवाडा, कोकण, उत्तर महाराष्ट्रातील लोक, आम्ही जे करावयाचे असेल ते करु. आम्ही दगडावर कपाळमोक्ष करु. पण कमीतकमी येथे कशाला लिहीता ? याठिकाणी दुस-या प्रश्नाच्या उत्तरामध्ये म्हटलेले आहे की,"मा.राज्यपाल यांच्या अनुशेषा संदर्भातील जिल्हानिहाय उपलब्ध तरतुदी अंतर्गत प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत." कशाची प्रगतीपथावर आहेत ? गेली तीन वर्षे तुम्ही माननीय राज्यपालांचे आदेश पाळलेले नाहीत, निधी दिलेला नाही. दोन कोटी, चार कोटी रुपये देता आणि ते सांगतात 15 कोटी आणि येथे म्हणता की, कामे प्रगतीपथावर आहेत ? कशाला येथे लिहीता ? तसेच याठिकाणी तिस-या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की,"मा. राज्यपाल महोदयांच्या अनुशेषासंदर्भातील निर्देशानुसार जिल्हानिहाय होणा-या निधीच्या उपलब्धते नुसार या योजनांची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे." कशाचे नियोजन आहे ? तुम्ही आमची का दिशाभूल करता ? आम्ही येथे पानठेल्याच्या टपरीवर बसलो आहोत काय ? माननीय उपमुख्यमंत्री म्हणतात की, माझे ऑफीस म्हणजे पानठेला आहे, तसे आम्ही आहोत का ? अहो, प्रश्न समजून घ्या. त्याचे तुम्ही उत्तर देत नाही. तुम्ही आमच्यापासून लपवून ठेवत आहात. याचे उत्तर असे आहे की, माननीय राज्यपालांनी तीन वर्षाचा हिशोब करुन यावर्षी तुम्हाला 4685 कोटी रुपयांची तरतूद करावयास सांगितले होते. पण गेल्या तीन वर्षामध्ये तुम्ही काही केलेले नाही. यावर्षी 1900 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. माननीय राज्यपालांनी 4685 कोटी रुपयांचे आदेश दिले, निर्देश दिले, डायरेक्शन्स् दिल्या आणि याठिकाणी 1900 कोटी रुपयांची तदतूद केली. मग पूर्ण पैसे कसे मिळणार आहेत ? ते मिळणारच नाहीत, मग उत्तरात कशाला सांगता ? सांगू नका. मग असे सांगा की, उत्तर असे-असे आहे आणि मला उत्तरात दुरुस्ती करावयाची आहे. सभापती महोदय, मला माफ करा, माननीय राज्यपालांनी दिलेल्या निर्देशाचे आम्ही पालन करु शकत नाही. जेवढे जमेल तेवढे देऊ. असे उत्तर द्या. उत्तर दुरुस्त करा. एकीकडे पैसे देत नाही आणि उलट राणा भीमदेवीथाटामध्ये उत्तरे देता की, आम्ही पैसे देऊ, आम्ही पालन केले. हे कशाला लिहीता ? जर पैसे द्यावयाचे नाहीत तर कमीतकमी बोलू तरी नका. यामध्ये लिहू तरी नका. यात दुरुस्ती करा. हा माझा हरकतीचा मुद्दा आहे आणि यामध्ये माझे काय चुकले आहे ते मला सांगा.

. . . .एच-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.नितीन गडकरी यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे, तो खरा आहे की, माननीय राज्यपालांनी सन 2005-2006 साठी 4685 कोटी रुपयांची तरतूद करण्यासाठी शासनाला निर्देश दिले होते. त्यानंतर शासनाने त्यांना सर्व प्लॅन समजावून सांगितला की,आपण राज्याचा प्लॅन हा 19 हजार कोटी रुपयावरुन 11 हजार कोटी रुपयांवर आणलेला आहे. त्यामुळे यामध्ये या-या अडचणी आहेत. त्यानंतर यावर्षी 1900 कोटी रुपये इरिगेशन विभागासाठी किंवा सिंचन विभागाला दिलेले आहेत आणि त्याचाही माननीय राज्यपालांना प्लॅन सबमिट केला होता आणि त्यांनी परवानगी दिल्यानंतरच आपण तो यामध्ये टाकलेला आहे. आम्ही 1941 कोटी रुपयांसाठी देखील माननीय राज्यपालांची परवानगी घेतलेली आहे. पहिल्यांदा माननीय राज्यपालांनी 4685 कोटी रुपयांसाठी निर्देश दिले होते. त्याचे आम्ही पालन करु शकत नाही हे माहिती असल्यामुळे आम्ही पुन्हा त्यांच्याकडे गेलो आणि वित्त विभागाने व नियोजन विभागाने त्यांना सर्व गोष्ट समजावून सांगितली की, आम्ही आमचा ॲन्युअल प्लॅन 19 हजार कोटीवरुन 11 हजार कोटीपर्यंत श्रिंक केलेला आहे. यावर्षी आम्ही एकही पैसा मार्केटमधून, बॉण्डच्या माध्यमातून उभे करणार नाही. यापूर्वी आपण जेव्हा-जेव्हा बॉण्डव्दारे पैसे उभे करण्यासाठी बॉण्ड रेज केले होते, त्याला चांगला प्रतिसाद मिळाला नाही. फक्त आकडेवारी चांगली दिसते की, 4000 कोटी रुपये आपल्याला मिळाले. पण आपल्या हातात 200 कोटी रुपयांपेक्षा कमी पैसे मिळाले होते. या सर्व गोष्टींचा विचार करुन, यंदा जे पैसे द्यावयाचे आहेत, ते आपल्या बजेटमधून, तिजोरीतून देणार आहोत. बॉण्डच्या माध्यमातून किंवा मार्केटमधून एकही पैसा उभा करणार नाही. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन प्लॅनिंग कमिशनने 11 हजार कोटीचा प्लॅन मंजूर केलेला आहे. त्यामुळे या चौकटीत बसविण्याकरता 4685 कोटी रुपयांपैकी 1900 कोटी रुपयांसाठी परवानगी द्या, अशी परवानगी मागण्यासाठी आम्ही माननीय राज्यपाल महोदयांकडे गेलो होतो आणि त्यांच्या निर्देशानुसार आम्ही काम केलेले आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, दिनांक 25 फेब्रुवारी रोजी घटनेच्या 371(2) कलमाप्रमाणे ज्या डायरेक्शन्स् तुम्हाला माननीय राज्यपाल महोदयांनी दिल्या होत्या, तेवढी तरतूद तुम्ही केली नाही. तुम्ही करु शकत नाही आणि तुम्ही एक नवीन सांगितले की, यावर्षी आम्ही बॉण्डव्दारे पैसेच घेणार नाही आणि 11 हजार कोटी रुपयांचा प्लॅन केला आहे. म्हणजे जे काही

. . . .एच-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

तुम्ही सांगता ते. मग तुम्हाला 25 फेब्रुवारी रोजी दिलेल्या निर्देशानंतर या अमाऊंटच्या बाबतीत घटनात्मकरित्या बंधनकारक असतानाही, याबाबतीतील रिलॅक्सेशन देणारे पत्र, एकतर माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुखसाहेब, माझ्या घटनेच्या ज्ञानाप्रमाणे एकदा दिलेल्या डायरेक्शनला अशा प्रकारची दुरुस्ती करणे, पुन्हा ते वापस घेणे हे घटनेमध्ये नाही. मग या घटनेच्या पत्राला माननीय राज्यपालांनी रिलॅक्सेशन दिल्याबाबत त्यांनी तुम्हाला काही पत्र दिले आहे का ? दुसरा प्रश्न असा की, तुम्ही जर त्याप्रमाणे करीत नाही, तर उत्तरामध्ये कशासाठी राणा भीमदेवी थाटामध्ये माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार या जिल्हयात तरतूद करण्याचे नियोजन आहे. हे कशाला बोलता ? जे तुम्हाला करावयाचे नाही , त्याची खोटी आश्वासने कशाला देता ? मला सांगा की, 25 फेब्रुवारीला माननीय राज्यपालांनी निर्देश दिलेले जे पत्र होते, 4685 कोटी रुपयांचे इरिगेशनच्याबाबतीत. त्याला रिलॅक्सेशन देणारे पत्र, दुसरे दुरुस्ती पत्र, बजेट करण्याच्या अगोदर तुम्हाला माननीय राज्यपालांनी दिलेले होते का ?

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3634 (पुढे चालू...

डॉ.सुनील देशमुख : मी असे सांगितले की,इरिगेशन विभागाचा 4,685 कोटीचा प्लॅन होता. तो 19000 कोटीवर अवलंबून होता. मी प्लॅनिंग कमिटीमध्ये स्वत: होतो. वारंवार सांगूनही प्लॅनिंग कमिटने नकार दिला...

श्री.नितीन गडकरी : जेव्हा कर्जरोखे मिळतात, एलआयसीकडून कर्ज मिळते,ते 1450 कोटी रुपये कर्ज दुष्काळाच्या नावाने तिकडे देऊन टाकले. दुष्काळासाठी पैसे दिले, त्याला आमचा विरोध नाही. त्यावेळेस मी सांगितले होते की, महाराष्ट्रात दुष्काळ असेल तर सरकारचा सगळा खजिना खाली करा. पण जेव्हा आमच्या मागासलेल्या भागाला पैसे देण्याची वेळ आली,त्या संदर्भात मा.राज्यपाल महोदयांनी निर्देश दिले तरी पण पैसे मिळत नाहीत. त्यानंतर मा.राज्यपालांनी त्याबाबत रिलॅक्सेशन दिले असल्याचे आपण आता सांगत आहात. सभापती महोदय, भारतीय घटनेच्या कलम 371 (2) (8) खाली दिलेल्या निर्देशाप्रमाणे गव्हर्नमेंटला हे बंधनकारक आहेत. राज्यपाल महोदय देखील आपले आदेश परत घेऊ शकत नाहीत.

डॉ.सुनील देशमुख : रेकॉर्डवर चुकीचे राहू नये, म्हणून मी सांगतो. मी असे सांगितले की, पाटबंधाऱ्यांचा 4,685 कोटीचा प्लॅन होता. तो 1900 कोटीचा केला. त्यामध्ये महाराष्ट्र शासन स्वत:चे काही पैसे त्यामध्ये देणार आहे, ते मा.राज्यपालांच्या फॉर्मूल्याप्रमाणेच देणार आहे. त्याची टक्केवारी आणि जो केंद्राकडून अेआयबीपीच्या मार्फत आणि नाबार्डच्या मार्फत पैसा उपलब्ध होणार आहे, तो प्रकल्पनिहाय पैसा येत असल्यामुळे...

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, अतिशय लहानसा मुद्दा या प्रश्नाच्या निमित्ताने उपस्थित झाला असला तरी महत्वाचा असा आहे की, यावर्षी मा. राज्यपालांनी 25-2-2005 रोजी 4,685 कोटीची ऑर्डर काढलेली आहे. ही कॉन्स्टीट्युशनल ऑर्डर आहे. मी एक गोष्ट स्पष्ट करु इच्छितो की, मा.राज्यपालांना 371 (2) प्रमाणे राष्ट्रपतींनी त्यांना 9 मार्च 1994 ला अधिकार दिला आणि त्या अधिकाराचा वापर करुन, त्यांनी डायरेक्शन इश्यु केल्यात. आपला ॲन्युअल प्लॅन 19000 कोटीचा आहे की, 11000 कोटीचा आहे, तो कमी केला की नाही, हे येथे इररिलव्हंट आहे. कॉन्टीट्युशनल ऑर्डर दिनांक 25-2-2005 रोजी त्यांनी पास केलेली आहे, त्याला अमेंडींग ऑर्डर पास केलेली आहे काय ? नसेल तर त्या आदेशाची अंमलबजावणी होईल काय ?

आय 2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Shri Nitin Gadkari: Mr. Deputy Chairman, Sir, as per my knowledge, a Constitutional Order cannot be amended by issuing a letter.

Shri B.T. Deshmukh Sir, it can be amended by issuing a further Constitutional Order. नसेल तर सप्रेम नमस्कार विनंती विशेष,अशी गोष्ट राहील. But, in accordance with the powers conferred upon the Hon'ble Governor, it can be amended by further Constitutional Order. परंतु अशी ऑर्डर दिनांक 25-2-2005 ला काढलेली आहे. या या कलमाप्रमाणे मी हे आदेश पारित करीत आहे, असे त्यामध्ये म्हटलेले आहे. त्याबाबत मला अशी स्पष्ट माहिती पाहिजे की, दिनांक 25-2-2005 च्या त्यांच्या कॉन्स्टीट्युशनल ऑर्डरला फरदर अमेंडमेंट करुन, अशा प्रकारची आर्डर ही काढलेली आहे काय ? काढलेली असेल तर सभागृहाच्या पटलावर कोणत्या तारखेला ठेवण्यात आली ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख साहेबांनी ज्या पत्राचा उल्लेख केला, ते पत्र येणाऱ्या काळात मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. कोणत्या तारखेला त्यांनी त्यामध्ये सुधारणा केली, कोणत्या तारखेला 4685 कोटीचा प्लॅन 1900 कोटीवर आणला, त्याप्रमाणे आम्ही त्यांना कळविले, ती सगळी माहिती मी पटलावर ठेवतो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

विदर्भातील ज ापूस संज ल ेंद्रावरील ज ापूस जरेदी ेंद्र माहे डिसेंबर, 2004 रोजी बंद े ल्याबाबत

(7) * 1945 श्री. संजय दत्त , मेजर सुधीर सावंत , श्री. यशवंतराव जडाज , श्री. मुझफ्फर हुसे-ा सय्यद , श्री. -ातिज ोद्दी-ा जतिब , श्री. पांडुरंज फुंडज र , श्री. श्रीज ंत जोशी , श्री. जजदिश जुप्ता , श्री. ि-ती-ा जडज री , श्री. वि-ोद तावडे : स-मा-ा-नीय पज-ा मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा ज रतील ज ाय :-

(1) विदर्भातील ज ापूस संज ल-ा ेंद्रावरील ज ापूस जरेदी ेंद्र माहे डिसेंबर, 2004 रोजी वा त्या सुमारास बंद ज रज्यात आल्यामुळे दुरवरु-ा आलेल्या शेतज ्यां-ा उपाशीपोटी थंडीवा ्यात अ-ेज दिवस ुडु डत ज ाढावे लाज त आहे, हे जरे आहे ज ाय,

(2) असल्यास, ज ापूस जरेदीस -ाज ार दिल्या-े शेतज ्यांमध्ये असंतोष ि-र्माज होऊ-ा त्यां-ी रास्ता रोज ो आंदोल-ा े ले, हे ही जरे आहे ज ाय,

(3) असल्यास, शास-ा-े या घट-ेची चौज शी े ली आहे ज ाय,

(4) असल्यास, चौज शीत ज ाय आढळू-ा आले व त्या-ुसार ज ापूस संज ल-ा ेंद्रे सुरु ज रज्याबाबत शास-ा-े ज ोजती तातडीची ज ार्यवाही े ली, वा ज रज्यात येत आहे,

(5) अद्याप, ज ोजतीच ज ार्यवाही े ली -ासल्यास विलंबाची ज ारजे ज ाय आहेत ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर श्री. हर्षवर्ध ेंद्र पाटील यांचेकरिता : (1) विदर्भातील ज ाही ज ापूस जरेदी ेंद्रे थोड्या ज ालावधीसाठी ज ाही तांत्रिज ज ारजास्तव योज्य त्या आज ाऊ सूच-ा देऊ-ा बंद ज रज्यात आली होती.

(2) होय, ज ापूस जरेदी ेंद्रावर पज-ा महासंघा-े ज ापूस जरेदीस -ाज ार दिलेला -ाही. परंतू ज ाही विभाज ामध्ये शेतज ्यां-ी ज ापूस जरेदी ेंद्र बंद असू-ा देजील ज ापूस ज ाड्या ेंद्रावर आजू-ा ज ापूस ज ाड्या मोजू-ा घेज्यासाठी बैलज ाड्या व ट्रॅक्टर रस्त्यावर चक्ज ा जाम आंदोल-ा े ल्याची बाब ि-दर्श-ास आलेली आहे.

(3) व (4) याबाबत ज ापूस उत्पादज पज-ा महासंघा-े चौज शी े ली होती. चौज शीमध्ये ज ापूस साठवजूज ज रज्याज रिता ेंद्रांवर पुरेशी ज ाज ा शिल्लज -ासल्यामुळे थोड्या ज ालावधीसाठी ज ाही ेंद्रे बंद ज रज्यात आली होती आजि ज ाज ा उपलब्ध होताच पु-हा त्या ेंद्रावरील ज ापूस जरेदी सुरु ज रज्यात आली आहे.

(5) प्रश-ा उद्भवत -ाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1945 (पुढे चालू...

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, "थोडया कालावधीसाठी काही तांत्रिक कारणास्तव योग्य त्या आगाऊ सूचना देऊन बंद करण्यात आली होती" ही तांत्रिक कारणे कोणती ? कापूस खरेदी किती दिवस बंद ठेवण्यात आली होती ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : कापूस एकाधिकार खरेदीमध्ये जेव्हा कापूस खरेदी केंद्रावर कापूस साठवण क्षमता कमी असते, त्यावेळेस कापूस खरेदी थांबविली जाते, हे काही नवीन नाही. त्याबाबत अगोदर सूचना दिली जाते. कधी पाऊस झाला,कधी गारपीट झाली त्यावेळी खरेदी थांबविली जाते.त्याप्रमाणे विदर्भातील नागपूर विभागामध्ये नागपूर, हिंगणा, बुटीबोरी येथे दोन वेळा दिनांक 30-11-2004 ते 12-12-2004 आणि 6-12-2004 ते 11-12-2004 रोजी दहा खरेदी केंद्रे बंद ठेवलेली होती. वनी विभागामध्ये 128-12-2004 च्या आसपास 9 खरेदी केंद्रे बंद केली होती....

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्रमांक 1945. . .

श्री. जयप्रकाश दांडेगावकर...

यवतमाळ विभागामध्ये 11 केंद्र दिनांक 25-11-2004 ते दिनांक 16-1-2005 पर्यंत बंद होती. अकोला विभागात दिनांक 18.12.2004 च्या आसपास 35 केंद्र बंद होती. अमरावतीमध्ये 21 केंद्र दिनांक 3.1.2005 ला बंद होती. खामगाव विभागात 2 केंद्र दिनांक 8.12.2004 ते दिनांक 15.1.2005 पर्यंत बंद ठेवण्यात आली.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्रश्न क्रमांक 4 च्या उत्तरात असे म्हटले आहे की, "केंद्रे बंद करण्यात आली होती आणि जागा उपलब्ध होताच पुन्हा त्या केंद्रावरील कापूस खरेदी सुरु करण्यात आली आहे." माझा प्रश्न असा आहे की, महाराष्ट्रामध्ये सध्या किती कापूस खरेदी केंद्र सुरु आहेत आणि आतापर्यंत किती कापसाचे जिनिंग मिळाले आहे?

श्री. हर्षवर्धन पाटील : महाराष्ट्रामध्ये आता सध्या कापूस खरेदी केंद्राचे काम पूर्ण झालेले असल्यामुळे आजच्या स्टेजला कुठेही कापूस केंद्र सुरु नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कापूस असे पर्यत तो कापूस खरेदी करण्यात येईल असे मंत्रिमहोदयांनी सांगितले होते.अकोला जिल्हयातील "चांदणी"सेंटरवर आजही गाडया उभ्या आहेत.

श्री. हर्षवर्धन पाटील :सभापती महोदय, ही केंद्र दिनांक 28.2. 2005 ला बंद करण्याचा आदेश दिला होता. परंतु काही सेंटर्सवर ज्यांना पंचनामे करुन टोकन दिलेले आहे, त्यांची खरेदी फक्त चालू ठेवावी, अशा पध्दतीचे आदेश शासनाने पणन महासंघाला.दिलेले आहेत.. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी प्रश्न उपस्थित केला,त्याबाबतची चौकशी केली जाईल आणि त्या प्रमाणे योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय, कापूस केंद्र तांत्रिकदृष्टया बंद करुन पुन्हा चालू केले. ते चालू केल्यानंतर सुध्दा ज्या केंद्राचे मी नांव सांगितले त्या अकोला जिल्हयातील"चांदणी" सेंटरवर जवळपास एक महिना कास्तकारांच्या गाडया उभ्या राहिल्या आहेत. तांत्रिकदृष्टया खरेदी केंद्र बंद करुन पुन्हा चालू केल्यानंतर त्या ठिकाणी कापसाची खरेदी केलेली नाही. आता परवा पर्यंत त्याठिकाणी गाडया उभ्या आहेत. मी या ठिकाणी प्रश्न विचारला की, महाराष्ट्रात किती खरेदी केंद्र सुरु आहेत? त्याला मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले की, "महाराष्ट्रात एकही खरेदी केंद्र सुरु नाही."

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्रमांक 1945. . .

श्री. हर्षवर्धन पाटील : सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी अकोला जिल्हयातील एका सेंटरची माहिती याठिकाणी संगितली. त्याची निश्चितपणाने चौकशी करण्यात येईल. मराठवाडा विभागात काही सेंटर्सच्या बाबतीत शासनाने आदेश काढले होते की, 28 तारखेला पंचनामे करुन जे शेतकरी रांगेत उभे असतील ते केंद्र चालू ठेवले होते. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे की, किती जिनिंग झालेले आहे? किती गाठी तयार झालेल्या आहेत? साधारणत: आतापर्यंत झालेले जिनिंग हे जवळपास 20.86 आहे. जिनिंगची टक्केवारी 37.91 आहे. आणि आज शिल्लक साठा 34.7 लाख क्विन्टल आहे. बांधलेल्या गाठींची सख्या 3.71 आहे.

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, 20 क्विन्टल पर्यंतच्या शेतक-यांचा चुकारा दिलेला आहे. ज्या शेतक-यांचा कापूस 21 क्विन्टल होता त्या शेतक-यांना काहीच रक्कम देण्यात आलेली नाही. तर 20 क्विन्टलच्या पुढचे ज्यांचे चुकारे आहेत त्या शेतक-यांना शासन किती दिवसात रक्कम देणार आहे?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, अधिवेशन संपण्यापूर्वी हमी भावाची रक्कम अदा करण्यात येईल असे मी सांगितलेले असल्यामुळे त्यासंदर्भातील कारवाई चालू आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मंत्रिमहोदय आश्वासन दिलेले आहे त्यामध्ये कापूस खरेदी केलेली उर्वरित रक्कम असे म्हटलेले आहे. त्यामध्ये आपण "हमी भाव" असे म्हटलेले नही. सगळी रक्कम ही अधिवेशन समाप्त होण्याच्या आधी देण्यात येईल, असे आपले आश्वासन आहे. मग हे नवीन काय काढले?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आपण प्रोसिडिंग काढून बघा. आपण जी.आर. काढलेला आहे. हमी भावाची रक्कम अधिवेशन संपण्यापूर्वी देण्यात येईल असे म्हटलेले आहे आणि या अग्रीमाचा जी.आर. मे आणि ऑक्टोबर मध्ये काढलेला आहे. आपण रेकॉर्ड तपासून बघा. मी या सभागृहात सांगितले आणि खालच्या सभागृहातही संगितले आहे. हमी भावाची 3742 कोटी रुपयाच्या आसपास जी किंमत आहे, ती रक्कम अदा करु असे सांगितलेले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, 20 क्विन्टलच्या कापूस उत्पादक शेतक-यांच्या पेमेंटच्यासंबंधी आमचे मित्र श्री. रघुवंशी यांनी सांगितले की, त्यांच्या विभागात 20 क्विन्टंलपर्यंतचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पूर्ण पेमेंट दिलेले आहे. विदर्भात हे वाटप अतिशय धिम्या गतीने सुरु आहे. याबाबतीत मी मंत्रिमहोदयांना दोष देत नाही. डॉ. पतंगराव कदम यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या ठिकाणी पैसा ॲलॉट झाल्यानंतर बँन्का अडवणुकीचे धोरण स्वीकारीत आहेत. विदर्भातील खामगांव झोन असेल, अकोला झोन असेल मी त्या ठिकाणची चौकशी केली असता, परवाच त्यांनी सांगितले की, त्या ठिकाणी 31 डिसेंबरपर्यंतचे पेमेंट झालेले आहे. दिनांक 1 जानेवारीपासून आजतागायत पर्यंतचे पेमेंट बाकी आहे.

यानंतर श्री. बरवड ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोणी विचारले तर बँका अडवणूक करतात, बँका सहकार्य करीत नाही अशी माहिती आम्हाला मिळालेली आहे. सन्माननीय मंत्रिमहोदय डॉ. पतंगराव कदम, आपण सर्व बँकांना याबाबतीत आदेश देऊन ताबडतोबीने हे वाटप सुरु करण्यासंबंधी सांगणार काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सन्माननीय सदस्यांनी जी तक्रार सांगितली ती गोष्ट खरी आहे. काही जिल्हयांमध्ये पैसे उपलब्ध होऊन सुध्दा जी स्थानिक यंत्रणा आहे ती प्रभावीपणे पैशाचे वितरण करीत नाही. म्हणून आज सकाळी सूचना दिलेल्या आहेत आणि तात्काळ...

श्री. पांडुरंग फुंडकर : शेतकरी चेक हातात घेऊन फिरत आहेत. बँका पैसे देत नाहीत.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आपण डायरेक्ट त्यांच्या अकाऊंटला पैसे जमा करतो. आपण हुंडया क्लिअर केलेल्या आहेत. जे 1261 कोटी रुपये मिळालेले आहेत त्याचे वाटप तात्काळ करण्याच्या बाबतीत पुन्हा सूचना देण्यात येतील.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मौजे येरळवाडी (ता.खटाव, जि.सातारा) येथील प्लॉट धरणग्रस्तांच्या नावे करण्याबाबत

(८) * ४४५६ श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील : सन्माननीय पुनर्वसन व मदत कार्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे येरळवाडी (ता.खटाव, जि.सातारा) येथील धरणग्रस्तांना १९७६-७७ मध्ये येरळवाडी बनपुरी रस्त्याच्या बाजुला पुनर्वसनासाठी ११३ प्लॉट वितरीत करण्यात येऊन अद्याप उपरोक्त प्लॉट धरणगस्तांच्या नांवे केलेले नसल्यामुळे संबंधित ग्रामपंचायतीने वेळोवेळी व दिनांक ११ जानेवारी,२००५ रोजी जिल्हाधिकारी सातारा यांचेकडे प्लॉट नावे करण्यात यावे अशी मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीत काय आढळून आले व प्लॉट धारकांच्या नांवे प्लॉट करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

डॉ.पतंगराव कदम : (१) होय.

(२) होय.

(३) मौजे.येरळवाडी ता.खटाव येथील धरणग्रस्तांना सन १९७६-७७ मध्ये येरळवाडी ते बनपुरी दरम्यान एकूण ११३ भूखंडापैकी ९० भूखंड दिनांक २२.८.१९९५ रोजी वाटप केले आहेत. उर्वरित २३ भूखंड वाटप करण्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, मी जो प्रश्न विचारलेला आहे त्या प्रश्नाला या ठिकाणी अतिशय वेगळे उत्तर दिले गेले आहे. या प्रश्नामध्ये असे विचारले आहे की, धरणग्रस्तांना जे भूखंड दिले गेले आहेत ते त्यांच्या नावावर केलेले आहेत काय ? या ठिकाणी असे उत्तर दिले आहे की, त्यांना वाटप करण्यात आले आहे. हे भूखंड त्यांच्या नावावर केलेले आहेत काय ? जर केले नसतील तर ते कधीपर्यन्त करण्यात येतील ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, 113 पैकी 90 प्लॉटच्या नोंदी आणि वाटप केलेले आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : ते नावावर केले आहेत काय ?

डॉ. पतंगराव कदम : 90 प्लॉट नावावर केलेले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

ता. प्र. क्र. 4456 ....

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मेरा प्रश्न यह है कि धरणग्रस्त लोगों का जहां पर पुनर्वसन किया गया था, क्या वे लोग वहां पर शिफ्ट हो गए हैं, क्या उनको इसके लिए पैसे का मुआवजा दिया गया था ? जो 23 भूखंड दिए गए हैं तो वहां पर धरणग्रस्त लोग शिफ्ट हुए हैं या नहीं या 30 साल होने के बाद भी वे लोग वहां पर अभी तक शिफ्ट नहीं हुए हैं ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, उर्वरित 23 प्लॉटपैकी 11 प्लॉट धारकांना परत दिलेले आहेत. 12 शिल्लक आहेत त्यावर अतिक्रमण झालेले आहे. तेही धरणग्रस्तांचेच आहेत. त्यांच्यावर कारवाई होईल.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सांगली जिल्ह्यातील धडक उपसा सिंचन योजनांबाबत

(९) * २१२४ प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील तारांकित प्रश्न क्र.२९२ ला दिनांक १० डिसेंबर, २००४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यात १९७२ साली राज्य सरकारने सुरु केलेल्या व सध्या वसंतदादा शेतकरी सहज्ारी साखर कारखान्याच्या ताब्यात असलेल्या धडक उपसा सिंचन योजना शेतकऱ्यांनी पाणीपुरवठा संस्था स्थापन करुन त्यांची पाटबंधारे खात्याकडे नोंद केल्यास त्यांच्याकडे सुपुर्द करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाचा अंतिम निर्णय झाला आहे काय,

(३) नसल्यास, त्याबाबतचा निर्णय कधीपर्यंत अपेक्षित आहे ?

डॉ. सुनील देशमुख, श्री.रामराजे नाईक निंबाळज्र यांच्याकरिता : (१) -ाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, 1972 च्या दुष्काळामध्ये केंद्र शासनाच्या मदतीतून सांगली जिल्हयामध्ये 25 धडक उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्यात आल्या. या योजना साधारणपणे 1984-85 च्या दरम्यान सांगलीच्या वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखान्याकडे चालविण्यासाठी हस्तांतरीत करण्यात आल्या. या योजनांची किंमत करुन त्याची रक्कम कारखान्याने शासनाकडे 20 समान हप्त्याने भरावी अशीही तरतूद करण्यात आली. गेल्या अनेक वर्षामध्ये कारखान्याने शासनाचे पैसे हप्त्याने भरलेले नाहीत. त्या योजना नीट चालविलेल्या नाहीत. गेली दोन वर्षे साखर कारखाना बंद आहे आणि या योजना देखील कारखान्याकडून नीट चालविल्या जात नाहीत. किंबहुना काही योजना त्यांनी दुसऱ्या खाजगी व्यक्तींना चालविण्यासाठी दिलेल्या आहेत. शासनाला भरावयाचे पैसे भरलेले नाहीत. पाणीपट्टीचे पैसे वसूल केले. विजेची बिले भरलेली नाहीत. त्यामुळे वीजपुरवठा खंडित करण्यात आलेला आहे आणि त्या योजना बंद पडल्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत आहे. म्हणून आमची शासनाला विचारणा आहे की, एक तर आपण त्या योजना ताब्यात घेऊन त्या चालवाव्या अन्यथा त्या योजना शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था स्थापन करुन त्यांना चालविण्यासाठी द्याव्यात. त्या देण्यासंबंधी शासन निर्णय घेईल काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

ता. प्र. क्र. 2124 ...

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी यासंबंधात जी मागणी केलेली आहे त्यासंबधी सन 2003 च्या नागपूर अधिवेशनात आश्वासन दिले गेले आहे की, या 25 धडक योजनांपैकी 11 धडक योजनांवर पाणी वापर संस्था करण्यासंबंधी मागणी आलेली आहे. या मागणीच्या संबंधाने सहकार खात्याकडे इरादा पत्रे देण्यात आलेली आहेत. सहकार खात्याकडून ही सर्व कागदपत्रे आल्यानंतर याबाबतीत विचार करण्यात येईल.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2124.... श्री.रामराजे नाईक-निंबाळकर....

सन्माननीय सदस्य श्री.पाटीलसाहेबांनी जो दुसरा मुद्दा उपस्थित केला आहे की, या सर्व योजना शासन ताब्यात घेईल काय, दि.10.10.2003 च्या पत्राप्रमाणे हा निर्णय झालेला होता. जुन्या रिटपिटीशनचे पुनर्जीवन या कारखान्याने केलेले असल्यामुळे एका बाजुला पाणी वापर संस्थाची मागणी आणि त्याच्यात सहकार खात्याचे प्रलंबित असलेले कागदपत्र आणि दुस-या बाजुला या रिटपिटीशनचा होणारा निर्णय याच्यावर हा निर्णय अंतिम करण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : या कारखान्याने खाजगी व्यक्तींना या योजना चालविण्यासाठी दिल्या तेव्हा शासनाची परवागनी घेतली होती काय ?

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : शासनाच्या परवानगीपेक्षा इडकॉम कॉर्पोरेशनची ही मालमत्ता होती. त्यासंबंधाने चौकशी करुन त्यांनी परवानगी घेतली होती किंवा नाही हे पटलावर ठेवण्यात येईल.

प्रा.शरद पाटील : यासंबंधीचा शासनाने निर्णय घेतलेला होता असे सांगितले आहे. कारखाना हायकोर्टामध्ये गेल्यामुळे या निर्णयाची अंमलबजावणी होऊ शकलेली नाही. न्यायालयातून या प्रश्नावर निर्णय मिळविण्यासाठी शासनाने काही प्रयत्न केलेले आहेत काय किंवा लवकरात लवकर निर्णय मिळेल काय ?

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : यासंदर्भात या रिटपिटीशनवर व सिव्हिल ॲप्लीकेशनवर ॲफिडेव्हिट दाखल केलेले आहे. यासंबंधीचा निर्णय अपेक्षित आहे. परंतु त्याहीपेक्षा पाणी वापर संस्थेकडे हया योजना वर्ग झाल्या तर हा प्रश्न ब-यापैकी मार्गाला लागेल.

<u>तारांकित प्रश्न क्रमांक - 3817</u>

(माननीय सदस्य अनुपस्थित)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/MAP

आज□सरा (हिंज्जघाट, जि.वर्धा) बॅरेज उपसासिंच□ प्रज ल्पाच्या ज ामाबाबत

(11) * 2168 श्री. व्हि. यू. डायजव्हाजे , प्रा. बी. टी. देशमुज , श्री. वसंतराव जोटरे , श्री. -ा-ासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अै-ापूरे ता,प्र.ज्र .42359 ला दि.27 मे, 2004 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : स-मा-ा-ीय जलसंपदा (ज्रृष्ना जोरे पाटबंधारे महामंडळ वजळू-ा) मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा ज रतील ज ाय :-

(1) आज-ासरा (हिंज्जघाट, जि.वर्धा) बॅरेज उपसासिंच-ा प्रज ल्पाच्या व-ा जमि-ीसाठी प्राथम्य ज्रमा-ुसार ि-धी उपलब्ध ज रज्याबाबतची सुरु असलेली ज ार्यवाही पूर्ज झाली आहे ज ाय,

(2) असल्यास, सदर प्रज ल्पासाठी स-ा 2004-2005 या वर्षात ज िती ि-धी उपलब्ध ज रु-ा देज्यात आला आहे,

(3) अद्याप ि-धी उपलब्ध ज रु-ा देज्याची ज ार्यवाही पुर्ज झाली -ासल्यास विलंबाची ज ारजे ज ाय आहेत ?

डॉ.सुनील देशमुख, श्री.अजित पवार यांच्याकरिता: (1) -ाही.

(2) प्रश्-ा उद्भवत -ाही.

(3) पाटबंधारे प्रज ल्प हाती घेज्यासंदर्भात उपलब्ध होजारा एज्ंदरीत अपूरा ि-धी विचारात घेऊ-ा हया प्रज ल्पाची प्राधा-यता ि-क्श्चत ज रज्याची ज ार्यवाही सुरु आहे.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, या प्रश्नाला हास्यास्पद उत्तर दिलेले आहे. वर्धा जिल्हा हा अनुशेषामध्ये आहे. 2004-2005 या वर्षात किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे या माझ्या दुस-या प्रश्नाला प्रश्न उद्भवत नाही असे लेखी उत्तरात नमूद केले आहे. सदरचा प्रकल्प मोठा आहे. सभागृहाला माहिती झाले पाहिजे की, एवढया मोठया प्रकल्पाचे 2004-2005 या वर्षी विद्यमान मा.मुख्यमंत्र्यांनी भूमिपूजन केलेले आहे. हे आपण विसरले आहात. त्याला सहा वर्षे होऊन गेली आहेत. त्याचे पूर्ण प्रारुप तयार केले गेले. आता यावेळेस किती निधी उपलब्ध केला आहे किंवा निधी उपलब्ध करुन देण्याचे काय नियोजन केले आहे ?

डॉ.सुनील देशमुख : या प्रकल्पाचे भूमिपूजन विद्यमान मा.मुख्यमंत्र्यांनी केले आहे ही गोष्ट खरी आहे. पण मा.राज्यपालांनी म्हटल्याप्रमाणे ज्या प्रकल्पांचे 50 टक्के वा 75 टक्क्यापपर्यंत काम पूर्ण केलेले आहे ते प्राथमिकतेवर पहिले घ्यावेत. (अडथळा) त्यामुळे या प्रकल्पासाठी गेल्या 4-5 वर्षात निधी उपलब्धता केलेली नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/MAP

ता.प्र.क्र.2168....

प्रा.बी.टी.देशमुख : राज्यपालांच्या निदेशाच्या उलट हे आदेश आहेत. मूळ आदेश आहेत त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, बिगर अनुशेषाच्या भागात विशेषत: उर्वरित महाराष्ट्रामध्ये नवीन प्रकल्पाला हात लावू नये परंतु विदर्भामध्ये व मराठवाडयामध्ये ते घेण्याची आवश्यकता राहील. दांडेकर समिती अहवालामध्ये 1984 च्या सरासरीवर आणि अनुशेष निर्देशांक समितीच्या 1994 च्या सरासरीवर या दोन्ही सरासरीनुसार हा जिल्हा अनुशेषामध्ये आहे. त्यामुळे गेल्या वर्षाच्या निदेशाप्रमाणे 101.99 कोटी रुपये इतके अलॉटमेंट या जिल्हयाला राज्यपालांनी दिले होते. परंतु या जिल्हयात प्रत्यक्ष खर्च केवळ 45 कोटी रुपये झाला. अनुशेषामध्ये असलेल्या जिल्हयामध्ये, नागपूर विभागामध्ये 101 कोटीचे ॲलोकेशन वर्धा जिल्हयाकरिता दिले ते हाइएस्ट आहे. याचे कारण तेथे अनुशेष जास्त आहे. परंतु 101.99 पैकी केवळ 45 कोटी रुपये खर्च झाला आहे. मी एक गोष्ट पुन्हा स्पष्ट करु इच्छितो की, राज्यपालांच्या निदेशामध्ये असे स्पष्टपणे म्हटलेले आहे की "अनुशेष जर दूर करावयाचा असेल तर या विदर्भामध्ये व मराठवाडयात नवीन प्रकल्प घ्यावे लागतील. खाजगी पत्रव्यवहार झाला असेल तर तो आम्हाला माहीत नाही. परंतु संविधानामध्ये राज्यपालांनी दुरुस्ती केलेली नाही. संविधानामध्ये विदर्भामध्ये व मराठवाडयामध्ये नवीन प्रकल्प घ्या असे म्हटलेले आहे नाही तर अनुशेष दूर कसा होईल. पाटबंधारे विभागाने राज्यपालांना कळविले होते.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 2168 पुढे सुरु...) (श्री. बी.टी.देशमुख पुढे सुरु...)

काही जिल्ह्यांचा अनुशेष दूर होत नाही.

उप सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मला माझा प्रश्न पूर्ण करण्याची परवानगी द्यावी. माझा प्रश्न असा आहे की, 101.99 कोटी रु. खर्च झाले नाहीत. मा. राज्यपालांच्या डायरेक्शनमध्ये मनाई नसेल तर त्याची खात्री करुन ताबडतोबीने हे काम सुरु केले जाईल काय? राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी भूमिपूजन केलेले आहे.

डॉ. सुनील देशमुख : ही गोष्ट खरी आहे की, ज्या जिल्ह्यामध्ये अनुशेष आहे त्या जिल्ह्यामध्ये प्रकल्प घेऊ शकतो. या प्रकल्पाला तातडीने प्रशासकीय मान्यता देऊन येणा-या काळामध्ये...

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : येणा-या काळामध्ये म्हणजे किती कालावधीमध्ये ? याबाबतीत काही कालबध्द कार्यक्रम मंत्रीमहोदय सांगतील काय ?

डॉ. सुनील देशमुख : तीन महिन्याच्या आता या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

उप सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

उप सभापती : माननीय सदस्य श्री. कन्हैयालाल गिडवाणी यांनी "सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका क्षेत्रात महापलिकेद्वारे करण्यात येत असलेल्या दुषित पाणीपुरवठ्यामुळे हजारो रुग्णांना गॅस्ट्रो व कॉल-याची लागण होऊन एका 17 वर्षीय विद्यार्थ्यांचा दिनांक 26.3.2005 रोजी झ ालेला दुर्दैवी मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे.

दिनांक 22.3.2005 रोजी या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश दिलेले आहेत. सबब मी सूचनेस अनुमती नाकारतो.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : उप सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, हा अतिशय गंभीर विषय असून या विषयामध्ये सार्वजनिक आरोग्य विभाग आणि पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग या दोन विभागांचा संबंध येत असल्यामुळे या प्रकरणी दोन्ही विभागांनी निवेदन करावे.

उप सभापती : या प्रकरणी सार्वजनिक आरोग्य मंत्री तसेच पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांनी निवेदन करावे.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन शासनाला उद्या निवेदन करण्यास सांगावे अशीही माझी आपणास विनंती आहे.

उप सभापती : यानंतर मा.सदस्य श्री. अनंतर तरे यांनी "श्रीपुरवडे, ता. सटाणा. जि. नाशिक येथील भीमाशंकर शासकीय आश्रमशाळेतील 6 वर्षीय बालकाच्या संशयास्पद मृत्यूप्रकरणी गुन्हा दाखल करण्यास पोलिसांनी केलेले दुर्लक्ष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या प्रकरणी शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर मा.सदस्य श्री. मधुकर चव्हाण व इतर वि.प.स. यांनी "मुंबई इमारती दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या संक्रमण शिबिरातील बदक चाळीच्या 10 रहिवाशांच्या विद्युत देयकाची चुकीची थकबाकी दाखवून विद्युत पुरपवठा खंडित करणे त्यामुळे त्यांना अंधारात दिवस काढावे लागणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयी शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : संक्रमण शिबिरातील सर्व लोक अंधारात आहेत. तेव्हा शासनाला उद्या निवेदन करण्यास सांगावे अशी माझी आपणास विनंती आहे.

उप सभापती : या विषयी शासनाने उद्या निवेदन करावे. यानंतर नियम 93ची निवेदने घेण्यात येतील. नियम 93च्या निवेदनावर मा.सदस्यांनी एकच प्रश्न विचारावा.

प्रा.बी.टी.देशमुख : उपसभापती महोदय, आपल्या दालनामध्ये बैठक झाली होती त्यावेळी मी वेतनेतर अनुदानाच्या संदर्भातील 93 वरील निवेदनावर दोन-तीन प्रश्न विचारण्याची संधी द्यावी अशी विनंती केली होती. त्यानुसार मला दोन-तीन प्रश्न विचारण्याची संधी द्यावी.

उप सभापती : सभागृहामध्ये ऊर्जा मंत्री तसेच राज्यमंत्री उपस्थित नाहीत.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

--

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याच्या मुद्याबाबत

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, एका गंभीर विषयाकडे मी आपले लक्ष वेधित आहे.याठिकाणी मा. मंत्रिमहोदयांनी घेतलेल्या निर्णयाला अधिकारी कसे केराची टोपली दाखवतात हे मी आपणास दाखवून देतो. काळाचौकी येथे जवळ जवळ 300 भाडेकरु असलेली बदक चाळ आहे. गेले वर्षभर तेथील लोकांना संक्रमण शिबिरामध्ये जागा मिळत नाही. माननीय गृहनिर्माण राज्यमंत्री महोदय श्री. दयानंद मस्के यांच्या दालनामध्ये 22 तारखलेला बैठक झाली होती. त्यावेळी गृहनिर्माण सचिव हजर होते. त्यांनी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या संबंधित अधिका-यांना राहूल नगरमध्ये त्यांना 32 जागा द्या असे आदेश दिले. त्या आदेशानंतर 23 तारखेला दुपारी 4.00 वाजता तुम्ही या, तुम्हाला संक्रमण शिबीरामध्ये गाळे उपलब्ध करुन देतो असे सांगण्यात आले.

...नंतर श्री.नाईक...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण..

23 तारखेस हे सगळे गेल्यानंतर त्यांना सांगण्यात आले की, आम्ही जागा देणार नाही. सभापती महोदय, या विभागाच्या मंत्री महोदयांना काही माहिती नाही ते नवीन मंत्री आहेत. मी या ठिकाणी अतिशय जबाबदारीने बोलतो आहे. माझ्याकडे यासंदर्भातील लिखीत आहे. कॅन्सर पेशंट असलेली 70 वर्षाची श्रीमती पार्वती काशिराम घाग यांनी लिहून आणले की, मला तुम्ही मुलुंड येथे जागा दिली आहे, मी कॅन्सरग्रस्त महिला आहे. मला रोज टाटा रुग्णालयात लाईट घ्यावयास जावे लागते. मला काळाचौकी येथे जागा द्या. त्यांनी वैद्यकीय अधिका-यांचे प्रमाणपत्र आणल्यानंतर त्या कॅन्सरग्रस्त महिलेच्या अर्जावर मंत्री महोदयांनी "त्वरीत जागा द्यावी" असा आदेश लिहून दिलेला आहे. तदनंतर सदरहू महिला तेथे गेल्यानंतर त्यांना सांगण्यात आले की, तुम्हाला त्या रुग्णालयात जाऊन दररोज लाईट घेण्याची आवश्यकता आहे काय असे दुसरे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करा. त्यानंतर श्री.नर आणि श्री. साळुंखे यांना पेरु कंपाऊंड येथे जागा देण्यात आली. मंत्री महोदयांच्या समारे तेथील संबंधीत अधिका-यांनी त्यांना खोटे सांगितले की, त्या संक्रमण शिबीरात जागा नाही. परंतु यासंदर्भात चार गाळयांचे क्रमांक त्यांना दिले. तेंव्हा या लोकांना असे सांगण्यात आले की, त्यांना काय माहिती आहे, हे आमच्या मर्जीसाठी 10 टक्के देण्याचे ठरविले आहे. मंत्री महोदयांच्या दालनात अशा प्रकारची एखादी बैठक झाली असेल. त्या बैठकीच्या अनुषंगाने संबंधितांना मंत्री महोदय आदेश दिले. त्या बैठकीस मुख्य सचिव उपस्थित होते. श्री. माधव पाटील आणि श्री.गवांदे अधिकारी आहेत ते उद्दटपणे उत्तरे देतात. या व्यक्ती राहतात ती चाळ पाडण्यात आलेली आहे. गेल्या एका वर्षापासून 105 लोक ट्रॉन्झीट कॅम्पमध्ये गेलेले आहेत. 70 लोकांना जागा देऊ असे दररोज सांगतात. उलट असे उत्तर दिले की, आम्ही संक्रमण शिबीरामध्ये धाडी घालून गाळे खाली करतो. परंतु ते गाळे मंत्री आम्हाला बिल्डरला द्यावयास लावतात. मी या ठिकाणी पुन्हा सांगतो की, मी जबाबदारीने बोलत आहे.माझ्याकडे लिखीत आहे. अशा त-हेने मंत्र्यांनी दिलेले आदेश, जागा रिकाम्या असताना एखाद्या सचिवाच्या स्तरावर दिलेले आदेश पाळले जात नसतील तर ते योग्य नाही. म्हाडाचा सर्व कारभार दलालांनी ताब्यात घेतलेला आहे. माननीय मंत्र्यांनी दिलेल्या आदेशाचे त्वरीत पालन झाले पाहिजे. अशा त-हेने मंत्री महोदयांच्या अपरोक्ष,तसेच सचिवांच्या स्तरावरच्या अधिका-यांची बदनामी करणारे अधिकारी आहेत त्यांचे विरुध्द कारवाई झाली पाहिजे.या रहिवाश्यांना त्वरीत न्याय मिळाला पाहिजे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : मी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांना विचारु इच्छितो की, आपण कॅन्सरग्रस्त महिलेचे नाव सांगितले. त्या महिलेने ज्या ठिकाणी जागा मागितली आहे तेथे जागा उपलब्ध आहे काय ?

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सगळया ठिकाणी जागा उपलब्ध आहेत.

उपसभापती : कॅन्सरग्रस्त महिलेचे नाव काय आहे ?

श्री. मधुकर चव्हाण : 30 जागा राहुनगर येथे उपलब्ध आहेत. कॅन्सरग्रस्त महिलेचे नाव श्रीमती पार्वती काशिराम घाग असे आहे. पेरु कंपाऊंडमध्ये जागा दिलेल्या आहेत त्यांनीही सर्टिफिकेट दिलेले आहे त्यांची नावे श्री. नर आणि श्री. साळुंखे आहेत.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. मधुकरराव चव्हाण यांनी सभागृहात औचित्याच्या मुद्दयाव्दारे एका परिस्थितीचे वर्णन केलेले आहे. त्या अनुषंगाने या कॅन्सरग्रस्त महिलेला तसेच श्री.नर आणि श्री.साळुंखे यांना राहुलनगरमधील तीन गाळे उपलब्ध असल्यास उद्दयाच्या उद्या वितरीत करण्याबाबत शासनास स्पष्टपणे सूचना देण्यात येत आहे. ज्या अधिका-यांनी माननीय मंत्री महोदयाच्या आदेशाचा अवमान केलेला आहे त्यांचेवर देखील योग्य ती कारवाई करावी.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. आपल्या सभागृहाने महाराष्ट्रातील एका विषयाकडे सरकारचे लक्ष वेधले होते. नागपूरच्या अधिवेशनामध्ये कुपोषणाने आदिवासी विभागात बालमृत्यू झाले होते त्या संदर्भात डॉ.अभय बंग यांची समिती आपल्या सभागृहाने मागणी केल्याप्रमाणे स्थापन झाली होती. त्या समितीने आपला दुसरा अहवाल शासनाला दिलेला आहे. आम्ही वृत्तपत्रातून त्या अहवालाच्या संदर्भातील बरीच माहिती वाचली. परंतु तो अहवाल आम्हा सदस्यांना मिळालेला नाही. या सभागृहात अहवालावर चर्चा व्हावी. जेणेकरुन बालमृत्यू थांबविण्याकरिता काय करता येईल असा प्रश्न असल्यामुळे डॉ.अभय बंग समितीचा अहवाल शासनाने सभागृहाच्या पटलावर ठेवावा अशी माझी विनंती आहे. हा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवल्यानंतर विरोधी पक्ष सदस्य, तसेच सत्ताधारी पक्षाचे सदस्य यावर चर्चा मागू. या अहवालावर चर्चा झाल्यानंतर ती चर्चा राज्य सरकारला उपयोगाची राहील म्हणून हा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावा अशी माझी पुन्हा आपल्याला विनंती आहे व तसे आदेश आपण शासनास द्यावे.

4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती नीलम गो-हे : सभापती महोदय, डॉ.अभय बंग समितीचा जो अहवाल शासनास सादर करण्यात आलेला आहे त्यात उपाययोजना सूचविण्यात आलेल्या आहेत. त्या उपाययोजनांवर शासनाने काय कार्यवाही केली याबाबतची माहिती ताबडतोब या सदनाला आणि राज्यातील जनतेला कळणे आवश्यक आहे. त्याचे कारण असे की, या समितीने दोन अहवाल शासनास सादर करुनही कुपोषणाने बालकांचे मृत्यू होत आहेत. राज्यात आदिवासी विभाग आहेत, त्या विभागांखेरीज इतर विभागातही कुपोषणाने बालमृत्यू होण्यास सुरुवात झालेली आहे असे अहवालात नमूद केले आहे असे आम्ही वृत्तपत्रात वाचले आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. नितीन गडकरी यांनी जो औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याला आम्ही समर्थन देत आहोत. हा अहवाल सभागृहासमोर मांडून शासनाने याबाबत काय कार्यवाही केली याची देखील आम्हाला कल्पना यावी अशी आमची विनंती आहे.

उपसभापती : सन्माननीय सदस्यांच्या सूचनेनुसार सदर समितीचा अहवाल शासनाने सभागृहासमोर ठेवावा.

यानंतर श्री. कानडे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय आझाद मैदानावर एकत्र झाला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की आळंदी येथील सिध्दटेक बेटाचा भाग आहे त्यासंदर्भात गेल्या 20-25 वर्षापासून सातत्याने मागणी होत आहे. आळंदी येथे मोठा मोर्चा आला होता. संपूर्ण महाराष्ट्रातील हजारो वारकरी आळंदी येथे गेले होते. आझाद मैदानावर महाराष्ट्रातील हजारो वारकरी ठिय्या आंदोलनासाठी बसलेले आहेत. याची महाराष्ट्र शासनाने तात्काळ दखल घेऊन वारक-यांचे समाधान करावे आणि वारक-यांना न्याय द्यावा अशी मी शासनाला विनंती करतो.

उप सभापती : ठीक आहे.

--

श्री. प्रकाश शेंडगे : अध्यक्ष महोदय, राज्यातील अनेक नगरपालिकांच्या हद्दीमध्ये काविळ आणि गॅस्ट्रोची लागण सुरु झालेली आहे. यासंदर्भात एका मुलाचा मृत्यूही झालेला आहे ....

उप सभापती : या विषयावर उद्या सभागृहामध्ये निवेदन आहे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्य वीज ग्राहक संघटनेने विद्युत नियामक आयोगासमोर दाखल केलेली याचिका.

मु.शी.: राज्य वीज ग्राहक संघटनेने विद्युत नियामक आयोगासमोर दाखल केलेल्या याचिकेबाबत सर्वश्री प्रा.शरद पाटील जयंत पाटील,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. दिलीप वळसे-पाटील (ऊर्जा मंत्री) : मा.सदस्य सर्वश्री प्रा.शरद पाटील,जयंत पाटील यांनी राज्य वीज ग्राहक संघटनेने विद्युत नियामक आयोगासमोर दाखल केलेली याचिका या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती मा. सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनानंतर

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने सिंगल फेजिंगवर केलेला खर्च कोणत्याही ग्राहकाकडून वसूल करता येणार नाही असे स्पष्ट आदेश दिलेले आहेत. तसेच मंडळाच्या सिंगल फेजिंगवर कडक ताशेरे मारले आहेत. असे असताना सुध्दा ही योजना राबविण्याचा अट्टाहास मंडळाने का धरला आहे ? या योजनेसाठी 500 कोटी रुपये खर्च होणार आहेत असा अंदाज आहे. प्रत्यक्षामध्ये त्यापेक्षा कितीतरी अधिक खर्च येणार आहे. माझा प्रश्न असा आहे की, सिंगल फेजिंगवर योजनेवर 500-600 कोटी रुपये खर्च करण्यापेक्षा नवीन विद्युत केंद्रे शासन का उभी करीत नाही ? तसेच वीज उपलब्ध करुन ऊर्जा बचत योजना आखलेली आहे. या योजनेतून किती वीजची बचत होईल असा अंदाज आहे ? तसेच राज्यामध्ये सध्या किती मे.वॅ.वीजेची कमतरता किंवा तुटवडा आहे ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मागणीच्या प्रमाणात वीज निर्मिती क्षमतेमध्ये गेल्या 10 वर्षात वाढ न झाल्यामुळे सध्या 2300 ते 3000 मे.वॅ.वीजेचा तुटवडा भासत आहे. 2010 सालापर्यंत 5700 मे.वॅ.वीजेचा तुटवडा भासण्याची शक्यता आहे. वीज उपलब्ध नसताना शासनाला लोड शेडींग करावे लागत आहे विशेषत: संध्याकाळच्या कालावधीमध्ये लोड शेडींग करावे लागत असल्यामुळे नागरिकांवर ताण पडत असून नाराजीची भावना निर्माण झालेली आहे.

यानंतर श्री. गायकवाड ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील..

पुढच्या पाच वर्षात या राज्यात कमी पडणारी वीज निर्माण करण्याच्या बाबतीत राज्य सरकार स्पष्ट निर्णय घेत आहे व त्याचे प्लॅनिंग केलेले आहे. 2010 सालापर्यन्त किमान पाच ते आठ हजार मेगॅवॅटसपर्यन्त खाजगी क्षेत्रातील गुंतवणुकीच्या माध्यमातून वा वीजमंडळाच्या गुंतवणुकीच्या माध्यमातून वीज निर्मिती करण्याच्या बाबतीत स्वतंत्र धोरण स्वीकारण्याचा विचार शासन स्तरावर सुरु आहे. आता परीक्षा चालू आहेत आणि परीक्षेच्या वेळी संध्याकाळी विद्यार्थ्यांच्या घरात वीज नसल्यामुळे त्यांना अभ्यास करता येत नाही अशा तक्रारी येत आहेत . ही परिस्थिती या वर्षीचीच आहे असे नाही. नवीन वीज निर्मितीचे धोरण जरी घेतलेले असले तरी ती वीज मिळायला चार ते साडेचार वर्षे लागणार आहे. त्यामुळे पुढील चार साडेचार वर्षे लोड शेडीगशी आपल्याला सामना करावा लागणार आहे.या वर्षी 2800 किंवा 3000 मेगॅवॅटस विजेचे शॉर्टेज जरी असले तरी पुढच्या वर्षी हेच शॉर्टेज 3800 मेगॅवॅटस पर्यन्त जाऊ शकते.अशा वेळी वीजमंडळाच्या मार्फत वीज निर्मितीचा प्रामाणिक प्रयत्न केला जात आहे. त्यामध्ये कोणाचे हितसंबंध असल्याचे आपल्याला दिसून येत असेल तर तसे आपण आम्हाला सांगावे.आम्ही त्यामध्ये विथड्रॉ व्हावयाला तयार आहोत.परंतु गावेच्या गावे अंधारात राहतात. त्याचे कारण असे की, पीक डिमान्डच्या वेळेला म्हणजे सकाळी 6 ते 10 आणि संध्याकाळी 6 ते 10 या वेळेला मोठया प्रमाणार विजेचा वापर सुरु झाल्यामुळे आपल्याला लोड शेडीग करावे लागत आहे.आम्ही असा प्रयत्न करीत होतो की, संध्याकाळच्या वेळेला आपण जर सिंगल फेज ट्रान्सफारमर्स लावले तर त्या गावातील थ्री फेज कनेक्शन बंद राहील. त्यामुळे कृषी पंप. पिठाच्या गिरण्या बंद राहतील आणि सिगल फेज कनेक्शनमुळे किमान घरात तरी वीज राहू शकेल.संध्याकाळच्या वेळेला गावात आणि घरात वीज ठेवण्यासाठी शासनाने सिंगल फेज योजना वीज मंडळाच्या मार्फत राबविण्याचे ठरविले आणि एम.ई.आर.सी.च्या मान्यतेसाठी हा प्रस्ताव त्यांच्यासमोर पाठविण्यात आला होता.तेव्हा एम.ई.आर.सी.ने असे सांगितले की,यासाठी शासन जो काही खर्च करणार आहे तो खर्च ग्राहकांकडून वसूल करण्यात येणार आहे. तेव्हा ग्राहकांकडून हा खर्च वसूल करु नका. तरीसुध्दा शासनाला या बाबतीत जर पुढे जावयाचे असेल तर शासनाने यासाठी अनुदान द्यावे. जर शासनाने अनुदानातून हा खर्च केला तर आमची त्याला काही हरकत नाही. एम.ई.आर.सी.ची ही ऑर्डर

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील..

माझ्या हातात आहे. राज्य सरकारने 14 तारखेला मंत्रिमंडळात निर्णय घेतला आणि त्या निर्णयाप्रमाणे या सिंगल फेजींगच्या कार्यक्रमाला लागणारे 500 कोटी रुपये वीज मंडळाने कर्जाने काढावेत. हे कर्ज आणि त्यावरील व्याज परत फेड करण्याची जबाबदारी राज्य सरकारने घेतलेली आहे.त्यासाठी या वर्षाच्या बजेटमध्ये 100 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

उप सभापती : यानंतर नियम 93 च्या सूचनेवरील दुसरे निवेदन घेण्यात येईल.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय , या सूचनेवर माझे नाव आहे व मला प्रश्न विचारावयाचा आहे.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे परंतु विधानसभेमध्ये इतक्या प्रमाणात निवेदने घेतली जात नाहीत आणि निवेदनावर प्रश्न देखील विचारले जात नाहीत.

श्री.दिवाकर रावते :सभापती महोदय,विधान सभेमध्ये बजेटवर 15 दिवस चर्चा होत असते आपल्याकडे दोन दिवस चर्चा होत असते .तेव्हा आपण खालच्या सभागृहाची तुलना कशी करता ?

उप सभापती : तेथेही तीनच दिवस चर्चा होत असते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : चर्नीरोड, मुंबई येथील बालभवनाच्या जागेवर सलाम बालक ट्रस्टने केलेले अनधिकृत बांधकाम

मु.शी : चर्नीरोड मुंबई येथील बालभवनाच्या जागेवर सलाम बालक ट्रस्टने केलेले अनधिकृत बांधकाम याबाबत श्रीमती संजीवनी रायकर,डॉ.अशोक मोडक,श्री.प्रतापराव सोनवणे,श्री.रामनाथ मोते श्रीमती कांता नलावडे, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये

सूचना

प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : अध्य□ महोदय, श्रीमती संजीवनी रायकर,डॉ.अशोक मोडक,श्री.प्रतापराव सोनवणे,श्री.रामनाथ मोते, श्रीमती कांता नलावडे यांनी."चर्नीरोड,मुबई येथील बालभवनाच्या जागेवर सलाम बालक ट्रस्टने केलेले अनधिकृत बांधकाम."या विषयावर □ाम 93 अ□ये जी सूच□ दिली होती, तिला अ□मू□, आप□ □देश दिल्याप्रमा□ मला □ाद□ □रावयाचे आहे. □ाद□ाच्या प्रती सदस्यां□ अ□दरच वितरीत □लेल्या असल्या□मी हे □ाद□ सभा□हाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : □ाद□ सभा□हाच्या पटलावर ठेव□यांत आले आहे.

□ाद□

(प्रेस : येथे सोबतचे □ाद□ छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

- निवेदना नंतर -

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, भारताचे पहिले पंतप्रधान कै.पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या प्रेरणने या बाल भवनाची निर्मिती झाली.भारतातील हे पहिले बाल भवन असे आहे की, येथे लहान मुलांना खेळण्यासाठी निरनिराळे उपक्रम राबविले जातात.कै. भक्ती बर्वे यांच्यासारखी अभिनेत्री या बालभवनातून तयार झालेली होती असे असतांना 1996 साली अचानकपणे "सलाम बालक ट्रस्टला जमीन देण्याची काही गरज नाही.परंतु त्यांनी असे सांगितले की, रस्त्यावरील लहान मुलांसाठी हा ट्रस्ट काम करील. परंतु भटाला दिली ओसरी आणि हळू हळू पाय पसरी या म्हणी प्रमाणे त्यांनी पाय पसरायला सुरुवात केली आणि त्यांनी अनधिकृतपणे बांधकाम केलेले आहे.तेव्हा या ट्रस्टचे ट्रस्टी कोण आहेत आणि अनधिकृत बांधकाम तातडीने पाडण्यात येईल काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, नुकतीच नियामक मंडळाची बैठक झाली आहे . 1996 साली या जागेवर अतिक्रमण केले गेले. होते त्यावेळी हेतू चांगला दर्शविण्यात आला होता. दिनांक 3.3.2005 ला नियामक मंडळाच्या समितीची बैठक झाली होती त्यावेळी धोरणात्मक निर्णय घेण्यात आला असून हे अनधिकृत बांधकाम निश्चितपणे पाडले जाईल अशी मी ग्वाही देतो.

श्रीमती संजीवनी रायकर : या ट्रस्टीची नावे काय आहेत ?

प्रा.वसत पुरके : त्यांची नावे माझ्याकडे नाहीत.सन्माननीय सदस्यांनी सांगितलेले ट्रस्टचे नाव बरोबर आहे.ट्रस्टींची नावे नंतर सांगण्यात येतील

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

पृ.शी. : राज्यातील खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचे 4 वर्षांचे थकित वेतनेतर अनुदान.

मु.शी. : राज्यातील खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचे 4 वर्षांचे थकित वेतनेतर अनुदान याबाबत सर्वश्री व्ही.यू. डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, व्ही.डी.खोटरे, नानासाहेब बोरस्ते, गजेंद्र ऐनापुरे यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : अध्यक्ष महोदय, सर्वश्री व्ही.यू. डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, व्ही.डी.खोटरे, नानासाहेब बोरस्ते, गजेंद्र ऐनापुरे यांनी "राज्यातील खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचे 4 वर्षांचे थकित वेतनेतर अनुदान " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुसरून, आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..... क्यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(नियम 93 खाली मा.शालेय शिक्षणमंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : अध्यक्ष महाराज, राज्यातील खाजगी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांच्या वेतनेतर अनुदानाचा हा प्रश्न आहे. 5 ऑगस्ट 2002 ला माननीय श्री.गोविंदभाई श्रॉफ यांच्या अध्यक्षतेखाली आलेल्या आंदोलकांच्या प्रतिनिधींबरोबर माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनामध्ये अध्यक्ष महाराज, आपल्याही उपस्थितीमध्ये चर्चा झाली त्यावेळेस माननीय मुख्यमंत्र्यांनी 2003 पर्यतंचे अनुदान देण्याचे मान्य केले होते. या निवेदनात म्हटलेले आहे की, राज्य सरकारने त्यानुसार या वेतनेतर अनुदानासाठी भरीव तरतूद उपलब्ध करून दिलेली आहे आणि त्यापैकी 155 कोटी उपलब्ध करून देवून ते वितरित करण्यात आले आहेत. अध्यक्ष महाराज, हे 155 कोटी रुपये दिले आहेत हे खरे आहे तर ते कोणत्या वर्षापासून कोणत्या वर्षापर्यंतचे आहेत आणि 2004 मार्च पर्यंत अजून किती देणे बाकी आहे. तसेच 87 कोटी रुपयांची तरतूद मागील बजेटमध्ये करण्यात येईल म्हणून सांगितले होते तर ते 31 मार्च पर्यंत आपण देणार का ?

प्रा. वसंत पुरके : अध्यक्ष महाराज, या ठिकाणी भरीव तरतूद ही मान्य कली असली तरी अनेक वर्षापासून हे वेतनेतर अनुदान देणे बाकी आहे आणि ही शासनाचीच जबाबदारी होती. अध्यक्ष महाराज, आतापर्यंत कधीही नव्हती एवढी म्हणजे 87.91 कोटीची तरतूद माननीय श्री.गोविंदभाई श्रॉफ यांच्या बरोबर झालेल्या बैठकीमध्ये ठरल्यानुसार आपण केली होती आणि त्याचा कालबद्ध असा कार्यक्रमही ठरला आहे. तेव्हा 87.91 कोटी रुपये देण्याच्या मन:स्थितीत शासन आहे आणि लौकरात लौकर ही रक्कम दिली जाईल.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : अध्यक्ष महाराज, हे पैसे निश्चित कोणत्या तारखेपर्यंत दिले जाणार आहेत ते मंत्री महोदयांनी सांगावे. देण्याची मन:स्थिती आहे म्हणजे नेमके काय आहे ?

प्रा. वसंत पुरके : अध्यक्ष महाराज, यासाठी ही तरतूद केलेली आहे आणि आता ती केवळ वितरित करणे बाकी आहे, लौकरात लौकर ती वितरित करण्यात येईल.

प्रा. बी.टी. देशमुख : अध्यक्ष महाराज, मी या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांना आपल्या मार्फत ठामपणे विचारू इच्छितो की, स्वत: माननीय मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात बैठक बोलाविली होती आणि त्यामध्ये आदरणीय गोविंदभाई श्रॉफ यांच्या समोर कमिटमेंट केलेले आहे. ही जी 200 कोटीची तरतूद आहे ती तुम्ही अशीच केली नाही तर 17 फेब्रुवारी 2004 ला या आंदोलनकर्त्यांना

..... क्यू 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. देशमुख ....

मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या दालनात बोलाविले असताना, त्यामध्ये श्री.देवीसिंग शेखावत हेही उपस्थित होते. या सदनाचे एक सदस्य श्री.पवार हेही उपस्थित होते, त्यांच्या समोर कबूल केलेले आहे आणि ही बैठक सायंकाळी 4 वाजता झालेली आहे. त्यामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी ही 200 कोटीची तरतूद करतो असे म्हटले होते आणि त्याप्रमाणे तरतूद केली. अध्यक्ष महाराज, यासाठी रोज रोज आंदोलने करावयाची काय ? या वेतनेतर अनुदानामुळे ग्रामीण भागामध्ये या शाळांची काय अवस्था आहे हे ज्यांना चांगले माहीत आहे त्यांनी हे अशा प्रकारे म्हणावे हे बरोबर नाही. अध्यक्ष महाराज, माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यावेळी आदरणीय गोविंदभाई श्रॉफ यांना स्पष्ट शब्दात लिहून दिले आहे की, "At the outset the Hon'ble Chief Minister Unequivocally stated that Non-salary grant being a committed expenditure shall have to be paid in full. It was also agreed that remining outstanding dues of non-salary grant upto year 2003, both of schools and colleges, would be provided for in the budget for years 2003-2004." अध्यक्ष महाराज, ही सचिवांनी लिहिलेली मिनिटस् आहेत. 11 डिसेंबरला माननीय मुख्यमंत्र्यांनी हे मान्य केले आहे हे खरे आहे की नाही ? नाही तर आम्ही आपल्या या धोरणाचा निषेध म्हणून सभात्याग करू. अध्यक्ष महाराज, या वर्षीचे 87 कोटी सुद्धा सरकारने दिलेले नाहीत त्याचे कारण काय आहे ? आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी कबूल केल्याप्रमाणे 2003-04 मध्ये तरतूद केली नाही ती 2004-05 मध्ये केली. तेव्हा हे 87 कोटी रपये आपण आज, उद्या-परवा दिले पाहिजेत. आणि त्यापैकी किती देणे राहिले आहे तसेच पुढील वर्षासाठी यासाठी किती तरतूद केली आहे ?

प्रा. वसंत पुरके : अध्यक्ष महाराज, पहिल्या प्रथम मी माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, यासाठी आपल्याला आंदोलने करण्याची गरज भासणार नाही. दुसरी बाब म्हणजे केलेल्या तरतुदी पैकी वितरित व्हावयाचे पैसे 87.91 कोटी इतके आहेत आणि लौकरात लौकर आम्ही ते वितरित करू. .....

(यानंतर श्री. जागडे .... आर 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके....

(गोंधळ)

हे आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी निश्चितपणे देण्याचा प्रयत्न करु.

प्रा. बी. टी. देशमुख : रुपये 87.91 कोटी 31 मार्च पूर्वी वितरीत केले जातील काय ?

प्रा. वसंत पुरके : हे आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी ही रक्कम देण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल. सभापती महोदय, ही रक्कम वितरीत करण्याचे बाकी आहे. तसेच ही बाब आम्ही गांभिर्याने घेतलेली आहे.

(गोंधळ)

प्रा. बी. टी. देशमुख : ही रक्कम आपण 31 मार्च पूर्वी द्याल काय ? मी तीन वेळा हा प्रश्न विचारला आहे. मा. मंत्रिमहोदयांनी " नाही " असे म्हणावे.

उपसभापती : मी माननीय मंत्रिमहोदयांना असा प्रश्न विचारतो की, हे आर्थिक वर्ष केव्हा संपणार आहे ?

प्रा. वसंत पुरके : 31 मार्च रोजी.

उपसभापती : मा. सदस्य असा प्रश्न विचारीत आहेत की, 31 मार्च पूर्वी म्हणजे हे आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी ही रक्कम वितरीत करण्यात येईल काय ?

प्रा. वंसत पुरके : हे आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी ही रक्कम देण्याचा आम्ही प्रयत्न करु.

(गोंधळ)

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी काय सांगितले आहे, ते आम्हाला समजले नाही.

उपसभापती : मी मा. मंत्रिमहोदयांना प्रश्न विचारला असता, त्यांनी असे उत्तर दिले की, "हे आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी ही रक्कम देऊ." आता आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी म्हणजे 31 मार्च पूर्वी ही रक्कम देण्यात येईल काय ? असा प्रश्न मी मा. मंत्रिमहोदयांना विचारला असता, त्यांनी "होय" असे उत्तर दिले आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : 31 मार्च पूर्वी 87.91 कोटी रुपये देऊ. असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. आता आपण विचारल्यानंतर त्यांनी हे उत्तर दिले आहे. आता या बाबत मी दु:ख व्यक्त करुन त्यांचे आभार मानीत आहे.

(गोंधळ)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख ...

सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, 31 मार्च पूर्वी एकूण देणे किती आहे ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. शिक्षणामध्ये गुणात्मक बदल होण्यासाठी हे सर्व करणे गरजेचे आहे. सभापती महोदय, 158.98 कोटी रुपये द्यावयाचे बाकी आहेत. हे आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी द्यावयाची रक्कम 87.91 कोटी इतकी आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, एकूण किती रक्कम द्यावयाची आहे आणि त्यासाठी किती तरतूद करण्यात आली आहे ?

प्रा. वसंत पुरके : मी स्पष्टपणाने असे सांगितले आहे की, 158.98 कोटी रुपये द्यावयाचे बाकी आहेत. सभापती महोदय, 87.91 कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली आहे.

(गोंधळ)

सभापती महोदय, 2004-05 साली एकूण तरतूद 242.91 कोटी रुपयांची आहे. यातील 155 कोटी रुपये वितरीत करण्यात आले आहे. 87.91 कोटी रुपये वितरीत करावयाचे राहिले आहेत. तसेच एकूण 158.98 कोटी रुपये देणे बाकी आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मी जो प्रश्न विचारला नाही, त्याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदय देत आहेत. मी पुन्हा असा प्रश्न विचारतो की, 31 मार्च 2005 पर्यन्त संपूर्ण महाराष्ट्राचे वेतनेतर अनुदानाचे एकूण देणे किती आहे ? तसेच हे देणे देण्यासाठी किती तरतूद केलेली आहे ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, यासाठी तरतूद होणे गरजेचे होते. परंतु ती तरतूद झालेली नाही. हा आकडा 158.98 कोटी रुपयांचा आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, एकूण देणे देण्यासाठी किती तरतूद केलेली आहे?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, यासाठी तरतूद केलेली नाही. पूरवणी मागण्यांमध्ये आम्ही यासाठी तरतूद करणार आहोत.

प्रा. बी. टी. देशमुख : या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदय जी आकडेवारी देत आहेत, ती अत्यंत चुकीची आहे. यासाठी काहीच तरतूद केलेली नाही. या राज्याचे मुख्यमंत्री असे उत्तर देतात की, हे वेळेवर झाले पाहिजे. मा. मुख्यमंत्र्यांचे आदेश पाळले जात नाहीत. यासाठी तरतूद केली जात नाही. या सर्व बाबींचा निषेध करुन आम्ही सभात्याग करीत आहोत.

(सर्व शिक्षक आमदारांनी सभात्याग केला.)

..3..

पृ.शी.: नवी मुंबईमध्ये वाहतूक पोलीस उपनिरिक्षक यांच्या अज्ञात इसमाने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केलेला हल्ला.

मु.शी.: नवी मुंबईमध्ये वाहतूक पोलीस उपनिरिक्षक यांच्या अज्ञात इसमाने केलेला हल्ला या बाबत सर्वश्री. अनंत तरे, अरविंद सावंत, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सर्वश्री अनंत तरे व अरविंद सावंत यांनी " नवी मुंबईमध्ये वाहतूक पोलीस उपनिरिक्षक यांच्या अज्ञात इसमाने केलेला हल्ला" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुसरून आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्यामी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

(यानंतर श्री. सरफरे...

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अनंत तरे :सभापती महोदय, त्याठिकाणी उपनिरीक्षकांबरोबर दोन कॉस्टेबल डयुटीवर होते. ते आपल्या अधिकाऱ्याला सोडून कुठे गेले? ज्या गाडीतून त्यांनी फायरींग केले ती गाडी श्री. जे.सी. गरुडीया यांची चोरुन आणली होती, ती केव्हां चोरुन आणली? त्या बाबतची केस कोणत्या पोलीस स्टेशनला केव्हा नोंदविण्यात आली? या तपासाकरिता श्वान पथकाची मदत घेतली होती काय? असल्यास, त्यांचा अहवाल आला आहे काय? डयुटीवर असतांना व आपली कामगिरी कणखरपणे निभावीत असतांना उपनिरीक्षक श्री.सुरेश खेडेकर हे गंभीर जखमी झाले त्यांना शासनातर्फे काय मदत केली आहे?

श्री. सिध्दराम म्हेत्रे : सभापती महोदय, उपनिरीक्षक श्री. खेडेकर यांचेबरोबर दोन पोलीस कॉस्टेबल होते व ते वहातूक नियंत्रणाचे काम करीत होते. वहातूक सुरळीत झाल्यानंतर श्री. खेडेकर यांनी सांगितले की, आपण आता जाऊ या. त्यामुळे ते त्यांच्या मोटर सायकलवरुन निघून गेले. त्यावेळी त्यांच्यावर हल्ला झाला. दुसरा प्रश्न चोरीच्या वाहनाचा असून ते वाहन श्री. जे.सी. गरुडीया यांचे आहे. त्यांनी आपले वाहन चोरीला गेल्यासंबंधी 20 तारखेला ओशिवरा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला.

श्री. अनंत तरे: जखमी पोलीस निरीक्षक श्री. खेडेकर यांना शासनाने मदत दिली आहे काय?

श्री. सिध्दराम म्हेत्रे : परवा घटना घडली आहे व श्री. खेडेकर हे गंभीर जखमी झाले असून ते हॉस्पिटलमध्ये ॲडमिट आहेत. ते अजून शुध्दीवर आले नाहीत. त्यांना निश्चितपणे मदत केली जाईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, अवघ्या महाराष्ट्रामध्ये दरोडयाचे सत्र सुरु आहे. वाशी येथे ही घटना घडण्यापूर्वी एक आठवडा अगोदर टी.व्ही. चॅनल चालविणारे श्री. गुप्ता यांच्यावर हल्ला झाला व त्यामध्ये ते मरण पावले. या घटनेचा तपास श्री. खेडेकर यांच्याकडे होता कां? तसेच, ही गाडी चोरीला गेल्याबाबत कोणत्या पोलीस स्टेशनला केव्हा तक्रार करण्यात आली?

श्री. सिध्दराम म्हेत्रे : केबल चालकांवर झालेल्या हल्ल्याचा तपास श्री.खेडेकर यांच्याकडे नव्हता. ती गाडी 20 तारखेला चोरीला गेली, त्याबाबतची तक्रार पोलीस स्टेशनला केली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : महाराष्ट्रामध्ये केबल चालकांच्या माध्यमातून एक गुन्हेगारांची नवीन जात तयार झाली आहे. त्यामुळे सर्वत्र कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषत: मुंबई, ठाणे, बेलापूर, वाशी याठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणाऱ्या या जातीचा शासनाने ताबडतोब बंदोबस्त करावा.

श्री. अनंत तरे : पोलीसांनी तपास करतांना ती गाडी ताबडतोब मिळाली आहे.त्याबाबत पोलीसांनी श्वान पथकाचा उपयोग तपास कामासाठी केला काय? असल्यास, त्यांचा अहवाल आला आहे काय?

श्री. सिध्दराम म्हेत्रे : श्वानपथकाचा उपयोग केलेला नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्दयासंबंधी

श्रीमती कांता नलावडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी औचित्याच्या मुद्दयाव्दारे एक गंभीर घटना याठिकाणी मांडू इच्छिते. सातारा जिल्हयाचे जिल्हाधिकारी श्री. सुबराव पाटील यांनी बेकायदा वाळू वहातुकीविरुध्द कडक धोरण अवलंबिल्यामुळे त्यांना 24 तारखेला ट्रकने उडविण्याचा प्रयत्न करण्यात आला. बेकायदा वाळू वहातूकदारांनी ट्रकने त्यांना उडविण्याचा प्रयत्न केला. सातारा-रहमतपूर रस्त्यावर ते पहाणी दौरा करीत असतांना बेकायदा वाळू वहातूक सुरु होती. त्या वहातुकीचे ट्रक थांबवीत होते, त्यातील एका ट्रकला त्यांनी हात केला तर त्या ट्रकवाल्याने ट्रक थांबविला नाही उलट जिल्हाधिकाऱ्यांच्या गाडीला धडक देऊन त्यांच्या अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्न केला.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे . . . .

जिल्हाधिकारी सावध होते, त्यामुळे ते एका बाजूला गेले. पण त्यांच्या अंगरक्षकाने त्या ट्रकवाल्याला पकडण्याचा प्रयत्न केला. पण तो निसटून गेलेला आहे. महाराष्ट्रात गेल्या दहा-बारा वर्षामध्ये बेकायदेशीररित्या वाळू चोरी करणारा किंवा वाळू काढणारा आणि ती विकणारा माफीया वर्ग निर्माण झालेला आहे. त्यातून अनेक मारामा-या आणि भांडणे होत असतात. तसेच सतत वाळू काढल्याने नदीच्या पाण्याची पातळी देखील खोल जात आहे आणि दिवसेंदिवस पाण्याची समस्या निर्माण होत आहे. अशा वेळी जर एखादा प्रशासकीय अधिकारी त्या विरोधात कडक धोरण अवलंबित असेल आणि त्यामुळे जर त्याच्या जीवावर बेतत असेल तर शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. तसेच वाळूच्या संदर्भात जी स्थगिती दिलेली आहे, त्याला शासनाने पाठिंबा द्यावा आणि सदर जिल्हाधिका-यांच्या बाबतीत जीवघेणा हल्ला करण्याचा जो प्रयत्न केला आहे, त्याची शासनाने सखोल चौकशी करावी.

. . . .टी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: 16 फेब्रुवारी 2005 रोजी कल्याण(पूर्व) येथील तीसगाव नाक्याजवळ असलेल्या ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेवर झालेला हल्ला.

J.शी.: 16 फेब्रुवारी 2005 रोजी कल्याण(पूर्व) येथील तीसगाव नाक्याजवळ असलेल्या ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेवर झालेला हल्ला यासंबंधी सर्वश्री. रणजितसिंह मोहिते-पाटील,विनायकराव मेटे, जितेंद्र आव्हाड, प्रा.फौजिया खान, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री सदाशिवराव पोटी, अनंत तरे, यशवंतराव गडाख, मधुकर सरपोतदार,अरविंद सावंत, अनिल परब विप.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील(सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"कल्याण(पूर्व) येथील तीसगाव नाक्याजवळ असलेल्या ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेवर दिनांक 16 फेब्रुवारी 2005 रोजी सकाळी पावणे दहाच्या सुमारास सात जणांच्या सशस्त्र टोळीने रिव्हॉलव्हर व चॉपरचा धाक दाखवून 2 लाख 27 हजार रोख व तारण म्हणून असलेले पाच लाख किंमतीचे 868 ग्रॅम सोने लुटणे, यापूर्वी डोंबिवली, उल्हासनगर आणि मुंबईतील बँकावर असेच पडलेले दरोडे, यामुळे ठाणे शहर, ग्रामीण तसेच मुंबई परिसरातील बँकांमधील ठेवीदार,कर्मचारी, संचालक यांमध्ये पसरलेली घबराट तसेच अहमदनगर जिल्हयातील नेवासे तालुक्यातील मौजे भारसहिवरे या गावाला 7 मार्च 2005 चे सुमारास रात्री 25-30 दरोडेखोरांनी सशस्त्र दरोडा टाकणे, श्री.अंबीलवादे बंधू यांची चार घरे या घटनेत लक्ष्य बनविणे, तेथे सर्व लूट करुन अकरा जणांना बेदम मारहाण करणे, दहा किलोमीटरचे अंतरावर पोलीस स्टेशन असूनही पोलिसांची वेळीच मदत न मिळणे, दरोडेखोरांचा अद्यापपावेतो तपास न लागणे, इत्यादी बाबत शासनाने केलेली व तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .टी-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, कल्याण (पूर्व) येथील तीसगाव नाक्याजवळ असलेल्या ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेवर सकाळी पावणे दहाच्या सुमारास दरोडा पडल्यानंतर अशाच प्रकारचे दरोडे मुंबई, उल्हासनगर, डोंबिवली परिसरात देखील पडलेले आहेत. बँकेसारख्या वित्तीय संस्था, शेतकरी आणि सर्वसामान्य माणसाच्यादृष्टीने महत्वाच्या असलेल्या या संस्था आहेत. अशा या संस्थांना संरक्षण द्यावयाचे असेल तर कमीतकमी वर्षाला एक लाख रुपये खर्च येतो. अशा प्रकारे जे दरोडे पडलेले आहेत, त्याच्या तपासाच्या बाबतीत आतापर्यंत काय निष्पन्न झालेले आहे ? तसेच यातील 3-4 दरोडे पाहिले तर त्यातील मोडस ऑपरेंडी ही एकसारखी आहे. माझा प्रश्न असा आहे की, या दरोडयांच्या तपासाच्या बाबतीत आता पर्यंत काय निष्पन्न झालेले आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, आतापर्यंत वेगवेगळया बँकांवर दरोडे पडलेले आहेत. ओरिएंटेड बँक ऑफ कॉमर्स्, एस.व्ही.रोड येथे 2004 मध्ये दरोडा पडला. त्यामध्ये 2 लाख 30 हजार 844 रुपयांचा माल चोरीस गेलेला आहे. या दरोडयातील सर्व आरोपींना अटक केलेली असून हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. बृहन्मुंबई बँकेवर दरोडा पडलेला आहे, त्यामध्ये चार आरोपी आहेत आणि त्यांच्याविरुध्द एम.पी.डी.ए.अन्वये कारवाई केलेली आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेमध्ये आम्ही नगर जिहयाचा उल्लेख केलेला आहे. आपल्याला हादरा बसेल अशी तेथील अवस्था आहे. 14 जानेवारी 2004 ते 24 मार्च 2005 पर्यंत एका नगर जिल्हयामध्ये 67 दरोडयांचे गुन्हे घडलेले आहेत. माझ्याकडे त्याची यादी आहे, मी ती तुम्हाला देतो. 6 मार्चला नेवासे तालुक्यातील भानसहिवरे येथे दरोडा घालण्यात आला. तेव्हा असे लक्षात आले की, या दरोडयांमधील मोडस ऑपरेंडी अशी आहे की, जेव्हा भारनियमन सुरु असते, जेव्हा अंधार असतो तेव्हा हे दरोडे पडतात. 30-40 जणांची सशस्त्र टोळी या गावात फिरत होती. तेथे दहा मिनिटात पोलीस आले कबूल आहे. पण त्यांनी त्याचक्षणी त्या गावात दरोडे घातले आहेत. पोलिसांनी तपास करण्याचा प्रयत्न केला. मग ते श्रीगोंदा तालुक्यात गेले, तर आरोपी पुन्हा पसार झाले. तेव्हा माझा पहिला प्रश्न असा आहे की, याठिकाणी जेव्हा दरोडा पडला, तेव्हा त्या गावामध्ये भारनियमनामुळे वीज गेली होती हे खरे आहे का ? तसेच पुणे-संभाजीनगर रस्त्यावर, पुणे-नाशिक रस्त्यावर सातत्याने दरोडे पडत आहेत. नगर जिल्हयामध्ये गेल्या वर्षभरामध्ये 67 गुन्हे झाल्यावर शासनाने कोणतीही कारवाई केली नाही . पण

. . . .टी-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनामध्ये म्हटलेले आहे की, विशेष पथके स्थापन करण्यात आली आहेत. पण हे प्रकार थांबलेले नाहीत. तसेच श्रीगोंदा येथे तपासाकरीता श्वानपथक, अंगुलीमुद्रा तज्ज्ञ यांना पाचारण करण्यात आले होते.

यानंतर श्री.किल्लेदार . . .

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (पुढे चालू....

त्या ठिकाणी जवळपास 74 गावांचे वास्तव्य आहे. म्हणून या प्रकरणांच्या तपासाबाबत सद्य:स्थिती काय आहे ? दरोडा पडला तेव्हा भार नियमन होते काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : विजेचे भार नियमन रात्री 11-00 वाजेपर्यन्त होते. दरोडा हा रात्री 12-30 वाजता पडलेला होता. त्यावेळेस लाईट होता. या दरोड्यांच्या गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी दरोडा प्रतिबंधक पथक तयार करण्यात आलेले आहे.

श्री.अरविंद सावंत : 67 दरोडे हे नगर जिल्ह्यामध्ये वर्षभरामध्ये पडलेले आहेत. घरांवर, बँकावर दरोडे पडलेले आहेत. घरांवर दरोडा पडल्यानंतर घरातील महिलांनाही कोयत्याने मारहाण झालेली आहेत. या 67 दरोड्यापैकी किती दरोड्यांचा तपास लागलेला आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : 67 दरोडा प्रकरणांची माहिती सध्या उपलब्ध नाही. परंतु 2004-2005 मध्ये 40 दरोडे पडले होते त्यापैकी 30 दरोडे उघडकीस आले.

श्री.अरविंद सावंत : 67 दरोडे कोठे पडलेले आहेत,त्याची माहिती मी देतो. माझ्याकडे यादी आहे. हवी तर ही यादी मी पटलावर ठेवतो.

(उत्तर आले नाही.)

श्री.जयंत प्र.पाटील : ठाणे,नवी मुंबई, पनवेल या परिसरामध्ये किती दरोडे पडले आणि यापैकी किती प्रकरणांचा तपास लागून मुद्देमाल पकडण्यात आला ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : ठाणे, नवी मुंबई आणि पनवेल या परिसरामध्ये पडलेल्या दरोड्याची माहिती आता माझ्याकडे माहिती उपलब्ध नाही, परंतु ती माहिती घेऊन पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : मी रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेचा चेअरमन आहे. या बँकेच्या चार शाखांवर दरोडे पडलेले आहेत. या दरोड्यातील 40-45 लाखाची रक्कम अजून मिळालेली नाही. या संदर्भात आम्हाला गृह विभागाकडून असे सांगण्यात येते की, तुम्ही तुमचे संरक्षण स्वत: करावे. आताच सन्माननीय सदस्य श्री.रणजितसिहं मोहिते-पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे एका बँकेच्या शाखेला बंदोबस्त ठेवण्यासाठी महिन्याला 12 हजार रुपये खर्च येतो. रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या एकूण 50 शाखा आहेत. या शाखांसाठी सुरक्षिततेवर खर्च करायचा म्हटला तर वर्षाला 70 लाख लागणार आहेत. अशापध्दतीने खर्च केला तर या संस्था जगू शकणार नाहीत. दरोडेखोरांना पोलिसांची भीती वाटत नाही, ही परिस्थिती शासन बदलणार आहे की नाही ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय सदस्य सांगतात त्या परिसरामध्ये दरोड्याची प्रकरणे झालेली असली तरी शासन त्या प्रकरणी तपास करण्याचा कसोशिने प्रयत्न करत आहे.

श्री.अरविंद सावंत : पोलीस गुन्हेगारांना पकडण्यासाठी जातात, परंतु गुन्हेगार फरारी होतात. याचे कारण पोलीस पूर्ण तयारीनिशी त्या ठिकाणी जात नाहीत, असा त्याचा अर्थ आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय सदस्यांनी जी माहिती सांगितली त्याची निश्चित चौकशी करुन कारवाई केली जाईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, गेल्या तीन वर्षाच्या काळामध्ये सातत्याने या विषयी आवाज उठविला जातो. नागपूरच्या अधिवेशनामध्ये गृहमंत्र्यांनी शासनाने घोषणा केली की, लोकांनी संरक्षणासाठी शस्त्र परवाना मागितला तर तो देण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी नगर, बीड, औरंगाबाद, नासिक, पुणे, सातारा येथील दरोड्याच्या संबंधाने उल्लेख केला. त्या ठिकाणच्या किती लोकांनी संरक्षणासाठी शस्त्र परवानगी मागितली आणि किती लोकांना दिली, याची माहिती मिळेल काय ? दुसरे असे की, सातत्याने घोषणा केली जाते की, दरोडे पडतात, त्या दरोड्यास प्रतिबंध करण्यासाठी विशेष पथकाची निर्मिती केलेली आहे. या पथकामध्ये किती कर्मचारी आहेत ? पथक कोठून कोठपर्यन्त जाते.दराडेखोर एका जिल्ह्यामधून दुसऱ्या जिल्ह्यामध्ये जातात,ते मागे मागमूसही ठेवत नाहीत. तेव्हा या पथकाची कार्यक्षमता वाढविण्याच्यादृष्टीने कोणते प्रयत्न सरकार करणार आहे ?

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे ताईंनी प्रश्न विचारला की, किती लोकांना बंदुकीचे लायसन्स देण्यात आले? ग्रामीण भागामध्ये बंदुकीचे परवाने जिल्हाधिका-याकडून दिले जातात. शहरी भागामध्ये कमिशनरकडून बंदुकीचे परवाने दिले जातात. सभापती महोदय, ही सर्व माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : लक्षवेधी सूचना क्रमांक 2.

(काही सदस्य एकाच वेळी बोलत असतात)

उपसभापती :मंत्रिमहोदयांनी यासंबंधीची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो असे संगितलेले आहे. स्पेसिफिक प्रश्नासंबंधी विचारा. ही सगळीच माहिती विचारल्यानंतर ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो असे मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे.

श्री. अनंत तरे : ठाण्यामध्ये दरोडा पडलेला असतांना त्यासंबंधातील कुठल्याही प्रश्नाचे संयुक्तिक उत्तर दिलेले नाही. ठाणे ग्रामीणमध्ये किती दरोडे पडले याची माहिती मंत्रिमहोदयांनी दिलेली नाही.

उपसभापती :ठाणे जिल्हयात किती दरोडे पडले याबाबत मंत्रिमहोदय फार तर सांगतील की, मी ही माहिती पटलावर ठेवतो. ही माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवा असे मी मंत्रिमहोदयांना निदेश देतो. आता तुम्ही ऑल ऑफ ए सडन प्रश्न विचारले तर मंत्रिमहोदय कसे काय उत्तर देतील.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, ज्या विषयाच्या संदर्भात या ठिकाणी लक्षवेधी सूचना देण्यात आली आहे त्यासंदर्भातच आम्ही प्रश्च विचारु.

उपसभापती : तुम्ही आता हात वर केला. मघाशीच हात वर केला असता तर मी तुम्हाला प्रश्न विचारायला परवानगी दिली असती. ठीक आहे. या नंतर तुमच्याकडे लक्ष देईन.आता लक्षवेधी क्रमांक 2 घेण्यात येईल.

----x----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबई शहरामध्ये होणा-या वाहनांच्या वाढीमुळे निर्माण होणारी वाहतुकीची कोंडी.

मु. शी : मुंबई शहरामध्ये होणा-या वाहनांच्या वाढीमुळे निर्माण होणारी वाहतुकीची कोंडी.यासंबंधी स-मा-न-ीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण,विनोद तावडे, श्रीमती कांता नलावडे वि.प.स. यां-ी दिलेली लज्जवेधी सूच-ा.

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था):सभापती महोदय, मी आपल्या अ-ुमती-े नियम 101 अ-वये पुढील तातडीच्या व सार्वजनिज महत्वाच्या बाबीज्डे स-मा-न-ीय उप मुख्यमंत्र्यांचे लज वेधू इच्छितो आजि त्याबाबत त्यां-ी निवेद-ा ज्रावे, अशी वि-ंती ज्रतो.

" मुंबई शहरामध्ये दिवसेंदिवस होणारी वाहनांची वाढ त्यामुळे निर्माण होणारी वाहतुकीची कोंडी, रस्त्यावर बेकायदेशीरपणे होणारे गाडयांचे पार्कींग, त्यावर मुंबई पोलिसांच्या वाहतूक शाखेने घेतलेली बघ्याची भुमिका, वाहतूक शाखेतील संबंधित शिपाई व अधिकारी यांचे खाजगी प्रवासी वाहतूक करणा-या बस चालकांकडे होणारे दुर्लक्ष, तसेच रहदारीच्या रस्त्यावर प्रितम हॉटेल ते दादर पोस्ट ऑफीस,डॉ. आंबेडकर मार्ग, दादर (पश्चिम) या ठिकाणी असणारे पदपथावरील बेकायदेशीर स्टॉल्स व फेरीवाले याकडे हेतुपुरस्सर पोलिसांचे व महापिलकेचे होणारे दुर्लक्ष, खाजगी प्रवासी बसेसना उभी करण्यास दिलेली अनधिकृत परवानगी व त्यामुळे निर्माण झालेली वाहतुकीची कोंडी, त्यामुळे आबालवृध्द पादचा-यांना पदपथावरुन चालताना होणारी गैरसोय, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे जनतेच्या मनामध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना, त्यावर तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लज्जवेधी सूच-ेसंबंधीच्या निवेद-ाच्या प्रती मा-न-ीय सदस्यां-ा आधीच वितरीत ज्ेल्या असल्यामुळे मी ते निवेद-ा आपल्या अ-ुमती-े सभाज्रृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेद-ा सभाज्रृहाच्या पटलावर ठेवज्यात आले आहे.

निवेद-ा

(प्रेस : येथे सोबतचे निवेद-ा छापावे.)

अशुद्ध प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या ठिकाणी जी लक्षवेधी सूचना मांडली होती ती ट्विस्ट करण्यात आलेली आहे. माननीय मंत्रिमहोदयांना मी विचारु इच्छितो की, एखादी लक्षवेधी सूचना आल्या नंतर आपले अधिकारी, आपल्याबद्दल पूर्ण आदर ठेवून मी बोलतो. लक्षवेधी सूचना चर्चेला आल्यानंतर आपण किंवा आलेले उत्तर, आपण येथे दिलेले आहे, ते चुकीचे आहे, त्यामुळे आपण अडचणीत याल. डॉ.आंबेडकर रोडचा प्रश्न विचारलेला आहे. डॉ. आंबेडकर मार्ग पश्चिमेला नाही. तो पूर्वेला आहे. उत्तर ट्विस्ट करण्यात आलेले आहे. मुंबई शहरामध्ये झालेल्या वाहतुकीच्या कोंडी बद्दल प्रश्न विचारलेला आहे. मुंबईमध्ये 20 लाख वाहने आहेत आणि 2200 पोलीस आहेत हे सगळे मान्य आहे. दादरला जर आपण गेलात, तर दादरचा संपूर्ण रस्ता, हिंदमाता आणि डॉ. आंबेडकर रोड, या संपूर्ण रस्त्यावर खोदादाद सर्कलपासून सायनपर्यंत मेनरोडवर नो पार्कींग आहे. दोन्ही बाजूला बसेस उभ्या असतात. प्रितम हॉटेलच्या समोर जर त्याठिकाणी पदचारी म्हणाले की, आपणे इधर धंदा क्यो खडा किया है, तर सरळ सरळ .....

माझ्याकडे फोटो आहेत. मी ते आपल्याकडे देणार आहे. तेथे पोलीस सरळ पैसे घेत असतात, बसेसवाल्यांकडून. मी मुंबईचे वाहतूक नियंत्रण करणारे उपायुक्त आहेत, त्यांना विचारले की, आपण गुप्तवेश करुन त्याठिकाणी जा आणि बघा. दादरच्या स्टेशनसमोर टॅक्सी ड्रायव्हर्स लोकांबरोबर इतकी दादागिरी करतात की, पादचा-यांना चालणे मुस्कील होते. येथे सगळी हॉटल्स आहेत. प्रितम हॉटेल असेल, सगळी हॉटेल्स आहेत. तेथे शेकडो गाडया लागलेल्या असतात. आजुबाजूच्या सगळया गल्ल्या येथे नो-पार्कीग केलेले आहे तरीही. तेथे गाडयांचे पार्कींग होत असते. माझा प्रश्न असा आहे की, निवेदनात असे म्हटले आहे की, "दादर (पूर्व) येथील प्रितम हॉटेल ते दादर पोस्ट ऑफीस, डॉ. आंबेडकर मार्ग या ठिकाणी असलेल्या अनधिकृत फेरीवाल्यांवर महानगरपालिका निष्कासनाची कारवाई वेळोवेळी करीत असते." ही कारवाई कधी केली आहे? किती स्टॉल उचचले आहेत? प्रवाशी वाहतूक करणा-या खाजगी बसेस प्रवासी घेण्याकरीता व उतरविण्याकरिता काही वेळ रस्त्यालगत थांबतात, त्यांनी वाहतूक नियमांचे पालन न केल्यास त्यांच्या विरुध्द नियमित कारवाई करण्यात येते. मुळात तेथे नो-पार्किग आहे. त्या तेथे थांबतात कशा? तेथे स्टेट बँक ऑफ इंडिया आहे. तेथे इतकी भयानक स्थिती आहे. लोकसत्ता आणि महाराष्ट्र टाईम्स,व मंबईतील इतर सात वर्तमानपत्रात गेल्या पधरा दिवसात वाहतुकीची कशी कोंडी होते याचे छायाचित्र देऊन वर्णन आलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण..

एकाही अधिका-यांनी त्याची दखल घेतलेली नाही. किती अधिकरी गेले? तुम्ही कल्याणकारी राज्य म्हणता. वर्तमानपत्रात एखादी बातमी येते.माझा मुद्दा असा आहे की, ही बातमी आल्यानंतर आपल्याकडे तक्रार केल्या नंतर आपले अधिकारी तेथे गेले का? किती कारवाई केली?दादर स्टेशनवर कोणत्या प्रकारची कारवाई गेल्या महिनाभरात करण्यात आली? नो पार्किंगमध्ये तेथे मोठया प्रमाणात बसेस कां उभ्या राहतात?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, दादर पूर्व, येथे वाहतूक शाखेकडून या वर्षभरामध्ये 403 लोकांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे .....

दादर पूर्व या ठिकाणी जो स्टॉप आहे त्या ठिकाणी बाहेरच्या लक्झरी बसेस येतात. टॅक्सी वाहतूक करणारे त्या ठिकाणी येऊन थांबतात तसेच आपल्या महामंडळाच्या बसेस त्या ठिकाणी थांबतात त्यामुळे वाहतुकीची कोंडी होते.

श्री. प्रमोद नवलकर : कोहिनूर टेक्निकल इन्स्टीटयूट पूर्वेला आहे की पश्चिमेला आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : पूर्वेला आहे.

उपसभापती : माननीय श्री. मनोहर जोशी टाकतील तिकडे असेल.

श्री. प्रमोद नवलकर : पश्चिमेला आहे आणि पूर्वेला सुध्दा आहे.

उपसभापती : म्हणूनच मी म्हणालो की, माननीय श्री. मनोहर जोशी टाकतील तिकडे असेल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी दादर टेक्निकल इन्स्टीटयूट, एल्फिस्टन रोड असे लिहिले आहे. मी तो प्रश्न विचारलेला नाही. मला असे वाटते की, ते श्री. कोकणे यांचे हॉटेल आहे. ते टेक्निकल इंस्टीटयूट नाही.

उपसभापती : आपण दादर टेक्निकल इन्स्टीटयूट म्हणत आहात. माननीय मंत्रिमहोदय कोहिनूर टेक्निकल इंस्टीटयूट म्हणत आहेत.

श्री. मधुकर चव्हाण : कोहिनूर टेक्निकल इंस्टीटयूट या बाजूला नाही. माननीय मंत्रिमहोदय चुकीचे उत्तर देत आहेत. या ठिकाणी सभागृहामध्ये दिशाभूल होईल असे उत्तर देणे अयोग्य आहे. माझा प्रश्न असा आहे की, डॉ. आंबेडकर रोडवर नो पार्कीन्ग असताना बेकायदेशीररीत्या बसेस उभ्या का राहतात ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : डॉ. आंबेडकर रोडवर नो पार्कीन्ग असताना सुध्दा ज्या ज्या बसेस उभ्या राहतात त्यांच्यावर मागेही कारवाई केलेली आहे आणि आताही परत उभ्या राहात असतील तर कारवाई करण्यात येईल. लायसन्स जप्त करण्याची कारवाई करण्यात येईल. दंडात्मक कारवाई करण्यात येईल. लायसन्स रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : ज्यावेळी अधिवेशन चालू असते त्यावेळी प्रश्न आला की, थोडीफार कारवाई होते. त्यानंतर ती कारवाई बंद होते. अशा अवैध प्रवासी वाहतूक करणारी एकंदर किती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

डॉ. दीपक सावंत ...

वाहने आपण गेल्या महिनाभरामध्ये पकडली आहेत ? कारण सातत्याने ही बातमी वर्तमानपत्रामध्ये येत आहे. ट्रॅव्हेल्स कंपन्यांच्या ज्या गाडया उभ्या राहतात, मोठमोठया लक्झरी बसेस उभ्या राहतात त्यांच्यावर कोणती ठोस स्वरुपाची कारवाई करणार ? अधिवेशन काळापुरती नव्हे तर कायम स्वरुपी काय कारवाई करणार ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : या महिनाभराच्या काळामध्ये 103 लोकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

डॉ. दीपक सावंत : त्या ठिकाणी रोज किती गाडया उभ्या राहतात ? आपण 103 गाडयांवर कारवाई केल्याचे सांगत आहात.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : जेवढया गाडयांवर कारवाई केली ते मी सांगत आहे.

डॉ. दीपक सावंत : 103 गाडयांवर कारवाई केली असेल तर ही कारवाई म्हणजे हिमनगाचे टोक आहे. त्या ठिकाणी रोज 103 गाडया फिरत असतील परंतु त्या ठिकाणी जवळजवळ 60 ते 70 प्रवासी कार उभ्या असतात. आपण माझ्याबरोबर चला किंवा सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर यांच्याबरोबर जाऊन तो भाग पाहून या. सभापती महोदय, यावर उत्तर मिळत नाही. फक्त 103 गाडयांवर कारवाई केली यामध्ये या खात्याचा नाकर्तेपणा दिसून येतो.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, महिनाभराच्या काळात काय कारवाई केली असे सन्माननीय सदस्यांनी विचारले. या महिनाभराच्या काळामध्ये 103 लोकांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपण डॉ. आंबडेकर रोडवर जाऊन पहावे. त्या रोडवर पुण्याला जाणाऱ्या आपल्या एशियाड बसेस उभ्या असतात. त्या ठिकाणी नवीन मुंबईकडे जाणाऱ्या आपल्या बसेस उभ्या असतात. त्या ठिकाणी तीन तीन रांगांमध्ये गाडया उभ्या असतात. त्यांचे क्लिनर खाली उतरुन आरामशीर सामान भरतात. शेकडो गाडया उभ्या असतात. असे असताना या ठिकाणी थातुरमातुर उत्तर दिले जात आहे. त्या ठिकाणी सरळसरळ पैसे घेतले जातात. नोटा घेतल्या जातात. याबाबतचे आपल्याला फोटो बघावयाचे आहेत काय ? त्या ठिकाणी ते दादागिरी करतात. दादरच्या बाजूला त्या ठिकाणी 200-200

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

श्री. मधुकर चव्हाण ....

टॅक्सीज उभ्या असतात. त्या ठिकाणी सरळ पैसे घेतले जातात. एका हातात काठी घेतात आणि चल आगे, चल आगे असे सांगतात. एका हाताने चल आगे असे म्हणावयाचे आणि दुसऱ्या बाजूला ड्रायव्हर त्या ठिकाणी पैसे देत असतात. त्या ठिकाणी स्वामीनारायण मंदिर आहे. त्या ठिकाणचा तमाशा बघा. तुम्ही मुंबईच्या जनतेला वेठीस धरले आहे. आम्ही या ठिकाणी लक्षवेधी सूचना विचारतो ती केवळ विचारावयाची म्हणून विचारत नाही. या ठिकाणी जनतेचे प्रश्न सुटणार नसतील तर हरी कीर्तन सुरु करा. मंत्र्यांचे कीर्तन ऐकून आम्ही समाजवादाच्या गप्पा ऐकू. त्या ठिकाणी 250 क्वॉलीस जिप्स बेकायदेशीरपणे उभ्या असतात. त्या प्रितम हॉटेलच्या ठिकाणी उभ्या असतात. तुमचे डी.सी.पी. जातात काय ? तुमचे ए.सी.पी. जातात काय ? तुमचे इन्स्पेक्टर जातात काय ? त्या ठिकाणी फेरीवाले लोकांना मारतात. आपण त्या ठिकाणी सगळया 150 ट्रॅव्हल एजन्ट्सना फूटपाथवर जागा दिलेल्या आहेत. लोकांनी कोठून चालावयाचे ? दुसऱ्या बाजूला स्टॉल धारक आहेत. मध्ये सगळे दलाल उभे असतात. या ठिकाणी अधिकारी चिटोरे देतात त्याप्रमाणे या ठिकाणी मंत्री महोदय उत्तरे देत आहेत.

डॉ. दीपक सावंत : आपण त्या ठिकाणी जाऊन बघा.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभागृहामध्ये लक्षवेधी सूचना लागत नाहीत, 93 ची सूचना लागत नाही, प्रश्नोत्तरे लागत नाहीत, मग आम्ही लोकांचे प्रश्न सोडवावयाचे कसे ? लोकसभेत केंद्र सरकारने उत्तर दिलेले आहे ते माझ्याजवळ आहे. त्याची शासनाने दखल घेतली आहे काय ?

श्री.अरविंद सावंत : तेथे जेवढे स्टॉल्स आहेत. त्या स्टॉल्सवर जेवढया ट्रॅव्हल्स एजन्सीज आहेत त्यांच्या गाडया पहा. तुमचे अधिकारी काय करतात त्याची मला कल्पना नाही. तेथे जेवढे स्टॉल्स आहेत त्या सगळया स्टॉल्सवर खाजगी गाडयांचे कोणकोणते रुट्स आहेत ते पहावयास मिळतात. येथे आपण मात्र केवळ 103 गाडयांवरील कारवाईची माहिती देत आहात. त्याठिकाणी दररोज 200-300 गाडया येत असतील. एवढया एजन्सीज आहेत आणि त्यांचे स्वत:चे खाजगी स्टॉल्स आहेत. त्याच्यासमोर एशियाडच्या बसेस थांबतात. एस.टी.महामंडळाचा तोटा हेच लोक करीत असतात. म्हणून शासनाने यावर तातडीने कारवाई करावी किंवा त्या स्टॉल्सवर सुध्दा आपल्याला माहिती मिळेल.

उप सभापती : आता या लक्षवेधीच्या अनुषंगाने मा.सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या सर्व विचारांत घेता मी मा.गृहराज्यमंत्र्यांना एक सूचना करु इच्छितो की, मा.सदस्यांनी वर्णन केलेल्या सर्व भागांच्या संबंधित अधिका-यांना ताबडतोब सर्वेक्षण करावयास लावून यामध्ये संबंधित यंत्रणा मग ती महापालिका असो वा पोलीस विभाग असो त्यांनी काय कार्यवाही केली याचे येत्या सात दिवसामध्ये आपण या सभागृहामध्ये तपशीलवार निवेदन करावे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मराठी चित्रपटांच्या प्रदर्शनासाठी मुंबई, महाराष्ट्रामध्ये थिएटर्स न मिळणे.

मु.शी. : मराठी चित्रपटांच्या प्रदर्शनासाठी मुंबई, महाराष्ट्रामध्ये थिएटर्स न मिळणे यासंबंधी सर्वश्री प्रमोद नवलकर, मधुकर सरपोतदार, डॉ.नीलम गो-हे, सर्वश्री अनंत तरे, डॉ.दीपक सावंत, विलास अवचट, अरविंद सावंत,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.प्रमोद नवलकर (मुंबई पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सांस्कृतिक कार्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई, महाराष्ट्रामध्ये मराठी चित्रपट निर्मितीची वाढती संख्या, मराठी चित्रपट निर्मितीसाठी शासनाकडून मिळणारे अनुदान त्यामुळे मराठी चित्रपटांची निर्मिती वेगात होत असून आठवडयाला एकाहून अधिक चित्रपट प्रदर्शित होणे, असे असतांना मराठी चित्रपटांच्या प्रदर्शनासाठी मुंबई, महाराष्ट्रामध्ये थिएटर्स मिळत नसल्याने मराठी फिल्म इंडस्ट्रीपुढे निर्माण झालेली कोंडी, चित्रपट मालकांकडून मराठी चित्रपटवाल्यांना मिळणारी सापत्न भावाची वागणूक, तसेच चित्रपटगृहांचे भाडे अव्वाच्यासव्वा आकारण्यात येणे, महाराष्ट्रात हिन्दी सी ग्रेड फिल्म इतकेही मराठी चित्रपटांना प्राधान्य दिले न जाणे, चित्रपटगृह मालकांवर तसेच नवीन चित्रपटगृहांना परवानगी देतांना मराठी चित्रपट दाखविण्याबाबत अट घालण्याची नितांत आवश्यकता, मुंबई शहरामधील काही सिनेमागृहांत मराठी चित्रपट प्रदर्शित करण्यासाठी सक्तीने थिएटर्स उपलब्ध करुन देण्याच्या शासनाच्या अटी असतांना त्या पायदळी तुडविण्यात येणे, राज्याच्या राजधानीत मराठी चित्रपटांची होणारी कळचेपी, त्यावर शासनाने तात्काळ उपाययोजना करण्याबाबत दाखविलेली अक्षम्य हेळसांड, परिणामी जनतेत निर्माण झालेली चीड व तीव्र असंतोष लक्षात घेता याप्रकरणी शासनाने तातडीने केलेली व करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. "

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KGS/ MHM/ MAP/

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, मा.मंत्रिमहोदयांना या निवेदनामध्ये काही दुरुस्ती करावयाची आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (बसून) : नाही.

श्री.प्रमोद नवलकर : मा.मंत्रिमहोदयांना दुरुस्ती करावयाची नाही. परंतु मी दुरुस्ती केली तर ? आपण या लक्षवेधीचे निवेदन वाचून पहावे. या निवेदनामध्ये फार मोठी चूक आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (बसून) : नाही.

श्री.प्रमोद नवलकर : यामध्ये चूक असल्यास आपण काय करणार आहात ? सभापती महोदय, या निवेदनामध्ये फार मोठी चूक आहे. फार भयंकर चूक आहे. निवेदनाला दुरुस्ती करावयाची आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : या उत्तराला दुरुस्ती करावयाची नाही.

श्री.प्रमोद नवलकर : आपली खात्री आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : होय, दुरुस्ती नाही.

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, गेल्याच आठवडयामध्ये मा.मंत्रिमहोदयांनी 15 लाखाचे 20 लाख केले होते ते 5 लाख कोठे गेले ? एवढी मोठी चूक आहे. ज्यावेळी युतीचे राज्य होते त्यावेळी 15 लाख नाही तर 16 लाख दिले होते. त्यातील 1 लाख कोठे गेले ? ज्या सवलती दिल्या होत्या त्या सवलतीमध्ये असे म्हटले होते की, " फिल्म सिटीमध्ये ज्यावेळी शुटिंग केले जाईल त्यावेळी 50 टक्के सवलत मिळेल." ही सवलत कोठे गेली ? मा.मंत्रिमहोदयांना यातील काहीच माहिती नसल्यामुळे हे निवेदन राखून ठेवण्यात यावे. कारण त्यांनी सगळे चुकीचे उत्तर दिलेले आहे. मी आपल्याला उत्तर दुरुस्त करण्याची संधी दिली होती. ही तिन्ही उत्तरे चुकीची आहेत. तसेच पहिला चित्रपट पूर्ण झाल्यावर नाही तर पहिला चित्रपट पूर्ण होऊन तो थिएटरला लागल्यावर असे म्हटले पाहिजे. त्यामुळे दिशाभूल करणारे हे संपूर्ण उत्तर आहे. सभापती महोदय, अशावेळी काय करावयाचे ते सांगावे ? हा ड्राफ्ट तुम्हाला कोणी करुन दिला ? 16 लाखाऐवजी 15 लाख, चित्रपट पूर्ण झाल्यावर नाही तर तो थिएटरला लागल्यानंतर असे यामध्ये उत्तर पाहिजे होते. तुम्हीच 16 लाखाचे 20 लाख केलेले आहेत. तसेच चित्रनगरीमधील

5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रमोद नवलकर....

शुटिंगमध्ये 50 टक्के सवलत दिली जाईल याचा कोठेही उल्लेख नाही. हे सगळे उत्तर ठोकून दिलेले आहे. त्यामुळे आता काय करावयाचे हे मा.मंत्रिमहोदयांनीच सांगावे. तुम्ही ही लक्षवेधी सूचना राखून ठेवता काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मा.सदस्य सांगत आहेत त्याप्रमाणे उत्तरात दुरुस्ती करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मा.सदस्य श्री.प्रमोद नवलकरसाहेबांकडे त्यावेळी हे खाते होते, त्याबाबत त्यांना माहिती असल्यामुळे त्यांनी मा.मंत्रिमहोदयांना चार वेळा उत्तरात दुरुस्ती करावयाची आहे काय असे विचारले आहे. प्रश्न गांभीर्याने विचारल्यावर प्रश्नाचे उत्तर देण्याची पध्दत योग्य नाही. अधिका-यांनी त्यांच्याकडे चिठ्ठी पाठविली परंतु अधिकारी सरळ सरळ हा प्रश्न लाईटली घेत आहेत. चुकीचे उत्तर सभागृहापुढे आणण्याचे ज्या अधिका-यांनी हे काम केले आहे त्या अधिका-याविरुध्द काय कारवाई करणार हा प्रश्न निर्माण झालेला आहे. आपण सांगितले की, मी हे करतो, अमूक करतो. हे उत्तर होऊ शकत नाही. ज्या अधिका-याच्या माध्यमातून आपण सभागृहाची दिशाभूल केलेली आहे त्यासंदर्भात आपण कोणती पावले उचलणार आहात त्याची माहिती आम्हाला सांगावी. कारण हे अधिकारी सुटतात.

नंतर श्री.शिगम.....

अशुध्दीत प्रत / शुध्दीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : अजून बजेट पास झालेले नाही. त्यामुळे तसे उत्तर दिलेले आहे.

डॉ. दीपक सावंत : युतीच्या काळामध्ये 15 लाखा ऐवजी 16 लाखाची तरतूद केलेली होती. तर मग एक लाख कोठे गेले ?

उपसभापती : ही लक्षवेधी मी राखून ठेवीत आहे.

श्री. दिवाकर रावते : उपसभापती महोदय, लक्षवेधी राखून ठेवल्या बद्दल मी आपणास धन्यवाद देतो. या लक्षवेधीच्या निवेदनाद्वारे सभागृहाची दिशाभूल झालेली आहे. या सभागृहामध्ये अर्थसंकल्प सादर केल्यानंतर शासनाने कोणकोणती धोरणे घेतलेली आहेत हे सर्व जनतेला माहीत झालेले आहे. हा अर्थसंकल्प पास झाल्यानंतर किती निधी मिळणार आहे आणि आधी किती निधी मिळत होता अशा प्रकारचे उत्तर मंत्रिमहोदयांना देता आले असते. परंतु अधिका-यांनी आम्हाला पेचात पकडण्याचा डाव टाकलेला असावा. म्हणून माझे स्पष्ट म्हणणे असे आहे की, अधिका-यांच्या संदर्भात कारवाई केली नाही तर आम्ही पाठपुरावा केल्या शिवाय राहाणार नाही. मा.सदस्य श्री.प्रमोद नवलकर यांनी सांगितले की, त्यांच्या काळात 16 लाख रु. दिले. मग एक लाख रु. कमी दिले असतील. तेव्हा हा प्रकार काही बरोबर नाही.

श्री. प्रमोद नवलकर : मी तांत्रिक चूक दाखविलेली आहे. महत्वाचा भाग असा आहे की, मराठी चित्रपटांना थिएटर्स् मिळत नाहीत. आतापर्यन्त यासंदर्भात अनेक ऑडर्स निघाल्या. याबाबतीत शासनाने कधी चौकशी केली नाही. मंत्री महोदयांनी विधान भवनाच्या खिडकीबाहेर पाहिले तर त्यांना सीआर2 मल्टिप्लेक्स आयनॉक्स थिएटर दिसेल. अडीच-तीन महिन्यापूर्वी हे थिएटर झालेले आहे. तेथे एखादा तरी मराठी चित्रपट लागलेला आहे काय ? कोणत्याही थिएटरला महिन्यातून एकदा तरी मराठी चित्रपट लावला जातो काय ? कोणत्याही थिएटरला मराठी चित्रपट दाखविला जात नाही. वर्षातून एक महिना तरी मराठी चित्रपट दाखविला जावा अशा प्रकारचे आदेश श्री. सुशीलकुमार शिंदे हे सांस्कृतिक कार्य मंत्री होते त्यावेळी निघालेले होते. माझी विनंती अशी आहे की, सुधारित निवेदन देताना त्यामध्ये कोणतीही त्रुटी ठेवू नये.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : कोकण पॅकेजमध्ये आंबोली येथे वन खात्याला वन औषधीचा प्रसार करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देणे

मु. शी : कोकण पॅकेजमध्ये आंबोली येथे वन खात्याला वन औषधीचा प्रसार करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देणे यासंबंधी सन्माननीय सदस्य मेजर सुधीर सावंत यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

मेजर सुधीर सावंत (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय वन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कोकण पॅकेजमध्ये आंबोली येथे वनखात्याला वन औषधीचा प्रसार करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येणे, त्याचबरोबर वन विश्रामगृहासाठी निधी देण्यात येणे, परंतु फॉरेस्ट पार्क व विश्रामगृह यांची सुधारणा न करता नवीन मैदानात कंपाऊंड करणे व टेंडर न काढता कामाला सुरुवात होणे इत्यादी प्रकार नुकतेच उघडकीस येणे, त्यात डी.एफ.ओ. व आर.एफ.ओ. यांच्याकडून होत असलेला प्रचंड भ्रष्टाचार, यावर शासनाने तातडीने चौकशी करुन करावयाची कारवाई व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री. बबनराव पाचपुते (वनमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

....3 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मेजर सुधीर सावंत : संपूर्ण भारतामध्ये 4 टक्के वनौषधी ही सह्याद्रीमध्ये आहे हे नाबार्डच्या अहवालावरुन आपणा सर्वांना माहीत झालेले आहे. बायोडायव्हर्सिटीचे संरक्षण करण्याच्यादृष्टीने 10 वर्षापूर्वी आम्ही बोटॅनिकल गार्डन, औषधी वनस्पती पार्क करण्याची मागणी केली होती. त्याप्रमाणे तेथे काम सुरु झाले. मागील दोन डी.एफ.ओ.नी चांगल्या प्रकारचे काम करुन औषधी वनस्पतीची लागवडही केलेली होती. औषधी वनस्पतीचे चांगले पार्क तेथे तयार झाले होते. परंतु मागील तीन वर्षामध्ये त्या वनस्पती पार्कचे संरक्षण झालेले नाही. त्याठिकाणी आता कोणतेही झाड नाही. जेव्हा कोकण पॅकेज झाले त्यावेळी 70 हेक्टर क्षेत्रामध्ये औषधी वनस्पतीची लागवड आणि तिचे संरक्षण करण्यासंदर्भात निर्णय घेण्यात आला. परंतु जेथे हा प्रकल्प करण्याचा निर्णय झाला तेथे तो न करता नवीन ठिकाणी, उघड्या मैदानावर, जेथे कोणत्याही प्रकारची लागवड झालेली नाही तेथे या प्रकल्पाच्या कामास सुरुवात करण्यात आली. टेंडर न काढता भिंत बांधण्याचे काम सुरु केलेले आहे. यामध्ये डी.एफ.ओ. आणि रेंज ऑफिसर यांनी प्रचंड भ्रष्टाचार केलेला आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मेजर सुधीर सावंत..

म्हणून माझा प्रश्न असा आहे की,या संपूर्ण प्रकरणाची चौकशी केली जाईल काय ? त्याच प्रमाणे जेथे निधीचा उपयोग करावयाचा होता तेथे निधीचा उपयोग न करता दुसरीकडे करण्यात येत आहे. पूर्वीची जी प्रॉपर्टी आहे तिच्यात सुधारणा न करता नवीन ठिकाणी काम सुरु केलेले आहे. ते नवीन सुरु करण्यात आलेले काम थांबविण्यात येईल काय ?

श्री. बबनराव पाचपुते : माननीय सभापती महोदय, आंबोली क्षेत्र आहे हे समुद्र सपाटीपासून 930 मीटर उंचीवर आहे. आंबोली येथील क्षेत्र मोठे असले तरी त्यातील 37.27 हेक्टर क्षेत्र फक्त वन खात्याकडे आहे. या ठिकाणी खूप मोठया प्रमाणात पाऊस पडतो. विशेषत: त्या ठिकाणी वन औषधीच्या संदर्भामध्ये चांगल्या प्रकारचा प्रयोग केलेला आहे आणि अजून काही प्रयोग करीत आहोत. त्या ठिकाणी वन औषधींचा पार्क तयार केलेला आहे. या ठिकाणी दोन-तीन वर्षापासून औषधींचा प्रसार करण्यासाठी सतत मागणी करुन सुध्दा निधी उपलब्ध करुन दिला गेलेला नाही ही वस्तुस्थिती खरी आहे. कोकण पॅकेजमध्ये 1 कोटी रुपयांची मागणी केली होती. प्रत्यक्षात 1 कोटी रुपयांऐवजी 44 लाख 95 हजार रुपये मंजूर करण्यात आले होते, परंतु या मंजूर निधीपैकी एकही पैसा अद्याप पर्यन्त मिळालेला नाही. मी त्या जिल्हयाच्या दौ-यावर गेलो होतो. त्यावेळी मला ही गोष्ट समजली. त्यावेळी त्या ठिकाणी लवकर पैशांची उपलब्धता करुन द्यावी अशा प्रकारच्या सूचना मी डी.एफ.ओ. आणि आर.एफ.ओ. यांना दिलेल्या आहेत. या शिवाय डी.पी.डी.सी.मधून 1 लाख 72 हजार रुपये मंजूर झाले होते. तोही पैसा या ठिकाणी मिळालेला नाही.या ठिकाणी निधीच उपलब्ध झाला नसल्यामुळे भ्रष्टाचार होण्याचा प्रश्नच उदभवत नाही. या ठिकाणची कामे पावसाळयाच्या पूर्वी व्हावीत म्हणून आमचा प्रयत्न आहे. 4 हजार मि.ली. पाऊस त्या ठिकाणी पडतो. या ठिकाणची कामे लवकर व्हावीत म्हणून निविदा न काढता या कामांसंबधीचा जो प्रचलीत दर आहे त्या प्रमाणे काम करण्यास सुरुवात केली आहे. त्या ठिकाणी वन कायद्याचा भंग होऊ नये म्हणून त्या ठिकाणच्या स्थानीक अधिका-यांनी निधी उपलब्ध नसताना सुध्दा कामे सुरु करावीत अशा प्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत. त्या सूचनेप्रमाणे तेथे काम चालू आहे. या ठिकाणी मुद्दा उपस्थित केला गेला की, मोकळया जागेत काम चालू आहे. ज्या ठिकाणी पार्क आहेत त्या ठिकाणी आपल्याला ग्रीन हाऊस तयार करावयाचे आहे. त्या ठिकाणी वेगळया वन औषधीची लागवड करावयाची आहे. त्याचे जतन करावयाचे आहे. वन औषधीचे जतन आणि संवर्धन या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते..

दोन्ही गोष्टी करीत असताना आवश्यक असणा-या पैशांची व्यवस्था झाली नाही. परंतु त्या ठिकाणच्या वनस्पतींची छाटणी करणे आणि त्यास पाणी देण्यासाठीची व्यवस्था केलेली आहे. या शिवाय लोकांच्या वाहनांसाठी या मोकळया जागेचा वापर होणार आहे. मोकळया जागेवर पार्कींगची व्यवस्था करण्यासाठी बाजुने माती आणून ती जागा व्यवस्थित करण्यात येत आहे. त्यासाठी जास्त खर्च झालेला आहे अशी काही परिस्थिती नाही. या संदर्भात सन्माननीय सदस्यांना मी पुढील महिन्यात सोबत घेऊन जाईन. त्या ठिकाणी चांगल्या प्रकारचा वन औषधीचा पार्क निर्माण करण्याचा कार्यक्रम करु अशी आमची भूमिका आहे. या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार झालेला नसल्यामुळे अधिका-यांवर कारवाई करण्याची आवश्यकता नाही.

श्री. अरविंद सावंत : शासनाने पॅकेज जाहीर केले आणि त्यातील एक दमडा देखील उपलब्ध करुन दिलेला नाही ही गोष्ट सन्माननीय मंत्री महोदयांनी मान्य केले ही चांगली गोष्ट आहे. या ठिकाणच्या कामास 44.95 लाख रुपयास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. परंतु त्यातील एक दमडीचा निधी शासनाने उपलब्ध करुन दिलेला नाही. या ठिकाणच्या कामास वेळ लागू नये म्हणून टेंडर काढले नाही. टेंडर काढले तर वेळ लागेल. म्हणून टेंडर न काढता तेथील वनक्षेत्रपालांनी कामास सुरुवात केली. टेंडर न काढता काम सुरु केला यास खरा सदस्यांचा आक्षेप आहे. निधी उपलब्ध नसताना वनक्षेत्रपालांनी सर्व्हेक्षण, 440 मिटर लांब पाया खोदणे, पायात भर घालणे,क्रॉंक्रीट टाकणे इत्यादी कामांना सुरुवात केलेली आहे. यासाठी पैसा कुठून उपलब्ध होणार आहे ? योजनाबाहय सोडा परंतु योजनेतंर्गत जो नियतव्यय मंजूर झाला म्हणजे डी.पी.डी.सी.मध्ये निधी मंजूर झाला होता तोही निधी उपलब्ध झालेला नाही. डी.पी.डी.सी.मध्ये मंजूर झालेला निधी आपण कधी उपलब्ध करुन देणार आहात ?

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना पुढे सुरु...

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय. मा.सदस्यांनी सांगितलेली वस्तुस्थिती बरोबर आहे. पैसे मिळण्याचे मान्य केलेले आहे आणि त्याप्रमाणे काम सुरु करण्यास सांगितलेले आहे. टेंडर काढण्यासाठी वेळ लागेल म्हणून मंजुरीच्या रेटप्रमाणे काम सुरु करण्यास सांगितले आहे. 45 लाखापैकी फक्त 1 लाख 17 हजाराचे काम सुरु करण्यास सांगण्यात आले आहे. आमच्या अभियंत्यांना काम नाही. यामध्ये भ्रष्टाचार झालेला नाही आणि झाला असेल तर शासन कोणालाही माफ करणार नाही. प्लॅनमधून 4-5 दिवसात पैसे मिळतील अशी अपेक्षा आहे. दोन्ही जिल्हाधिकारी आणि आयुक्तांनी पैसे देतो असे सांगितले आहे. काम सुरु करण्यात येईल.

मेजर श्री. सुधीर सावंत : सभापती महोदय, 200 एकर जमिनीला पूर्ण कंपाउंड असताना मोकळया जमिनीमध्ये कंपाउंड बांधण्याची गरज काय होती ? पैसे मंजूर नसताना काम सुरु केले. यामध्ये भ्रष्टाचार झाला नाही असे म्हणणे मला मान्य नाही. नवीन ठिकाणी काम सुरु करण्याची काय आवश्यक आहे ? याची चौकशी करावी आणि यासंदर्भात निश्चितपणाने कारवाई करावी अशी शासनाला विनंती आहे.

श्री. बबनराव पाचपुते : It is a suggestion for action.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, कोकण पॅकेज अंतर्गत जो निधी उपलब्ध होणार आहे त्यातून कर्नाटकातून जे हत्तींचे कळप या भागात येऊन नुकसान करीत आहेत त्यांच्या बंदोबस्ताची व्यवस्था केली जाणर आहे काय ? तसेच या भागात हत्तींच्या कळपांमुळे जे नुकसान झालेले आहे त्यासंदर्भात शेतक-यांना शासन मदत करणार आहे काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या लक्षवेधीच्या संदर्भातील हा प्रश्न होत नाही. यासाठी वेगळी लक्षवेधी सूचना किंवा प्रश्न विचारावा लागेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>विशेष उल्लेख</u>

पृ.शी.: मुंबईतील रिक्षा चालकांना मीरा-भाईंदर परिसरात धंदा करण्यास प्रतिबंध करणे.

मु.शी.: मुंबईतील रिक्षा चालकांना मीरा-भाईंदर परिसरात धंदा करण्यास प्रतिबंध करणे याबाबत श्री. अरविंद सावंत यांनी दिलेली विशेष उल्लेखची सूचना.

उप सभापती : मा. सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" मुंबईतील अनेक रिक्षा कायद्यांचे उल्लंघन करुन दहिसर चेकनाक्यावरुन मीरा-भाईंदर परिसरात दिवस-रात्र राजरोसपणे धंदा करतात. दहिसरवरुन येणा-या रिक्षा तसेच मीरा-भाईंदर मधील चेकनाक्यांवर उभ्या असलेल्या रिक्षा यामुळे दररोज प्रचंड प्रमाणात वाहतूक कोंडी होते. तसेच मीरा-भाईंदर मधील रिक्षा चालकांच्या धंद्यावर होणारा विपरित परिणाम,अनेक रिक्षावाल्यांचा बँकेचे कर्जाचे हप्ते भरण्याइतकीसुध्दा कमाई होत नाही. त्यामुळे त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. यासंदर्भात दि. 17.3.2005 च्या सुमारास ठाणे जिल्हा(ग्रामीण) पोलीस अधिक्षकांना एक निवेदन महाराष्ट्र रिक्षाचालक सेनेने दिलेले असून त्यावर कोणतीच कारवाई होत नाही. यासंदर्भात लवकर तोडगा न काढल्यास आंदोलन करण्याचा पवित्रा आहे. तरी याबाबत शासनाने निवेदन करावे."

सभापती महोदय, मुलुंड-ठाणे भागात एक चेकनाका आणि दहिसर येथे एक चेकनाका असे दोन चेकनाके मुंबईमध्ये येण्यासाठी आहेत. खास करुन मीरा-भाईंदर चेथील चेकनाक्यावरुन एस्सेल वर्ल्डला जाण्यासाठी मुंबईतील परवानाधारक रिक्षाचालक मीरा-भाईंदरमध्ये जातात. प्रत्यक्षात मीरा-भाईंदर परिसरासाठी ज्या रिक्षावाल्यांचा परवाना आहे त्यांना मात्र भिका-यासारखे जगावे लागत आहे. या रिक्षाचालकांनी कर्ज घेतलेले असताना त्यांना कर्जाचे हप्ते देखील फेडता येत नाहीत अशी त्यांची अवस्था आहे. एस्सेल वर्ल्डचा स्टॅम्प लावून हे मुंबईतील परवानाधारक रिक्षा चालक याठिकाणी बारबाला घेऊन जातात. यातून दोन प्रश्न निर्माण होतात. मुंबईतील परवानाधारक रिक्षाचालक आणि मीरा-भाईंदर परिसरातील रिक्षाचालक यांच्यामध्ये वैमनस्य निर्माण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होत आहे आणि त्यातून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. ऑक्ट्रॉयवाल्यांचा दोन्ही ठिकाणी छळवाद आहे. तसेच वाहतुकीची प्रचंड कोंडी निर्माण होत आहे. महाराष्ट्र रिक्षाचालक सेनेच्या वतीने यासंदर्भात लेखी निवेदन दिलेले आहे तरीही अजून कारवाई होत नाही. माझी अशी विनंती आहे की, मुंबईच्या भागातील रिक्षाचालकांना मीरा-भाईंदर भागात रिक्षाचा धंदा करण्यापासून प्रतिबंध करावा आणि वाहतुकीची कोंडी कमी करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : जळगाव महानगरपालिकेने सफाई कामगारांच्या रिक्त जागा त्वरित भरणे

मु.शी : जळगाव महानगरपालिकेने सफाई कामगारांच्या रिक्त जागा त्वरित भरण्याबाबत प्रा.जोगेन्द्र कवाडे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उप सभापती : माननीय सदस्य प्रा.जोगेन्द्र कवाडे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा.जोगेन्द्र कवाडे (नामनियुक्त) :महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :

"जळगाव नगरपालिका अस्तित्वात असतांना 541 सफाई कामगारांच्या जागा भरण्यास शासनासने मान्यता दिली होती. परंतु तत्कालीन नगरपालिकेने शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करुन सफाई कामगारांची भरती केली नाही. सध्या महानगरपालिका अस्तित्वात आल्याने सफाई कामगारांच्या जागा पर्यायाने वाढल्या आहेत परंतु मागील 15 ते 16 वर्षापासून या ठिकाणी फक्त 400 ते 500 सफाई कामगार कार्यरत आहेत.

जळगाव नगरपालिकेतील रिक्त जागा त्वरित भरण्यात याव्यात. कामगारांची आर्थिक पिळवणूक थांबवावी, तसेच तेथे सुरु असलेली ठेकेदारी पध्दती बंद करण्यात यावी यादी न्याय्य मागण्यांसाठी राष्ट्रीय मजदूर सेवा या कामगार संघटनेतर्फे गेल्या दोन महिन्यापासून आंदोलन सुरु असून प्रस्तुत संदर्भात शासनाने उचित कारवाई करुन जळगाव महानगरपालिकेच्या सफाई कामगारांना न्याय द्यावा यासाठी उक्त बाब विशेष उल्लेखाच्या सूचनेव्दारे मी सभागृहात सादर करीत आहे ".

सभापती महोदय,जळगाव महानगरपालिकेतील सफाई कामगारांच्या प्रश्नाकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.जळगाव नगरपालिका जेव्हा अस्तित्वात होती तेव्हा 541 सफाई कामगारांच्या जागा भरण्यास शासनाने मान्यता दिली होती. परंतु तत्कालीन नगरपालिकेने सफाई कामगारांची भरती केली नाही आणि शासनाच्या आदेशाचे उल्लंघन केले होते.अद्यापि या जागा रिक्त आहेत त्यानंतर जळगाव नगरपालिकेचे रुपांतर महानगरपालिकेमध्ये झाले त्यानंतर सफाई कामगारांच्या जागा वाढल्या व महानगरपालिकेचे कामसुध्दा वाढले आणि महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्राची

2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.कवाडे....

व्याप्तीसुध्दा वाढली होती.परंतु सफाई कामगारांच्या ज्या जागा भरावयाच्या होत्या त्या जागा महानगरपालिकेने भरल्या नाहीत.15 ते 17 वर्षा पासून महानगरपालिकेमध्ये 400 ते 500 सफाई कामगार कार्यरत आहेत. सफाई कामगारांच्या रिक्त जागा त्वरित भरण्यात याव्यात यासाठी जळगाव जिल्हयाच्या राष्ट्रीय मजदूर सेना या कामगारांच्या संघटनेने महानगरपालिकेसमोर बेमुदत साखळी उपोषण सुरु केले होते .जवळपास 73 दिवसापर्यन्त हे साखळी उपोषण सुरु होते.त्यानंतर 11.3.2005 पासून आमरण उपोषण सुध्दा सुरु करण्यात आले होते.त्यामध्ये 5 महिलांची प्रकृती खालावल्यामुळे त्या महिलांना दवाखान्यात भरती करण्यात आले होते.या महानगरपालिकेमध्ये 400 ते 500 सफाई कामगारांकडून सफाईचे काम करुन घेतले जाते.परंतु त्यांना सेवेत नियमित करुन घेतले जात नाही . हे सफाईचे काम ठेकेदारी पध्दतीने केले जात आहे. त्या ठिकाणी जे ठेकेदार नेमण्यात आलेले आहेत .ते ठेकेदार या सफाई कामगारांचे प्रचंड शोषण करीत असतात.सभापती महोदय, माझी आपल्या मार्फत शासनाला अशी विनंती आहे की जे सफाई कामगार आहेत त्यांना सेवेत कायम करण्यात यावे तसेच ठेकेदारी पध्दती बंद करण्यात यावी. आणि शासनाने जे आदेश दिले होते त्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी जळगाव महानगरपालिकेला सूचना द्यावी. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : विद्युत मंडळातील अधिका-यांच्या भ्रष्टाचाराची उच्च स्तरीय चौकशी करण्याची कर्मचा-यांनी केलेली मागणी

मु.शी : विद्युत मंडळातील अधिका-यांच्या भ्रष्टाचाराची उच्च स्तरीय चौकशी करण्याची कर्मचा-यानी केलेली मागणी या बाबत श्री.जयंत प्र.पाटील यांनी दिलेली विशेष उल्लेखासंबंधीची सूचना

उप सभापती : माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) :महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो.

"सभापती महोदय, विद्युत मंडळातील अधिका-यांच्या भ्रष्टाचाराची उच्च स्तरीय चौकशी करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या कर्मचा-यांनी केल्याने अधिकारी वर्गात खळबळ उडाली आहे. भिंगारी (ता. पनवेल,जि.रायगड) येथे कर्मचा-यांची परिषद भरली होती. त्यामध्ये ही मागणी करण्यात आली आहे.

रोजच्या कामासाठी आवश्यक असणारी विद्युत उपकरणे मागणी करुनही पुरविली जात नाहीत. ग्राहकाला नवीन जोडणी देतांना अधिकारी प्रचंड भ्रष्टाचार करतात तसेच मीटर बसविणे,रिडींग घेणे,मिटर बदलणे इत्यादी कामातही अधिकारी भ्रष्टाचार मोठया प्रमाणात करतात असाही आरोप कर्मचा-यांनी अधिका-यांच्या विरुध्द केला आहे.

तरी वीज मंडळाच्या कर्मचा-यांनीच आपल्या वरिष्ठ अधिका-याच्या विरुध्द कृती समितीच्या वतीने भरलेल्या परिषदेमध्ये जाहीर आरोप केल्यामुळे शासनाने या गंभीर प्रकरणाची तातडीने दखल घेण्यासाठी मी हा विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : कोकण कृषी विद्यापीठाने तयार केलेला कोकण विकासाचा कार्यक्रम

मु.शी : कोकण कृषी विद्यापीठाने तयार केलेला कोकण विकासाचा कार्यक्रम या बाबत डॉ.अशोक मोडक यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उप सभापती : माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर) :महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"कोकण कृषी विद्यापीठामार्फत प्रस्तावित असलेला कोकण विकासाचा कार्यक्रम व महाराष्ट्र सरकारचे दायित्व "

सभापती महोदय,दापोली येथील बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाने कोकण विकासाचा एक सुधारित कार्यक्रम तयार केला आहे.त्या सुधारित कार्यक्रमानुसार पडिक जमिनीच्या विकासासाठी मुडघे या ठिकाणी संशोधन केन्द्र सुदृढ करावे अशी एक कल्पना आहे.महाराष्ट्र सरकारने यासाठी एक कोटी रुपये मंजूर केलेले आहेत आणि आतापर्यन्त जेमतेम साडेसदोतीस लाख रुपये उपलब्ध झालेले आहेत. या विशेष उल्लेखाव्दारे मला अशी विनंती करावयाची आहे की,जवळजवळ साठ टक्के रक्कम अजून मिळावयाची आहे तेव्हा कोकणाच्या विकासासाठी ही रक्कम लवकर मिळणे अत्यावश्यक आहे.त्याचबरोबर बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाने दापोली येथे एक फळ प्रक्रिया प्रशिक्षण आणि संशोधन केन्द्र स्थापन करण्याचा मनोदय आखला आहे.त्यासाठी केन्द्राच्या योजनातून अर्थ सहाय्य प्राप्त व्हावे म्हणून .....

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

डॉ. मोडक ....

महाराष्ट्र कृषीउद्योग विकास महामंडळाच्या सल्ल्याने प्रस्तावदेखील तयार करून पाठविण्यात आला असून आता केवळ महाराष्ट्र सरकारने यामध्ये लक्ष घालून, सहकार्य करून हा प्रकल्प मार्गी लावण्याचीच तेवढी आवश्यकता आहे. अध्यक्ष महाराज, याच कृषी विद्यापीठाने दापोली, वाकोलीला उच्च स्तरीय संशोधन केंद्र पदविका अभ्यासक्रमासाठी स्थापन करण्याची योजना आखली आहे. उच्च स्तरीय संशोधन विकास केंद्राच्या स्थापनेसाठी नवी पदे निर्माण केली पाहिजेत. आता विद्यापीठाकडे संशोधन गटातील 47 पदे अतिरिक्त आहेत ती शिक्षण गटामध्ये समायोजित केली तर त्यामुळे थोडा एक प्रकारे रिलिफ मिळेल. तसा प्रस्ताव विद्यापीठाने शासनाकडे पाठविला आहे. त्याचाही विचार केला जावा आणि शेवटचा मुद्दा, रोहा येथे मसाला पिकांसाठी संशोधन आणि विकास केंद्र उभारण्याची योजना आहे. दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये तिचा समावेश करण्यासाठी सदरचा प्रस्ताव देण्यात आलेला आहे. सरकारने पदांच्या समायोजनेला मान्यता दिली तर हीही योजना कार्यान्वित होऊ शकेल. अध्यक्ष महाराज, मी मुद्दाम हा प्रश्न येथे माडला आहे. कारण एकूणच या विद्यापीठाच्या माध्यमातून कोकणच्या विकासाला चालना मिळावी अशा प्रकारची योजना आहे. कृषी विज्ञान केंद्र रायगड जिल्ह्यातील रोहा या ठिकाणी स्थापन व्हावे. त्यासाठीसुद्ध भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या शिफारशीनुसार एक संशोधन केंद्र स्थापन व्हावे आणि त्यासाठी किमान पाच लाख रुपये महाराष्ट्र सरकारकडून मिळावेत अशी अपेक्षा आहे. तरी हे पैसे विद्यापीठाला मिळावेत अशी मी विनंती करतो आणि थांबतो. धन्यवाद.

*****

..... सीसी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : अनेक वर्षांपासून देवदासींच्या पुनर्वसनासह प्रलंबित असलेल्या इतर मागण्या .

मु.शी. : अनेक वर्षांपासून देवदासींच्या पुनर्वसनासह प्रलंबित असलेल्या इतर मागण्या याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिलेली 'विशेष उल्लेख'ची सूचना.

उपसभापती : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी 'विशेष उल्लेख' ची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील 'विशेष उल्लेख'ची सूचना मांडते -

" पुनर्वसनासह इतर मागण्यांसाठी राज्यातील देवदासींनी 29 मार्च 2005 पासून आझाद मैदान, मुंबई येथे सुरू करण्यात येत असलेले उपोषण, यामध्ये हजारो देवदासी सामील होणे, देवदासी मुक्ती व देवदासी पुनर्वसन कायदा मंजूर करण्याबाबत आवाडे आयोगाच्या शिफारशी सुधारून त्यांची अमलबजावणी करण्याची देवदासी मुक्ती संघटनेने केलेली मागणी., त्याकडे शासनाचे दुर्लक्ष, देवदासी पुनर्वसन व त्यासंबंधात अन्य मागण्यांबाबत शासनाने कोणती उपाय योजना केली वा करण्यात येत आहे, याबाबत शासनाने तातडीने निवेदन करावे, ही विनंती. "

अध्यक्ष महाराज, उद्या म्हणजे 29 मार्च 2005 पासून राज्यातील हजारो देवदासी मुंबईतील आझाद मैदानावर आपल्या विविध मागण्यांसाठी उपोषण सुरू करणार आहेत. आवाडे समितीचा अहवाल शासनाकडे येऊन अनेक वर्षे लोटली. देवदासी आणि त्यांच्या मुला-मुलींना रोजगार व संरक्षण मिळून त्यांना नव्याने जीवन सुरू करता यावे यासाठी देवदासी मुक्ती व देवदासी पुनर्वसन कायदा मंजूर करावा आणि देवदासींच्या मुलांना विशेषत: मुलींना पुन्हा त्याच धंद्यामध्ये जाण्याची वेळ ओढवते, ते टाळण्यासाठी त्यांना शिक्षणाचा अधिकार आणि सुविधा मिळाव्यात आणि शेवटी देवदासींना निवारा-आरोग्य यांचे अधिकार मिळावेत, त्यांना निर्वाह वेतन आहे ते वाढविण्यात यावे, 2001 चे देवदासी मुक्ती आणि निर्मूलन विधेयक क्र. 51 मंजूर करावे अशा विविध मागण्या या देवदासी वर्षानुवर्षे करीत आहेत. अध्यक्ष महाराज, 1991 साली जाहीर करण्यात आलेल्या पहिल्या

..... सीसी 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे ....

महिला धोरणामध्येसुद्धा देवदासींचा अंतर्भाव करण्यात आलेला नव्हता. 2001 मध्ये जो मानव विकास अहवाल जाहीर झालेला आहे त्यानुसार महाराष्ट्रात 88 लाख विधवा, निराधार व एकट्या स्त्रिया आहेत. त्यामध्ये कोल्हापूर, सांगली, सोलापूर, पुणे, मुंबई परिसरातील देवदासींचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. या पार्श्वभूमीवर या भगिनी अनेक वर्षापासून आपल्या विधान भवना समोर मोर्चा घेऊन येतात पण कोणीही त्यांचे म्हणणे ऐकून घेत नाहीत आणि त्या तशाच परत जातात. म्हणून आवाडे समितीच्या विविध शिफारशींची अमलबजावणी करावी आणि देवदासींच्या मागण्यांकडे या 'विशेष उल्लेख' द्वारा मी आपले लक्ष वेधते आहे.

*****

..... सीसी 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>औचित्याच्या मुद्याबाबत</u> .....

श्री. जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महाराज, मला आपल्या परवानगीने औचित्याचा मुद्दा उपस्थित करून एका गंभीर विषयाकडे आपले लक्ष वेधावयाचे आहे. अध्यक्ष महाराज, मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, काल रात्री एका दूरदर्शनच्या वाहिनीवरून 45 पोरांची वसईतील बॉस इंग्लिश स्कूल म्हणून जी शाळा आहे येथील विद्यार्थी आपल्या घरापासून तुटले जात आहेत, ते बंडखोरी करून आपल्या घरापासून दूर जाताहेत आणि ते परतच येत नाहीत. अशा प्रकारच्या तक्रारी जवळपास 15-20 पोलीस ठाण्यांमध्ये मुलांच्या पालकांनी केलेल्या आहेत. हा एक जणू कट आहे किंवा काय असा संभ्रम निर्माण झालेला आहे. अध्यक्ष महाराज, असाच एक प्रकार यापूर्वी आंध्र प्रदेशमध्ये झालेला होता आणि जेव्हा तेथे कारवाई करण्यास शासन यंत्रणा गेली तेव्हा 75 विद्यार्थ्यांनी सायनाईड खाऊन आत्महत्या केली होती. तेव्हा हा सारा गंभीर असा प्रकार आहे आणि त्याची त्वरित दखल घेऊन, ज्या आई-वडिलांनी आपली पोरे गमावली आहेत, जी मुले त्यांच्या घरापासून तुटलेली आहेत त्यांची माहिती घेऊन, ती मुले खरोखरी जीवंत आहेत किंवा काय, याची माहिती घेऊन त्यांच्या पालकांना दिलासा द्यावा अशी माझी या औचित्याच्या मुद्याच्या निमित्ताने विनंती आहे.

****

(यानंतर श्री. जागडे .... डीडी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 4 वाजून 45 मिनिटांनी पुन: भरेल.

(4.25 ते 4.45 मध्यंतर)

(यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अर्थसं□ल्पावर सर्वसाधार□चर्चा

(सभापतीस्थानी मा. उपसभापती)

पु.शी : अर्थसं□ल्पावर सर्वसाधार□चर्चा

मु.शी : स□2005-2006 च्या अर्थसं□ल्पावर सर्वसाधार□चर्चा

उपसभापती : आजपासू□ अर्थसं□ल्पावरील सर्वसाधार□ चर्चेस प्रारंभ होईल. ही चर्चा दिनांक 28, 29 व 30 मार्च 2005 असे एकूण तीन दिवस होईल. चर्चेसाठी एकूण जो वेळ उपलब्ध आहे, त्यापैकी वित्तमंत्र्यांच्या उत्तरासाठी असलेला एक तास जमेस धरुन निम्मा वेळ सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांसाठी व निम्मा वेळ विरोधी पक्षाच्या सदस्यांसाठी व स्वतंत्र सदस्यांना देण्यात येईल. या चर्चेत भाग घ्यावयाचा असेल त्यांनी आपली नावे ते ज्या तारखेस बोलू इच्छितात ती तारीख आपल्या प्रतोदामार्फत माझ्याकडे त्वरीत पाठवावी. आज बोलू इच्छिणाऱ्या सदस्यांची आठ नावे आलेली आहेत.

त्याचप्रमाणे बऱ्याच माननीय सदस्यांनी तीन दिवसांमध्ये ही चर्चा संपणार नाही, व आम्हाला बोलावयाचे आहे अशी भावना माझ्याकडे व्यक्त केली आहे. माननीय सदस्यांच्या भावना विचारात घेऊन सभागृहाची विशेष बैठक उद्या सकाळी 10 ते 12.30 वाजेपर्यंत घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते (बसून) : सभापती महोदय, उद्या सकाळच्या विशेष बैठकीमध्ये बोलू इच्छिणाऱ्या सदस्यांची नावे आली नसतील तर विशेष बैठक घेऊन उपयोग काय?

उपसभापती : ठीक आहे, या बाबतचा निर्णय एक तासानंतर घेऊ. माननीय विरोधी पक्षनेते श्री. नितीन गडकरी यांनी चर्चेला सुरुवात करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी खाली बसून बोलण्याकरिता आपली अनुमती मागतो.

उपसभापती : ठीक आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सन 2005-2006 चा अर्थसंकल्प सभागृहामध्ये सादर झाला आहे. या अर्थसंकल्पामध्ये किती विसंगती आहे, कॉंट्रॅडिक्शन आहे हे मी आपल्यासमोर पुराव्यासहीत मांडणार आहे. हे आघाडी सरकार सत्तेवर आल्यानंतर मा. अर्थमंत्र्यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पामध्ये वार्षिक योजनेचे आकारमान व प्रत्यक्ष झालेला खर्च पहाता मागील सहा वर्षाची महाराष्ट्राची वार्षिक योजना 11 हजार कोटी, 12 हजार कोटी दरम्यान होती व प्रत्यक्षात खर्च 8 हजार कोटी ते 10 हजार कोटीच्या दरम्यान झाला हे लक्षात येईल. या संदर्भात वार्षिक योजनेच्या बाबतीत आणि प्रत्यक्ष झालेल्या खर्चाच्या बाबतीत किती प्रगती झाली, किती विकास झाला, किती उत्पन्न वाढले? हे समजून येत नाही. 2000-2001 या वर्षामध्ये वार्षिक योजना 12 हजार 330 कोटी रुपये होती व प्रत्यक्ष झालेला खर्च 11601.45 कोटी रुपये होता. म्हणजे प्रत्यक्षात कमी झालेला खर्च 728.55 कोटी रुपये होता. 2001-2002 साली राज्याची वार्षिक योजना 11 हजार 720 कोटी रुपये होती व प्रत्यक्ष खर्च 10,009.80 कोटी रुपये झाला होता, व प्रत्यक्ष कमी झालेला खर्च 1710.20 कोटी होता. 2002-2003 साली राज्याची वार्षिक योजना 11,135.37 कोटी रुपये होती व प्रत्यक्ष खर्च 7538.66 कोटी रुपये होता.

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म्हणजे 3596.71 कोटी रुपये कमी खर्च झाला आहे, एवढा कट लावला आहे. 2003-2004 या वर्षामध्ये महाराष्ट्राची वार्षिक योजना 12,650 कोटी रुपयांची तयार केली, प्रत्यक्षात 8362.01 कोटी रुपये खर्च झाले म्हणजे 4287.99 कोटी रुपयांचा कट लागला, म्हणजे एवढा खर्च प्रत्यक्षात कमी झाला. सभापती महोदय, 2004-2005 हे निवडणुकीचे वर्ष होते आणि या जादूच्या प्रयोगामध्ये माननीय अर्थमंत्र्यांनी एक्स्ट्रीम लिमिट गाठले. म्हणजे महाराष्ट्राच्या जनतेला मुर्ख बनविण्याचा नवीन धंदा या शासनाने उघडला. प्रत्यक्षात 19983.90 कोटी रुपयांची योजना बनविली म्हणजे अंदाज जवळजवळ 20 हजार कोटीची वार्षिक योजना 2004-2005 या वर्षाकरता तयार केली आणि प्रत्यक्षात 10670.0 कोटी एवढा खर्च केला म्हणजे 9313.90 कोटी रुपये प्रत्यक्षात कमी खर्च झाले. एकीकडे तुम्ही 19983.90 कोटी रुपयांची योजना तयार करता, महाराष्ट्राच्या जनतेला आश्वासनांची खैरात वाटता, घोषणा करता, कार्यक्रम जाहीर करता, जाहीरनाम्यामध्ये लिहीता. पण दुसरीकडे तुम्हाला माहिती आहे की, तुमच्याकडे पैसा नाही. 19983.90 कोटी रुपयांच्या योजनेमध्ये तुम्ही जवळपास अर्ध्या योजनेचा म्हणजे 10 हजार कोटी रुपयांचा खर्चच करीत नाही. तेव्हा माननीय अर्थमंत्री महोदय, मी पहिला प्रश्न विचारतो की, 2004-2005 मध्ये महाराष्ट्राच्या जनतेची दिशाभूल केली. योजना बनविली, त्याच्यातील अर्धा खर्च केला आणि अर्ध्या खर्चाला कट लावला आणि निवडणुकीच्या काळात महाराष्ट्राच्या जनतेला सर्व खोटी आश्वासने, भूलथापा दिल्या आणि आता नवीन बजेट आल्यानंतर, पुन्हा नवीन घोषणा करुन, आता जुना काळ विसरुन पुन्हा नवीन घोषणा करण्यास आपण मोकळे झाले आहात. 2005-2006 मध्ये केवळ 11 हजार कोटीची योजना तयार केली. मागच्या वर्षी 20 हजार कोटीची योजना केली आणि यावर्षी 11 हजार कोटीची योजना. 2003-2004 मध्ये 12,650 कोटीची योजना केली. मग तुम्ही मला सांगा की, यामुळे राज्याची प्रगती होत आहे का ? राज्याचा विकास होत आहे का ? राज्य पुढे जात आहे का ? तर राज्य आहे तेथेच आहे. गेल्या पाच वर्षात राज्य कुठे आहे ? ते तुम्ही मला सांगावे. तुम्ही खर्च केलेली आकडेवारी लक्षात घेतली तर मला कळत नाही की, लोक या बजेटला का महत्व देतात ? कशाकरता तुमच्या मुलाखती घेतात ? कशाकरता तुमच्याकडे चर्चा करतात ?तुम्ही कबूल केलेल्या रकमेप्रमाणे 50 टक्के बजेट मांडतच नाही, त्याला कट लावता, जनतेची दिशाभूल करता. मग तुमच्या बजेटच्या सँटीटीला काय अर्थ आहे ? सभापती महोदय,

. . . .2 एफ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

युती सरकारच्या काळामध्ये म्हणजे 1999-2000 साली आम्ही जेथे होतो, तेथेच आज 2005-2006 मध्ये आपण पुन्हा येऊन थांबलो आहोत. मग राज्याचे उत्पन्न कुठे वाढले आहे? पाच वर्षामध्ये राज्याचे उत्पन्न का वाढले नाही ? पैसा कुठे गेला ? याचे तुम्ही उत्तर दिले पाहिजे. नुसत्या आकडयांचा खेळ करुन महाराष्ट्राच्या जनतेची आपण दिशाभूल केली आणि त्यामुळे या प्रकरणात तुम्ही कशा पध्दतीने महाराष्ट्राच्या जनतेचा विश्वासघात केला हे सिध्द करणारे हे प्रकरण आहे.तुमच्याजवळ पैसा नव्हता, तर 19983.90 कोटी रुपयांची योजना कशासाठी जाहीर केली ? पण प्रत्यक्षात फक्त 10,670.0 कोटी रुपये खर्च केले आणि 9313.90 कोटी रुपयांना कट लावला. मग माझा तुम्हाला पहिला प्रश्न असा आहे की, 9313.90 कोटी रुपयांच्या मागच्या वर्षी ज्या योजना केल्या होत्या. तो खर्च तुम्ही करु शकला नाहीत, त्या योजनांचे काय झाले ? त्या योजना कुठे गेल्या ? त्या घोषणा कुठे गेल्या ? ती आश्वासने कुठे गेली ? माझा या आकडेवारीमध्ये एक पैशाचा जरी आकडा चुकला असेल तर मला सांगा, मी हात जोडून आपली क्षमा मागेन. तुम्ही जवळपास अर्धी रक्कम बजेटमधून गायब केली आणि आता तुम्ही येऊन पुन्हा टाळया पिटत आहात आणि नवीन बजेट मांडत आहात. तुमच्या बजेटमधील फोलपणा हा यातून सिध्द होत आहे. मग महाराष्ट्राचा तुम्ही विकास कसा करणार आहात ? यामध्ये एक महत्वाचा प्रश्न आहे की, या पाच वर्षामध्ये महाराष्ट्राचा रेव्हीन्यू का वाढला नाही ? सेल्स् टॅक्स आणि एक्साईज हे आपल्या रेव्हीन्यूचे दोन स्त्रोत आहेत. तुमच्या विभागामध्ये एवढा गलथान कारभार आहे की, सेल्स् टॅक्सच्या कशा चो-या होतात याची हजारो-करोडो रुपयांची प्रकरणे मी महाराष्ट्र सरकारला पुराव्यासहित दिलेली आहेत. एक्साईज मध्ये तुम्ही किती लोकांच्या केसेस सेटल केल्या ? किती लोकांना रिलीफ दिला ? याबाबतीत तुमची तयारी आहे का ? गेल्या पाच वर्षामध्ये तुम्ही एक्साईजच्या बाबतीत किती प्रकारच्या लोकांना सवलती देऊन, किती रुपयांचा टॅक्स माफ केला ?

सभापतीस्थानी - तालिका सभापती(श्रीमती सुधा जोशी)

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.नितीन गडकरी (पुढे चालू.....

हे या सभागृहाला सांगण्याची ताकद तुमच्यामध्ये आहे काय ? तुम्ही तुमच्या कॅबिनेटचा सगळा वेळ फक्त खर्च कसा करावा यावर घातवता, पण या राज्याचा महसूल कसा वाढावा, त्यातील त्रुटी कशा दूर होतील, त्यातून महसूल जास्तीत जास्त वाढून या राज्याच्या प्रगतीकरिता, विकासासाठी पैसो मिळावा,असा कधीतरी प्रामाणिकपणे प्रयत्न केला आहे काय] याचे उत्तर द्यावे. आपल्या या बजेटप्रमाणे कोठेच उत्पन्नाचे स्रोत्र वाढविले नाही. मला सांगतांना दु:ख होते की, युतीच्या सरकारमध्ये आम्ही जेथे होतो, तेथेच आज आहोत. पाच वर्षामध्ये खाया-पिया कुछ नही, ग्लास फोडा अठ्ठाण्णा, अशी आपली अवस्था आहे. आपली फक्त नाटक कंपनी आहे. बाबासाहेब आंबेडकर, शाहुमहाराज, महात्मा फुले, शाहु महाराजांचा महाराष्ट्र म्हटले जाते. लक्ष्मी दर्शन, मधल्या ट्रान्सफर, खेचो, कमाव,अपने बाप का माल है, जाव. मी बोलून थकलो. बिच्चारे सन्माननीय सदस्य श्री.कवाडे साहेब, काय आपल्या मंत्री महोदयांची परिस्थिती आहे ? त्यांच्या गाडीमध्ये घालण्यासाठी पेट्रोल मिळत नाही, त्यांची गाडी चढावावर चढत नाही. मा.श्री.मस्के साहेबांना रहायला घर नाही, त्यांनी सन्माननीय मंत्री श्रीमती विमल मुंदडा यांच्या घरावर अतिक्रमण केले. त्यांना शेवटी एका मंत्र्यांच्या घराचा ताबा घ्यावा लागला. अशी नाटक कंपनी सुरू आहे. आपल्याला कोणाचे काही देणे-घेणे नाही. महाराष्ट्र आर्थिक पॅरामिटरमध्ये आहे. सहा वर्षात आपले उत्पन्न स्थिर आहे, उत्पन्न वाढीसाठी कोणते प्रयत्न केले ? योजनेचे आकारमान स्थिर का आहेत, याचे उत्तर मंत्रीमहोदयांनी द्यावे. यावर आपण काही बोलत नाही. म्हणून मी अर्थमंत्री महोदयांना 'जादूगर' असे म्हटलेले आहे. त्यांचे एका गोष्टीच्याबाबतीत कसब जाणतो. प्रत्यक्षामध्ये आपण मोठमोठी छिद्रे असतांना देखील ती छिद्रे झाकून, राणा भिमादेवी थाटामध्ये कोट घालून आणि गुलाबाचे फूल लावून दूरदर्शनच्या कॅमेरासमोर बसून महाराष्ट्राच्या जनतेच्या डोळ्यात धुळफेक केली. मी सन्माननीय मंत्री, डॉ.सुनील देशमुख साहेबांना दोष देणार नाही. पहिल्यांदा आमच्या श्रीमती वसुधा देशमुख या मंत्री होत्या, त्या अर्थमंत्री असतांना बजेट वाचायच्या. आता ते बजेट आमचे डॉ.सुनील देशमुख साहेब वाचतात. बजेट हे अर्थमंत्री जयंत पाटील तयार करतात, त्यामुळे त्यांच्या बिचाऱ्यांच्या हातामध्ये काही नाही. त्यामुळे आज महाराष्ट्राच्या विकासाची गती आहे, तेथेच आहे. दुसरा एक मुद्दा चर्चेला आला की, भाजप युतीच्या काळामध्ये महाराष्ट्राला कर्जबाजारी केले, कर्जाचा डोंगर वाढविला, या कर्जामुळे सगळे राज्य अडचणीमध्ये आले असे सांगितले गेले. सरकार बदलल्यानंतर 2000 साली नागपूरच्या अधिवेशनामध्ये श्वेतपत्रिका काढली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/ KGS/ MHM/

श्री.नितीन गडकरी (पुढे चालू...

आता अर्थमंत्र्यांनी बजेटमध्ये जे म्हटलेले आहे ते त्यांचे वाक्य वाचून दाखवितो. त्यासंदर्भाने पुराव्यासहित उत्तर द्यावे. तसा मी कोणावर आरोप करणार नाही. या बजेटमध्ये त्यांनी दुसऱ्या परिच्छेदामध्ये म्हटलेले आहे की,"सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांना सांगतांना मला आनंद वाटतो की, मागील सुमारे 10 वर्षाच्या कालावधीसाठीच्या आर्थिक अस्थिरतेतून महाराष्ट्र आता सर्व सामामर्थ्याने बाहेर पडला आहे ". यावर सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी आणि इतर सदस्यांनी बाके वाजविली. आता सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारतो की, कोणत्या अस्थिरतेतून महाराष्ट्र बाहेर पडला ? मा.मंत्री, श्री.जयंत पाटील यांना कोणत्या दिव्य दृष्टीतून हे दिसले ? ती दिव्य दृष्टी कोणाची आहे, ती सभागृहाला त्यांनी सांगावे. वस्तुस्थिती अशी आहे की, 1995-96 साली युतीचे राज्य आले. तेव्हा राज्यावर 1,9013.99 कोटीचे कर्ज होते. त्याचे दरडोई प्रमाण 2,475 रुपये होते. 2000-2001 मध्ये राज्यात आघाडीचे सरकार आले, त्यावेळी राज्यावरील कर्जाचा बोजा 3,8170.97 कोटीचा होता. म्हणजे युतीच्या काळामध्ये 19000 कोटी रुपयाचे अंदाजाने कर्ज वाढले, त्याचे दरडोई प्रमाणे 5466 रुपये होते. आजच्या या स्थितीत राज्यावर 1,10,210.76 कोटी रुपयाचे कर्ज आहे. याचाच अर्थ युती शासनाने साडेचार वर्षाच्या काळामध्ये 1,9156.98 कोटी रुपयाचे कर्ज घेतले तर आघाडी शासनाने त्यांच्या पाच वर्षाच्या काळात 7,2039.79 कोटीचे कर्ज घेतले. तुम्ही तीन-साडे तीन पटीने कर्ज वाढविले. आता मला सांगा की, भाजपसेना युतीने राज्यात सत्तेवर आल्यानंतर 19000 कोटी रुपयाच्या कर्जातून सगळीच कामे केली , असे मी म्हणत नाही. पण आम्ही या राज्याच्या विकासाला गती देण्याचा प्रयत्न केला. पूल बांधले, रस्ते् बांधले, उड्डान पूल बांधले, द्रुतगती मार्ग बांधले, कृष्णा खोऱ्याचे सिंचन प्रकल्प सुरु केले....

यानंतर कु.थोरात.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

पूल बांधले, रस्ते बांधले, उड्डाणपूल बांधले, द्रुतगती मार्ग बांधले, कृष्णा खोऱ्यातील सिंचन प्रकल्प सुरु केले. विदर्भ, तापी, मराठवाडा, सिंचन प्रकल्प, पिण्याच्या पाण्याच्या योजना, जीवन प्राधिकरणाची अनेक मोठी, मोठी कामे आम्ही या महाराष्ट्रात सुरु केली. महाराष्ट्राच्या विकासाला एक दिशा दिली. कर्जाच्या रकमेचा विनियोग राज्याच्या विकास कामासाठी झाला, हे वास्तव असतांना सुध्दा तुम्ही युती शासनाने कर्जाचा बोझा, राज्यावर बसविला असे तुणतुणे राज्यातील विद्यमान काँग्रेस, राष्ट्रीय काँन्गेस आघाडीचे शासन वाजवित राहिले. तुमचे राज्य मंत्री जरी गावा गावात गेले तर काय सांगायचे? तिजोरी खाली आहे. राज्य दिवाळखोर झाले, पगार द्यायला पैसे नाहीत.मला आर्थिक क्षेत्रात मंत्री म्हणून काम करायला जेव्हा संधी मिळाली तेव्हा या महाराष्ट्र राज्याचा मंत्री म्हणून रस्ते विकास मंडळाचा अध्यक्ष म्हणून मी चार हजार कोटी रुपये कॅपिटल मार्केटमधून रेज केले. जेव्हा 400 कोटी रुपये पाहिजे होते तेव्हा 1180 कोटी रुपयाचे बॉण्ड्स विकल्या गेले. महाराष्ट्राची आर्थिक स्थिती उत्तम होती. पण तुम्ही आमच्यावर टीका करण्याच्या नादात, राजकारण करीत असतांना, तुम्ही महाराष्ट्र सरकारची एवढी बेअब्रु केली की, कॅपिटल मार्केटमधील महाराष्ट्र सरकारची विश्वसनियता समाप्त करण्याचे पाप या कॉन्ग्रेस आणि राष्ट्रवादी कॉन्ग्रेसच्या शासनाने केले. आज काय स्थिती आहे? अध्यक्ष महाराज, आघाडी शासनाच्या पाच वर्षात ज्या प्रमाणात कर्जाच्या रक्कमेचा डोंगर वाढला त्याप्रमाणात राज्यात विकासाच्या कामाचा डोंगर निर्माण झाला आहे का? 72 हजार कोटी रुपयाची तुम्ही कोणती कामे केली आहेत? या शासनाने पाच वर्षामध्ये प्रचंड कर्ज केले आहे. राज्याच्या विकासाला कासवाची गती सुध्दा प्राप्त झाली नाही, ही वास्तविकता असतांना भाजप-सेना युती शासनावर खेटे नाटे आरोप करुन विद्यामान काँग्रेस आणि राष्ट्रीय काँग्रेस शासन आपल्या नाकर्तेपणावर पांघरुण घालण्याचा प्रयत्न करीत आहे. युती शासनावर अनाठायी टिका करण्यापेक्षा राज्य शासनाने 72 हजार कोटी रुपयाच्या कर्जाच्या विनियोगाची श्वेतपत्रिका जाहीर करण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी करावी, अशी मी तुम्हाला मागणी करतो. तुम्ही आमच्या 19000 कोटी रुपयाच्या कर्जाकरिता श्वेतपत्रिका काढली ना? मग तुम्ही 72 हजार कोटी रुपये कर्ज या महाराष्ट्रावर वाढविले, कां नाही याची श्वेतपत्रिका काढत? कां नाही तुम्ही याचा हिशेब महाराष्ट्राच्या जनतेला देत? हे तुम्ही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

कां जाहीर करीत नाही, हा माझा तुम्हाला सवाल आहे? म्हणून मंत्रिमहोदय, माझी तुम्हाला विनंती आहे की, तुम्ही ताबडतोब श्वेतपत्रिका जाहीर करा आणि या 72 हजार कोटी रुपयाचा हिशेब या महाराष्ट्राच्या जनतेला द्या.राज्यावर 1,10,210,76 कोटी रुपयाचे कर्ज असतांना, राज्य आर्थिक अस्थर्यातून पूणे सामर्थ्याने बाहेर पडले आहे, असे म्हणण्याची हिंमत अर्थमंत्री कसे करतात? मला सांगा, याचा अर्थ काय आहे?तुम्ही येथे बोललात की, याच महनिय सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांना सांगतांना मला आनंद वाटतो की, मागील सुमारे दहा वर्षाच्या कालावधीच्या आर्थिक अस्थैर्यातून महाराष्ट्र आता पूर्ण सामर्थ्याने बाहेर पडला आहे. वाह रे वा. बाहेर पडला. 72 हजार कोटी रुपये पाच वर्षात वाढवले. आमच्या 19 हजार कोटी रुपयाची श्वेतपत्रिका काढली. आणि आता बजेटच्या भाषणात सांगतात की, आता आम्ही सगळया अस्थैर्यातून बाहेर पडलो आहोत. कर्ज फिटलेले आहे. सगळीकडे आनंदी आनंदगडे आहे. वा फटाके फोडा, मिठाई खा. कुठे गेले 72 हजार कोटी रुपये? कोणाला सांगता? आणि तुम्ही हे सांगता की, आता पूर्ण सामर्थ्याने बाहेर निघालो. तुम्ही पाच वर्षात किती उत्पन्न वाढवले. तुमचा प्लॅन सांगता, त्याच्या अर्धे पैसे खर्च करता. निवडणुकीच्या काळात दहा हजार कोटी रुपयाच्या पूर्ण घोषणा करुन महाराष्ट्रातील जनतेची दिशाभूल करता, विश्वासघात करता. दहा हजार कोटी रुपयाचा तुमचा प्लॅन कट होतो, मागच्या वर्षीचा. त्याच्या बद्दल एक शब्दही काढत नाही. मला कधी कधी वाईट वाटते. एका गोष्टीचे तुमचे कौतुक केले पाहिजे की,सूर्यप्रकाशा इतकी स्पष्ट आकडेवारी असतांना देखील एखाद्या वर्तमानपत्रामध्ये किंवा दूरदर्शनच्या कुठल्या चॅनलवर याची माहिती ऐकायला मिळत नाही. मी कुणी मॅनेजमेंट करतय असे म्हणत नाही. पण एवढे सगळे घोटाळे आणि कर्ज वाढत असतांना मात्र पब्लिकमध्ये आणि मिडियामध्ये कुणी चकार शब्दही काढीत नाही. सगळीकडे शांतता आहे, हे तुमचे कसब मात्र मी मान्य केल्या शिवाय राहात नाही. या बाबतीत तुमच्या कौशल्याला तुमच्या चातुर्याला मी नक्कीच किंमत देतो. महाराष्ट्राचे पूर्ण भोंगाडे वाजले आहेत, पूर्ण पोंगे वाजले आहेत. 72 हजार कोटी रुपयाचे कर्ज आहे. आणि मागच्या वर्षीच्या तुमच्या दहा कोटी रुपयाच्या बजेटच्या घोषणा हवेत गेल्या. पण एक चकार शब्द श्री. रावते साहेब तुम्ही कुठे वाचला? एक शब्द कुठे लिहून आला?

यानंतर श्री. बरवड ....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्री. नितीन गडकरी ....

तुमचे अर्ध बजेट कोठे गेले पत्ता नाही. घोषणा विरल्या. 10 हजार कोटीचे काय झाले हे तुम्हाला कोणी विचारत नाही. 19 हजार कोटीचा प्लॅन केला होता. त्यावेळचे माननीय मुख्यमंत्री आता हैद्राबादच्या आंध्र भवनमध्ये आराम करीत आहेत. यावेळी शिल्लकीचे अंदाजपत्रक सादर केले आहे, महाराष्ट्र आर्थिकदृष्टया अस्थैर्यातून बाहेर आलेले आहे असे कशाच्या भरवशावर बोलता ? तुमच्या सेल्स टॅक्सची, एक्साईज स्थिती काय आहे ? तुमच्या प्लॅनची स्थिती काय आहे? तुमच्या कर्जाची स्थिती काय आहे ? माननीय अर्थमंत्र्यांनी पहिल्यांदा याचे उत्तर दिले पाहिजे की, मागच्या वर्षीचे 50 टक्के तुमचा प्लॅन तेल लावत गेला. तो कोठे गेला माहीत नाही. निवडणुकीच्या आधी कॅबिनेटचे निर्णय घेऊन दणादण घोषणा केल्या. आता तुमच्या घोषणांचे काय झाले हे कोणी सांगण्यास तयार नाही. सभापती महोदया, माननीय अर्थमंत्र्यांनी पहिल्यांदा हे समजावून सांगावे की, 1,10,210.76 कोटी रुपयांचे कर्ज असतांना राज्य आर्थिक स्थैर्यामध्ये कसे आहे आणि राज्य अस्थैर्यातून बाहेर कसे पडले आहे ? हे त्यांनी समजावून सांगावे अशी मी आपल्यामार्फत त्यांना विनंती करतो.

सभापती महोदया, या बजेटमध्ये त्यांनी त्रिस्तरीय शैक्षणिक शुल्क पध्दत सांगितलेली आहे. आपण एकदा अनुभव घेतला आहे. मागच्या वेळी जेव्हा पुस्तके वाटण्याची योजना झाली तेव्हा तुम्हाला सगळयांना मोफत पुस्तके द्यावी लागली होती. माननीय शिक्षण मंत्री श्री. पुरकेसाहेब या ठिकाणी बसलेले आहेत. आधी म्हणाले की, यांना द्या, त्यांना द्या. मग तुम्हाला सगळयांना मोफत पुस्तके द्यावी लागली. आता अनुदानित शैक्षणिक शुल्क, प्रत्यक्ष खर्चावर आधारित अर्धे शैक्षणिक शुल्क आणि संपूर्ण शैक्षणिक शुल्क अशी त्रिस्तरीय शुल्क पध्दत सांगितलेली आहे. सभापती महोदया, आता या सभागृहात माननीय मंत्रिमहोदय श्री. मस्के साहेब आलेले आहे. ते आमचे सहकारी आहेत. त्यांच्याबद्दल मला दु:ख आहे. त्यांना त्रास होतो. त्यांना घर सुध्दा आक्रमण करुन घ्यावे लागले. त्याबद्दल मला निश्चितपणे दु:ख आहे. त्यांच्याबद्दल सहानुभूती आहे. मी मलबार हिलला राहतो. त्यांची गाडी त्या ठिकाणी रु रु करीत येते पण पुढे जात नाही.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : यामध्ये विषयांतर होत आहे. आपण अर्थसंकल्पावर बोलावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदया, या ठिकाणी परिस्थिती सांगितली पाहिजे. त्यांच्या गाडीमध्ये पेट्रोल नाही. सभापती महोदया, या ठिकाणी तीन आधारावर शुल्क पध्दती तयार केली आहे. यामध्ये अनुदानित शैक्षणिक शुल्क, प्रत्यक्ष खर्चावर आधारित अर्धे शैक्षणिक शुल्क आणि संपूर्ण शैक्षणिक शुल्क यापैकी एक विकल्प महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना देण्याचा देण्याचा प्रस्ताव आहे असे माननीय अर्थमंत्र्यांनी बजेटमध्ये सांगितले आहे. त्यामुळे शासनाच्या अनुदानित महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये तीन जाती तयार होतील. मी जाती हा शब्द वापरत आहे. हा नवा जातीयवाद कशाला सुरु करीत आहात ? कमी फी देणारे विद्यार्थी, जास्त फी देणारे विद्यार्थी असे सगळे वर्ग निर्माण होतील. त्यांच्यामध्ये चर्चा होते. त्यांच्यामध्ये विषमता वाढते. एखादवेळी क्रिमी लेयर सारख्या आयकर भरणारे आणि आयकर न भरणारे अशा दोन कॅटेगरीज झाल्या इथपर्यन्त ठीक आहे. परंतु तुम्ही हे तीन तीन गट केलेले आहेत ? तुम्ही हे प्राथमिक शाळेमध्ये करणार. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके वाटण्याची योजना केली त्याबाबत मी सांगितले. तुम्हाला सगळयांना पुस्तके वाटावी लागली. मला असे वाटते की, हा जो प्रस्ताव आहे तो शैक्षणिक क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांमध्ये नवीन जातीयवाद निर्माण करणारा आहे. माझी तुम्हाला विनंती आहे की, हा प्रस्ताव आपण मागे घ्यावा. तुम्ही हा प्रस्ताव ठेवणे शासनाच्या हिताचे नाही.

सभापती महोदया, शासकीय कर्मचाऱ्यांच्या महागाईभत्त्यात वाढ ही एक नवीन दिशाभूल आहे. या अर्थसंकल्पामध्ये असे म्हटले आहे की, "शासनाने शासकीय, निमशासकीय व निवृत्ती वेतनधारकांच्या महागाई भत्त्यात 1 एप्रिल, 2005 पासून 3 टक्के वाढ देण्याचे मान्य केले आहे, हे सांगताना मला आनंद होतो." असे माननीय अर्थमंत्री म्हणाले. परंतु याच परिच्छेदामध्ये ही वाढ केंद्र शासनाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे केव्हा अनुज्ञेय होती हे लिहिण्याचे ते मुद्दाम विसले आहेत. शासनाने या अर्थसंकल्पात दिलेली 3 टक्के वाढ ही केंद्र सरकारने प्रत्यक्षात 1 जुलै, 2004 रोजीच लागू केलेली आहे. त्यामुळे राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना सुध्दा ही वाढ दिनांक 1 जुलै, 2004 पासूनच लागू करावयास हवी होती आणि राज्याची आर्थिक स्थिती पाहता, जी माननीय अर्थमंत्र्यांना सुदृढ वाटते, किमान 1 जुलै, 2004 ते दिनांक 31 मार्च 2005 या कालावधीतील महागाई भत्त्याची थकबाकी कोण देणार आहे ? कशी देणार आहे ? ती रक्कम भविष्य निर्वाह निधीमध्ये तरी जमा करावयास पाहिजे होती.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

मा.श्री.शरदराव पवारसाहेब मुख्यमंत्री असताना त्यांनी सरकारी कर्मचा-यांच्या संघटनेशी करार केलेला होता की, ज्यादिवशी दिल्लीमध्ये महागाई भत्ता वाढेल त्याप्रमाणे राज्यसरकारी कर्मचा-यांनाही आम्ही महागाई भत्ता वाढवून देऊ. मग या मधल्या काळाचे काय करणार आहे ? मला वाटते की, याचा खुलासा मा.अर्थमंत्र्यांनी केला पाहिजे. परवाच केंद्र सरकारने त्यांच्या कर्मचा-यांसाठी 1.1.2005 पासून 3 टक्के वाढीव महागाई भत्ता जाहीर केला आहे. तो सुध्दा राज्य सरकारी कर्मचा-यांना 1.4.2005 पासून आपण लागू करावा. कारण राज्याची आर्थिक स्थिती फार चांगली आहे, पैशाची काही कमी नाही, आर्थिक संकट संपले आहे. सोन्याचा दूर निघू लागला आहे, वातावरण चांगले आहे. मग त्यांना 3 टक्के महागाई भत्ता द्या. तुम्हीच सांगता ना ? या सभागृहामध्ये काम करीत असताना माझ्या जीवनातील सगळ्यात वाईट कोणते दिवस असतील तर या सभागृहामध्ये भारतीय घटनेच्या चिंधडया उडताना मी माझ्या डोळयांनी पाहिले आहे. सभापती महोदया, अनुशेषाबाबत काय बोलावे ? काय सांगावे ? सगळे सांगून, बोलून संपले आहे. शब्द वापरावेत तर ते संसदीय होत नाहीत. शहाण्याला शब्दांचा मार असे म्हणतात. मा.सदस्य श्री.बी.टी.देशमुख आपण अर्थशास्त्राचे प्रोफेसर आहात. मी तर आता थकलो. आता कोणते शब्द वापरावेत याबद्दल आपणच मला मार्गदर्शन करावे. कारण सगळे शब्द वापरुन संपले आहेत. सभापती महोदया, यावर्षाच्या अनुशेषाबाबत महाराष्ट्राचे महामहीम राज्यपाल घटनेच्या कलम 371 (2) अन्वये प्राप्त विशेषाधिकारात 2002-2003 पासून जे निदेश देतात त्याबाबतीत एक गंमत घडली. आम्हाला कळले नाही. विदर्भ, कोकण, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधींनी मागणी केल्यावर तत्कालीन राज्यपाल मा.डॉ.पी.सी.ॲलेक्झांडरसाहेब यांनी सिंचन क्षेत्रासाठी दि.15 डिसेंबर, 2001 रोजी व तद्नंतर दि.12 मार्च, 2003 रोजी व दि.23 फेब्रुवारी, 2004 रोजी निदेश दिलेले आहेत. आम्हाला महाराष्ट्राचे महामहीम राज्यपाल केवळ सिंचन क्षेत्रातील अनुशेष दूर करण्यासाठीच वेगळे निदेश देतात हे माहीत होते. कारण मागील तिन्ही वर्षी सभागृहात त्या निदेशाची मागणी करुन प्रसंगी दोन-दोन, तीन-तीन दिवस सभागृह तहकूब करुन ते आम्हाला मिळत होते. तर दरवर्षी प्रमाणे याही वर्षी राज्याचा अर्थसंकल्प विधिमंडळाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/ KGS/ MAP/

श्री.नितीन गडकरी...

दोन्ही सभागृहात सादर झाला. परंतु आघाडी शासनाच्या थोर परंपरेनुसार त्यांनी याही वर्षी 2005-2006 सालाकरिता सिंचन क्षेत्रासाठी असलेले निदेश त्यांनी आम्हाला दिले नाही. अर्थसंकल्पावरील या सभागृहातील मा.अर्थमंत्र्यांचे भाषण संपताच ही बाब आपल्या नजरेस आणून दिली असता तसेच दुस-या दिवशी नियम 93 ची सूचना दिल्यावर सभागृह दोन वेळा तहकूब झाल्यानंतर आम्हाला मा.राज्यपालांचे निदेश प्राप्त झाले. परंतु हे निदेश वाचावयास घेतले तेव्हा धक्काच बसला. कारण महामहीम राज्यपालांनी दिलेले निदेश हे सिंचन क्षेत्रासाठी नसून इतर रस्ते, सामान्य शिक्षण, तंत्रशिक्षण, सार्वजनिक आरोग्य, नागरी पाणीपुरवठा, मृदसंधारण, पशुवैद्यकीय सेवा, विद्युत पंपांना कनेक्शन या आठ विकास क्षेत्रांसाठी असल्याचे दिसून आले. सभापती महोदया, मला माहीत नाही. मा.सदस्य श्री.बी.टी.देशमुखसाहेब हे माझ्यापेक्षा अभ्यासू सदस्य आहेत. गेल्या तीन वर्षामध्ये या आठ विषयांचे निदेश कोठे होते ? आपल्याला मिळाले का ? हे निदेश कोठे होते ? यावर्षी अलिबाबाची गुहा उघड म्हटल्याप्रमाणे भलतेच बाहेर निघाले. त्यानंतर हे आम्हाला दिले. मग मागील 3 वर्षामध्ये या आठ विषयांचे राज्यपाल महोदयांचे तुम्हाला निदेश होते ते कोठे आहेत ? त्याबाबत तुम्ही काय काम केले ते सांगा ? सभापती महोदया, मागील 3 वर्षासाठी या आठ विषयाबाबतचे निदेश आम्हाला माहीत नाहीत. (अडथळा) विदर्भाचे राज्यमंत्री झाले म्हणून निधी तर मिळालाच नाही पण निधीचा कागदतरी हातामध्ये पडला. (अडथळा) मा.सदस्य श्री.सुधाकर गणगणे, तुम्ही कशाला सहन करता ? टी.व्ही.वर एक जाहिरात दिसते. त्यात असे दाखविले जाते की, सहन होत नाही आणि सांगताही येत नाही, तशी तुमची अवस्था झाली आहे.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी पुढे सुरु...)

सभापती महोदया, सिंचन क्षेत्रासाठीचे निदेश कुठे आहेत असा प्रश्न आम्हाला पडला असता एक शिपाई सभागृहामध्ये आला आणि तो काही तरी कागदपत्र सभागृहातील मा.सदस्यांना देत आहे असे दिसले. ते कागदपत्र जेव्हा आमच्या हातात आले त्यावेळी ते सिंचन क्षेत्राचे निदेश असल्याचे आढळून आले. यावर्षी 8 क्षेत्रासंबंधीचेही निदेश मिळाले. मग माननीय अर्थमंत्र्यांनी एका प्रश्नाचे उत्तर द्यावे की, मागील तीन वर्षात हे 8 क्षेत्राचे निदेश दिलेले होते त्याचे काय झाले? यासंदर्भात चर्चा नाही, हाक नाही, कुठे बोंब नाही. आम्हाला तुम्ही पैसे देत नाही आणि निदेशही देत नाही. यावर्षी ते तुम्ही समजून, उमजून दिले असले तरी ते दिल्याबद्दल मी तुमचा आभारी आहे. परंतु मागील तीन वर्षात या निदेशांचे काय झाले ? डॉ. सुनील देशमुख हे अर्थराज्यमंत्री झाले म्हणून ही कागदपत्रे आम्हाला मिळाली. मागच्या वेळी श्री. दिलीपराव देशमुख हे अर्थराज्यमंत्री होते. त्यावेळी निदेश कुठे गेले ? अर्थमंत्री श्री. जयंत पाटील यांनी त्यांना पत्ताच लागू दिला नाही की काय, हे मला माहीत नाही. मागील तीन वर्षामध्ये या निदेशांचे तुम्ही काय पालन केले त्याची माहिती आपण आम्हाला सभागृहामध्ये द्यावी. आपण आम्हाला ते निदेश आणि त्यासंबंधीची माहिती द्यावी. माननीय राज्यपालांचे निदेश हे गुप्त धन होऊ शकत नाही. आम्हाला पैसे देऊ नका, निदेशांना केराची टोपली दाखवा, पण कमीत कमी निदेशांचे कागद तरी आम्हाला द्या. आम्ही दर वेळी सभागृहामध्ये भांडतो, गोंधळ घालतो, सभागृहाचे कामकाज स्थगित करतो. हे सर्व केल्यानंतर तुम्ही आम्हाला निदेश देता. आपण पैसे तर देतच नाही. सरकारकडे कागद देखील नाही काय ? कागद न देण्याएवढी देखील सरकारची परिस्थिती नाही काय ? हे कागद देण्यासाठी आम्हाला सभागृहामध्ये वारंवार सांगावे लागते. हे कागद पार्ट ॲण्ड पार्सल ऑफ दी बजेट नाहीत काय ? दरवर्षी आम्ही गोंधळ घातल्यानंतर तुम्ही ते कागद आम्हाला देता. आम्ही न मागता हे कागद तुम्ही आम्हाला का देत नाही ? पुढच्या वर्षी देखील आम्ही असाच तमाशा करायचा काय? आपण पैसे तर देत नाही, आणखी आदेशाचे कागद मागायलाही तुम्ही आम्हाला मागे मागे धावयला लावता. ही स्थिती योग्य आहे काय ? ही लपवाछपवी, हातचलाखी बंद करा. मा. राज्यपालांनी दिलेले आदेश लोकप्रतिनिधींपासून दूर ठेवण्याचा जो प्रयत्न झाला तो अतिशय निंदनीय आणि निषेधार्ह आहे. या गोष्टीचा जेवढा निषेध करावा तेवढा तो कमीच आहे. आता मी सिंचनाच्या अनुशेषाबद्दल बोलतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी पुढे सुरु...)

बाकीच्या अनुशेषाबद्दल बोललो तर अजून दोन तास लागतील. खरे म्हणजे आता असे वाटते की, ज्या 8 क्षेत्रासंबंधी निदेश दिलेले आहेत त्यावर या सभागृहामध्ये चर्चा व्हायला पाहिजे. पण हे सरकार कशावर चर्चा करीत नाही. कोकण, विदर्भ, मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्र या भागातील आमदार याठिकाणी बसले आहेत. मराठी माणसांचा महाराष्ट्र एकसंध राहिला पाहिजे. पण दुष्काळ पडला तरी तिकडेच आणि पडला नाही तरी तिकडेच. मग सभापती महोदय, आम्ही काय करायचे याचे मार्गदर्शन आपण आम्हाला करावे. सभापती महोदय, आपला जन्म कोकणातील आहे. कोकणाच्या तोंडाला पाने पुसली जातात. आता आपण सांगावे की, ज्या भूमीत आपण जन्म घेतला त्या भूमिशी सातत्याने 4 वर्षे अशा प्रकारे व्यवहार झालेला आहे. मा.सदस्य मेजर सुधीर सावंत यांना हे माहीत आहे. मा.सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी हे देखील कोकणातीलच आहेत. "असुनी नाथ मी अनाथ" अशी आमची स्थिती झालेली आहे. आपल्या कोकणाशी, विदर्भाशी, मराठवाड्याशी विश्वासघात केलेला आहे. मा.मुख्यमंत्री हे मराठवाड्याचेच आहेत. कोणाचे काही चालत नाही. बाकीच्या 8 क्षेत्राबद्दल मी बोलत नाही. घटनेच्या अनुच्छेद 371(2)(8) खाली माननीय राज्यपालांनी घटनात्मक निदेश दिलेले आहेत. भारताच्या संसदेने 1958मध्ये जे बिल पास केले त्याआधारे 1995 साली मा. महामहीम राष्ट्रपतींनी आपले विशेष अधिकार महाराष्ट्राच्या राज्यपालांना दिलेले आहेत. "याआधी जे काही लिहिले असले तरीही" असे म्हणून आदेश दिलेले आहेत. या आदेशाप्रमाणे शासनाने मागील चार वर्षात सिंचनाच्या क्षेत्रात काय काम केले ? सन 2002-03 ते 2005-06 या चार वर्षात मा.राज्यपाल महोदयांनी दि. 15 डिसेंबर 2001, 12 मार्च 2003, 23 फेब्रुवारी 2004 आणि 25 फेब्रुवारी 2005 रोजी निर्देश दिलेले आहेत.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

व दिनांक 25 फेब्रुवारी,2005 रोजी निदेश दिलेले आहेत. हे निदेश कशासाठी दिलेले आहेत ? माननीय राज्यपालांच्या निदेशाप्रमाणे राज्याचा अर्थसंकल्प तयार करावा म्हणून निदेश दिलेले आहेत. मी तुमच्या अर्थसंकल्पाचा दुसरा भाग वाचला आहे. या दुस-या भागात तुम्ही असे म्हटले आहे की, वार्षिक योजना सन 2005-2006 बाबत योजना आयोगाशी झालेल्या चर्चेच्या आधारे या वर्षाच्या योजनेचे आकारमान 11 हजार कोटी रुपये निश्चित करण्यात आले आहे. 11 हजार कोटी नियतव्ययापैकी 8416.64 कोटी इतका नियतव्यय अर्थसंकल्पीत झाला आहे. हे तुम्ही मान्य केलेले आहे. आणि उर्वरित 2583.36 कोटी रुपये इतक्या योजनांतर्गत नियतव्ययाची आवश्यक ती साधनसंपत्ती अर्थसंकल्पात उपलब्ध असल्याने हा नियतव्यय वर्षभरात अर्थसंकल्पीत करण्यात येईल. अर्थमंत्री महोदय, 2583.36 कोटी रुपयांचा उल्लेख अर्थसंकल्पात का केला नाही ? हा निधी वेगळा का ठेवला ? या रक्कमेवरील हेड निश्चित का केले नाही ? पाटबंधा-यांसाठी 2583.36 कोटी रुपये का उपलब्ध करुन दिले नाही ? जर अर्थसंकल्पातील 2583.36 कोटी पाटबंधारे खात्यास दिले असते तर यावेळी माननीय राज्यपालांच्या निदेशाचे तुम्हाला 100 टक्के पालन करता आले असते. परंतु 2583.36 कोटी या नियतव्ययाचे तुम्ही साधनसंपत्ती लावून ठेवली आहे. या रक्कमेचे एक्सपेंडीचर हेड मात्र काहीच दिलेले नाही असे का ? तुम्ही म्हणता आमचा बजेट प्लॅन एवढाच आहे. 1900 कोटी रुपये फक्त पाटबंधा-यांच्या कामांसाठी देता आले. शासन कर्ज रोखे उभे करणार नाही आज सकाळीच तुम्ही बोललात. बजेट प्लॅन प्रमाणे आम्ही निधी उपलब्ध करुन दिलेला आहे असेही त्यावेळी सांगितले. मग हे 2583.36 कोटी रुपये तुमच्याकडे आहेत. हे पैसे तुम्ही पाटबंधारे खात्याकडे का दाखविले नाही ? यासंबंधीचे आपल्याकडे उत्तर आहे काय ? मागील तिन्ही वर्षी माननीय राज्यपाल महोदयांनी दिलेल्या निदेशाचे पालन या सरकारने केलेले नाही. या सरकारमध्ये मुख्यमंत्री अथवा अन्य मंत्र्यांनी येऊन सांगावे की, गेल्या चार वर्षात घटनेच्या दृष्टीने जे निदेश दिले आहेत त्याचे आम्ही पालन केले आहे. आम्ही या संदर्भात चार वेळा अर्थमंत्र्यांना विचारले. त्यावेळी त्यांनी सांगितले की, बरोबर आहे. आम्ही घटनेचे पालन केलेले आहे. माननीय राज्यपालांच्या निदेशाचे पालन केलेले आहे. असेच पालन केलेले आहे काय ? आम्हाला सांगितले जाते की, आम्ही माननीय राज्यपालांच्या निदेशाचे पालन केले आहे. परंतु वस्तुस्थिती मात्र वेगळीच आहे.मागील तिन्ही वर्षात निदेशाचे पालन केले गेले नाही. याही वर्षी

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी..

माननीय राज्यपालांच्या निदेशाचे पालन केले गेले नाही. यासाठी 2583.36 कोटी रुपये वेगळे ठेवले. सभापती महोदया, तुम्ही आम्हाला संरक्षण द्या. माननीय राज्यपालांचे घटनात्मक निदेश उपलब्ध असताना हा वेगळा निधी ठेवलेला आहे.तसेच हा निधी कोणत्याही हेडखाली दाखविण्यात आलेला नाही. हा निधी माननीय राज्यपालांच्या म्हणण्यानुसार पाटबंधारे विभागास का देण्यात आला नाही ? या ठिकाणी आम्ही आमच्या बजेटप्रमाणे प्लॅन केले आहे असे या ठिकाणी सांगता. "आंधळा दळतो आणि कुत्रा पीठ खातो" असा हा प्रकार आहे. हा अन्याय आहे. माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशाचा भंग कसा झाला याची मी सभागृहाला माहिती देतो. माननीय राज्यपालांचे निदेशाप्रमाणे पाटबंधारे क्षेत्रासाठी देय व प्रत्यक्ष वितरीत रक्कम वर्षनिहाय विवरण मी आपल्यासमोर सांगणार आहे. 2002-2003 या वर्षात विदर्भासाठी माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार देय रक्कम 932.70 कोटी रुपये होती. प्रत्यक्षात 353.63 कोटी रुपये प्रत्यक्षात रक्कम वितरीत करण्यात आली आहे.या एका वर्षात 579.07 कोटी रुपये एवढी रक्कम कमी देण्यात आलेली आहे.मराठवाडयात याच वर्षी 625.67 कोटी रुपये द्यावयास पाहिजे होते.प्रत्यक्षात 319.91 कोटी रुपये देण्यात आलेले आहेत. 305.76 कोटी रुपये एवढी रक्कम कमी देण्यात आलेली आहे.उर्वरित महाराष्ट्रात उत्तर महाराष्ट्र आणि कोकण विभागाचा समावेश आहे. या विभागासाठी त्यावर्षी 894.58 कोटी रुपये देय रक्कम होती. 1193.64 कोटी रुपये प्रत्यक्षात देण्यात आलेले आहेत.299.06 कोटी रुपयांची रक्कम जास्त देण्यात आलेली आहे. माननीय राज्यपालांच्या निर्देशास त्या वर्षी कच-याची टोपली दाखविली.2003-2004 या वर्षी विदर्भासाठी माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार देय 1164.77 कोटी रुपये होती.प्रत्यक्षात 501.47 कोटी रुपये दिले गेले गेले.663.29 कोटी रुपये शासनाने दिले नाहीत. त्याच वर्षी मराठवाडयास 742.77 कोटी रुपये द्यावयास पाहिजे होते. प्रत्यक्षात 350.18 कोटी रुपये दिले. 392.59 कोटी रुपये प्रत्यक्षात कमी देण्यात आलेले आहेत.

यानंतर श्री. कानडे..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. नितीन गडकरी ...

सभापती महोदय, उर्वरित महाराष्ट्रासाठी 843.46 कोटी द्यावयास पाहिजे होते. 1273.73 कोटी रुपये दिले. 429.27 कोटी जादा दिले. 2004-05 या वर्षाकरिता विदर्भासाठी 1835.33 कोटी द्यावयास पाहिजे होते प्रत्यक्षात 344.27 कोटी रुपये दिले. 1491.60 म्हणजे 1500 कोटी रुपये पळविले राज्यपालांच्या निदेशाला केराची टोपली दाखविली. मराठवाडयासाठी 1081.02 कोटी रुपये देणे आवश्यक होते प्रत्यक्षात 296.85 कोटी रुपये दिले. 784.17 कोटी रुपये गायब केले. उर्वरित महाराष्ट्रासाठी 396.86 कोटी रुपये द्यावयास पाहिजे होते 526.30 कोटी रुपये दिले 129.44 कोटी रुपये जास्त दिले. राज्यपालांच्या निर्देशाप्रमाणे 2005-06 या वर्षाकरिता निधीची तरतूद अर्थसंकल्पात करणे आवश्यक होते ती नाही . आम्ही या सभागृहामध्ये अनेक वेळेला हा विषय उपस्थित केलेला आहे.या सर्वोच्च व्यासपीठावर किती वेळा न्याय मागितला ?भारतीय घटनेप्रमाणे डॉ. आंबेडकरांनी लिहिलेल्या घटनेप्रमाणे कलम 371 (2)(8) अनुसार राज्यपालांनी दिलेल्या निर्देशाचे पालन सरकार करीत नाही हे वर्तन घटनाबाहय आहे.घटनेच्या विरुध्द सभागृहात कोणी बोलत नाही. कोणीही उभे राहून सांगावे की गडकरी तुम्ही चुकीचे बोलत आहात.आम्ही घटनेचे पालन करतो. मी आव्हान देतो की, या सभागृहातील सत्तारुढ पक्षाच्या एका तरी आमदाराची ताकद आहे किंवा एका तरी मंत्र्याची ताकद आहे काय की त्याने उभे राहून सांगावे हे शासन भारतीय घटनेप्रमाणे वागत आहे. मी हार मानतो.आपली क्षमा मागेन. या सरकारने घटनेच्या धज्ज्या उडविल्या आहेत. पूर्णपणे घटनेचे निदेश असताना यावर्षी देखील घटनाबाहय वर्तन केलेले आहे. एकाही लोकप्रतिनिधीची सांगण्याची ताकद नाही की आमचे सरकार घटनेप्रमाणे वागत आहे.तुम्ही हे शब्द परत घ्या. आमचे राज्य भारतीय घटनेप्रमाणे चालले आहे. घटनेची पायमल्ली केलेली नाही. केलेली नसेल तर मी शब्द मागे घेतो. ही ताकद एकाही आमदारामध्ये किंवा मंत्र्यांमध्ये नाही. श्री. गुरुनाथ कुलकर्णी आपण कायद्याचे पदवीधर आहात. वकील आहात.हायकोर्टाचे न्यायाधीश होणार होते.कौरवांच्यादरबारामध्येबसून जशी द्रोणाचार्याची कृपाचार्याची ,भीष्माचार्याची जशी हालत झालेली आहे तशी तुमची या सरकारच्या दरबारात झालेली आहे.कारण द्रोणाचार्य म्हणाले की यांचे मीठ खाल्ले आहे. त्यांची जशी लाचारीची अवस्था होती तशी तुमची झालेली आहे.डॉ. सुनील देशमुख साहेब तुमच्यावर टीकाही करता येत

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

नाही. तुम्ही बिच्चारे काय करणार ? विद्यार्थी असताना त्यांच्याबरोबर काम केले आहे. उत्तम कार्यकर्ता आहे. माझे त्यांच्यावर व्यक्तिगत प्रेम आहे.डॉ. देशमुख साहेबांच्या हातातच काय आहे. बजेट तयार करताना तुम्हांला विचारले तरी काय ? तुमचे ऐकले तरी काय ? या राज्यात 2/3 जिल्हयांची राजवट सुरु आहे. आहे. विदर्भातील आमच्या एका मित्रांनी नऊ वेळा अर्थसंकल्प मांडला. मी गमतीने म्हणालो की मांडला नाही वाचून दाखविला. पूर्वी श्रीमती वसुधाताई देशमुख यांनी वाचला. आता डॉ. सुनील देशमुख यांनी अर्थसंकल्प वाचून दाखविला. श्री. जयंत पाटील यांनी मांडला.अर्थसंकल्प त्यांचाच. रोख्याच्या स्वरुपात जेवढे पैसे वसूल झाले तेही दिले नाहीत.गुलाबाचे फूल लावण्यापुरते आणि काळा कोटा घालण्यापुरते विदर्भाच्या नेत्यांना बरोबर नेतात आणि वाचायला लावतात. उपमा बरोबर नाही मी देत नाही. कोट सारखा,कोटाचे डिझाईन सारखे ,कोटाचे फूल सारखे पण अर्थसंकल्प तयार करताना एकाची मक्तेदारी चालली आहे. यांच्या हातात काटे आणि गुलाबाचे फूल मात्र ते फिरवून राहिले आहेत.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) :अशा प्रकारे आपण म्हणत आहात परंतु ते तसे म्हणत नाहीत.

श्री.नितीन गडकरी : तसे आम्ही म्हणत आहोत.माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी असे म्हणावे की या अर्थसंकल्पामध्ये मी भारतीय राज्य घटनेचा मी कोणत्याही प्रकारे अवमान केलेला नाही.घटनाबाहय वर्तन केलेले नाही. त्यांनी असे म्हटल्यानंतर मी चुपचाप खाली बसेन.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : त्या संदर्भात आपण मुद्दा मांडलेला आहे.

श्री.नितीन गडकरी : परंतु त्याबाबतीत कोणीही बोलत नाही. है कोई बोलने वाला ?

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : जेव्हा बोलण्याची वेळ येईल तेव्हा ते बोलतील.

श्री.नितीन गडकरी : या बाबतीत एकही सदस्य काही बोलत नाही. जे विधिज्ञ आहेत ते सुध्दा बोलत नाहीत.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, अनुशेषाच्या बाबतीत सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.नितीन गडकरी हे वारंवार उल्लेख करीत आहेत.त्याबाबत मी सांगू इच्छितो की इंडिकेटर समितीचा रिपोर्ट युती शासनाला 1995 साली दिला होता.युती शासन असतांना इंडिकेटर समितीचा रिपोर्ट बासनात गुंडाळून ठेवण्यात आला होता.हा रिपोर्ट बाहेर काढण्याची त्यांना कधीही बुध्दी झाली नाही.लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर युती शासनाला इंडिकेटर समितीने त्यांना दिलेला जो रिपोर्ट होता तो रिपोर्ट लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर बाहेर काढला आणि त्याप्रमाणे विनियोग करण्याचे काम सातत्याने केले जात आहे.त्यामध्ये काम कमी जास्त केले जात असेल आर्टिकल 371(1) नुसार जे काही करावयास पाहिजे होते ते पूर्णपणे केलेले नसेल परंतु या निमित्ताने हा अहवाल मान्य करुन त्याची अंमलबजावणी करण्याचे काम लोकशाही आघाडी शासनाने केलेले आहे हे आपल्याला विसरता येणार नाही.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपले मुद्दे मांडावेत.

श्री.नितीन गडकरी :सभापती महोदया, त्यामध्ये मी एक दुरुज्ञस्ती करु इच्छितो.ही गोष्ट खरी आहे की आमच्या काळात इंडिकेटर समितीचा अहवाल आला होता परंतु आमच्या काळात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तो स्वीकारला गेला नाही ही गोष्ट खरी आहे.परंतु हा रिपोर्ट स्वीकारण्याचे श्रेय तुमचे नाही.मंत्रिमंडळामध्ये त्यावेळी विदर्भाचे श्री.रणजित देशमुख हे मंत्री होते.त्यांनी आग्रह धरुन हा रिपोर्ट मंत्रिमंडळासमोर आणला होता त्यामुळे त्याचे श्रेय त्यांच्याकडे आहे तेव्हा हे श्रेय तुम्ही आणि राष्ट्रवादीने घेण्याचे काही कारण नाही.असो. सभापती महोदया, केवळ रिपोर्ट स्वीकारुन काम भागत नाही. रिपोर्ट स्वीकारुन काय कार्यवाही केली हे सुध्दा सागितले पाहिजे.त्यांनी हा रिपोर्ट स्वीकारला परंतु प्रत्यक्षात मात्र काहीही दिलेले नाही.माननीय राज्यपालांनी जे निर्देश दिले होते ते सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते परंतु त्या निर्देशाप्रमाणे सिंचन क्षेत्रासाठी जो निध द्यावयास पाहिजे होता तो दिलेला नाही. आम्हाला जी बॅग भरुन कागदपत्रे दिली होती त्यातील कोणत्याही कागदपत्रात हया निधीची तरतूद करण्यात आलेली नाही.वारे आघाडीचे सरकार.आमच्या हातात फक्त कचरा दिला होता.निर्देशानुसार काहीही अंमलबजावणी केली नाही.राज्यपालांनी 2005-2006 मध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे तरतूद करण्यास सांगितले होते. त्यात राज्यपालांनी असे म्हटले होते की,

"Therefore, the Governor has directed that Rs.4685.46 crores outlay be allocated in the Irrigation sector in the Annual Plan for 2005/06. The region-wise distribution of which should be as given below."

माननीय अर्थ राज्य मंत्रिमहोदयांना मी असे विचारु इच्छितो की माननीय राज्यपालांनी दिलेले आदेश कोठे गेले ? 4 हजार 685 कोटी रुपये कोठे गेले ?2 हजार 800 कोटी रुपये वर्ग करावयाचे अजून राहिलेले आहे.हे पैसे इरिगेशनमध्ये का टाकत नाही ?4 हजार 685 कोटी रुपयांचा आऊट ले माननीय राज्यपालांनी सांगितल्याप्रमाणे तुम्ही पूर्ण का करीत नाहीत ? या प्रश्नांची उत्तरे माननीय अर्थ राज्य मंत्र्यांनी द्यावे.अजूनही आपल्याकडे पैसे बाकी आहेत ते पैसे तुम्ही इरिगेशनमध्ये टाका िव उत्तर देत असताना माननीय राज्यपालांच्या निर्देशाप्रमाणे दुरुस्ती करावी. ही दुरुस्ती आपुण करणार आहात किंवा नाही असा माझा आपल्याला प्रश्न आहे. प्लॅन प्रमाणे आणि तरतुदीप्रमाणे बजेटमध्ये ही तरतूद असून ती वेगळी पडलेली आहे.ते पैसे तुम्ही आम्हाला का देत नाही? माननीय राज्यपालांनी दिलेले आदेश तुम्ही का पाळत नाही ?तुम्ही आम्हाला असे सांगत आहात की आमच्याकडे पैसे नाहीत तर एवढे पैसे तुम्ही वेगळे का ठेवले आहेत? पैसे असतांना आदेशाचे पालन का करीत नाहीत याचे उत्तर मंत्रिमहोदयांनी द्यावे.सभापती महोदया, मी पुन्हा ही सगळी आकडेवारी येथे आणलेली आहे. दरवर्षीच्या अर्थ मंत्र्यांच्या भाषणात माननीय राज्यपालांनी दिलेल्या निर्देशाचा उल्लेख तरी रहावयाचा परंतु या वर्षी तोही गायब करण्यात आला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होता.अर्थमंत्र्यांनी दोन तास जे भाषण केले होते त्या भाषणात यासबंधीचा कोठेही उल्लेख केला नाही. तेव्हा दोन दोन तास भाषण करण्याची काय गरज आहे ? हा पुतळा उभा केला, तो पुतळा उभा केला, ही समिती नेमली , त्यांनी असे म्हटले हे सांगण्यासाठी अर्थसंकल्प आहे काय ?35-40 मिनिटांमध्ये अर्थसंकल्प मांडला पाहिजे.जे नाही ते सांगितले जाते आणि घोषणा केल्या जातात परंतु तो सगळा कचरा असतो त्यात कामाचे फार कमी निघते.ज्या कॉक्रिट गोष्टी आहेत त्या सांगितल्या जात नाहीत आणि ज्या गोष्टी कामाच्या नाहीत त्या मात्र सागितलया जातात. आम्ही ज्यावेळी प्रश्न विचारतो तेव्हा मुख्य उत्तर देण्यामध्ये जेव्हा अडचण येते तेव्हा भलतेच उत्तर दिले जाते.आम्ही गेलो होतो आणि चौकशी केली होती वगैरे वगैरे सांगितले जाते..परंतु आम्ही जे विचारतो त्याचे उत्तर द्यावे.परंतु ते न सांगता आम्ही ते तपासून पाहतो. आम्ही इकडे गेलो तिकडे गेलो होतो असे सांगण्यातयेते .

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

आम्ही विचारले तो रिपोर्ट मिळाला काय ? तर त्याचे उत्तर द्यायचेच नाही आणि दुसरेच काही तरी उत्तर द्यायचे. म्हणजे मुख्य विषय टाळायचा. अध्यक्ष महाराज, अर्थसंकल्पिय प्रकाशनाचा वार्षिक वित्तीय स्टेटमेंटमध्ये, ग्रीन बुकमध्ये याचा समावेश नाही. वार्षिक योजना भाग 1 मधील वैधानिक विकास मंडळे अनुशेष दूर करणे या प्रकरणामध्ये देखील याचा उल्लेख नाही. अध्यक्ष महाराज, माननीय राज्यपालांनी भारतीय घटनेच्या कलम 371(2) अन्वये माननीय राष्ट्रपती महोदयांनी 1994 मध्ये माननीय राज्यपालांना दिलेल्या अधिकारान्वये तसेच राज्याच्या महाभिवक्त्यांनी, असे दिलेले निदेश हे राज्य सरकारला बंधनकारक आहेत असे सभागृहामध्ये येऊन सांगितल्यानंतर देखील त्याचा समावेश अर्थसंकल्पातील बॅगभर असलेल्य पुस्तकांतील कोठल्याच पानावर नसावा यापेक्षा दुसरे कोठले दुर्दैव अनुशेषग्रस्त भागाचे राहू शकत नाही. अध्यक्ष महाराज, या वर्षी देखील तीच स्थिती आहे. या वर्षीचे पाटबंधारे विभागाचे बजेट किती आहे तर 1901.67 कोटी रुपयांचे. वार्षिक योजना जीएल-1 मध्ये पृष्ठ रोमन 28-29 वर आहे. 25 फेब्रुवारी 2005 रोजी माननीय राज्यपालांनी दिलेल्या निर्देशांनुसार 4685.46 कोटी रुपयांची तरतूद करणे अपेक्षित होते त्यापैकी विदर्भाला 3,010.19 कोटी रुपये, मराठवाड्याला 1551.75 कोटी रुपये, उर्वरित महाराष्ट्राला 115.17 कोटी रुपये प्रस्तावित करण्याची आवश्यकता होती. परंतु माननीय राज्यपालांच्या निदेशांचा उल्लेखच जेथे संपूर्णपणे अर्थसंकल्पातून टाळला तेथे ही तरतूद शोधून देखील सापडणे कठीण आहे. अध्यक्ष महाराज, या अर्थसंकल्पामध्ये सिंचनासाठी एकंदर किती तरतूद आहे हे शोधण्याचा प्रयत्न केला असता वार्षिक योजना 2005-06 भाग 1 विवरणपत्र जीएन 1 अ, वैधानिक विकास मंडळ यामध्ये खालीलप्रमाणे तरतूद केल्याचे दिसून आले आहे. अध्यक्ष महाराज, या तरतुदी मी पाहिल्या आणि त्यातही विदर्भ विकास मंडळ - जिल्हा स्तरीय, राज्य स्तरीय तरतूद 884.47 कोटी रुपये आणि त्यातही 400 कोटी केंद्र सरकारचे आहेत. मराठवाडा विकास मंडळ इ 16.56, 421.66 राज्य स्तरीय तरतूद .. म्हणजे एकंदर 438.23 कोटी रुपये त्यातील 175 कोटी केंद्र सरकारचे आहेत. उर्वरित महाराष्ट्रावर 578.97 कोटी रुपये आहेत त्यापैकी 425 कोटी केंद्र सरकारचे आहेत. म्हणजे पाटबंधारेच्या 1901. मध्ये 700 कोटी हे केंद्र सरकारचेच आहेत. म्हणजे राज्य सरकारचे बजेट किती रुपयांचे आहे ? मला हे कळतच नाही की, या राज्यामध्ये आपण पाटबंधाऱ्यासाठी काही खास लक्ष देणार आहात की नाही ? तुम्ही हे पैसे का दिले नाहीत ?

..... ओओ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

अध्यक्ष महाराज, याचे उत्तर स्पष्ट आहे. इरिगेशनसाठी बजेटमध्ये मोठी तरतूद दाखविली असती तर तुम्हाला हे सर्व पैसे राज्यपालांच्या निदेशानुसार द्यावे लागले असते म्हणून मग तुम्ही काय केले ? तर बजेटच कापून टाकले. चांगला उपाय यांनी शोधला आहे. 4600 चे बजेट 1900 चे करा, त्यातील 900 कोटी केंद्र सरकारचे की संपला विषय. आणि मग हे बजेट या प्रगतीशील, समृद्ध संपन्न अशा राज्याचे पाटबंधाऱ्यासाठीचे प्रत्यक्ष बजेट किती रुपयांचे आहे तर 800-900 कोटी रुपयांचेच आहे. अध्यक्ष महाराज, मला आठवते की, आमचे सरकार सत्तेत असताना सर्वात जास्त प्राधान्य हे सिंचनासाठी मिळाले होते, बांधकाम विभागाला मिळालेले होते. या राज्याचा विकास करावयाचा असेल तर राज्यातील शेतकऱ्याच्या शेतीला पाणी मिळाले पाहिजे. परंतु या सरकारने केवळ या राज्यातील मागास भागाला पैसे द्यावे लागतील म्हणून सिंचनावरील तरतूदच कापून टाका आणि केंद्र सरकारच्या मिळणाऱ्या पैशासह 1901 कोटी रुपयांचे बजेट दाखविले आहे. यापेक्षा अजून किती मोठा विश्वासघात करायचा बाकी आहे ? अध्यक्ष महाराज, मला आता असे वाटू लागले आहे की, हे जे एक राज्य बद्दल वाद चालू आहे ना त्यासंबंधात कधी कधी मलाही असू वाटू लागते की, वेगळे होण्याशिवाय यामध्ये दुसरा पर्याय नाही. मी या बाबतीत मनापासून जेव्हा जेव्हा वेळ येते तेव्हा माझे संवेदनशील मन सांगते की, महाराष्ट्रातील मराठी माणसांचे एकसंघ राज्य असले पाहिजे. ते तुटता कामा नये. पण अशा प्रकारची बेदरकारवृत्ती पाहिल्यानंतर वाटू लागते की, आता या राज्यातील मागास भागाला तुम्ही न्याय द्याल असे काही वाटत नाही. अध्यक्ष महाराज, 1901.67 कोटी रुपयांमध्ये 1000 कोटी रुपये एआयबीपी योजनेंतर्गत केंद्र सरकारचे आहेत. म्हणजे राज्य सरकारची स्वत:ची अशी 901.67 कोटी रुपयांचीच तरतूद सिंचन क्षेत्रासाठी या अर्थसंकल्पामध्ये केलेली आहे. माझी महाराष्ट्रातील साऱ्या विद्वानांना, पत्रकारांना, बुद्धिजीवीना प्रश्न आहे, लोकप्रतिनिधींना प्रश्न आहे .....

(यानंतर श्री. जागडे .... पीपी 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

राजकारण्यांना प्रश्न आहे. प्रगतशील, संपन्न आणि समृध्द महाराष्ट्राच्या इरिगेशनचे बजेटसाठी केवळ 901.67कोटी रुपयाची तरतूद करणा-या अर्थमंत्र्यांच्या दृष्टीला काय म्हंटले पाहिजे. सिंचन हा महाराष्ट्राचा आत्मा आहे. शेतीला पाणी देणे महत्वाचे आहे. मा. राज्यपालांबरोबर मा.कमलकिशोर कदम बोलले आहे. मा. राज्यपाल महोदय म्हणाले की, संपूर्ण महाराष्ट्राचा विचार मला करावयाचा आहे. त्यावेळी मा. कमलकिशोर कदम जे बोलले ते मी ऐकले आहे. त्यावेळी मला मा. कमलकिशोर कदम यांच्या चेह-यावरील भाव दिसून आले. मराठवाड्यातील अनेक प्रकल्प 20 ते 22 वर्षापासून रखडलेले आहेत, अशी माहिती श्री. कमलकिशोर कदम यांनी राज्यपालांना दिली. त्यावेळी मा. राज्यपाल सूसंस्कृत भाषेत असे म्हणाले की, माझ्या भावना या प्रश्नावर हर्ट झाल्या आहेत. मराठवाड्यातील प्रकल्पांची शोकांतिका मा. कमलकिशोर कदम यांनी जेव्हा मा.राज्यपालांना सांगितली, तेव्हा मा. राज्यपाल असे म्हणाले की, मला याची माहिती नव्हती. मी याचा विचार नक्कीच करेन. सभापती महोदय, समृध्द आणि संपन्न महाराष्ट्रासाठी मा. अर्थमंत्री फक्त 901 कोटी रुपयाचे बजेट जलसंपदा विभागासाठी करतात. You can donate eye but you cannot donate vision. सभापती महोदय, तुम्ही डोळे दान करु शकता, परंतु विकासाची दृष्टी आपणाला दान करता येणार नाही. युतीचे सरकार असताना जलसंपदा खात्याचे मंत्री श्री. एकनाथ खडसे होते. तेव्हा या खात्याकरिता 2800 कोटी रुपयाचे बजेट आम्ही केले होते. मा. मुंडेसाहेब, मा. राणेसाहेब आणि आम्ही सतत इरिगेशनला प्राधान्य देत होतो. आम्ही आमच्या काळात इरिगेशन आणि सार्वजनिक बांधकाम खात्याला जास्तीचे बजेट दिले होते. आता मात्र प्रवास उलटाच सुरु आहे. माननीय अर्थमंत्र्यांना अशी भीती आहे की, आपण जर इरिगेशनसाठी जास्तीची तरतूद केली तर ती मागासलेल्या भागासाठी जाईल. विदर्भ, मराठवाडा आणि कोकणासाठी ही रक्कम जाईल. तेव्हा आपणाला त्यासाठी नाही म्हणता येणार नाही. म्हणूनच या जादुगार अर्थमंत्र्यांनी पाटबंधारे विभागासाठी फक्त 901 कोटी रुपयाचे बजेट दिले आहे. आता राज्य पुढे चालले आहे की मागे चालले आहे, याचे उत्तर त्यांनीच मला द्यावे. राज्यातील शेतीला पाणी मिळावे, या करिता सर्वात जास्त बजेट पाटबंधारे विभागासाठी देण्याची गरज आहे. सार्वजनिक बांधकाम विभागासाठी तशीच तरतूद करुन ग्रामीण भागातील रस्ते तयार केले पाहिजे. पिण्याचे पाणी, रस्ते आणि शेतीला पाणी या तीन महत्वाच्या गोष्टी आहेत. या तीन गोष्टी महाराष्ट्राचा आत्मा आहे. याचा विचार करता यासाठी 4800 कोटी रुपयाचे बजेट करण्याची आवश्यकता आहे. परंतु तसे काहीच न करता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

मा.अर्थमंत्र्यांनी हातचलाखी केली आहे. आता मा. अर्थमंत्र्यांची दृष्टी कशी आहे ? आता सर्व वर्तमानपत्रे मात्र ही गोष्ट पहिल्या पानावर छापत आहेत. अजूनपावेतो लोकांच्या लक्षात या गोष्टी आलेल्या नाहीत. महाराष्ट्रातील जनतेची त्यांनी दिशाभूल केली आहे. विदर्भ, मराठवाडा आणि कोकणाचा त्यांनी विश्वासघात केला आहे. तुम्ही आमचा विश्वासघात केला आहे. आज तेथील प्रकल्प 20-20 वर्षे रखडले आहेत, त्यांच्यासाठी काहीच तरतूद करण्यात आली नाही. कारण आज या महाराष्ट्रात त्या भागातील नेतृत्व शक्तीशाली नसल्यामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. जे आहेत, ते तर मिंधे झाले आहेत. त्यांना नाक आहे, परंतु वास येत नाही. त्यांना डोळे आहेत, परंतु दिसत नाही. तोंड आहे, पण बोलता येत नाही, त्यांना पाय आहे, परंतु चालता येत नाही. फक्त या ठिकाणी खुर्चीत बसतात आणि वरच्यांच्या आदेशाचे पालन करतात. अशी केवलवाणी अवस्था आज महाराष्ट्राची आहे. म्हणून माझा या ठिकाणी मा. अर्थमंत्र्यांना प्रश्न आहे. आता हा अर्थसंकल्प महाराष्ट्राला पुढे नेणारा आहे की, मागें टाकणारा आहे ? माननीय राज्यपालांनी जे आदेश दिले होते, त्याचा अनुपालन अहवाल सादर करण्यात आला आहे. त्यामध्ये वार्षिक योजना 2005-2006 चे स्वरुप योजना आयोगाने 11000 कोटीपर्यन्त सीमीत केल्याने सिंचन क्षेत्रासाठी 1941.94 कोटी देणे शक्य असल्याचे माननीय राज्यपालांच्या निदर्शनास आणण्यात आले आहे. त्यास संमती मिळाल्यानुसार एक हजार कोटी एआयबीपी, 150 कोटी नाबार्ड आणि 77 कोटी बाह्य सहाय्य प्रकल्पासाठी निधी प्रस्तावित केले असल्याचे म्हंटले आहे. आता हे बजेट आहे काय ? सारे काहीच बाहेरच्या पैशावर अवलंबून आहे. मा. राज्यपाल महोदयांनी 25 फेब्रुवारी रोजी निदेश दिल्यानंतर आता 1939 कोटी रुपयांना घेतलेली ही नवीन संमती कोणती आहे ?

(यानंतर श्री. सरफरे....

अशुद्धीत मत / शोधनेसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

मग ही संमती दिनांक 25.2.2005 च्या निदेशाबरोबर कां वितरीत केली नाही? ही संमती म्हणजे वेगळे निदेश आहेत काय? कॉस्टिटयुशनल ऑर्डरची अमेंडमेंट कॉंस्टिटयुशनल ऑर्डरने होते. कॉंस्टिटयुशनल डायरेक्शनची दुरुस्ती कॉंस्टिटयुशनल डायरेक्शनने होते. मग माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख म्हणतात, "सप्रेम नमस्कार विनंती विशेष". हे पत्र आहे कां? हे काय आहे? तुम्ही मघाशी सांगितले की हे घटनाबाहय वर्तन आहे. काल तुम्ही माननीय राज्यपालांची परवानगी घेतली, त्यांच्या पत्राप्रमाणे बदल केला. आम्ही ते पत्र पटलावर ठेवू म्हणाले, ते पत्र कुठे आहे? महाराष्ट्राच्या जनतेसमोर ते पत्र आले पाहिजे. हे काय चालले आहे. या सभागृहामध्ये, लोकशाहीच्या पवित्र मंदिरामध्ये? ही भारतीय घटनेची क्रूर थट्टा होत आहे, आपण मला संरक्षण द्या. "सिंचन क्षेत्र सोडून 8 विकास क्षेत्रासाठी 3880.84 कोटी तरतूद करण्याचे दिलेले निदेश" हे वाचून मोठा आनंद झाला. "आंधळा मागायला गेला एक डोळा मिळाले दोन डोळे". पण याही आठ क्षेत्राच्या निदेशाचे काही पालन होत नाही. 3880.24 कोटीमध्ये "रस्ते, शिक्षण, सामान्य शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, नागरी पाणी पुरवठा , जलसंधारण, पशुवैद्यकीय सेवा, विद्युत पंपाना कनेक्शन" या आठ विकास क्षेत्रातील अनुशेष दूर करण्यासाठी रुपये 1400 कोटी रुपये इतका निधी ठेवण्यात आला आहे. तरतूद 3880.24 कोटींची आहे, मग फक्त 1400 कोटींचा निधी कां ठेवला? राज्यपाल महोदयांनी दिलेल्या निदेशाच्या पृष्ठ दोन वर सांगितले आहे की, "The Governor has, therefore, directed that Rs.3880.84 crores should be earmarked for backlog removal in sectors other than the irrigation sector in the Annual Plan 2005/06." कशासाठी हे पत्र आणता आणि आम्हाला वाटता? तुमच्यातील संवेदनशीलता संपली आहे काय? त्यांचे पत्र वाटता, आमच्यासमोर बोलता. आम्ही पालन करु म्हणता, परंतु एकाही गोष्टीचे पालन करीत नाही. फक्त 1400 कोटींची तरतूद करता. सभापती महोदया, आपण आम्हाला संरक्षण द्या. माननीय राज्यपालांच्या डायरेक्शन्स बंधनकारक आहेत. त्यांचा भंग करुन बजेट तयार केले तर Whether this budget is constitutional or not? हे बजेट घटनात्मकदृष्टया योग्य आहे की अयोग्य आहे? हे भारतीय घटनेच्या कलमाची पायमल्ली करणारे असेल तर या बजेटला कॉंस्टिटयुशनल बजेट कसे म्हणायचे? क्षणो क्षणी, पदो पदी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनेचे धज्जे उडवायचे? तुम्ही कसेही म्हणायचे आणि आम्ही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

मान्य करायचे? सभापती महोदया, आपण आम्हाला संरक्षण द्या. या रेफरन्सप्रमाणे वारंवार प्रत्येक ठिकाणी घटनाबाहय वर्तन होत असेल तर सरकारचे वर्तन योग्य आहे की अयोग्य आहे हे विचारण्यासाठी राज्याच्या ॲडव्होकेट जनरलना या सभागृहासमोर पुन्हा बोलवा. आपण ॲडव्होकेट जनरलना विधान परिषदेत बोलवा, आणि सत्य काय आहे याची चर्चा होऊ द्या, आम्हाला कळू द्या. कुणी बोलत नाही, कुणी सांगत नाही. या निमित्ताने आमच्या हातात कागद पडले आहेत त्याबद्दल मंत्रिमहोदयाचें मी आभार मानतो.

अर्थसंकल्पाच्या भाषणामध्ये "मोफत वीज योजना" या शीर्षाखाली "मागील दोन तीन वर्षात राज्यातील तीव्र दुष्काळी परिस्थितीला तोंड देऊन सामान्य शेतकरी हवालदिल झालेला होता व आर्थिकदृष्टया गांजला होता. त्यास या परिस्थितीतून बाहेर काढण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून शेतकऱ्यांच्या वीज पंपावरील वीजेचा पुरवठा दिनांक 1 जुलै 2004 पासून मोफत करण्याचा निर्णय शासनाने घेतला" असे नमूद केले आहे. मी चौकशी केली की, 1 जुलै 2004 ची मंत्रिमंडळाची बैठक सकाळी झाली होती की रात्री झाली होती? रात्री झाली असेल तर आमच्या लक्षात आले नाही, काय झाले? परंतु ती सकाळी झाली....

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : माननीय विरोधी पक्षनेते आपण अजून किती मिनिटे बोलणार आहात?

श्री. नितीन गडकरी : मी दहा मिनिटामध्ये माझे भाषण संपवितो. "गेल्या नऊ महिन्यांच्या अनुभवावरुन शासनाला मोफत वीज पुरवठा संबंधातील नवीन धोरणाचा पुनर्विचार करणे आवश्यक झाले आहे आहे".

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

आपण या अर्थसंकल्पात वीज अनुदानापोटी 750 कोटी रुपये इतकी तरतूद प्रस्तावित केलेली आहे. का, हो, अर्थमंत्री महोदय, शेतक-यांना मोफत वीज द्यावयाची झाल्यास किमान 1400 कोटी रुपयांची तरतूद करण्याची आवश्यकता होती. पण आता तुम्ही फक्त 750 कोटी रुपयांची तरतूद केली आहे म्हणजे तुम्ही तुमच्या जुन्या घोषणेपासून दूर गेला आहात ना? आता मोफत वीज देणार नाही ना ? गरज सरो, वैद्य मरो. काम संपले, मत घेतली, निवडून आले, सत्ता मिळाली, खूर्चीवर बसले आणि आश्वासने संपली.

श्री.जितेंद्र आव्हाड(खाली बसून) : मरता क्या न करता ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, हे बरोबर आहे. मरता क्या न करता, लेकिन मरता कभी झूठ नहीं बोलता. इथे तर काहीच नाही. मोफत विजेच्या बाबतीत आता वाट लागली. आता लहान शेतकरी, मोठा शेतकरी, विद्वतप्रचूर भाषणे, आर.आर.पाटील यांचे योग्य आहे का? मेरिटवर चर्चा करा असे म्हणणे. पण तेव्हा मेरिट आठवले नाही का ? तेव्हा कुठे होते मेरिट ? माननीय श्री.शरद पवारसाहेब, म्हणाले की, हे व्यवहार्य नाही. मग माननीय श्री.शरद पवारसाहेबांचे मंत्री यांना विचारु इच्छितो की, मग त्यांना न विचारताच ते मंजूर झाले का ? का, हो, वसंतराव पवार ? हे मोफत विजेचे जे काही झाले, ते माननीय श्री.शरद पवारसाहेबांना न विचारताच कॅबिनेटमध्ये एवढा मोठा निर्णय मंजूर झाला का ?

श्री.वसंतराव पवार(खाली बसून) : साहेबांनी विरोध केला होता.

श्री.नितीन गडकरी : होय. मग यांनी का मंजूर केले ? राष्ट्रवादीच्या मंत्र्यांनी त्याला का सपोर्ट केला ? तुम्ही राष्ट्रवादीवाले एवढे हुशार आहात की, विजेचे खातेही तुमच्याकडेच, पण लोड शेडींगच्या बाबतीत शिव्या सरकारला देता. इरिगेशनचे खाते राष्ट्रवादीकडे, पैसे मिळाले नाही तर शिव्या सरकारला देता. म्हणजे जेवढे चांगले असेल ते राष्ट्रवादीचे आणि घाटा असेल तर तो काँग्रेसचा. या काँग्रेसवाल्यांची तुम्ही वाट लावली. मला पूर्ण विश्वास आहे की, तुम्ही याच गतीने गेलात तर अनिस अहमदसाहेब, तुम्हाला पुन्हा या बिल्डींगमध्ये येण्याची संधी नाही. हे तुमची पुरती वाट लावल्याशिवाय राहणार नाहीत. हे लक्षात ठेवा.

श्री.दिवाकर रावते(खाली बसून) : ते राष्ट्रवादीत जातील.

श्री.नितीन गडकरी : तो एक मार्ग आहे. पण ते जाणार नाहीत, ते नागपूरमधील

. . . .2 आर-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

आहेत. मला माहिती आहे की, ते कुठे जातील. सभापती महोदय, आता मोफत विजेचा विषय संपला. दुसरी बाब म्हणजे एकाधिकार कापूस खरेदी योजना. आपल्यासमोर मला माननीय श्री.आर.आर.पाटीलसाहेबांनी सांगितले की, अजून पावणेपाच वर्षे बाकी आहेत आणि 2700 रुपये हमी भाव देऊ. अजून वेळ आहे. पावणेपाच वर्षे 2700 रुपये भाव देऊ असे येथे सांगितले, त्यामुळे मी असे समजलो की, पुढच्या वर्षी 2700 रुपये भाव मिळेल आणि एकाधिकार योजना सुरु राहील. आता यांनी सांगितले की, एकाधिकार कापूस खरेदी योजना बंद, बंदच. पण त्यासाठी शब्द कसे वापरले ? तर ना नफा ना तोटा या तत्वावर चालवू. ना नफा ना तोटा या तत्वावर चालविण्याचे गरज काय ? केंद्र सरकारच्या मिनिमम प्राईजप्रमाणे कापूस घ्यावयास केंद्र सरकार बसले आहे. मिनिमम प्राईजवर कापूस घेण्यास ते तयार आहेत. तुमची गरज काय ? ना नफा ना तोटा. तुमचा याच्याशी काही संबंध आहे का ? चालवावयाचे असेल तर चालवा, नाहीतर नका चालवू. मला हे कळत नाही. कशासाठी आपण बोलता ? तुम्ही सांगा की, आम्हाला जमत नाही. आम्ही हे करीत नाही. आज कापसाची आधारभूत किंमत, प्रचलित बाजारभाव जो आहे, त्याचा विचार न करता कापूस एकाधिकार योजनेतील खरेदी किंमतीत आज जी परिस्थिती निर्माण झालेली आहे, ती पुन्हा नफा ना तोटा या तत्वावर स्विकारणे आवश्यक झाले आहे असे माननीय अर्थमंत्री म्हणतात. ही दुसरी धूळफेक. 2700 रुपये क्विंटल भाव. मरता क्या नही करता. आमची सत्ता येईल म्हणून भीती होती, म्हणून मरता क्या नही करता. 2700 रुपये भाव, मोफत वीज, कर्जावरील व्याज माफ. आता कोणाला विचारावयाचे ? माननीय श्री.सुशिलकुमार शिंदेसाहेब, हैद्राबादला. आता त्यांनाही विचारावयाची सोय नाही. आता आम्ही कुठे जावयाचे ? शिंदेसाहेबांकडे इतक्यात जाऊ नका. सभापती महोदय, एकाधिकारामध्ये सरकार बदलले. निवडणुकीपूर्वी मेरिट आठवले नाही, डी-मेरिट आठवले नाही. केंद्र सरकारने या योजनेला दहा वर्षाची मुदतवाढ दिली होती. पण आता योजना बंद पडली. पुढल्यावर्षी एकाधिकार वगैरे काही नाही, अस्तित्वात नाही. संपलेच. पण कसे आहे की, मेले असले तरी सांगावयाचे नाही की, मेले आहे. जीवंत आहे असे म्हणावयाचे. आमच्याकडे नागपूरला काही डॉक्टर आहेत. ते मुडद्याला पण इंजेक्शन देतात. म्हणजे खरी गोष्ट सांगतो की, डेड बॉडीला देखील सलाईन लावतात, इंजेक्शन देतात.

श्री.जितेंद्र आव्हाड (खाली बसून) : ते कोण डॉक्टर आहेत याची सभागृहाला माहिती मिळाली पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : ते मी तुम्हाला सांगेन. तसे हे एकाधिकार खरेदी योजनेच्या बाबतीत सांगावयाचे तर हे सगळे डेड झालेले आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (पुढेउ चालू...

इन्जेक्शन आणि सलाईन लावण्याचे काम झालेले आहे. आपण कशाला आम्हाला मुर्ख बनविता ? आम्हाला ही योजना चालवायची नाही, योजना चालविण्यास जमत नाही, असे सांगा. परंतु आपल्याला हे सांगण्याची हिंमत नाही. ताकाला जाऊन भांडे का लपविता, हे समजत नाही.

सभापती महोदया, जीवनदायी योजना खूप चांगली आहे, मी स्वत: या योजनेमध्ये पुष्कळ काम करतो या योजनेसाठी सरकारने 7 कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे. मी आपल्याला विनंती करतो की, या योजनेमध्ये तुम्ही 25 कोटी रुपयाची तरतूद करावी. बीपीएलखालील अतिशय गरीब लोक आहेत, त्यांच्यासाठी फार चांगली योजना आहे. आमच्या सरकारने ही योजना सुरू केली आणि आपल्या सरकारने ती पुढे चालू ठेवली. गरीब लोकांचे यामुळे कल्याण होते. याबाबतीतील आपण तरतूद वाढवावी, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

शासकीय दूध योजना महानंद दूध योजनेकडे हस्तांतरित करण्याचे सांगितलेले आहे. 'महानंदा दूध योजने'च्या किल्ल्या चोराच्या हाती दिलेल्या आहेत. हे तळेकर, तळे राखील तो पाणी चाखील. तळेकरांनी खूप तळे राखले. सन्माननीय मंत्री श्री.अनिस अहमद साहेब, एक गोष्ट लक्षात येत नाही. कापूस खरेदी योजनेला 3200 रुपये तोटा होतो त्याची चर्चा होते, परंतु या दूध योजनेला 3100 कोटीचा संचित तोटा झालेला आहे. या विषयीची महाराष्ट्रात चर्चा होत नाही. कापसाचा 3200 कोटीचा घाटा होतो, त्याची मात्र आपण सगळेजण चर्चा करतो. ठीक आहे, तोही घाटा वाईटच आहे. या शासकीय दूध योजनेचा 3100 कोटीचा तोटा आहे. ही तोट्याची रक्कम वाढू नये, म्हणून राज्याचा शासकीय दुग्ध व्यवसाय टप्प्याटप्प्याने तळेकराच्या स्वाधीन करण्याचा निर्णय सरकारने घेतलेला आहे. श्री. तळेकर, पुन्हा आहे, त्यांनी डब्बा वाजवावा, प्लॉट 450 हजार करोडला विकावा जयमहाराष्ट्र होऊ द्या.

श्री.जितेंद्र आव्हाड : आपण 'जयमहाराष्ट्र' म्हणत आहात.

श्री.नितीन गडकरी : त्यांच्याकरिता 'जयमहाराष्ट्र' म्हणत नाही. 'जयमहाराष्ट्र' म्हणणे हा आमच्या स्वाभिमानाचा नारा आहे. 'जयमहाराष्ट्र', हा आपल्या सगळयांचा आहे. सभापती महोदया महानंदमध्ये एवढ्या मोठयाप्रमाणात भ्रष्टाचार चव्हाट्यावर आला. त्या ठिकाणी सगळा आनंदी आनंद सुरू आहे. ही टप्प्याटप्प्याने योजना महानंदाकडे देण्याचा अर्थमंत्री महोदयांनी प्लॅन तयार केला. चांगली योजना आहे. वरळीचे प्लॉट आणि आरे कॉलनीचे ऑक्शन करून 3200 कोटीचा तोटा भरुन काढण्याचा धंदा चालविलेला आहे.जयहिंद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ MAP/ KGS/ SBT/

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : आता आपण 'जहिंद', म्हणत आहात.

श्री.नितीन गडकरी : बजेटच्या शेवटी अर्थमंत्री महोदयांनीही 'जयहिंद,जयमहाराष्ट्र' असे म्हटलेले आहे. हे दूध सम्राट तयार झालेले आहेत. 3100 रुपये घाटा असणाऱ्या या सगळया योजना, या तळेकरांच्या स्वाधीन करायला निघालेला आहात यावर काय बोलावे, हे मला कळत नाही.

सभापती महोदया, मुंबईसाठी 1 हजार कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे. यामध्ये सत्य किती आणि असत्य किती, हे समजत नाही. मुख्यमंत्री हे सत्य असल्याचे सांगतात, त्याप्रमाणे केंद्रीय अर्थमंत्र्यांनी दिल्लीमध्ये घोषणा केली. त्यामध्ये मेट्रो सिटीकरिता 5500 कोटी रुपयाच्या तरतुदीबाबत त्यांनी सांगितले. त्यापैकी 1 हजार कोटी रुपये मुंबईकरिता आणू, अशाप्रकारचा मुख्यमंत्र्यांना विश्वास आहे. या दिल्लीच्या पैशावर या अर्थसंकल्पात घोषणा केलेली आहे. म्हणजे "हलवाच्या घरावर तुळशीपत्र", ठेवण्याचा प्रकार झाला. ठीक आहे. काही हरकत नाही. सभापती महोदया, हे 66 भुयारी मार्ग, 41 उड्डाण पूल, 300 कि.मी.चे पदपथाची अशी एकूण 2600 कोटीची कामे 2007 सालापर्यन्त करावयाची आहेत. त्यासाठी 1 हजार कोटी वापरण्यात येणार आहेत. सभापती महोदया, मी बऱ्याचवेळा सांगितले, परंतु माझे कोणी ऐकायला तयार नाही. मुंबईच्या विकासाकरिता पैशाची आवश्यकता नाही. मुंबईच्या विकासासाठी इच्छाशक्तीची गरज आहे. हे पैसे मुंबईच्या विकासासाठी खर्च करण्यापेक्षा मुंबईचा विकास खाजगी गुंतवणुकीमधून बील ऑपरेट ॲन्ड ट्रान्फरवर करा. आज आपल्याला यासाठी पैशाची कमी नाही. आज मुंबईचा माणूस 5 रुपये, 10 रुपये टोल देऊ शकतो. आपल्याला सगळे प्रकल्प करता येतात. परंतु मुंबईची अशी अवस्था आहे की, कोणी म्हणते, मुंबईचे शांघाय करु, कोणी म्हणते, सिंगापूर करू. परवा मा.मुख्यमंत्री महोदयांना सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार यांनी विचारले की, कोण सुप्रीम आहे ? मुख्यमंत्री सुप्रीम आहे की,.....

यानंतर कु.थोरात....

अशुद्धीत प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

मुख्यमंत्री सुप्रीम आहे की, दहा जनपथ सुप्रीम आहे? आमचे पहाडासारखे मुख्यमंत्री दिल्लीला गेले आणि सोनिया गांधींना भेटून परत आले. तिकडे गुरुदास कामत यांचे पोस्टर्स लागले. श्री. राज श्रॉफ यांनी सोनिया गांधी आणि विलासरावांचे पोस्टर्स लावले.झोपडपट्या आपण वाढवीत आहोत. कुठे गेले सन 2000 साल? आता त्यांनी सांगितले की, कोर्टात ॲफिडेव्हिट केलेले आहे की, 1995 नंतरच्या झोपडयांना मान्यता देणार नाही. त्यामुळे आता कोर्टाची परवानगी मिळाली तर 2000 पर्यंतच्या झोपडया रेग्युलर करणार.....

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी): 6.00 वाजलेले आहेत. सभागृहाची वेळ 6.00 वाजे पर्यंत होती. अर्थसंकल्पावरी सर्वसाधारण चर्चा किती वाजे पर्यंत घ्यावयाची?

श्री. नितीन गडकरी : आज अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी जेवढया सन्माननीय सदस्यांनी नांवे दिलेली आहेत तेवढया सन्माननीय सदस्यांची भाषणे होईपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात यावी.

तालिका सभापती :एकूण 9 वक्ते बोलणार आहेत. तेव्हा ही चर्चा किती वाजेपर्यंत सुरु ठेवावयाची ते सभागृहाने ठरवावे.

श्री. विलास अवचट :आज जेवढे वक्ते बोलणार आहेत तेवढया वक्त्यांची भाषणे पूर्ण होऊ द्यावीत आणि उद्या स्पेशल सिटिंग 10.30 वाजता घ्यावे.

तालिका सभापती :कबूल आहे पण सभागृहाला मान्य असेल तर सभागृहाची वेळ 7.00 वाजे पर्यंत वाढविण्यात येईल. पण वक्त्यांनी पाच मिनिटांत आपले भाषण पूर्ण करावे.

श्री. मधुकर चव्हाण :सभापती महोदया, ही चर्चा 7.30 वाजे पर्यंत घ्यावी. उरलेले वक्ते उद्या बोलतील.

तालिका सभापती :प्रत्येक सदस्याला किती वेळ द्यावयाचा हेही ठरविले तर फार बरे होईल. कारण माननीय विरोधी पक्ष नेता श्री. गडकरी साहेब सोडून आणखी 9 सदस्य या चर्चेत भाग घेणार आहेत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदया, सभागृहाची कामकाजाची वेळ 8.00 वाजेपर्यंत वाढविण्यात यावी. तोपर्यंत जेवढे सदस्य बोलतील तेवढे बोलतील..पुन्हा आपल्याला सभागृहाची वेळ वाढविता येईल. प्रत्येक सदस्याला बोलण्यासाठी 15/15 मिनिटे वेळ देण्यात यावा.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती :प्रत्येक सदस्याला 15 मिनिटे वेळ कसा देता येईल?

श्री. नितीन गडकरी :सभापती महोदया, आपण एक्स्ट्रा सेशन घेण्याचे पण ठरविले आहे.सदस्यांना बजेटवर बोलू द्या.

तालिका सभापती :सभागृहाच्या अनुमतीने रात्री 8.00 वाजे पर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मुंबईच्या विकासाच्या बाबतीत युती सरकारने वरळी-बांद्रयाचा पूल सुरु केला. त्या कामाचे 420 कोटी रुपयांचे टेंडर होते. आता त्याची किंमत 350 कोटी रुपयांनी वाढविली आहे. अद्यापपर्यंत काहीही काम होण्याचा पत्ता नाही. हे काम कासवाच्यागतीने सुरु आहे. नावाशेवा ते शिवडी 4000 कोटी रुपयाचा पूल बांधण्याची घोषणा झाली. मी स्वागत करतो. त्यासाठी पर्यावरण विभागाकडून क्लिअरन्स आला. उत्तम झाले परंतु हा प्रकल्प कसा बांधणार? याला पैसा कुठून आणणार? 4000 कोटी रुपयाच्या प्रॉजेक्टचा इंन्टर्नल रेट ऑफ रिटर्न सहापेक्षा कमी आहे त्याला एक्विटी पार्टिसिपेशन करुन सपोर्ट केल्या शिवाय तो होणार नाही. त्या करिता काही नवीन डिझाईन शोधावे लागेल. मुंबईच्या विकासाकरिता एक मूलभूत प्रश्न मी उपस्थित करतो. तुम्ही मुंबईमध्ये रस्ते बांधाल, नवीन बगीचे तयार कराल, पाण्याच्या पाईपलाईन टाकाल,धरणाची उंची वाढवाल, लाईट आणाल. सगळे काही आणू शकता. पण मुंबईच्या विकासाकरिता लोकांना राहण्याकरिता तुम्ही जागा कुठून आणणार आहात.? तिन्ही बाजूने समुद्राने वेढलेले आहे. आता मुंबईमध्ये येणा-या लोकांकरिता जर राहण्याची व्यवस्था करावयाची असेल तर क्रीडांगणे आणि बगीचे तोडून त्या ठिकाणी बिल्डिंग बाधाव्या लागतील आणि त्या ठिकाणी त्यांची व्यवस्था करावी लागेल.सभापती महोदया, सगळया गिरण्यांच्या जमिनी आता निघत आहेत. मी परवा एका मिलच्या इमारतीत गेलो होतो. सी.एन.बी.सी. टी.व्ही.वर मुलाखत द्यायला गेलो होतो. तेथे आतून बिल्डिंग आणि बाहेरुन जुने खोपट दाखविले आहे. एफ.एस.आय. चे उल्लंघन येथे झालेले आहे व त्यांना आणखी काय, काय कन्सेशन दिले हा एक नवीन संशोधनाचा विषय आहे. बिचारा गरीब कामगार मात्र देशोधडीला लागला आहे.

यानंतर श्री. बरवड ....

अशुद्धीत प्रत/ग्रंथालयासाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

मी माननीय अर्थमंत्र्यांना विनंती करतो. मी डायमंड मार्केटमध्ये गेलो होतो. या ठिकाणी त्यांना कमीतकमी 50 लाख चौरस फूट जागा पाहिजे. त्यांनी सांगितले की, जेवढे मिल कामगार असतील त्यांच्या प्रत्येकी एका मुलाला आम्ही प्रशिक्षण देऊन नोकरी देऊ. तुम्हाला करता आले तर या ठिकाणी मोठे डायमंड एक्स्चेंज तयार करा. येथील प्रत्येक कामगाराच्या एका मुलाला नोकरी मिळवून देण्याची योजना आखा. त्यांचे पुनर्वसन करा. सन्माननीय सदस्य श्री. सरपोतदार साहेब हे बांद्रा येथील डायमंड मार्केटबाबत बोलत आहेत. डायमंडची जी सोसायटी आहे त्यांचा तो कॉम्प्लेक्स आहे. त्याचा सरकारशी संबंध नाही. या ठिकाणी सेनापती बापट मार्गावर जागा उपलब्ध आहे. त्या ठिकाणी जर डायमंड इंडस्ट्रीकरिता एमआयडीसीकडून बांधकाम करुन दिले तर त्याच ठिकाणी आम्ही ट्रेनिंग इन्स्टीटयूट उभी करु आणि तुमच्या यादीप्रमाणे जेवढे कामगार आहेत त्यांच्या एका मुलाला किंवा मुलीला सहा महिन्यांचे प्रशिक्षण देऊन त्या प्रत्येकाला आम्ही रोजगार देऊ ही तयारी त्यांनी दाखविलेली आहे. ही योजना आपण तपासून पहावी. कारण या मुंबईमधला जो भूमिपुत्र आहे त्याला 225 चौ.फुटाचे घर दिले पाहिजे. त्यांच्या मुलांच्या हाताला इमानदारीने करण्याचे काम दिले पाहिजे. त्यांच्या घरच्या मुली जर लेडीज बारमध्ये जात असतील तर या मुंबईच्या विकासाचा काय उपयोग आहे ? येथील स्थानिक लोकांवर अन्याय होणार असेल, त्यांना स्वाभिमानाने जगता येत नसेल तर या विकासाचा काय उपयोग होणार आहे ?

सभापती महोदया, या ठिकाणी वीज निर्मितीच्या बाबतीत असे म्हटले आहे की, "वीज निर्मिती क्षेत्रात 500 मेगावॅट व त्यापेक्षा जास्त निर्मिती क्षमतेसाठी खाजगी गुंतवणुकीसाठी धोरण ठरविले आहे." त्याबद्दल मी तुमचे स्वागत करतो. यामध्ये 500 मेगावॅटच का ? 20-25-50 मेगावॅटचे असतील त्या सगळयांना का येऊ देत नाही ? रिलायंस कशाला पाहिजे ? निप्पॉन डेनरोवाले श्री. मित्तल कशाला पाहिजे ? विदर्भ मराठवाडयातील सामान्य 50 कोटीचे, 100 कोटीचे लहान लहान उद्योग आहेत. ते पॉवर प्लँट टाकत असतील तर त्यांना ते टाकू द्या. लहान माणसांना मोठे करा. 500 मेगावॅटपेक्षा कमी क्षमतेचे प्लँट लहान माणसांना का देत नाही ? याही बाबतीत आपण याचा विचार केला पाहिजे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बायोडिझेलच्या बाबतीत शेवटचा मुद्दा मांडून मी माझे भाषण संपविणार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS

श्री. नितीन गडकरी ....

आहे. माननीय अर्थमंत्र्यांनी बायोडिझेलच्या धोरणाबाबत थोडासा स्पर्श केला आहे. या राज्यामध्ये 50 लाख हेक्टर पडीक जमीन आहे. जंगलातील रतनजोत, मोह, साल, करंजी या सगळया बिया सडतात. ठाणे जिल्हयामध्ये तसेच आमच्याकडेही हया बिया उपलब्ध आहेत. मी स्वत: प्रतिदिन 3 हजार लीटर बायोडिझेल तयार करतो. त्यावर ट्रक चालतात, ट्रॅक्टर चालतात. ते शेतकऱ्यांचे, आदिवासींचे डिझेल आहे. ते डिझेल सल्फरलेस आहे, लेडमुक्त आहे. या महाराष्ट्रातील गावागावात हे प्रकल्प का सुरु होत नाहीत ? यासाठी माझा जीव तडफडतो. या पडीक जमिनीवर कोकणामध्ये आपण जर जट्रोफा लावल्या तर त्याचा उपयोग होऊ शकतो. आता रायपूरला एकाने बायोटेक्नॉलॉजीचे संशोधन केले. त्यातून 60 टक्के तेल निघते. हे नॉन एडीबल ऑईल सीड आहे. हे अखाद्य तेल आहे. त्याच्या ढेपेपासून ऑरगॅनिक मॅन्युअल्स तयार होतात. ऑरगॅनिक पेस्टीसाईड तयार होतात. हे आपण औषध म्हणून, खत म्हणून वापरु शकतो. मला याठिकाणी वाईट वाटते. या देशात 1 लाख 20 हजार कोटी रुपयांचे आपले इम्पोर्ट आहे. एवढे पेट्रोल-डिझेल आपण बाहेरुन आणतो. त्याचे भाव वाढवित आहोत. परंतु या देशातील आदिवासी, या देशातील शेतकरी आपल्या पायावर उभा राहिला पाहिजे. त्या पडीक जमिनीमध्ये एका पैशाचेही उत्पन्न नाही. मी माननीय मुख्यमंत्र्यांना भेटलो. मी अनेक माननीय मंत्रिमहोदयांना भेटलो आणि त्यांना विनंती केली की, महाराष्ट्राच्या पडीक जमिनीवर रोजगार हमी योजनेतून जत्रोबा लावण्याची योजना तयार करा. ती योजना आपण आणली परंतु ती डिटेल योजना नाही. या प्रश्नाकडे जेवढया गांभीर्याने बघावयास पाहिजे तसे अजूनही सरकार बघत नाही. जर आपण 50 लाख हेक्टरवर हे लावले तर त्यातून 50 लाख युवकांना रोजगार मिळेल. याचे तेल काढले आणि 80 टक्के आईल, 20 टक्के मिथेनॉल आणि 6 टक्के कॉस्टीक सोडा टाकला तर सल्फरलेस बायोडिझेल तयार होते. ते जर आपण तयार केले तर त्यातून नकळत ग्लिसरीन हे बायोप्रॉडक्ट तयार होते. या डिझेलवर आपल्या गावातील ट्रक, ट्रॅक्टर चालू शकतात. मी आपल्याला विचारपूर्वक सांगतो की, त्याचा नीट उपयोग केला तर या महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील 1 कोटी युवकांना रोजगार देण्याची ताकद या प्रकल्पामध्ये आहे. परवा कै. पागे साहेबांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने जो कार्यक्रम झाला त्यावेळी मी बोललो. रोजगार हमी योजना ही सुंदर योजना आहे, चांगली योजना आहे. या महाराष्ट्रात काय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS

श्री. नितीन गडकरी ....

चांगले आहे असे कोणी विचारले तर रोजगार हमी योजना असे सांगता येईल. या महाराष्ट्रात रोजगार हमी योजना सुरु झाली हा महाराष्ट्राच्या अभिमानाचा विषय आहे आणि म्हणूनच या योजनेमध्ये जर आपण हे केले तर उपयोग होऊ शकतो. कोकणामध्ये हापूस आंबा येतो. रोजगार हमी योजनेतील पैसे त्यासाठी वापरले. खड्डे खणले. आज त्या ठिकाणी हापूस आंबा येतो. आपण फलोद्यान योजनेतून ते केले तसेच रोजगार हमी योजनेचा निधी सुध्दा त्यामध्ये वापरला.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

माझी आपल्याला विनंती आहे की, याबाबत शासनाने गंभीरपणे योजना आखली पाहिजे. यातून एक कोटी युवकांना रोजगार मिळेल. हा आयातीला पर्याय आहे. आपला रुपया बाहेर जाणार नाही. माझी विनंती आहे की, याचा सविस्तरपणे उल्लेख केला असता तर जास्त चांगले झाले असते. सभापती महोदया, माझे बजेटवरील भाषण समाप्त करीत असताना मी एवढेच सांगेन की, संपूर्ण महाराष्ट्राची दिशाभूल करणारा हा अर्थसंकल्प आहे. गेल्या 5 वर्षामध्ये सांगितले त्यानुसार 50 टक्के हे वागले आहेत आणि 50 टक्के त्याप्रमाणे वागले नाहीत असा यांचा ट्रॅक रेकॉर्ड आहे. निवडणुकीच्या वर्षात 19 हजार कोटीचा प्लॅन तयार केला त्यातील फक्त 10 हजार कोटीच खर्च केले गेले आणि 10 हजार कोटीच्या घोषणा हवेत विरल्या आहेत. त्याचा हिशोब देण्यास सरकार तयार नाही. सरकारने कापसाच्या प्रश्नावर धूमजाव केले, विजेच्या प्रश्नावर धूमजाव केले. पैसा खर्च कसा करावयाचा याच्यासाठी फक्त वेळ खर्ची घालविला परंतु उत्पन्न कसे वाढेल याच्यावर विचार केला नाही. महाराष्ट्रातील टॅक्स चोरीची प्रकरणे आम्ही उघडकीला आणली, ती बिचारी मुले ज्यांनी मला मदत केली, ते जेलमध्ये गेले, आणि ज्यांनी खरे गुन्हे केले त्यांना ॲण्टीसिपेटरी बेल मिळाला असा त्रुटीपूर्ण आपला कायदा आहे. सभापती महोदया, याठिकाणी बजेटच्या निमित्ताने शासनाने मागील 5 वर्षाचा अहवाल सांगितला असता तर चांगले झाले असते. परंतु मागील 5 वर्षाच्या आपल्या ट्रॅक रेकॉर्डवर बोलण्यास मा.अर्थमंत्री तयार नाहीत. कारण ते बोलू शकत नाहीत. त्यांनी घटनेची पायमल्ली केली आहे. शासनाने या बजेटच्या निमित्ताने पुन्हा एकदा विदर्भ, मराठवाडा, कोकण व उत्तर महाराष्ट्रावर अन्याय केला आहे. शेतक-यांवर अन्याय केला आहे, शासकीय दूध योजना महानंदकडे देण्याची घोषणा करुन चोराच्या हातामध्ये किल्ल्या देण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्राच्या विकासाला दिशा देणारे हे बजेट नाही. वरुन मेकअप करुन सजविलेले बजेट आहे. दुर्दैवाने लोक याच्या खोलामध्ये गेले नाहीत. तुमचा मागील ट्रॅक रेकॉर्ड खोलामध्ये जाऊन पाहिला तर बजेटच्या मागचे सगळे उघडेनागडे सत्य महाराष्ट्राच्या जनतेला दिसल्याशिवाय राहणार नाही. हे सत्य यानिमित्ताने माझ्या भाषणाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या जनतेने लक्षात घ्यावे, सभागृहाने लक्षात घ्यावे म्हणून विस्तृतपणे पुराव्यासह मी या गोष्टींचा

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/

श्री.नितीन गडकरी.....

उल्लेख सभागृहात केला आहे. माझी सत्तारुढ पक्षाच्या आमदारांना विनंती आहे की, मी सांगितलेली आकडेवारी चूक असेल तर आणि एखादा आरोप चुकीचा असेल तर आपल्या उत्तरामध्ये खोडून काढा. मी हात जोडून आपली क्षमा मागितल्याशिवाय राहणार नाही. जी वस्तुस्थिती, सत्य स्थिती आहे ती या सभागृहात मी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. आपण मला संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद, जय हिंद, जय महाराष्ट्र.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/

श्री.जितेंद्र आव्हाड (नामनियुक्त) : सभापती महोदया, संसदीय लोकशाहीमध्ये जनता ज्याच्या मागे उभी राहते त्यांचा ट्रॅक रेकॉर्ड क्लीअर आहे असे म्हटले जाते आणि ज्यांच्या मागे उभी राहत नाही त्यांच्या ट्रॅक रेकॉर्डमध्ये गडबड झाली असे म्हणावयास हरकत नाही. (अडथळा) सभापती महोदया, मागील 5 वर्षांचा ट्रॅक रेकॉर्ड तपासला गेला, प्रसंगी चौथ्या स्तंभाचे कान पकडले, वाहवा केली, त्यांना काही मॅनेज करण्याच्या गोष्टी नव्हत्या. चौथा स्तंभ मॅनेज होतो असे म्हणावयास लागलो तर मग आपल्याला बोलायला नको. या महाराष्ट्रामध्ये चौथ्या स्तंभाची एक उच्च परंपरा आहे. त्यांनी ट्रॅक रेकॉर्ड तपासला आणि त्यांनी जनतेपर्यंत सत्य आहे ते पोहोचविले. सत्यतेचे पॅरामीटर जनतेने तपासले, भरभरुन मते दिली आणि परत एकदा 5 वर्षाच्या चांगल्या कामगिरीनंतर हे शासन याठिकाणी निवडून आले. त्यानंतर एक रिॲलिस्टीक असे बजेट मा.अर्थमंत्र्यांनी सभागृहाला सादर केलेले आहे. मी एका गोष्टीबाबत स्पष्टपणे बोलू इच्छितो ज्याचा उल्लेख मा.विरोधी पक्ष नेते श्री.गडकरीसाहेबांनी केला. ते म्हणाले की, मी 400 कोटीचे रोखे मागितले आणि 1080 कोटीचे रोखे आम्हाला मिळाले. त्यांचे म्हणणे बरोबर आहे. आपण जेव्हा मागितले तेव्हा 1995-96 हे साल होते. त्याच्यापूर्वी 35 वर्षाची काँग्रेसची राजवट होती.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जितेंद्र आव्हाड पुढे सुरु...)

त्याची क्रेडिबिलिटी तुमच्या पाठिशी होती. म्हणून रोखे उभारण्यासाठी जनता कॅपिटल मार्केटमधून तुमच्या पाठिशी उभी राहिली. नंतर 1995-2000 मधील क्रेडिबिलिटीमुळे मार्केटमध्ये कोणीही उभे राहायला तयार नाही. सभापती महोदय, मी वैयक्तिकरित्या या शासनाचे अभिनंदन करण्यासाठी उभा आहे. सन 1999-2000मध्ये एकूण महसुली उत्पन्नाच्या 81 टक्के रककम ही पगार आणि पेन्शन यावर खर्च होत होती. म्हणजे 100 रुपयातील 81 रुपये हे केवळ पेन्शन, ग्रॅच्युइटी, प्रॉव्हीडंट फंड, पगार यावर खर्च होत होते. परंतु शासनाच्या काटकसरीच्या धोरणामुळे हा खर्च 67 टक्क्यावर आलेला आहे. वास्तविक हा खर्च देखील जास्त प्रमाणातच आहे. हा खर्च जेवढा कमी होईल तेवढा महाराष्ट्राला फायदा होईल. म्हणून हा खर्च कमी करण्यासाठी कडक निर्बंध घातले पाहिजेत. महाराष्ट्र हे आर्थिकदृष्टया सक्षम राष्ट्र म्हणून संबोधले जायचे. त्यानंतर मागील 10 वर्षाच्या काळात जे काही झाले त्यावर सभागृहामध्ये वारंवार चर्चा झाली. महाराष्ट्रातील पुढच्या पिढीच्या भवितव्याच्यादृष्टीने महाराष्ट्र कर्जातून, आर्थिक संकटातून बाहेर यावयास पाहिजे असे मला वाटते. मा. अर्थमंत्र्यांनी 265 कोटी रु.चा शिलकी अर्थसंकल्प सादर केला ही चांगली गोष्ट असली तरी ही तूट कमी कमी व्हायला पाहिजे. महाराष्ट्राच्या आर्थिक स्थितीवरच महाराष्ट्राच्या उज्वल भवितव्याची गंगा अवलंबून आहे. महाराष्ट्रामध्ये येणारे उद्योगधंदे, परदेशी गुंतवणूक ह्या गोष्टी राज्याच्या आर्थिक स्थितीवरच अवलंबून असतात. म्हणून या विषयाकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे.

या सदनामध्ये मा. विरोधी पक्षनेते श्री. नितीन गडकरी आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी अनुशेषावर वारंवार चर्चा केली. मी मघाशी मा. विरोधी पक्षनेते श्री. नितीन गडकरी यांच्याशी अनौपचारिकपणे बोलत असताना सांगितले की, मी एमपीएससी आणि युपीएससीच्या परीक्षेच्या वेळीच दांडेकर समितीचा अहवाला वाचला होता आणि त्याच वेळी अनुशेषाच्या संदर्भात अभ्यास केला होता. परंतु अजूनही आपण तेच गु-हाळ कायम दळतोय. हा अनुशेष आपण कायम मिटवू शकलो नाही तरी तो एकदाचा कमी करु शकलो तरी मना मनामध्ये जे क्लेष निर्माण होतात, दुजाभाव निर्माण होतो तो कुठेतरी रोखण्यामध्ये आपण यशस्वी होऊ असे मला सांगावेसे वाटते. महाराष्ट्र शासन हे जनतेला आरोग्य विषयक सुविधा पुरविण्यामध्ये अग्रेसर आहे असे म्हटलेले आहे. आपण गावागावामधून चांगल्या प्रकारच्या आरोग्य सेवा उपलब्ध करुन देत आहोत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जितेंद्र आव्हाड पुढे सुरु...)

तरीही याबाबतीत कॉन्सन्ट्रेटेड एफर्ट करण्याची गरज आहे. उदा. आपल्या ठाण्याच्या सिव्हिल हॉस्पिटलची परिस्थिती पाहिली तर त्या रुग्णालयामध्ये उपचारासाठी जावे की जाऊ नये असा प्रश्ननिर्माण होतो. माझ्यासारख्या एका तरुणाचा जन्म देखील सिव्हिल हॉस्पीटलच्या खाटेवर झालेला आहे. पण आज त्या सिव्हिल हॉस्पीटलमध्ये रात्री एखादी बाळंतीण गेली तर ती सुखरुप राहील की नाही अशी तेथील परिस्थिती आहे. एक कोटी लोकसंख्या असलेल्या ठाणे जिल्ह्याच्या सेंटर पॉईन्ट असलेल्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये हार्टची कॅथलॅब नाही. दुदैवाची गोष्ट अशी आहे की, एखाद्याला जर हार्ट ॲटॅक आला आणि तो गरीब असेल तर त्याला जे.जे. रुग्णालय किंवा के.ई.एम. रुग्णालयामध्ये जावे लागते. तेथे जाईपर्यन्त तो रुग्ण एक तास जगू शकेल की नाही याची शाश्वती देता येत नाही. म्हणून या ठाणे शहराकरिता आपण कॉन्सन्ट्रेडेट एफर्ट केले पाहिजेत. त्याचप्रमाणे औरंगाबाद, नाशिक, पुणे, अमरावती याठिकाणीही कॉन्सन्ट्रेटेड एफर्ट करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, एडस् हा महाभयंकर रोग महाराष्ट्रात घुसतोय. जगाच्यापाठीवर आज अनेक राष्ट्र अशी आहेत की, ती येणा-या 25 वर्षामध्ये या रोगामुळे उद्ध्वस्त होतील. आज जवळ जवळ तेथील 40 टक्के लोकसंख्या ही एडस् रोगाने बाधित झालेली आहे. महाराष्ट्रातही या रोगाचे प्रमाण वाढत आहेत. महाराष्ट्राच्या भवितव्याच्या दृष्टीने हे अत्यंत धोकादायक असे चित्र आहे. महाराष्ट्राची आजची पिढी ही उद्या महाराष्ट्राचे भविष्य घडविणारी आहे. म्हणून एडस्च्या संदर्भात महाराष्ट्राने काही ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. जेव्हा राज्यावर दुष्काळासारखी नैसर्गिक आपत्ती किंवा संकट कोसळते त्यावेळी आपण सर्वजण एकत्रितपणे निर्णय घेतो, आपण एकसंधपणे उभे राहतो. तद्वतच या एडस्च्या विरोधात आपण एकसंधपणे उभे राहिले पाहिजे असे मला स्पष्टपणे नमूद करावेसे वाटते.

माननीय विरोधी पक्षनेते श्री. नितीन गडकरी यांनी अंत्योदय योजनेचा उल्लेख केला. ही एक अत्यंत चांगली योजना आहे. परंतु या योजनेसाठी करण्यात आलेली तरतूद फार कमी वाटते.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/

(श्री. जितेंद्र आव्हाड पुढे सुरु....

या योजनेंतर्गत रुग्णला 70 हजार रु.पर्यन्त अर्थसहाय्य केले जाते. परंतु 70 हजार रु.मध्ये किडनी ट्रान्स्प्लान्टेशन होत नाही. माननीय अर्थराज्यमंत्री हे स्वत: डॉक्टर आहेत आणि त्यांना देखील याची कल्पना आहे की, 70 हजार रु.मध्ये बायपास होत नाही, 70 हजार रु.मध्ये एन्जोप्लास्टी होत नाही.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड..

म्हणजे 70 हजार रुपये उपचारासाठी देतो. इतक्या कमी पैशात पूर्णपणे उपचार होऊ शकत नाही. उपचारासाठी लागणारी रक्कम ही अतिशय तुटपुंजी आहे असे मला वाटते. उपचारासाठी देत असलेल्या रक्कमेमध्ये वाढ करुन गोरगरीब जनतेस शासनाने न्याय द्यावा अशा प्रकारची शासनास विनंती करतो. कुटुंब कल्याण कार्यक्रमामध्ये शासनाने एखाद्या कुटुंबियास जर दोन मुली असतील, किंवा कुटुंबियातील त्या मुली दारिद्रयरेषेच्या खालील असतील तर त्यांना बक्षीस देण्याची घोषणा जाहीर केलेली आहे. सभापती महोदया, आपल्या कुटुंबात मुलगा असावा असे गरीबालाच वाटत नसते. श्रीमंताला देखील एक मुलगा असावा असे वाटत असते. एक मुलगी ज्या नव दाम्पंत्याला झाली आणि त्यानंतर त्याने नसबंदी केली किंवा त्याच्या घरी दुसरे मूल जन्माला येणार नसेल अशाही कुटुंबियांना बक्षिसाची योजना जाहीर करावी अशी मी शासनाकडे मागणी करु इच्छितो. महाराष्ट्रातील लोकसंख्येचा विचार करता प्रत्येक कुटुंबात एक मुलगा, एक मुलगी असे लिमिटेशन घालून देण्याचा विचार समाजात शासनाच्या माध्यमातून पुढे येणे आवश्यक आहे.अशा प्रकारचे विचार समाजामध्ये पुढे येऊन त्यासंबंधी जनतेमध्ये प्रोत्साहन निर्माण व्हावे अशी भूमिका शासनाने तातडीने हाती घ्यावी असे मला वाटते.सभापती महोदया, शालेय स्तरावर क्रीडेसाठी प्रोत्साहन देण्याची योजना जाहीर केलेली आहे. ही एक चांगली योजना आहे. क्रीडापटूंसाठी 5 टक्के शासकीय,निम-शासकीय सेवेत 5 टक्के जागा राखून ठेवण्याची घोषणा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात केलेली आहे. मला असे वाटते की, राज्यातील मेट्रोपोलिटिएन सिटी मोठया प्रमाणात विकसीत होत आहेत. मुंबई, ठाणे, कल्याण,डोंबिवली, नाशिक, अमरावती या मोठया शहरांमध्ये खेळांसाठी मैदाने उपलब्ध नाहीत. या शहरांमध्ये भूखंड आरक्षित ठेवण्यात आलेले आहेत, परंतु या आरक्षित भूखंडांवर अतिक्रमणे झालेली आहेत. ती अतिक्रमणे नष्ट करुन शासनाने स्पष्टपणाने निर्देश दिले पाहिजेत की, अमूक अमूक एवढया लोकसंख्येसाठी अमूक अमूक एक बगीचा असलाच पाहिजे, अमूक अमूक एवढया लोकसंख्येसाठी एक क्रीडांगण असायलाच हवे. नाही तर कालांतराने मुंबईसह महाराष्ट्रात काँक्रीटची जंगले उभी आहेत अशा प्रकारचे चित्र दिसेल आणि ते चित्र येणा-या पिढीच्या दृष्टीने भयानक असेल. माननीय वित्त मंत्र्यांच्या भाषणात महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळ व इतर महामंडळे आहेत त्यांचे सक्षमीकरण करणे गरजेचे आहे असा उल्लेख केलेला आहे. सभापती महोदया, त्याच अनुषंगाने मी एक गोष्ट सांगू इच्छितो की,--

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम 18:20

श्री.जितेंद्र आव्हाड..

मुंबईतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची स्थिती भयानक आहे. मुंबई शहरात गेली अनेक वर्षे वसतिगृहे बांधली गेलेली नाहीत. या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी मुंबई शहरात चांगल्या प्रकारची वाचनालये नाहीत. महाराष्ट्रातील संपूर्ण ग्रामीण भागातून मागासवर्गीय विद्यार्थी मुंबई शहरात शिक्षण घेण्यासाठी येतात. ते विद्यार्थी कधी कधी मुंबई सेंट्रल स्टेशनच्या दिव्याखाली बसून अभ्यास करतात. व्ही.टी.स्टेशनमधील दिव्याखाली बसून अभ्यास करतात. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी शासनाने लक्ष घालावयास हवे. मुंबईत शहरात विद्यापीठांच्या भूखंडावर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी आणि मागासवर्गीय विद्यार्थिनींसाठी चांगल्या प्रकारची वसतिगृहे निर्माण केली गेली पाहिजे अशी आग्रही मागणी मी शासनाकडे या निमित्ताने करीत आहे. आज राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळण्याची शक्यता मावळली आहे. औद्योगीकरणाची गती खूपच कमी झालेली आहे. दिवसें दिवस बेरोजगारांची संख्या वाढत आहे. त्यासाठी आपण सहकारी सोसायटया निर्माण करीत आहोत. शासनाच्या माध्यमातून निघणारी विविध कामे स्वंरोजगाराच्या सोसायटयांना आग्रहाने दिली गेली तर मला वाटते बेरोजगारांना न्याय मिळेल. रोजगाराची निर्मिती होऊ शकेल. परंतु यामध्ये एक धोका आहे तो असा की, अधिकारीवर्ग मुजोर होईल. बेरोजगार बेकार असतात, त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारची शक्ती नसते, त्यांना राजकीय पाठबळ नसते. त्यांनी केलेल्या अर्जाला केराची टोपली दाखविली जाते हे सर्वांच्या लक्षात आलेले आहे. मी स्वत: देखील बेरोजगारीचा अनुभव घेतलेला आहे. मी अर्ज घेऊन फिरत होतो.माझ्या अर्जाकडे त्यावेळेस कोणी लक्ष दिले नाही. शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष दिले तर बेरोजगारांची संख्या कमी होऊन त्यांना न्याय मिळू शकेल असे मला वाटते.

यानंतर श्री. कानडे..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री. जितेंद्र आव्हाड ...

(**सभापतीस्थानी मा. उप सभापती**)

सभापती महोदय, नागरी वस्त्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या भेडसावत आहे. ठाणे शहराची पिण्याच्या पाण्याची समस्या दूर करण्यासाठी शाई धरण मंजूर झालेले आहे. मुंबई महानगरपालिकेला धन्यवाद द्यावयास पाहिजेत की त्यांनी ठाण्यातील लोकांची पाण्याची समस्या लक्षात घेऊन शाई धरण मंजूर केले. निधीच्या उपलब्धतेचा विचार करावयास हवा. कारण ही फार महत्वपूर्ण बाब आहे. असे म्हणतात की 2011 सालापर्यंत ठाणे शहरासाठी पाण्याचा स्वतंत्र सोअर्स शोधला नाही तर ठाण्यामध्ये रोज दोन तास सुध्दा पाणी येणार नाही. म्हणून उपाययोजना करुन आर्थिक तरतूद केली पाहिजे. तरच ठाणे शहराचा फार मोठा फायदा होईल. Thane M.I.D.C. is considered a biggest Industrial belt in Asia. औद्योगिकरणाचा विचार केला तर सर्वात जास्त जमीन औद्योगिकरणासाठी ठाणे शहरातील आणि आसपासची जमीन 1960 सालानंतर ठाणे शहराने दिली आहे. आज एमआयडीसीमधील 72 टक्के कारखाने बंद आहेत. काही जमिनींवर अतिक्रमणे झालेली आहेत. वास्तविक पाहता शेतक-यांकडून एक आणा ते दोन आणे भावाने त्याकाळात जमीन घेतली गेली. आज त्याठिकाणी मोठमोठी गृहसंकुले उभारली 5जात आहेत आणि आमचा शेतकरी मात्र रिक्षासाठी फिरत आहे. एमआयडीसीमधील असंख्य कारखाने बंद आहेत ते उभे राहू शकत नाहीत. याचे कारण शेजारी म्हाप्याजवळ 3 हजार रुपये एकर या भावाने जमीन मिळते तर आमच्याकडे 8 हजार रु. भावाने जमीन कोण घेणार ? यामध्ये कोठेतरी समानता असली पाहिजे. कॉमनकोड आणला पाहिजे. ठाण्याला जर समान दर्जा दिला तर एमआयडीसीमधील उद्योग जिवंत राहतील आणि बेकारीची समस्या काही प्रमाणात तरी दूर होईल. म्हणून जमिनींचे रेट कमी करण्यात यावेत. माहिती आणि तंत्रज्ञानाचा विषय आहे. ठाणे उपनगर हे मुंबई जवळ आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळापासून जवळ आहे. ठाण्याला 72 एकराचा मेंटल हॉस्पीटलचा एक प्लॉट आहे. त्याठिकाणी अतिक्रमण होण्याची शक्यता आहे. आय ॲन्ड टी साठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा ठाणे शहरामध्ये उपलब्ध आहे. जा 700 चौ.फूट. विकसित झाले तर एक घर निर्माण होते. येणा-या काळामध्ये 5 कोटी चौ.फूट बांधकाम ठाणे शहरात होणार आहे. म्हणून याठिकाणी आय ॲन्ड टी चा प्रकल्प उभा केला तर महाराष्ट्राच्या प्रगतीला हातभार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड ..

लावल्यासारखे होईल. महाराष्ट्र हे प्रगतीशील राज्य आहे. आजच्या युगात माहिती आणि तंत्रज्ञान या क्षेत्रात हे राज्य हैद्राबाद आणि बंगलोर शहराच्या मागे राहता उपयोगी नाही. But, we are losing out in the fields of Information and Technology when compared to the cities of Hyderabad and Bangalore. For the first time in India, the city of Mumbai has lost out to the cities of Hyderabad and Bangalore. I think, the city of Mumbai has got better infrastructural developmental facilities than the above cities. गेल्या 5 वर्षामध्ये आघाडी सरकारने या क्षेत्रात अभ्यासात्मक गुंतवणूक एवढी केली आहे की हे सरकार त्यासाठी कौतुकास पात्र आहे. कुपोषणाच्या बाबतीत महाराष्ट्राच्या दृष्टीने चांगल्या योजना आणणे महत्वाचे आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागामध्ये आणि आदिवासी पाड्यांमध्ये बालके कुपोषणामुळे मृत्यूमुखी पडत आहेत ही अभिमानास्पष्ट गोष्ट निश्चितपणाने नाही. ज्या योजना आखायच्या असतील त्या आखा जेवढा पैसा आवश्यक असेल तेवढा खर्च करा पण महाराष्ट्रातील आदिवासी भागातील आणि वाडया-वस्त्यांमधील बालके मरता कामा नयेत हा महाराष्ट्राचा अपमान होतो. त्यापासून परावृत्त केले पाहिजे असे मला वाटते.

Shri Diwakar Rawate: Mr. Deputy Chairman, Sir, I would request the hon. Member to support his statement with facts and figures because he is speaking on the Budget.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेन्द्र आव्हाड .....

त्यानंतर मत्स्य व्यवसायाच्या संदर्भात शासनाने चांगली भूमिका घेतलेली आहे.मत्स्यव्यवसायाच्या बाबतीत बोलत असतांना मला असे सांगावेसे वाटते की, बंदराची अवस्था देखील लक्षात घेतली पाहिजे. मुंबईतील बंदराची अवस्था आता बिकट झालेली आहे. मुंबईचे जे मुख्य बंदर आहे, ज्याला इदिरा डॉक असे म्हटले जाते . तसेच उरण येथे बंदर आहे.ही दोन्ही बंदरे कॅपेसिटीच्या बाहेर गेलेली आहेत.त्यामुळे लहान बंदराचा विकास होणे गरजेचे आहे. ठाणे जिल्हयात उलव्याचे बंदर केन्द्र सरकारने 1953 साली जाहीर केले होते.परतु आजपर्यन्त त्या बंदराच्या विकासासाठी काहीही करण्यात आलेले नाही. आता शिपींग इन्डस्ट्रीला वेग मिळत आहे . सन्माननीय सदस्य श्री.रावते यांना शिपींग इन्डस्ट्रीबद्दल जास्त माहिती असेल.परतु आज आंतरराष्ट्रीय स्तरावर शिपींग इन्डस्ट्रीला जो वेग मिळत आहे, तो वेग लक्षात घेता व पुढच्या 30 वर्षाची गती लक्षात घेता महाराष्ट्राने जर पहिले पाऊल टाकले व छोटया बंदरांना जास्त आर्थिक सहाय्य देऊन मान्यता प्राप्त बंदरांना ताकदवान केले तर यातून महाराष्ट्राला सोशो इकोनॉमिक्स बेनिफिटस यातून मिळू शकतील तसेच बेरोजगाराची समस्या त्यातून आपण मिटवू शकू. तेव्हा याकडे शासनाने लक्ष द्यावे अशी मी आग्रहाची मागणी करीत आहे मुंबईचा विकास हा अतिशय महत्वाचा विषय असून आपण वारंवार असे ऐकतो की, इंटरनॅशनल ट्रॅगलमधील हा एक सेन्टर पॉईन्ट आहे आणि जगातील एक हब म्हणून त्याची निर्मिती होणे अशक्य आहे अशातील ही बाब नाही.परंतु मुंबईची वाढती लोकसंख्या हा प्रश्न निश्चित विचार करण्यासारखा आहे.ज्याप्रमाणे आज मुंबईकडे लोकांचे लोंढे मोठया प्रमाणावर येत आहेत, त्या बाबतीत काही तरी एफटर्स करुन, त्याचे डिसेन्ट्रलायझेशन करणे गरजेचे आहे. त्यासाठी शासनाने काही तरी ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे असे मला वाटते.एम.एम.आर.डी.ए.चे जे डेव्हलपमेन्ट प्लॅन्स आहेत, ते डेव्हलपमेन्ट प्लॅन्स हे कॉन्सस्ट्रेड मुंबईसाठी केलेले दिसत आहेत.मुंबई मोठी झाली तर आपले नाव मोठे होईल,असे जर अधिका-यांना वाटत असेल तर ते चुकीचे आहे.एम.एम.आर.डी.ए. याचा अर्थ मुंबई मेट्रोपॉलीटीयन रिजनल डेव्हलपमेन्ट ॲथॉरिटी असा आहे. ठाणे, उल्हासनगर,वसई, विरार,मिरा भाईदर इत्यादी मुंबईचा जो सर्पोटिव्ह एरिया आहे.त्या एरियाची सुध्दा त्याच गतीने प्रगती झाली तरच मुंबई विकासाचा वेग पकडू शकेल, असे माझे मत आहे.

ZZ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईतून जर आपण कोणाला विस्थापित केले तर ती व्यक्ती ठाण्याला जाऊन स्थापित होते.किंवा मिरा भाईदरच्या पट्टयात जाऊन स्थापित होते. सगळया नगरांची एकत्रित विकास योजना आपण जोपर्यन्त सादर करीत नाही,तोपर्यन्त मुबई सुस्थितीत जाईल असे मला वाटत नाही. एक कॉन्सन्स्ट्रेटेड एफर्ट मुंबईसाठी व्हावयाला पाहिजे. मुंबईसाठी ट्रान्स हार्बर लिंक वे आणली तसेच मुंबईसाठी विविधयोजना आणल्या परंतु त्याचा फायदा घेण्यासाठी जी माणसे असतात ती माणसे जर इतरत्र फेकली गेली आणि त्यांच्या अवती भोवताली असलेल्या शहराचा दबाव जर मुंबईवर पडला तर मुंबई पुन्हा एकदा अडचणीत सापडेल. त्यामुळे एम.एम.आर.डी.ए.ची जी मूळ संकल्पना आहे त्या मूळ संकल्पनेवर आधारित असा विकासाचा कार्यक्रम शासनाने आणावा अशी महत्वपूर्ण मागणी मी या निमित्ताने करीत आहे.मेट्रो सिटीच्या डेव्हलपमेन्टसंबंधीची कल्पना केन्द्रीय अर्थमंत्री श्री.चिदंबरम यांनी आपल्या भाषणात मांडली आहे.आपल्या भाषणात त्यांनी मिलियन प्लस सिटीजसाठी या योजना आणल्या असल्याचे सांगितलेले आहे.मिनियन प्लस सिटीज म्हणजे ज्या शहरांची लोकसंख्या दहा लाखा पेक्षा जास्त आहे अशा शहराच्या विकासासाठी त्यांनी काही कार्यक्रम आणलेले आहेत व त्याकरता निधी ठेवलेला आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.नितीन गडकरी यांनी पाच सहा दिवसापूर्वी केलेल्या भाषणात असे म्हटले होते की,"आपण एक एजन्सी नेमावयास हरकत नाही". आपण पॉझिटीव्ह विचाराने काम करणारी जर एजन्सी नेमली तर ठाणे शहर असो, पुणे असो,अमरावती असो ज्या शहराची लोकसंख्या 10 लाखाच्या वर आहे अशी 8 शहरे महाराष्ट्रात आहेत. तेव्हा त्यांच्यासाठी आपण चांगला पैसा आणू शकू. त्या शहरातील रस्ते,धरणे आणि सिव्हरेज इत्यादी प्रकल्प मार्गी लावता येतील आणि शासनाला जनतेसाठी खरोखर काही द्यावयाचे असेल तर शासन या निमित्ताने जनतेला काही देऊ शकेल असे मला वाटते. आपण पोलीस कल्याणाच्या बाबतीत उल्लेख केलेला आहे.त्या संदर्भात मी एक महत्वपूर्ण सूचना करणार आहे.एखादा अधिकारी डयुटीवर असून तो युनिफॉर्म घालून एखाद्या चौकशीसाठी जात असतांना जर एका ट्रकने त्याला उडवले असेल, तर त्याच्या मुलाला अनुकंपा तत्वावर या खात्यात नोकरी मिळवावयाची असेल तर त्यासाठी मोठी प्रतिक्षा यादी आहे.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.जितेन्द्र आव्हाड .....

चार चार वर्षे त्या मुलाला नोकरी मिळत नाही.तेव्हा यामध्ये सुधारणा केली पाहिजे असे मला वाटते. ज्याप्रमाणे गडचिरोली येथे नक्षलवाद्यांच्या हल्यात बलीदान झालेल्या पोलीस अधिका-यांना साडे सात लाख रुपये, साडेबारा लाख रुपये देतो.तसेच त्यांच्या मुलांना नोकरीत सवलती देतो त्याप्रमाणेच याही पोलीस अधिका-यांच्या मुलांना मदत देण्यात यावी. ही मदत देत असतांना त्यांना तेवढी आर्थिक मदत देऊ नका.... If somebody dies on duty or on dress, due to an accident or by heart attack or stress and strain then an immediate relief should be granted to him.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आव्हाड ....

परंतु कमीत कमी ऑन ड्युटी, युनिफॉर्ममध्ये असलेला कोणी पोलीस दलातील कर्मचारी मानसिक वा कामाचा ताण-तणाव, अपघात वा अन्य कोठल्याही कारणास्तव मरण पावला तर त्याच्या वारसांना ताबडतोब रिलिफ मिळाला पाहिजे. त्याच्या कुटुंबियांना तातडीने मदत दिली गेली पाहिजे. अध्यक्ष महाराज, मला वाटते पोलीस हौसिंगचा जो प्रश्न आहे तोही असाच आहे. आज पोलीस हौसिंगच्या प्रचंड मोठ्या जागा मुंबई-ठाणे परिसरामध्ये आहेत परंतु तरीही आमचा पोलीस कर्मचारी मात्र दयनीय अवस्थेमध्येच राहतो आहे. त्याचे घर म्हणजे घर असत नाही. तेथे त्याला म्हणजे त्याच्या मुलांना अभ्यासासाठी जागा मिळाली पाहिजे, त्याच्या घरातील बाईला प्रायव्हसी मिळाली पाहिजे, या सगळ्या गोष्टी त्या घरावर अवलंबून असतात. थोडक्यात घर म्हणून त्याला निवारा मिळाला पाहिजे. जो इसम वा जी व्यक्ती महाराष्ट्रातील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न सोडवित असते, सारी जबाबदारी घेत असते त्याचे स्वत:च्या घरामध्ये किती लक्ष असते ? तो तर सदैव 24 पैकी 18 तास घराबाहेरच असतो. त्यामुळे त्याचे आपल्या स्वत:च्या घराकडे लक्षच नसते. मला वाटते बीओटी वर त्यांच्यासाठीच्या चांगल्या जमिनी ज्या आहेत त्यांना चांगले बाजारमूल्य आहे, त्या बाजारमूल्याचा वापर करून बीओटी तत्त्वावर गृहसंकुले उभी आपण करू शकलो आणि पोलिसांना न्याय देऊ शकलो तर खऱ्या अर्थाने जो पोलीस तुमच्या माझ्या, सर्वसामान्यांच्या रक्षणासाठी जीवाचे रान करतो आहे त्याला न्याय दिल्या सारखे होणार आहे असे मला या ठिकाणी सांगावेसे वाटते. तसेच वाढती लोकसंख्या पाहून आता आपण पोलीस भरती सुरू केलेली आहे, परंतु त्या प्रमाणात पोलीस ठाणी देखील आपण ग्रँट केलेली आहेत, आपण मान्यता दिलेली अशीही काही पोलीस ठाणी आहेत. उदा. ठाण्यामध्ये राबोडी पोलीस ठाणे आहे, संवेदनशील असा तो भाग आहे म्हणजे काही भाग हा आपण संवेदनशील ठिकाणे म्हणून मान्य केलेली आहेत त्या ठिकाणी पोलीस ठाणे, पोलीस चौकी उभी केली गेली पाहिजेत, ती आजची एक गरज आहे. ठाण्यातील श्रीनगर हाही असाच मान्यताप्राप्त भाग आहे, तर अशा ठिकाणी लोकसंख्या प्रचंड प्रमाणात वाढते आहे आणि आपले पोलीस बळ कमी पडते आहे, गुन्ह्यांची संख्याही वाढते आहे त्यामुळे त्याकडे देखील आपण कॉन्सन्ट्रेटेड लक्ष दिले तर मला वाटते हा प्रश्न सोडविण्यात आपल्याला मदतच होईल. अध्यक्ष महाराज, मुंबईच्या आणि ठाण्याच्या प्रश्नांविषयी बोलताना एका प्रश्नाकडे मी आपले लक्ष वेधणार आहे. घोडबंदर ते बोरीवली आणि घोडबंदर ते ऐरोली हा मोठ्ठा

.....3ए 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आव्हाड ....

समुद्र किनारा आहे, घोडबंदर हा तसा मध्यवर्ती भाग पडतो. खाडीकडील मध्यवर्ती भाग असे आपण त्याला म्हणू शकतो. ज्या पध्दतीने आपण नवी मुंबई ते गेटवे ऑफ इंडिया प्रकल्प करीत आहात त्याचप्रमाणे या अतिशय शांत आणि सुंदरशा खाडीमधून आपण ट्रान्स हार्बर लिंक सुरू केली तर... कारण पुढील मुंबईची जी सारी डेव्हलपमेंट आहे ती सारी बोरीवली ते ठाणे हा जवळ जवळ 10 कोटी चौरस फूटाचा पट्टा आहे त्यामध्ये येणार आहे. तेव्हा त्याकडे जर कॉंसन्ट्रेटेड एफर्टसने लक्ष आपण दिले तर ज्याला आपण इंट्रा हार्बर लिंकचा प्रोजेक्ट म्हणतो तो यशस्वीरित्या आपण राबवू शकाल. अध्यक्ष महाराज, या ठिकाणी पर्यटनासंबंधातही बरेच बोलले गेले. पण मला वाटते या पर्यटनाच्या बाबतीत देखील मध्यवर्ती प्रयत्न होणे गरजेचे आहेत. आपल्या इतके सुंदर बॅकवॉटर इतरत्र काठेही उपलब्ध नाही. आपण जर सर्वांग सुंदर कोकण पाहिला तर मी म्हणेन की, कोकणासारखी परिस्थिती केरळमध्ये देखील नाही. पण आपण कॉंसन्ट्रेटेड एफर्टस् केलेले नाहीत. आता आपल्याकडे जवळ जवळ 300 कोटीचा फंड आलेला आहे. तेव्हा आपण कोकणातील काही विशिष्ट ठिकाणांकडे लक्ष दिले तर पर्यटनाच्या दृष्टीने आपण चांगला विकास करू शकू असे मला वाटते. या निमित्ताने खास करून आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, गोरेगाव पासून घोडबंदर पर्यंत येऊरचा जो जवळपास 540 कि.मी.चा पट्टा आहे तो अत्यंत निसर्गरम्य असा भाग आहे, तो कोणी बदनाम केला असेल तर तो भाग वेगळा, तो विषय आपण बाजूला ठेवू. पण आज तरी येऊर सारखे दुसरे पर्यटनस्थळ मुंबईत तरी असूच शकत नाही अशी स्थिती आहे आणि अडीच हजार फूटावर असलेला, निसर्गाने आशीर्वाद दिला आहे असा हा परिसर आहे. तेथील टेंपरेचरचा विचार केला तरी इतर ठिकाणी जर अमुक एक टेंपरेचर असेल तर त्या ठिकाणी चार डिग्रीने कमीच टेंपरेचर असेल. अतिशय सुंदर अशी हिरवळ त्या ठिकाणी आहे शिवाय वन्य प्राणी देखील आहेत. तेव्हा आपण काही तरी प्रयत्न करून हे जे प्रोजेक्टस् आहेत .. शिवाय आंतरराष्ट्रीय विमानतळ यापासून जवळ असलेली ही जागा आहे. त्यामुळे पर्यटनाचे आकर्षण देखील वाढेल, लोक येतील, साधनसामग्रीची उपलब्धता वाढेल आणि खास करून तेथील जो बेरोजगार नवयुवक आहे त्यालाही मोठ्या प्रमाणात काम करण्याची संधी मिळेल. अध्यक्ष महाराज, मी या दोन तीन गोष्टींवर बोलून माझे भाषण संपवितो आहे. अध्यक्ष महाराज, महाराष्ट्रातील वीजेचा जो प्रश्न आहे... मोफत विजेचा प्रश्न आहे. मला वाटते की, महाराष्ट्रातील भल्या-भल्यांना

..... 3ए 3 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आव्हाड ....

ही मोफत वीज नको आहे. सन्माननीय केंद्रीय मंत्री श्री.शरद पवार साहेबांनी देखील सांगितले आहे की, ज्याला खरोखरी गरज आहे, जो अत्यल्प उत्पन्न गटात मोडणारा आहे त्याच्यासाठी ही मोफत वीजेची योजना राबवावी. अन्यथा वीजेचा तुटवडा हा वाढतच जाईल आणि ज्या अंधारामध्ये आम्हाला आज चाचपडावे लागते आहे ... आज 10 वी, 12वी ची परीक्षा आहे आणि नेमकी संध्याकाळीच वीज नाही की ज्या वेळेस मुलांना अभ्यास करावयाचा असतो. हे काही बरोबर नाही. तेव्हा फुकट वीज कोणालाच नको आहे, त्याचे योग्य असे नियोजन झाले तर महाराष्ट्राला न्याय आणि वीज मिळेल असे मला वाटते. ....

(यानंतर श्री.जागडे ...3बी 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड...

सभापती महोदय, कापूस एकाधिकार योजनेमध्ये आम्ही वर्षानुवर्षे तेच ऐकत आहोत. मला याबाबत असे वाटते की, या बाबत लोकशिक्षण देण्याची गरज आहे. पर्यायी व्यवस्था करण्याची गरज आहे. म्हणून या बाबत आपल्याला कठोर निर्णय घ्यावा लागेल. यासाठी आपण कापूस एकाधिकार योजना बंद करावी लागली तरी चालेल. परंतु आपणाला महाराष्ट्राला आर्थिक संकटातून वाचविण्याची गरज आहे.

सभापती महोदय, एमपीएससी कॅडरमधून जी मुले पास होतात, ती मुले डेप्युटी कलेक्टर होतात, डीवायएसपी होतात. परंतु त्यांना आपण नंतर टाईम बाऊंड प्रमोशन काही देत नाही. त्यांना प्रमोशन मिळण्यासाठी म्हणजे आयपीएस आणि आयएएस अधिकारी होण्यासाठी 20-20 वर्षे थांबावे लागते. आता या बाबत तामिळनाडू, आंध्र प्रदेश आणि बिहार राज्याची काय भूमिका आहे, ती आपण समजून घेतली पाहिजे. डेप्युटी कलेक्टर किंवा डीवायएसपी यांना आयपीएस तसेच आयएएस अधिका-याची केडर 7 वर्षाने मिळण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, दिल्लीमध्ये एक लॉबी अशी आहे की, या लोकांना प्रमोशनच मिळवू देत नाही. यामुळे आपल्या महाराष्ट्राचे जे मुळ भूमीपुत्र आहेत, त्यांच्यावर अन्याय होत आहे. त्यांना प्रमोशन मिळत नाही, नवीन पे स्केल मिळत नाही. म्हणून महाराष्ट्र शासनाने या बाबत एक उच्च स्तरीय समिती नेमून या लोकांना टाईम बाऊंड प्रमोशन कसे मिळेल ते पाहिले पाहिजे. डॉ. मनमोहनसिंह यांनी पुण्यामध्ये जे भाषण केले होते, त्यामध्ये असे म्हंटले होते की, मी आर्थिक सुधारणांना जी सुरुवात केली, ती महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्समधील माननीय शरद पवार यांचे भाषण ऐकल्यानंतर. He further stated that Hon'ble Shri Sharadrao Pawarji is his guide for Globalization and Privatization. मला वाटते त्यांचाच आदर्श घेत मा. अर्थमंत्री श्री. जयंत पाटील आणि अर्थराज्यमंत्री श्री. सुनील देशमुख यांनी मांडला आहे. हा अर्थपूर्ण अर्थसंकल्प विकसित महाराष्ट्राला दिशा दाखविणारा आहे. त्यामुळे मी मा. अर्थमंत्र्यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पाला पाठींबा देतो, तसेच माननीय सभापती महोदयांनी मला बोलण्याची जी संधी दिली, त्याबद्दल त्यांचे आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद । जय महाराष्ट्र ।

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, या अर्थसंकल्पावर माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. 265 कोटी 86 लाख रुपये शिलकीचा अर्थसंकल्प मांडून माननीय अर्थमंत्र्यांनी स्वत:चाच सन्मान करुन घेतला आहे. स्वत:ची पाठ थोपटून घेतली आहे, असे मला वाटते. महाकर्जाच्या फे-यात महाराष्ट्र असताना हा अर्थसंकल्प शिलकी कसा ? राजकीय तूट 20 हजार कोटी रुपयाची असताना, महसूली तूट 9 हजार कोटी रुपयाची असताना हा अर्थसंकल्प शिलकी कसा ? करवाढ न केल्याचे दाखविले असताना बेसन, मैदा, रवा, गुळ इं. दैनदिन वापराच्या वस्तुंवर चार टक्के कर लावण्यात आला आहे. कोणतीही करवाढ न करता अर्थसंकल्प शिलकी कसा, याचे कोडे सर्वसामान्य नागरिकांना पउलेले आहे. 1 लाख 10 हजार कोटी रुपयाचे कर्ज राज्यावर असताना हा अर्थसंकल्प शिलकी कसा ? आता 1 लाख 10 हजार रुपयांचे कर्ज आपण कशा प्रकारे फेडणार आहांत ? याचा या अर्थसंकल्पात कोठेही उल्लेख नाही. आता हा अर्थसंकल्प कशा प्रकारचा आहे, हे काळच ठरविणार आहे. सवंग लोकप्रिय घोषणामुळे तिजोरीवर पडणारा ताण, यामुळे विकास कामातील खर्च जवळ जवळ 70 टक्के आणि कामावरील खर्च 47.1 टक्क्यांनी घसरला आहे. अंदाजपत्रकाबाहेरील कर्ज उभारणी आणि सरकारने हमी देण्याचे बंद केले तरच राज्याची आर्थिक घडी व्यवस्थित बसू शकेल, असे मला वाटते. गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात 40 हजार कोटी रुपयाचे महसूल दाखविण्यात आले होते. त्यातील 75 टक्के रक्कम व्याज, कर्मचा-यांचे पगार आणि भत्ते, निवृत्ती वेतनावर खर्च होत होती. याचाच अर्थ 40 हजार कोटी रुपयांपैकी आपण 30 हजार कोटी प्रशासकीय कारणासाठी खर्च केला आहे.

(यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट....

आणि 10 हजार कोटी रुपये फक्त विकासाच्या कामासाठी उरले. यामध्ये आपला वर्षभरात विकास होऊ शकतो काय? हा खरा प्रश्न आहे. एकीकडे हा अर्थसंकल्प शिलकीत असतांना देखील हिरव्या पुस्तकातील पान क्र. 8 वर "प्रधान शीर्षक 2075, संकीर्ण सर्वसाधारण सेवा" मध्ये अर्थसंकल्पामध्ये केलेली तरतूद 3157.22 कोटी, सुधारलेला अंदाज 869.99 कोटी म्हटले आहे. म्हणजे यामध्ये तफावत, घट 2287.23 कोटींची आहे. या ठिकाणी शेरा मारतांना आपण म्हटले आहे की, "लॉटरीची नवीन पध्दत वर्षभरात राबविता न आल्यामुळे तसेच राज्य वित्त आयोगाच्या शिफारशीची अंमलबजावणी करण्यासाठी करण्यात आलेल्या तरतुदीचा वापर न केल्यामुळे" याचा अर्थ मला समजला नाही. कृपया आपण आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये सांगितले तर बरे होईल.

सभापती महोदय, रोजगार हमी योजनेच्या संदर्भात माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामधील परिच्छेद क्र. 32 वर "शासनाने, रोजगार हमी योजने अंतर्गत चालू वित्तीय वर्षात डिसेंबर 2004 पर्यंत एकूण 1071 कोटी रुपये खर्च केले असून 11 अवर्षणग्रस्त जिल्हयांतील मजुरांना 5.66 लाख मेट्रीक टन गहू वितरीत केला आहे" असे म्हटले आहे. आणि आपल्या भाषणातील पान क्र. 56 वरील परिच्छेद क्र. 106.1 मध्ये "राज्यातील टंचाईसदृष्य परिस्थिती असलेल्या जिल्हयात रोजगार हमी योजनेची आवश्यकतेनुसार कामे सुरु राहण्यास्तव काही निकष शिथिल करण्यात आले आहेत. सन 2004-05 मध्ये या योजनेंतर्गत 68,109 कामे दिनांक 31 डिसेंबर 2004 अखेर पूर्ण झाली आहेत व एकूण रुपये 1,218 कोटी खर्च झाले असून त्याव्दारे 20 कोटी मनुष्य दिवस रोजगार निर्मिती झाली आहे." असे म्हटले आहे. सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये 1071 कोटी रुपये खर्च केल्याचे म्हटले आहे, आणि आपण मांडलेल्या अर्थसंकल्पामध्ये 1218 कोटी रुपये खर्च झाले असे म्हटले आहे. म्हणजे यामध्ये 147 कोटींची तफावत आहे. माझी आपणास विनंती आहे की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील संख्या बरोबर आहे की, आपल्या भाषणातील संख्या अचूक आहे याबाबतच खुलासा होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये जवळ जवळ 30 वर्षे रोजगार हमी योजना सुरु आहे. हिंदुस्थानामध्ये एक आदर्श अशी योजना गणली गेली आहे. त्या योजनेच्या बाबतीत या ठिकाणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट....

एक परिसंवाद देखील आयोजित करण्यात आला होता. परंतु या योजनेचे निकष आता बदलणे आवश्यक आहेत. जवळ जवळ 30 वर्षाच्या कारकिर्दीमध्ये योजना राबवितांना त्यामध्ये अनेक अडचणी आल्या. या बाबतीत आपण फायनान्शिअल ऑडीट करीत असतो, परंतु याचे परफॉर्मन्स ऑडीट आपण केले नाही. ते केले तर रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून जी कामे केली आहेत त्यांचे निकष तपासतांना ती कामे किती निकृष्ट दर्जाची होती हे कळून येईल. म्हणून "मागेल त्याला काम, कामाप्रमाणे दाम" हे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले ते लवकरात अंमलात येऊ शकते कां? याचा विचार करण्याची गरज आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, शालेय शिक्षणाच्या बाबतीत "आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहीकडे" असे जर या अर्थसंकल्पाच्या बाबतीत म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरणार नाही. दहावी आणि बारावीच्या माध्यमातून जी असंख्य कॉपी प्रकरणे आपल्यासमोर आली आहेत त्यावर आपण दृष्टीक्षेप टाकला तर असंख्य प्रकरणांमध्ये शिक्षक स्वत: विद्यार्थ्यांना कॉपी करयास मदत करीत असल्याचे दिसून येईल. शाळेतील शिक्षक आजचा विद्यार्थी उद्याचा नागरीक घडवितो, त्याच्यावर संस्कार करतो, भारतीय संस्कृती जतन करतो. अशा परिस्थितीत शिक्षकांकडून जर वर्तणूक होत असेल तर दहावी आणि बारावीच्या परीक्षेत होत असलेल्या कॉपी प्रकरणांना आपण आळा कसा घालणार? शिक्षण विभागाच्या सचिवांनी या बाबतीत मध्यंतरी असा इशारा दिला होता की, जर कोणत्याही शिक्षकाने कॉपी करण्यास विद्यार्थ्यांना मदत केली तर त्याला बेडया ठोका, सामूहिक कॉपी झाल्यास त्याचे केंद्र बदला, आणि त्या शिक्षण संस्थेचे अनुदान रोका. मंत्रिमहोदयांना विचारु इच्छितो की, आतापर्यंत आपण किती शिक्षकांना बेडया ठोकल्या?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट . . . .

किती शाळांचे अनुदान बंद केले ? त्याचबरोबर सामुहिक कॉपी केल्यामुळे केंद्र किती बदलली ? अक्कलकोटमध्ये तर प्रश्नपत्रिका झेरॉक्ससारखी तेथे चालत गेली. मोर्शीमध्येही पेपर फुटले. जळकोट येथे कॉपी करुन दिली नाही म्हणून तेथील पालकांनी परीक्षा केंद्रावर हल्ला केला. पंढरपूर मध्ये जो शिक्षक त्याठिकाणी संस्कार केले असे म्हणतो, त्या शिक्षण अधिका-याला तेथे भरारी पथकाच्या माध्यमातून आपण पाठविले होते. या भरारी पथकाने तेथे जाऊन खरोखर निश्चित पणे कशाप्रकारे कॉपी होत आहे याची पाहणी करावयाची होती. परंतु ते महाशय त्याठिकाणी तळीरामच्या अवस्थेमध्ये गेले होते, मद्यपी होते आणि त्या मद्यपीच्या अवस्थेमध्ये त्यांनी तेथील केंद्राला कशा प्रकारे भेट दिली आणि काय पाहणी केली ? हा संशोधनाचा विषय आहे असे मला वाटते. तेव्हा या संबंधितांना खरोखर अटक केली का ? त्यांच्यावर कारवाई केली का ? हाही येथे महत्वाचा प्रश्न आहे. ज्याला आपण लातूर पॅटर्न, लातूर पॅटर्न असे म्हणतो, पण त्याठिकाणी तर पालकांच्या संगनमताने कॉपी झाली. तेव्हा तेथे शालेय शिक्षणाच्या माध्यमातून अशाच प्रकारे परीक्षांमध्ये कॉपी होणार असेल, तर या महाराष्ट्रातील आजचा विद्यार्थी उद्याचा श्रेष्ठ नागरीक बघू शकू का ? हा याठिकाणी सर्वात महत्वाचा प्रश्न आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, घरदुरुस्ती मंडळ हे या मुंबई शहराला दिलेला एक वारसा आहे असे मी समजतो. परंतु माझ्यासमोर एक प्रकरण आलेले आहे की,"म्हाडाच्या दुटप्पी धोरणाने वृध्द भाडेकरु रस्त्यावर". त्या भाडेकरुचे नाव "पोयस पोनायो फर्नाण्डीस," वय वर्षे 76, राहणार बॅटरी स्ट्रीट कुलाबा येथील गार्डन हाऊसमध्ये. 1973 मध्ये ही इमारत पाडली. घरदुरुस्ती मंडळाने आज त्याठिकाणी पुनर्रचित इमारतीमध्ये त्याला जागा देण्यास नकार दिला म्हणून तो कोर्टामध्ये गेला. कोर्टाने सांगितले की, म्हाडाने या माणसाला न्याय द्यावा. म्हाडाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे ज्यावेळेला इमारत पाडली जाते, तेव्हा तेथील लोकांना आपण संक्रमण शिबिरामध्ये जागा देतो. परंतु आजतागायत या फर्नाण्डीसनां अजूनपर्यंत जागा दिलेली नाही. पण फर्नाण्डीस ज्या पुनर्रचित इमारतीमध्ये राहत होते, त्याठिकाणी दुसरा एक घूसखोर शिरला आणि हा फर्नाण्डीस मात्र अजूनही तेथे जागेच्या प्रतिक्षेत आहे. याही पुढे जाऊन कोणतीही शहानिशा न करता, म्हाडाच्या अधिका-यांनी संक्रमण शिबिरातील जागाही त्याला खाली करण्याची नोटीस दिली. अशा प्रकारचे म्हाडाचे हे प्रकरण आहे. म्हाडाचे दुसरे एक प्रकरण म्हणजे "म्हाडाच्या पवई येथील 11 फ्लॅटची

. . . .3 डी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट . . . .

घाऊक विक्री हाय कोर्टाकडून रद्द" सर्वसामान्य नागरीकांना आपण न्याय देणार आहोत की नाही असा माझा प्रश्न आहे. याठिकाणी घरदुरुस्ती मंडळाच्या माध्यमातून म्हाडाने या फ्लॅटसाठी "विक्री" या नावाने जाहीरात देऊन बोली मागितल्या होत्या. ही बोली मागितल्यानंतर ज्यांना त्याठिकाणी सोसायटी देणे आवश्यक होते, त्यांना न देता, बोलीमध्ये ज्यांनी भाग घेतला नव्हता, तेथे म्हाडाने अधिका-यांच्या संगनमताने 17 कोटी रुपये खर्च करुन दुस-यांना तेथील जवळजवळ 25 फ्लॅटस् दिले. कोर्टाने याबाबतीत न्यायनिवाडा देऊन, त्याने सांगितले की, कोणत्याही परिस्थितीत म्हाडाने तेथे बोली केलेल्यांना फ्लॅटस् द्यावेत.

सभापती महोदय, पोलीस दलाचे अधुनिकीकरण. पोलीस कल्याण सुविधा. याबाबतीत हिवाळी अधिवेशनामध्ये मी एक औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता आणि त्यावेळेला माननीय गृहमंत्र्यांनी आश्वासन दिले होते की, चार अधिका-यांना निश्चितपणे प्रमोशन दिले जाईल. दिनांक 25-8-2003 रोजी झवेरी बाजार आणि गेटवे ऑफ इंडिया येथे बॉम्बस्फोट झाले. या घटनेच्या बाबतीत आपल्याकडे कोणताही धागा हातामध्ये नसताना, आपल्याकडे कुठलाही साक्षीदार नसताना देखील दोन पोलीस अधिकारी आणि दोन कॉन्स्टेबल या चार पोलीस कर्मचा-यांनी आठ दिवसामध्ये गुन्हयाचा छडा लावून आरोपींना पकडले. त्यावेळेला माननीय श्री.छगन भुजबळ हे उपमुख्यमंत्री होते. त्यांनी प्रेस कॉन्फरन्स् घेऊन सांगितले की, कोणत्याही परिस्थितीत या चार अधिका-यांना बढती देण्याचा शासनाने विचार केलेला आहे. नंतर माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटीलसाहेबं यांनीही हिवाळी अधिवेशनामध्ये सांगितले होते की, चार अधिका-यांना निश्चितपणे बढती देऊ. पण आजतागायत या सभागृहात आश्वासन देऊन देखील तीन वर्षापूर्वी झालेल्या बॉम्बस्फोटामध्ये या चार अधिका-यांनी आपला जीव धोक्यात घालून तपास केला. पण अजूनही त्यांना बढती दिलेली नाही. याचे कारण लाल फितीच्या कारभारामध्ये उत्तेजनार्थ मिळणारी बढती अडकलेली आहे. मुंबईच्या विकासाच्या माध्यमातून जवळजवळ 33 हजार कोटी रुपयाची योजना असताना देखील आपल्याकडे आतापर्यंत फक्त 1 हजार कोटी रुपये आलेले आहेत. एक हजार कोटी रुपये आम्ही देऊ असा निश्चित संकल्प केलेला आहे. पण हे एक हजार कोटी रुपये आपण कोणत्या योजनेसाठी घेणार आहात ?

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट (पुढे चालू...

पण हे 1 हजार कोटी रुपये कोणत्या योजनेसाठी आपण घेणार आहात ? एक हजार कोटी देत असतांनाच मुंबई शहरामध्ये वाढत्या झोपडपट्टीच्या माध्यमातून आपण खरोखर 2 हजार सालापर्यन्त झोपड्या रेग्युलराईज करणार असाल तर 1 हजार कोटीच्या माध्यमातून न्याय मिळेल असे वाटत नाही. मला डॉ.झकेरिया यांचे कौतुक करावेसे वाटते. डॉ. झकेरिया झोपडयांच्याबाबतीमध्ये बोलले होते. मुंबई शांघाय, सुंदर, शिस्त बनवायचे पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे स्वप्न असून, मार्गरेट अल्वा या काँग्रेस श्रेष्ठींकडे झोपडपट्टीच्या प्रश्नावरून दिशाभूल करीत आहेत, पंतप्रधानांच्या स्वप्नाची थट्टा करीत असल्याची प्रखर टिका काँग्रेसचे नेते, विचारवंत डॉ.रफीक झकेरिया यांनी केली. डॉ.रफिक झकेरिया यांना मुंबईतील झोपडपट्टीची जाण आहे, ती जाण आपल्याकडे आहे की, नाही असा प्रश्न पडतो. ज्या तडफेने मा.मुख्यमंत्री आणि मा.उप मुख्यमंत्र्यांनी या मुंबई शहरातील जवळजवळ 70 ते 80 हजार झोपड्या बुलडोझर लावून पाडल्या होत्या. परंतु एक दिवस माशी शिंकली आणि संपूर्ण बुलडोझर फिरविण्याबाबत महानगरपालिकेला दिलेले आदेश थांबविण्यात आले. याबाबतचाही खुलासा करणे आवश्यक आहे, असे मला वाटते. म्हणून मला एक चारोळी आठवते.

'आले बारामतीच्या मना,
बारामतीच्या मर्जीने झोपडपट्टीवरील कारवाई गेली टळून.
आबांची बोलती बंद होऊन बसली तोंडात वेलची गिळून.'

सभापती महोदय, या मुंबई शहराचा विकास करावयाचा असेल तर त्या विकासाच्या आराखड्यामध्ये शाळेसाठी, महाविद्यालयांसाठी, उद्यानांसाठी, मैदानांसाठी आरक्षित भूखंड ठेवणे आवश्यक असते. परंतु गेल्या दोन वर्षाच्या कारकिर्दीमध्ये प्रशासनाने कलम 37 (1), डी.सी.रुल 58, 37 (3) या माध्यमातून मुंबई महानगरपालिका स्वायत्त संस्था असतांना देखील त्यांना विश्वासात न घेता संपूर्ण भूखंडाचे आरक्षण बदलण्याचे काम आपल्याकडून होत आहे. अशाप्रकारे भुखंडांचे आरक्षण बदलणार असाल तर या मुंबईचा विकास कसा होणार, हा खरा प्रश्न आहे. माझ्याकडे घाटकोपर, पार्ले, गोरेगाव, बोरिवली येथील मूळ आरक्षण, सरकारी कार्यालये, खाजगी प्राथमिक संस्था यासाठीचे होते, तसेच गोरेगाव येथील खेळाचे मैदानासाठी आरक्षण, बोरिवली येथील ना विकास क्षेत्र, बोरिवलीमधील पुन्हा एक खाजगी मैदान आणि उद्यान यासाठी आरक्षित भूखंड ठेवण्यात आले होते, या सगळया आरक्षण क्षेत्राचे निवासी क्षेत्रामध्ये रुपांतर करणार असाल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/ MAP/ SBT/

श्री.विलास अवचट (पुढे चालू.....

तर या मुंबईचा विकास कसा होणार ? नुकतेच गेल्या महिन्यामध्ये मुलुंड येथे संभाजी महाराज उद्यानामध्ये माजी आमदार शिशिर शिंदे यांनी जॉगिंग पार्क तयार केलेला होता. त्या ठिकाणी मुख्यमंत्र्यांनी सीएनजी सेंटर उभारण्याची घोषणा करुन टाकली. त्या ठिकाणी म्हाडाचे भूखंड आहेत, जिल्हाधिकाऱ्यांचे भूखंड आहेत. त्या ठिकाणी सबंध उद्याने विकासासाठी ठेवलेली असतांना अशाप्रकारे तुम्ही त्या ठिकाणचे आरक्षण बदलणार असाल तर खरोखरच मुंबईचा विकास होणार आहे काय, हा खरा प्रश्न आहे. पुनर्रचित इमारतीच्याबाबतीत त्यावेळच्या मा.मुख्यमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे साहेबांनी 18 ऑगस्ट 2004 रोजी बैठक घेतली होती. मुंबईतील जुन्या चाळीच्या पुनर्रचित झालेल्या इमारतींना मालमत्ता करामध्ये सूट देण्याचा मंत्रिमंडळाच्या निर्णयाची मागणी केलेली होती. ज्याला आपण कलम 37 (7) च्या अंतर्गत म्हटले होते की, एस.आर.ए. स्कीममध्ये ज्याप्रमाणे मालमत्तेमध्ये सूट दिली होती, त्याच धर्तीवर पुनर्रचित इमारतींच्याबाबतीमध्ये असे म्हटले होते की, 'जुन्या चाळर पनर्रचित झाल्यावर रहिवाशांसाठी मालमत्ता करामध्ये पहिली 10 वर्षे 20 टक्के, नंतर पाच वर्षे 50 टक्के आणि पुढील पाच वर्षासाठी 80 टक्के अशाप्रकारे मालमत्ता कर घेण्यास सुचविले होते. परंतु आजतागायत आपल्या सरकारने मा.माजी मुख्यमंत्री सुशिलकुमार शिंदे यांनी दिलेले आश्वासन मुंबईकरांसाठी आपण पाळलेले नाही, या अधिवेशनामध्ये तरी त्याची अंमलबजावणी करणार आहात काय, असा माझा आपल्याला प्रश्न आहे.

सभापती महोदय, डबघाईला आलेली महामंडळे ही किती दिवस चालणार आहेत ? आपण खरोखरच अर्थसंकल्प शिलकीचा आहे असे म्हणत असाल, तर या 53 महामंडळापैकी जवळजवळ 19 महामंडळे डबघाईला आलेली आहेत. 19 महामंडळांना दिनांक 31-3-2003 पर्यन्त सुमारे रुपये 1,965 कोटी रुपयाचा तोटा झालेला आहे. तर याच सर्व महामंडळांनाला 3-3-205 पर्यन्त 4,000 कोटी रुपयाचा तोटा झालेला आहे. असा एकूण 5,965 कोटी रुपयाचा तोटा झालेला असतानाही आपला अर्थसंकल्प शिलकी आहे असे कसे कोणत्या आधारावर म्हणता ? तसेच वस्त्रोद्योग महामंडळाचा तोटा 615 कोटीचा आहे.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

यानंतर कु.थोरात.....

श्री. विलास अवचट...

माविम 455 कोटी, मेल्ट्रॉन 108 कोटी, एस.टी.748 कोटी,पुणे शेती महामंडळ 54 कोटी, ऊस लागवड 54 कोटी, महाराष्ट्र पॉवर लुम 64 कोटी आणि महाराष्ट्र स्टेट हॅण्डलूम 79 कोटी ही जवळ जवळ कोटयावधीची तूट असतांना देखील, अशा प्रकारे महामंडळे तोटयात चालणार असतील, आणि हे जर पांढरे हत्ती आपण पोसणार असाल तर निश्चित आपण या ठिकाणी जे म्हणता की, खरोखर आम्ही याठिकाणी अर्थ संकल्प शिलकी दाखवितो, याचे मला आश्चर्य वाटते. या अर्थसंकल्पामध्ये माननीय अर्थमंत्र्यांनी पान क्रमांक 47 वर डॉ. कोटनीस यांच्या स्मारकासंबंधी काही निधी राखून ठेवलेला आहे. त्याचे मी स्वागत करतो. परंतु माझ्याकडे डॉ. द्वारकानाथ शांताराम कोटनीस मेमोरीअल ट्रस्ट, वेंगुर्ला यांचे पत्र आलेले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनाही त्यांनी पत्र दिलेले आहे. गदिमांच्या बाबतीत जसा वाद झाला की, त्यांची येथे जन्मभूमी आहे आणि तेथे कर्मभूमी आहे.तसा मा. डॉ. कोटनीसांच्या बाबतीतसुध्दा वाद झालेला आहे. संबंध कोटनिसांच्या कुटुंबियांचे म्हणणे असे आहे की, डॉ. कोटनीस हे खरे वेंगुर्ल्याचे. त्यांचे वडील ज्यावेळी सोलापूरला गेले त्यावेळी त्यांचा जन्म झाला. पण खरी त्यांची कर्मभूमी कुठली असेल तर ती वेंगुर्ला आहे. त्यामुळे ज्याप्रमाणे आपण त्यांचे सोलापूरला स्मारक करीत आहात तशा प्रकारचे स्मारक वेंगुर्ल्यालाही करावे, अशी त्यांची मागणी आहे. शेवटी निर्णय काय घ्यायचा ते शासनाने ठरवावे. डॉ. कोटनीसांच्या कुटुंबियांनी याबाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांना देखील पत्र लिहिले आहे.सभापती महोदय, अर्थसंकल्पाच्या बाबतीत माझे मनोगत व्यक्त करीत असतांना मुंबईच्या विकासाच्या बाबतीत बोलले पाहिजे. कारण शेवटी आम्ही या मुंबई महानगरपालिकेमध्ये नगरसेवक म्हणून काम केलेले आहे. श्री. रावते साहेबांनी देखील या मुंबई महानगरपालिकेमध्ये काम केलेले आहे.म्हणून शेवटी 450 कोटी रुपये थकबाकी असलेल्या या महानगरपालिकेचे आपण काही तरी देणे लागतो. आज आपला अर्थसंकल्प जरी शिलकी असला तरी मुंबई महानगरपालिका 450 कोटी रुपयात पाण्याचा प्रकल्प करु शकते, सिमेंट कॉंन्क्रीटचा प्रकल्प करु शकते, पावसाळयात पाण्याच्या गटाराचा प्रकल्प करु शकते, मलनि:सारण वाहिनीचा प्रकल्प करु शकते. तसेच के.ई.एम.हॉस्पिटल,. नायर हॉस्पिटल, आणि सायन हॉस्पिटल सारखे हॉस्पिटल महानगरपालिका चालवू शकत नाही. म्हणून त्यांच्या 450 कोटी रुपयाच्या थकबाकीपैकी या अर्थसंकल्पाच्या आधी आपण त्यांना किमान 200 ते 250 कोटी रुपये द्याल कां? एवढी एक अपेक्षा मी या निमित्ताने

व्यक्त करतो. आणि आपली रजा घेतो. -x- यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजीया खान (नामनियुक्त) : सभापती महोदय, सम्माननीय वित्त मंत्री जी ने वर्ष 2005-2006 का जो बजेट सदन में रखा है, उसका स्वागत एवं समर्थन करने के लिए मैं खड़ी हुई हूँ. यह समर्थन सत्ताधारी पक्ष के एक सदस्या का सरकार के प्रति समर्पण नहीं, बल्कि कठोर आत्मपरीक्षण है. क्योंकि जब तक हमें अपनी मर्यादाओं का अहसास नहीं होता तब तक हम सपनों की दुनिया से जमीन पर नहीं आ सकते है. वित्त मंत्री जी ने सदन में जो बजेट रखा है, वह सपनों का पिटारा नहीं बल्कि कठोर वास्तव और उँची महत्वाकांक्षा का सुंदर समन्वय है. ऐसे सुंदर दस्तावेज को किसी की नज़र ना लगे इसलिए कुछ सुझाव मैं अपनी ओर से सदन के सामने रखनी चाहती हूं. जिसकी अहमियत केवल A mole on cheek जैसी है, गाल पर जिस तरह से काला तिल होता है.

सभापति महोदय, अपने राज्य की खस्ता हालत को देखते हुए 2005-2006 का बजेट बनाना जितना कठिन है उतना ही कौशल्य का काम था. जिस राज्य पर 1 लाख 10 हजार 211 करोड़ रुपयों का कर्जा हो, राज्य की आय में 2.7 प्रतिशत राजस्व घाटा हो, 5.6 प्रतिशत फिस्कल घाटा हो, राज्य का अल्प और अल्प डिक्रीसिंग राजस्व हो और दूसरी ओर बढ़ता खर्च, उसमें भी बढ़ता अनुत्पादक खर्च हो, इसके साथ ही सामान्य आदमी की दृष्टि से औद्योगिक रोजगार के अवसर कम होने की चिंता हो, इतना ही नहीं बिजली की कमी ओर भारी लोडशेडींग और गले की हड्डी बनी कपास एकाधिकार योजना हो, इन सारी समस्याओं का मुकाबला करते हुए वित्त मंत्री को बजेट बनाना था और इसके लिए जरुरी होता हे बजेटरी स्किल. इस बॅकग्राउण्ड से इस बजेट को देखा जाए तो वित्त मंत्री जी ने अपना पूरा स्किल अप्लाइ करते हुए बजेट को न सिर्फ प्रेक्टिकल बल्कि प्रेक्टिकेबल बना कर राज्य की अर्थव्यवस्था को पटरी पर लाने का प्रामाणिक प्रयत्न किया है, ऐसा मैं मानती हूं. उनके इस प्रयत्न के लिए मैं उनका अभिनंदन करती हूं.

सभापति महोदय, सामान्य जनता के कल्याण के दृष्टिकोण से सब से पहले बजेट का विचार होना चाहिए. इस दृष्टि से देखा जाए तो पिछले पांच बजेट से यह बजेट निश्चित रुप से अच्छा है. इसका सबसे बड़ा प्रमाण यह है कि इस बजेट में प्रत्यक्ष रुप से कोई भी कर वृध्दि जनता पर नहीं थोपी गई. इसके चलते बजट में की गई कर वृध्दि के कारण वस्तुओं के भाव बढ़ गए, यह हमेशा की कटुता का अनुभव इस बार नहीं करना पड़ा. इस बजेट की दूसरी विशेषता

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजीया खान ....

जो मुझे भायी है, वह यह है कि जेंडर बजेटिंग पर वित्त मंत्री जी ने स्ट्रेस (जोर) दिया है. महिला और बच्चों को ध्यान में रखते हुए उनके लिए सुविधाओं की तरतूद करना ही जेंडर बजेटिंग कहलाता है. इस दृष्टि से देखा जाए तो हम निश्चित रुप से संतुष्ट हो सकते हैं. इसके अलावा वित्त मंत्री जी ने फाइनॅशियल डिसिप्लिन की जो बात कही है और उसके लिए विधेयक लाने की मंशा जताई है, वह भी एक उल्लेखनीय कदम है, ऐसा मैं समझती हूं.

सभापती महोदय, यह बजेट बनाते समय वित्त मंत्री जी ने जो स्किल अप्लाइ किया है, वह निश्चित रुप से अभिनंदनीय जरुर है, जिसके द्वारा बजेट को एक मिकॅनिकल रुप दे दिया गया है. लेकिन उसको ह्यूमन् फेस शायद पूरी तरह दे पाए है या नहीं यह जरुर सोचने की बात है कयोंकि ह्यूमन् फेस का मतलब होता है कि कमजोर वर्ग को सामाजिक न्याय देना और इसमें वह भाषा बोली गई है या नहीं, यह सोचने की बात है.पिछड़े वर्गो के विकास के लिए जो अलग अलग महामंडल है, उनके लिए 83.50 करोड़ रुपये प्रस्तावित किए गए हैं, जो पिछले साल की तुलना में लगभग 13 करोड़ रुपये कम है ओर सबसे ताज्जुब की बात यह है कि इस बजेट में मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडल का सादे नाम का भी उल्लेख नहीं है. यह अल्पसंख्यक समाज के साथ खिलवाड़ है, ऐसा मुझे लगता है.

इसके बाद श्री शर्मा....

अशुधारित प्रत / प्रशुद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान . . .

इस महामंडल को सक्षम, सक्रिय और उपयोगी बनाने के लिए इसमें कम्पीटेंट लोग लाए जाएं और पर्याप्त निधि की तरतूद की जाए, यह मेरी सरकार से आग्रही मांग है. अन्यथा जो अल्पसंख्यक समाज आज निराशा की ओर बढ़ रहा है, उसकी निराशा बढ़ती ही जाएगी. इसलिए मैं शासन से अनुरोध करती हूँ कि इस महामंडल के लिए अधिक निधि का प्रावधान करें.

सभापति महोदय, जहां तक स्वंय रोजगार का सवाल है, मैं समझती हूँ कि स्वंय रोजगार ही आज हमारे राज्य का और हमारे देश का हल है. अगर हम एज्यूकेशनल सिस्टम को रोजगार से जोड़ते हैं तो मैं यह कहना चाहती हूँ कि हमारा एज्यूकेशनल सिस्टम लाइव स्किल के हिसाब से उपुयक्त नहीं है. इसलिए 10 वीं और 12 वीं कक्षा तक के हमारे सारे विद्यार्थियों को लाइव स्किल के अनुसार तैयार करना जरुरी है. मैं आपको उदाहरण के तौर पर बताना चाहती हूँ कि जहां तक गणित का सिलेबस है तो उसमें ट्रिगनोमेट्री और ज्योमेट्री हमारी रोजमर्रा की जिंदगी में काम में आने वाली नहीं है. इस तरह के सिलेबस की बजाय स्वंय रोजगार पर हमारा फोकस होना चाहिए. व्यावसायिक शिक्षण जरुर हमारे पास है, लेकिन हमें युवकों को एन्टरप्राइज डिवलपमेंट स्किल बनाने की जरुरत है. 12 वीं कक्षा तक एक कट ऑफ पॉइन्ट होना चाहिए. जो व्यावसायिक शिक्षण दिया जाए, उसमें प्रोडक्शन किस तरह से कर सकते हैं, मार्केटिंग मेनेजमेंट किस तरह से कर सकते हैं, कम्पटीशन एन्टरप्राइजज इत्यादि बातों के बारे में जानकारी होनी चाहिए. इस तरह का सिलेबस बच्चों के लिए होना चाहिए. इस प्रकार से हमारे समाज की सारी समस्याओं का हल हो सकता है, ऐसा मैं समझती हूँ.

सभापति महोदय, बीपीएल के लोगों की मदद करने के लिए जीवनदायी आरोग्य योजना सरकार ने लागू की है. इस बारे में विरोधी पक्ष नेता श्री. गडकरी जी ने जी और मा. सदस्य श्री. जितेन्द्र आव्हाड ने अपने विचार रखे हैं. इस योजना के लिए बजट में सिर्फ 7 करोड़ रुपए का प्रावधान किया गया है. जिस राज्य की लोकसंख्या 2001 की जनगणना के अनुसार 9.69 करोड़ और 1 मार्च 2005 को प्रक्षेपित 10.27 करोड़ है, उस राज्य में प्रति व्यक्ति के हिस्से में कितना पैसा आ सकता है, इसके केलकुलेशन में मैं नहीं जाना चाहती. अगर अपने राज्य की तुलना देश के साथ की जाए तो अपने राज्य की मृत्यु दर कम है.

...3H-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान . . . .

हमारे राज्य में 2002 में मृत्यु दर 7.3 और बाल मृत्यु दर 45 थी, जबकि देश में मृत्यु दर 8.1 और बाल मृत्यु दर 63 थी. इस योजना के लिए जो आर्थिक प्रावधान किया गया है, वह नहीं के बराबर है. इसलिए राज्य की मृत्यु दर को कम करने के लिए लोकसंख्या के हिसाब से अधिक प्रावधान करने की जरुरत है.

सभापति महोदय, मा. मंत्री महोदय ने वसतिगृह की बात की है, लेकिन ऊस कामगारों के बच्चों के लिए "साखर शाला" की जरुरत को नजरअंदाज किया गया है. इस प्रश्न की गंभीरता को देखते हुए "साखर शाला" के लिए जरुरी प्रावधान किये जाने चाहिए.

सभापति महोदय, मैं एस.सी. और एस.टी. के बच्चों के लिए स्कॉलरशिप में वृद्धि का स्वागत करती हूँ, लेकिन शासन का ध्यान इस ओर आकर्षित करना चाहती हूँ प्राईवेट मेडीकल कॉलेजों में जो सरकारी सीट्स होती हैं, उसके लिए तत्कालीन मुख्य मंत्री ने वायदा किया था कि ई.बी.सी. के बच्चों के लिए फीस भरने के लिए मदद करेंगे, लेकिन आज तक वह मदद उनके पास नहीं पहुंच पायी है. यह मेरी मांग नहीं है, बल्कि मा. मुख्य मंत्री ने आश्वासन दिया था और इस आश्वासन के बाद जिन बच्चों ने एडमीशन ले लिया है, आज उनको परेशान किया जा रहा है. उन बच्चों को बँक से लोन तक नहीं मिला है. इसलिए इन बच्चों की फौरन मदद करने की जरुरत है.

सभापति महोदय, महाराष्ट्र सरकार ने अगले 10 साल के लिए वन संरक्षण का आड़ा-खाड़ा बनाया है और उसके लिए 84.21 करोड़ रुपए का प्रावधान किया है. वास्तव में फॉरेस्ट हम सब लोगों का ऑक्सीजन है और पर्यावरण का संतुलन भी इसी पर आधारित है.

. . . भाषण जारी, नंतर तालेवार.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजीया खान .....

अनिवार्य बना जलसंवर्धन भी वन विभाग सही तौर पर कर सकता है. क्योंकि वन विभाग की जितनी जमीन है,उस पर जलसंधारण के काम अच्छी तरह से हो सकते है. क्योंकि इस जल संवर्धन की यह कन्सेप्ट है कि उसका रिज् टू बॉटम (ऊपर से नीचे) विकास होना चाहिए. उसमें पूरी तरह वह जमीन होती है लेकिन यह देखा गया है कि वन विभाग में जलसंधारण के काम नहीं के बराबर होते हैं. कृषि विभाग में जलसंधारण के काम ज्यादा होते हें क्योंकि कृषि जमीन स्लेट होती है.इसलिए मैं यह चाहती हूं कि वन विभाग के लिए फ्रेश इकॉनॉमिकली आउटले बनाकर उसे सक्षम किया जाए ताकि हमारी जिंदगी के लिए, हमारी इकॉलॉजिकल बेलेंस के लिए यह कारगर साबित हो सके

सभापति महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभाग के संबंध में मुझे एक बात कहनी है. मैने पूरक मांगों पर बोलते समय इस विषय में यह बताया था कि बी.पी.एल के व्यक्तियों के लिए और अन्य दूसरे समाज के लिए राशन की दुकान पर रियायत की दर से जो वस्तुएं दी जाती है, वे पूरी तरह से उन तक नहीं पहंचती है और दूसरे लोग ही उसे ले जाते हैं, वहां के माल की ब्लेक मार्केटिंग होती है. शासन को इससे करोड़ों रुपयों का नुकसान हो रहा हे. पूरक मांगों पर बोलते समय मैंने इस संबंध में यह सुझाव दिया था कि हर राशन की दुकान पर एक स्मार्ट कार्ड होल्डर रखा जाए और राशन कार्ड धारक को भी एक स्मार्ट कार्ड दिया जाए. जब कोई स्मार्ट कार्ड धारक राशन की दुकान पर कोई वस्तु लेना जाएगा तो स्मार्ट कार्ड होल्डर में वह दर्ज हो जाएगा. इसका रिकार्ड पूरी तरह से राशन दुकानदार को मेन्टेन करना होगा. इस प्रकार की व्यवस्था से शासन की निगरानी रहेगी और भ्रष्टाचार से बचा जा सकता है. इसलिए मैं यह चाहती हूं कि कम से कम प्रायोगिक तौर पर बीओटी बेसिस पर यह काम किसी कम्पनी को दिया जाए. अगर यह व्यवस्था कामयाब होगी तो शासन के करोड़ो रुपये बच सकते हैं.

सभापति महोदय, मैं एक और छोटा सा सुझाव देना चाहती हूं कि जिस तरह से मुसलिम समाज के लिए रमजान ईद है और हिन्दुओं के लिए दीवाली और होली त्योहार है, उसी तरह से दलित समाज के लिए 14 एप्रिल का दिन होता है और दलित समाज के लोग इस दिन को त्योहार की भावना से ही मनाते है. इसलिए जिस तरह से रमजान के अवसर पर, दीवाली के अवसर पर बोनस दिया जाता है, उसी तरह से 14 एप्रिल के अवसर पर समय पर वेतन दिया

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जाए, ऐसा मेरा सुझाव है. क्योंकि यह देखा जाता हे कि 31 मार्च का बहाना बनाकर वेतन देरी से दिया जाता है. बौध्द समाज के लोग 14 एप्रिल अच्छी तरह से मना सके इसलिए उनको समय पर वेतन मिल सके, इसका ख्याल रखना चाहिए, ऐसा मैं समझ्ती हूं.

सभापति माहदेय, मैं एक और मुद्दा यहां रखना चाहती हूं. यह अकृषि धारा के बारे में है और एन.ए. टैक्स के बारे में है. इसके बारे में भेदभावपूर्ण व्यवहार होता है, ऐसा मैं समझ ाती हूं. शासन के नियम के अनुसार जो एन.ए. टैक्स का असेसमेंट होता है, वह प्लाट की कीमत के आधार पर होता है. लेकिन देखा गया है कि, उदाहरण के तौर पर औरंगाबाद में जमीन की कीमत बहुत हाई है इसलिए नेचरली एन. ए. असेसमेंट भी हाई होनी चाहिए. लेकिन देखा गया है कि जहां जमीन की कीमत ज्यादा हे वहां का असेसमेंट कम हो रहा है और जहां जमीन की कीमत कम है वहां ज्यादा असेसमेंट हो रहा है. दूसरी बात यह है कि इसमें जो पेनाल्टी लगाई गई है, वह वन टू फॉर्टी टाईम है तो कहीं पर माफ कर दिया गया है. कलेक्टेरेट में यह देखा गया है कि टैक्सपेअर से कन्सल्ट करके कभी भी यह टैक्स असेसमेंट नहीं किया जाता है. इसलिए मैं यह कहना चाहती हूं यह भेदभाव दूर किया जाए. क्योंकि इस अकृषि धारा से व्यापारी वर्ग में बहुत नाराजी है. इसलिए इसके बारे में शासन विचार करें. इतना कहते हुए मैं एक बार फिर से इस बजट का समर्थन करते हुए अपना भाषण समाप्त करती हूं. जय हिन्द, जय महाराष्ट्र.

.....

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, 2005-2006च्या अर्थसंकल्पावर माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे. हा अर्थसंकल्प जेंडर-रिस्पॉन्सिव्ह अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पाचा बारकाईने अभ्यास केला तर महिला घटकांसाठी हे शून्य बजेट आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही.

श्री. हर्षवर्धन देशमुख : महिला व बालविकासासाठी बजेट शून्य आहे असे मा.सदस्यांनी सांगितले. ते खाते माझ्याकडे आहे म्हणून मी सांगू इच्छितो की, बजेटमध्ये तरतूद केलेली आहे.

श्रीमती कांता नलावडे : महिला घटकांसाठी बजेटमध्ये तरतूद केलेली असली तरी ती शून्यवत आहे असे मला सांगावयाचे आहे. प्रत्यक्षात पाहिले तर महिलांसाठी काहीही तरतूद दिसून येत नाही. जीवनदायी योजना, बालमृत्यूचे प्रमाण कमी होणे, गभवर्ती स्त्रियांना मातृत्व अनुदान देणे, अशा प्रकारच्या चांगल्या योजना केलेल्या आहेत. परंतु या योजना प्रामाणिकपणे राबविल्या जात नाहीत. दाई प्रशिक्षण यामध्ये यावयास पाहिजे. त्याच प्रमाणे केन्द्र सरकारची वंदे मातरम् अशी योजना होती. ती योजना काय होती ?

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे...

तर या गरोदर आदिवासी महिलांची प्रत्येक महिन्याच्या 9 तारखेला शासकीय रुग्णालय असेल किंवा खाजगी रुग्णालय असेल त्या ठिकाणी मुक्त चिकित्सा झाली पाहिजे. प्रत्येक महिलेच्या लक्षात रहावे म्हणून प्रत्येक महिन्याची 9 तारीख ही निवडलेली होती. केंद्र शासनाची ही अतिशय चांगली योजना होती. ही योजना राज्य शासनाने राबविण्यास काहीच हरकत नाही असे मला वाटते.4600 आदिवासी महिलांसाठी बचत गटाच्या योजनेसाठी शासनाने तरतूद केलेली आहे.महिला बचत गट हे महिलांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी चांगले आहेत. परंतु यांना स्वयंरोजगारासाठी त्यांना स्वत:च्या पायावर उभे करावयाचे असेल तर तालुकावाईज प्रशिक्षण केंद्रे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून सर्व बचत गटांना दिले गेले पाहिजे. व्यवसायाभिमूख प्रशिक्षण महिला बचत गटांना दिले गेले पाहिजे अशी माझी सूचना आहे. अंगणवाडी सेविकांचे वेतन वेळेवर शासनाने दिले पाहिजे. वस्ती शाळांच्या बाबतीत मी पुरवणी मागण्यांच्या वेळी बोललेले आहे. या ठिकाणी 8398 वस्ती शाळा सुरु आहेत.1086 विद्यार्थी शिकत आहेत. परंतु त्यांची अवस्था काय आहे, कोंडवाडयासारखी तेथील विद्यार्थ्यांची अवस्था होऊ नये, तसेच वस्ती शाळेत शिकणा-या विद्यार्थ्याला प्रामाणिकपणे अनुदान मिळाले पाहिजे या बाबींकडे शासनाने गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. भारतातातील पहिल्या डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिनांक 26 फेब्रुवारी हा दिवस "आरोग्य दिन" म्हणून साजरा करण्यात येणार आहे.हा स्तुत्य उपक्रम आहे. या संदर्भात मी काही सूचना करु इच्छिते. या आरोग्य दिनाच्या दिवशी मागासवर्गीय किंवा आदिवासीच महिला नव्हेत तर इतर सर्व स्तरातील महिलांची चिकित्सा शिबिरे आयोजित केली गेली पाहिजेत. सरकारी रुग्णालये असतील, नगपालिकेचे रुग्णालये असतील त्या ठिकाणी ही शिबिरे आयोजित केली गेली पाहिजेत. मागासवर्गीय, आदिवासी,दारिद्रयरेषेखालील महिला चिकित्सा करण्यासाठी कधीच जात नाहीत. श्रीमंत महिला वा मध्यम वर्गीय महिला देखील चिकित्सा करण्यास जात नाहीत. दर वर्षी 26 फेब्रुवारी सर्व शासकीय रुग्णालयांत महिलांसाठी मोफत चिकित्सा शिबीरे आयोजित करण्यात यावीत अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, शिक्षणाच्या संदर्भात मला काही गोष्टी शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाच्या आहेत.2005-2006 वर्षाच्या अर्थसंकल्पात सर्वसाधारण शिक्षणासाठी शासनाने 9706 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. परंतु प्रत्यक्षात 2004-2005 वर्षासाठी सुधारीत तरतूद 9764

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे..

कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, हिरव्या पुस्तकातील पृष्ठ क्रमांक 41 वर नमूद केलेले आहे की, पुढील वर्षासाठी 58 कोटी रुपयांची तरतूद कमी आहे. माननीय अर्थमंत्र्यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये अनुदान न मिळणा-या 850 माध्यमिक शाळांना नव्याने अनुदान देण्यात येणार आहे असे घोषीत केलेले आहे. त्यासाठी 140.94 कोटी रुपयांची तरतूद केल्याचे म्हटले आहे. नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ञ श्री. अमर्त्य सेन यांनी विचार मांडताना असे मत व्यक्त केले होते की. शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य या बाबीवर शासनाने लक्ष केंद्रीत करावे.महाराष्ट्र राज्यात शासनाची शिक्षण विषयक निती काय आहे हे स्पष्ट होत नाही. सरकारवर आर्थिक संकट आल्यावर सर्वात जास्त फटका बसत असेल तर तो शिक्षण क्षेत्राला बसत असतो.गेली पाच वर्षे ज्या खाजगी अनुदानीत शाळा आहेत त्या शाळांना वेतनेतर अनुदान देण्यात आलेले नाही. त्यामुळे अशा अनुदानीत शाळांना अत्यंत आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.शिक्षणावरील एकूण खर्च लक्षात घेता वेतनेतर अनुदानाचा खर्च फक्त 1 ते 2 टक्के आहे. चालू वर्षात खाजगी,प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या वेतनेतर अनुदानासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात 243 कोटी रुपयांची तरतूद होती.वर्तमानपत्रांना शिक्षण सचिवांनी दिलेल्या माहिती प्रमाणे वर्षाच्या अखेरीस फक्त 105 कोटी रुपयांचेच वेतनेतर अनुदान देऊन उर्वरित रक्कमेची बचत करण्यात आलेली आहे. आता वेतनेतर अनुदान मिळावे म्हणून शैक्षणिक संस्थांनी वेळोवेळी आवाज उठविला होता. आंदोलने सुध्दा केली होती. परंतु आपण पाहिले की, गेल्या वर्षी शालांत परीक्षेवर बहिष्कार टाकण्याची सुध्दा धमकी संस्था चालकांनी दिली होती.

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्रीमती कांता नलावडे ...

परंतु शासनाच्या आश्वासनानंतर शिक्षण संस्थांनी आपला बहिष्कार मागे घेतला होता. चालू वर्षात वेतनेतर अनुदानासाठी केलेली संपूर्ण तरतूद शाळांना वितरीत कमेली असती तर संस्थांना किती तरी मदत झाली असती. प्रत्यक्षात 50 टक्क्यांपेक्षा कमी रक्कम शाळांना देऊन आर्थिक अडचणीत असलेल्या सरकारने शाळा व संस्थांना अडचणीत आणले आहे. यावरुन हेच सिध्द होते की सरकारचे अग्रक्रम वेगळे आहेत व शिक्षण या अग्रक्रमात शेवटी आहे.

महाराष्ट्रात शिक्षण विषय जेवढा घोळ आहे तेवढा इतर कोणत्या विषयात नसेल. विनाअनुदान शाळा,विळा अनुदान महाविद्यालये त्यांनी आकारावयाची फी व्यावसायिक शिक्षण देणारी महाविद्यालये संस्था याबाबतीत धोरणाचा संपूर्ण अभाव आहे. कोणत्या व्यवसायाचे शिक्षण द्यावयाचे उद्योग व्यवसायाकडून त्याची मागणी किती हया गोष्टींचा विचार न करताच महाविद्यालये व्यावसायिक संस्था कुत्र्याच्या छत्रीप्रमाणे उगवत आहेत. महाराष्ट्र शासनाने प्राथमिक,माध्यमिक,महा.ज्ञालयीन व्यवसायिक शिक्षणासंबंधी श्वेतपत्रिका काढून एकदा आपले धोरण तसेच अनुदान विषयक धोरण जाहीर केले पाहिजे. शिक्षणाला शासनाचा अग्रक्रम असेल तरच आर्थिक,व्यावसायिक क्षेत्रात महाराष्ट्र टिकेल हे सरकारने लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

मुंबईच्या विकासासाठी 1000 कोटींची तरतूद केली प्रत्यक्षात शासन किती देणार हा प्रश्न आहे. 2 वर्षापूर्वी 100 कोटी तरतूद केली पण प्रत्यक्षात एकही पैसा दिला नाही. मुंबईचा विकास जगाच्या नकाशावरील प्रादेशिक आर्थिक केंद्र म्हणून व्हावा. मुंबई शांघायप्रमाणे विकसित व्हावे. मुंबईच्या विकासात महाराष्ट्राचा विकास पयार्याने देशचा विकास अंतर्भूत आहे हे सर्वांनाच मान्य आहे. परंतु चालूअसलेले परिवहन प्रकल्प व पायाभूत सोई प्रकल्प सोडल्यास मुंबईच्या विकासासाठी राज्य शासन काय करु इच्छिते त्यासाठी कोणती अर्थसंकल्पीय तरतूद केली आहे यासंबंधी मा. अर्थमंत्र्यांच्या निवेदनात उल्लेख नाही. झोपडपट्टयांचा पुनर्विकास,उच्चाटन यासंबंधी अवाक्षरही नाही. विकास नियंत्रण नियमावली मध्ये सुधारणा,टीडीआर,बांधकाम चटईक्षेत्र नियमन या सर्वांचा मुंबईच्या विकासाशी संबंध आहे. टीडीआर ही संकल्पना येऊन 10-15 वर्षे झाली. टीडीआर च्या योजनेचे मूल्यमापन व मुंबईच्या विकासावर त्याचे झालेले परिणाम यासंबंधी कुठेही चर्चा होताना दिसत नाही. जमिनीच्या क्षेत्रफळामध्ये काही वर्षापूर्वी झालेली हेराफेरी याविषयी

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे ...

आठवणी ताज्या असताना टीडीआर च्या योजनेचे स्पेशल ऑडीट होणेही आवश्यक आहे. 30-40 फुटी रस्त्यावर 10-15 मजली इमारती होताना दिसतात. रस्त्याची रुंदी,पाण्याच्या जोडण्या,गटारांची सांडपाणी वाहून नेण्याची क्षमता या सर्वांचा विचार होताना दिसत नाही. अग्निशमन दलाची शिडी जेथे पोहोचू शकत नाही त्यापेक्षा जास्त उंचीचे टॉवर्स बांधले जात आहेत. नवीन होऊ घातलेल्या इमारतींना पाण्याचा पुरवठा होऊ शकणार नाही असे मुंबई महानगरपालिका म्हणत आहे. मुंबईचा विकास करताना या सर्व बाबींचा विचार होणे आवश्यक आहे. मुंबईच्या विकासात राज्य शासनाचे नेमके दायित्व काय आहे हा यक्ष प्रश्न आहे. मुंबई ही सोन्याची अंडे देणारी कोंबडी आहे पण तीच मारुन सर्व अंडी एकाच वेळी मिळविण्याचा खेळ शासन खेळत आहे. मुंबईच्या विकासासाठी आर्थिक मदत सोडाच परंतु प्राथमिक शाळांचे अनुदान ,माध्यमिक शाळांचे अनुदान,मालमत्ता कर,जलकर,शासनाच्या जमिनीवरील झोपडयांवरील सेवा आकार इत्यादी पोटी दि. 31.10.2004 पर्यंत शासनाने मुंबई महानगरपालिकेला 578 कोटी रुपये देणे आहेत. वर्षानुवर्षे हे देणे वाढत असून हे देणे दिले तरी मुंबई महानगरपालिकेच्या विकास कामांना चालना मिळेल . मुंबई महापालिकेच्या आयुक्तांनी नियोजन केले त्यावेळी अर्थसंकल्पीय निवेदनातून त्यांनी हे मांडले आहे.

(**सभापतीस्थानी तालिका सभापती प्रा. फौजीया खान**)

यानंतर श्री. गायकवाड

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नोंदी

श्रीमती कांता नलावडे .....

खरे म्हणजे याबाबतीत जर सविस्तर सांगण्यात आले असते तर बरे झाले असते . महाराष्ट्रात 9 टक्के उद्योगाची वाढ कोठे झालेली आहे ? परंतु जर या उद्योगांना वीज मिळणार नसेल तर हे उद्योग कसे वाढतील.? पुणे ही एक उद्योग नगरी आहे परंतु पुण्यामध्ये सुध्दा रोज तीन तास भारनियमन केले जाते.अशा वेळी मोठमोठे उद्योजक जनरेटर्सचा वापर करतात परंतु लहान उद्योजक जनरेटर्स ठेवू शकत नाहीत त्यामुळे उद्योगधंदे कसे वाढतील.? आपण ठाणे, बेलापूर पट्टयात ओ.पी.झेड जाहीर केले होते परंतु त्याचे पुढे काय झाले याची मला कल्पना नाही.महाराष्ट्रातून आतापर्यन्त किती तरी उद्योग बाहेरच्या राज्यात गेलेले आहेत.त्यामुळे किती कामगारांवर बेकारीची कु-हाड कोसळलेली आहे ? त्यामुळे किती कामगारांना व्ही.आर.एस. घ्यावी लागली आहे.?मुंबईतील महिन्द्रा ॲन्ड महिन्द्रा कंपनी उत्तरांचलमध्ये गेलेली आहे.उत्तरांचल मध्ये70टक्के ट्रॅक्टर्सचे काम होत आहे.त्याचबरोबर गोदरेज, क्रॉम्पटन या सारख्या ज्या मोठ मोठया कंपन्या आहेत त्यासुध्दा आपल्या राज्यातून बाहेर चालल्या आहेत.कदाचित उत्तरांचलमध्ये झिरो परसेन्ट एक्साईज डयूटी असेल,किंवा त्या ठिकाणी सेल्स टॅक्स कमी असेल तसेच इनकम टॅक्स कमी असेल .....

डॉ.सुनील देशमुख : इनकम टॅक्स हा केन्द्र सरकारशी संबंधित आहे. त्याचा राज्याशी काय संबंध येतो.?

श्रीमती कांता नलावडे :सभापती महोदया, आपल्या राज्यातील अनेक उद्योग बाहेर का चालले आहेत हे मला सांगावयाचे आहे. त्या राज्यात काय परिस्थिती आहे हे मी आपणास सांगत आहे.व्हॅटमुळे महाराष्ट्रात काय परिस्थिती निर्माण होणार आहे? शेतक-यांना चार ते बारा टक्कयापर्यन्त हा कर भरावा लागणार आहे.त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट यांनी उल्लेख केला होता की डॉ. कोटणीस यांचे स्मारक सोलापूरला उभारले जाणार आहे.त्या अनुषंगाने मला असे सांगावयाचे आहे की, माडगुळकराचे सुध्दा स्मारक उभे केले जाणार आहे त्याचा आराखडा तयार करण्यात आला आहे.मागच्या अर्थसंकल्पामध्ये सुध्दा काही स्मारके उभी केली जाणार असल्याचे शासनाने घोषित केले होते. बा.सी.मर्ढेकरांचे स्मारक उभे करण्याच्या बाबतीत मी दोन तीन वेळा या सभागृहात बोलले होते.ज्या गावात त्यांचे स्मारक उभे करावयाचे आहे त्यासाठी अजूनही आराखडा तयार करण्यात आला नाही. त्यासाठी समिती नेमण्यात आलेली

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे .....

नाही. ज्या ठिकाणी मर्ढेकराचे घर होते ते घर पाडून तेथे त्यांचे स्मारक उभे करावयाचे होते परतु एक वर्षे होऊनसुध्दा त्यांचे स्मारक उभे करण्यात आलेले नाही. त्या ठिकाणी आता उकिरडा तयार झाला आहे.परंतु अजूनही मर्ढेकरांचे स्मारक बांधण्याच्या बाबतीत शासनाने पाऊल उचलले नाही.तेव्हा जे कोणी थोर समाजसेवक किंवा राज्यकर्ते असतील त्यांचे स्मारक उभारण्यात येईल असे अर्थसंकल्पात घोषित करण्यात येते परंतु त्यासाठी कोणत्याही हालचाली होत असतांना दिसत नाही.ज्या वेगवेगळया समित्या नेमलेल्या जातात त्याबाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, महाराष्ट्राचा जो अर्थसंकल्प आहे तो समित्यांचाच अर्थसंकल्प आहे की काय असे मला म्हणावेसे वाटते.जेवढा गाजावाजा केलेला आहे तेवढे मात्र प्रत्यक्षात दिसून येत नाही. या वर्षीचे बजेट हे शिलकी आहे असे सांगण्यात आले आहे परंतु हे बजेट शिलकी कसे आहे हे मोठे गोडबंगाल आहे आणि त्याची उकल सरकारकडेच आहे असे मला वाटते. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सांवत (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदया, सन्माननीय वित्त राज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख यांनी या ठिकाणी अतिशय कुशाग्र बुध्दीने हा अर्थसंकल्प मांडला आहे परंतु हा अर्थसंकल्प मांडत असतांना त्यांची प्रचंड दमछाक होत असतांना मला दिसली. अर्थसंकल्प मांडत असतांना ते सारखे पाणी पीत होते.कदाचित ते या अर्थसंकल्पाव्दारे गरीब, आदिवासी आणि ज्याला आपण डाऊनट्रोडन ऑफ द सोसायटी म्हणतो त्या सोसायटीला ते पाणी पाजणार आहेत किंवा नाही हा माझ्या पुढे प्रश्न आहे..कदाचित लोकांच्या तोंडाला ते पानेच पुसतील असे या अर्थ संकल्पावरुन वाटते. सभापती महोदया, मी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या बजेटपासून माझ्या बोलण्यास सुरुवात करीत आहे.वैद्यकीय शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य यासाठी 2004-2005 मध्ये किती तरतूद केली होती हे आपण पाहू या. त्या वर्षी .....

नंतर श्री.सुंबरे

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ...

1883.27 कोटीचा अर्थसंकल्प सादर केला गेला होता त्यामध्ये अपेक्षित अंदाज चुकल्यामुळे जी वाढ झाली होती ती 115 ने वाढ केली होती. या वाढीतील 50 टक्के भाग हा महागाई भत्ता देण्यासाठीच वापरला गेला. मात्र असे सांगण्यात आले होते की, हॉस्पिटल्सची वेगवेगळी उपकरणे आपण घेणार आहोत त्यासाठी ही तरतूद करणे आवश्यक आहे. पण प्रत्यक्षात मात्र ही रक्कम दुसऱ्याच कामांसाठी खर्च केली गेलेली आहे. अध्यक्ष महाराज, मग या वर्षीची परिस्थिती काय आहे? गेल्या वर्षी 1798.97 चे बजेट होते तर या वर्षी 1945.64 इतका अपेक्षित अंदाज 2005-06 या वर्षासाठीचा आहे. यामध्ये 146.66 ची वाढ आहे. ही अतिशय मर्यादित अशी वाढ आहे. अध्यक्ष महाराज, मघापासून या ठिकाणी जी भाषणे झाली त्यातून सारखे सांगण्यात येत आहे की, हा अर्थसंकल्प किती चांगला आहे, किती लोकांच्या आरोग्यासाठी तरतूद केलेली आहे कुपोषित बालके, गरोदर महिलांसाठी... अध्यक्ष महोदया, आपण देखील काही अपेक्षा याकरिता व्यक्त केल्या आहेत. परंतु यामध्येसुद्धा महागाई भत्त्याची रक्कम ही लपलेली आहेच. गेल्या वर्षी 115 वाढ होती ती या वर्षी 146 झाली आहे इतकेच. पण त्यामध्ये राज्यातील हॉस्पिटल्ससाठी अत्यावश्यक असलेली उपकरणे आणणे, औषधांसाठीचा खर्च करणे यासाठीची रक्कम शोधणे कठीण आहे, नव्हे तो एक संशोधनाचाच विषय होईल. अध्यक्ष महाराज, आपली लोकसंख्या पाहिली तर साडेदहा कोटी आहे आणि त्यातील जवळ जवळ 57 टक्के लोक ग्रामीण भागात राहत आहेत. या ग्रामीण भागातील लोक हॉस्पिटल्समध्ये किती जातात ? तर 2.8 टक्के लोक ग्रामीण भागातील हॉस्पिटल्समध्ये दाखल होतात आणि शहरी भागामध्ये हे प्रमाण आहे 3.2 टक्के. अध्यक्ष महाराज, ग्रामीण भागातील साडेचौदा टक्के लोक मोफत सुविधा उपभोगतात आणि शहरी भागामध्ये हे प्रमाण आहे 11 टक्के. आपण वर्षाच्या 365 दिवसांचा आढावा घेतला तर 6916 प्रति रूग्ण असा ग्रामीण भागामध्ये खर्च केला जातो आणि शहरी भागामध्ये हा खर्च 9,656 इतका आहे. ग्रामीण भागातील या मागील कारणे वेगळी आहेत. परंतु ग्रामीण भागामध्ये एकूणच फार कमी प्रमाणात पैसा रूग्णावर खर्च केला जातो आहे. कारण यामध्ये ग्रामीण भागातील लोक स्वत:च्या वाहतुकीने, स्वतबरोबर एक माणूस घेऊन हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होत असतो, त्याच्या आतमध्ये हा खर्च दडलेला आहे, प्रत्यक्षात औषधावर होणारा खर्च शासनाकडून केला जात नाही. ग्रामीण भागामध्ये

.....3एम 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सावंत ....

प्रत्यक्ष ट्रीटमेंटसाठी येणारा 46 टक्के आहे तर शहरी भागामध्ये 57 टक्के आहे आणि खाजगी डॉक्टर्सकडे जाणाऱ्यांचे प्रमाण हे ग्रामीण भागामध्ये 28 टक्के तर शहरी वा नागरी भागामध्ये 58 टक्के आहे. म्हणजे इतके लोक खाजगी डॉक्टर्सकडून उपचार घेत असतात. याचीही अनेक कारणे आहेत. ग्रामीण भागामध्ये सर्व्हे घेतला तेव्हा 9 टक्के लोकांनी हॉस्पिटलमध्ये दाखल होण्यापूर्वी उपचारच घेतलेले नव्हते. कारण एक तर त्यांना सुविधा उपलब्ध नव्हत्या. तर 33 टक्के लोक आर्थिक अडचणीमुळे उपचार घेऊ शकले नव्हते. अध्यक्ष महाराज, हा गेल्या वर्षीचा अहवाल आहे. आता आपण काय तरतूद करीत आहोत तर 146 कोटी. ही तरतूद किती अत्यल्प आहे हे मला या ठिकाणी आपल्याला या साऱ्या आकडेवारीतून दाखवावयाचे आहे. प्रदीर्घ प्रतिक्षेमुळे, तसेच सोयी नसल्यामुळे 11.6 टक्के लोक ट्रीटमेंट घेऊ शकत नाहीत. .....

(यानंतर श्री. जागडे .... 3एन 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....

4.1 टक्के ग्रामीण रुग्णांना वैद्यकिय सेवा उपलब्ध नाही. हे जर भीषण चित्र पाहिले तर आपल्याला अतिशय वाईट वाटते. आज महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात अनेक लोक ट्रीटमेंट घेऊ शकत नाहीत. ग्रामीण जनता वैद्यकिय सेवेपासून वंचीत राहिलेली आहेत. त्यासाठी आपण या अर्थसंकल्पात कोणत्याही प्रकारची तरतूद केलेली नाही. फक्त मलमपट्टी करण्याचे काम अर्थमंत्र्यांनी केलेले आहे. सभापती महोदय, नॉन प्लॅन योजनेअंतर्गत काहीच करण्यात आलेले नाही. 110242 पासून या वर्षी आपण 12 लाखावर गेलो आहोत. या दृष्टीने आता ग्रामीण लोकसंख्या किती वाढली आहे, हेही पाहिले पाहिजे. म्हणून हे जे प्रमाण आहे ते संपूर्णपणे व्यस्त आहे. आरोग्य खात्यासाठी जे बजेट गेल्या वर्षी होते, त्याचा विचार करता दीड ते पावणेदोन टक्क्यवर येऊन हे बजेट सीमीत राहिलेले आहे. घराघरापर्यन्त आरोग्य अशी घोषणा करणा-या या सरकारने हा फुसका बार सोडला आहे.

सभापती महोदय, या सभागृहात अनेक वेळा राज्यातील कुपोषणाचा विषय चर्चेला आला आहे. राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य मिशन या प्रकारची योजना फार मोठ्या प्रमाणात ढोल आणि ताशे वाजवून या शासनाने सुरु केली. अभय बंग यांचा अहवाल आता आमच्या तोंडावर फेकला आहे. या सभागृहात त्या बाबत चर्चा होऊनही हा अहवाल आता केराच्या टोपलीत पडला आहे. सभापती महोदय, हे शासन किती समित्या स्थापन करणार आहे ? मघाशी माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी सांगितल्याप्रमाणे हा अर्थसंकल्प समित्या नेमण्याचा अर्थसंकल्प आहे. लोकांचे माईन्ड डायव्हर्ड करावयाचा आणि तो विषय थांबवावयाचा. आरोग्य विभाग हा आदिवासी विकास विभाग, सार्वजनिक बांधकाम खाते, ग्रामविकास विभाग, पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभाग इ. सर्व विभागांवर कुपोषणाचे पाप मारीत आहे. सभापती महोदय, पूर्वीही कुपोषण होत होते. परंतु त्यावेळची नव संजीवनी योजना आणि आताची नव संजीवनी योजना यामध्ये जमीन अस्मानाचा फरक आहे.

सभापती महोदय, एकात्मिक आहार योजना आहे. मी नागपूरच्या अधिवेशनात प्रोटोव्हीटा लाडूचा एक नमुना मा. आरोग्य मंत्र्यांना दिला होता. खिचडीची डाळ आणि तांदळाचा नमुनाही दिला होता तसेच तेलाचाही नमुना दिला होता. परंतु त्या बाबत आजपर्यन्त आरोग्य विभागाकडून कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात आली आहे, हे मला समजले नाही. पुरवठादारांने जो पुरवठा केला होता, तो निकृष्ठ प्रतिचा होता. परंतु त्या पुरवठादारावर कोणत्याही प्रकारची कारवाई केली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत.....

नाही. त्या पुरवठादाराला पाठीशी घातले गेले. त्या पुरवठादाराला ब्लॅकलिस्टही करण्यात आले नाही.

सभापती महोदय, आज नंदूरबारमध्ये काय स्थिती आहे ? 2004-05 मध्ये 25128 मुले जन्माला आली. त्यातील 10 टक्के बालके कुपोषीत आहेत. आता या बाबतचा शासकीय आकडा 1121 असा आहे. या बाबत नंतर न्यायालयाने शासनाला चपराक मारली आणि सांगितले की, पुन्हा एकदा गावोगाव आणि घरोघर जा. त्यानंतर शासनाचे आरोग्य कर्मचारी कामाला लागले. अंगणवाडी सेविका कामाला लागल्या, ग्रामसेवक कामाला लागले. त्यानंतर अजून 1250 आणखी कुपोषीत बालके असल्याचे दिसून आली. सभापती महोदय, आज या नंदूरबार जिल्ह्यातील प्रशासन संपूर्णपणे सुस्त आहे. आज तेथील लोक मोठ्या प्रमाणात गुजरातमध्ये स्थलांतरीत होत आहेत. तीच परिस्थिती अक्कलकुवा आणि धडगावमध्ये आहे. या सभागृहात आदिवासी मंत्र्यांनी असे सांगितले आहे की, " आम्ही पाड्यापाड्यापर्यन्त रस्ते बनविले आहेत. 80 टक्के गावापर्यन्त रस्त्यांची सोय करण्यात आली आहे. " मी त्यांना असा प्रश्न केला की, जमाना या पाड्यावर रस्ता गेला आहे की नाही ? परंतु त्याचे उत्तर मला आजपर्यन्त मिळालेले नाही.

(यानंतर श्री. सरफरे.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

सभापती महोदय, या सदनामध्ये ज्या ज्यावेळी आम्ही प्रश्न उपस्थित करतो त्यावेळी अहवाल देतो म्हणून सांगितले जाते परंतु शेवटपर्यंत मंत्रिमहोदय अहवाल देत नाही. त्या दिवशी मी प्रश्न उपस्थित केला होता की, जागतिक बँकेच्या माध्यमातून आपण ज्या योजना घेतो त्यांची माहिती द्या. त्यावेळी माननीय राज्यमंत्री व माननीय कॅबिनेट मंत्री दोघांनी माहिती देतो म्हणून सांगितले.परंतु आजपर्यंत या सदनामध्ये कोठल्याही प्रकारची माहिती आम्हाला मिळत नाही. माहितीचा अधिकार फक्त कागदावरच आहे, सदस्यांना माहिती मिळत नाही तर सामान्य नागरिकांना काय मिळणार? मंत्रिमहोदयांनी आमची दिशाभूल केली आहे, 80 टक्के गावामध्ये रस्ते आहेत असे सांगितले. वास्तविक आज पाडे रस्त्यांपासून वंचित आहेत. आपल्याकडे जर माहिती नसेल तर सभापती महोदयांमार्फत ती माहिती मी आपणाकडे देतो. नंदूरबार विभागात 1534 पाडयातील 317 मिनी अंगणवाडया आणि 1973 अंगणवाडयांपैकी 40 टक्के अंगणवाडयांमध्ये अंगणवाडी सेविका आहेत. असे असेल तर कुपोषणाचा प्रश्न कसा सुटणार ? आज ट्रेन दायां नऊ ठिकाणी नाहीत. कशासाठी आपण ही फसवा फसवी करीत आहात. त्यापेक्षा हा कुपोषणाचा प्रश्न आम्हाला सुटणार नाही असे आपण सांगा. नंदूरबार जिल्हयात फक्त एकच आरोग्य पथक आहे. कुपोषित भागामध्ये डॉक्टरची, आरोग्य पथकाची किती आवश्यकता आहे? एक आरोग्य पथक सद्या अस्तित्वात आहे. धडगावमध्ये 14 डॉक्टर आहेत, अक्कलकुवा तालुक्यात 11 मानसेवी डॉक्टर शासनाने नेमले आहेत. या डॉक्टर्सना नेमणुकीची पत्रे दिल्यानंतरही त्यांनी दुसऱ्या दिवशी आम्ही जॉईंट होत नाही म्हणून सीक सर्टिफिकेट पाठविले. आज फक्त चार डॉक्टर आहेत. शासन फक्त या डॉक्टरांवर बोट दाखविणार, स्वत: काही करणार नाही. ज्यावेळी डॉक्टर्सना संवेदनशील भागात पाठविले जाते त्यावेळी ती पनिशमेंट पोस्टींग समजली जाते. एकदा त्या ठिकाणी गेल्यानंतर पुन्हा परत मूळ ठिकाणी येणार नाही असा त्यांचा समज बरोबर आहे. कारण त्यांनाही मुले-बाळे असतात. दुर्गम भागामध्ये पोस्टींग झालेल्या डॉक्टर्सना 15 टक्के विशेष अनुदान देण्याची योजना आपण हिवाळी अधिवेशनामध्ये जाहीर केली. परंतु अजून पर्यंत त्यांना 15 टक्के विशेष अनुदान दिले जात नाही. अक्कलकुवाला जा, धडगावला जा, मोखाडयाला जा, मेळघाटला जा कोणत्याही डॉक्टरला 15 टक्के विशेष अनुदान देत नाही. या सभागृहामध्ये आम्ही पोटतिडिकीने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

` प्रश्न विचारतो, माहिती जमा करतो, लोकांबरोबर बोलतो. जर त्यांना अर्थसहाय्य मिळणार नसेल तर काय फायदा? तेव्हा अक्कलकुवा, धडगाव या कुपोषित भागामध्ये एनआयसीयु ची स्थापना करणार असे आपण अर्थसंकल्पामध्ये सांगितले. शिवसेनेने तर हे अगोदरच स्थापन करण्याचा प्रयत्न केला आहे. माननीय श्री. उध्ववजी ठाकरे साहेबांनी अक्कलकुवा, धडगाव, मोखाडा, जव्हार या तालुक्यामध्ये एनआयसीयु स्थापन केले, आम्ही तुम्हाला मदत करायला तयार आहोत. परंतु तुमच्याकडे इन्फ्रास्ट्रक्चर नीट नसेल तर आम्ही काय करणार? आम्ही डॉक्टर आणून देऊ काय? आपण जागतिक बँकेच्या सहाय्याने 1 कोटी रुपयांचे जनरेटर खरेदी केले. परंतु हे जनरेटर आज धूळ खात पडले आहेत. कुडाळ, सिंधुदुर्ग व मेळघाटमध्ये किती जनरेटर आहेत ते सांगा? मी तुम्हाला सांगतो की, जनरेटर रुम करायला पी.डब्लू.डी.तयार नाही. तरमग हे जनरेटर आपण कुणाला कमिशन मिळावे म्हणून कुणाचे पोट भरावे म्हणून आपण घेतले आहेत काय? यामध्ये आपण जागतिक बँकेचे पैसे वाया घालविले आहेत.

सभापती महोदय, राज्य सरकारने आय.ए.एस. अधिकारी श्री. रमणी यांच्या अध्यक्षतेखाली मिशन स्थापन केले. त्यामध्ये सर्व आय.ए.एस. अधिकारी आहेत. ते संभाजीनगरमध्ये एअर कंडिशनमध्ये बसून कुपोषित बालकांचा अहवाल देणार? यावर आपण सर्व ब्युरॉक्रॅट्स नेमले आहेत. त्यामध्ये एकही टेक्नोक्रॅट डॉक्टर नाही.आपल्याला कुपोषणाचा प्रश्न सोडवावयाचा आहे, एखाद्या धोरणात्मक बाबीवर चर्चा करायची नाही. कुपोषणाबाबतचे धोरण तर केव्हाच तयार झाले आहे. सभापती महोदय, मेळघाटची भौगोलिक परिस्थिती वेगळी आहे, मोखाडयाची भौगोलिक परिस्थिती वेगळी आहे व नंदूरबारची भौगोलिक परिस्थिती वेगळी आहे. तेथील आदिवासी लोकांचे रहाणीमान, त्यांची भाषा वेगळी आहे, त्यांचे संस्कार वेगळे आहेत...

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

तेथील ट्रेडीशन वेगळी आहे. अशा वेळी आपण या सर्वांना एकच मापदंड लावणे बरोबर आहे का ? जर एअरकंडीशन केबिनमध्ये बसून जर आपण कुपोषणाचा प्रश्न सोडविणार असलो तर, मला माफ करा. माझे म्हणणे आहे की, राज्यातील कुपोषणाचा प्रश्न सुटणार नाही. ब्युरोक्रॅटस् कधीच सोडविणार नाहीत. जर राजकीय इच्छाशक्ती असेल तरच हा प्रश्न सुटू शकेल.

सभापती महोदय, मेळघाट या भागासंदर्भात सांगावयाचे तर तेथे कुपोषित बालकांच्या ग्रेड 3 व ग्रेड 4 बाबत अतिशय वाईट अवस्था आहे. तेथे ग्रेड 4 चे रुग्ण फार आहेत. का नसणार? कारण तेथील चिखलदरा आणि धारणी या दोन तालुक्यांमधील परिस्थिती पाहिली तर चिखलदरामधील 30 गावातील लोक अशुध्द पाणी पीत आहेत. मी माननीय मंत्री महोदयांना 30 गावांची यादी देतो, त्यांनी ती लिहून घ्यावी. 1) वैराट 2) पस्तलई 3) चुर्णी 4)मेमना 5) शहापूर 6) आलाडोह 7)लवादा 8) अमोना 9) मोथाखेडा 10) ताऊबांदा 11) भिलखेडा 12) मोथा 13)गिरुटी 14)झिंगापुर 15) बेला 16) बेळाफिटी 17) दिली 18) अवागड 19) मेरीयांग 20) कामापुर 21) सोनापुर 22) मोरगड 23) तोरणवाडी 24) पाचडोंगरी 25) करलापाणी 26) आवागड 27) मेहरीआम 28) चुणीढाणा 29) खडीमल 30) खारी. या 30 गावांमध्ये हातपंप नाहीत. तसेच धारणी तालुक्यातील 35 गावांमध्येही हातपंप नाही. आता उन्हाळा तोंडावर आला आहे. अशा वेळी पाणी टंचाई आणि होणारे आजार, कारण हातपंप नसल्याने तेथील लोक डबक्यातील पाणी पिणार आहेत आणि मग डायरिया, गॅस्ट्रो सारखे आजार होणार आहेत. त्याठिकाणी ई.जी.एस.च्या माध्यमातून कोणती कामे सुरु आहेत ? परवा माननीय मंत्री महोदयांनी ठासून सांगितले की, कुठेही स्थलांतर झालेले नाही. रोजगार हमी योजनेची कामे सगळीकडे व्यवस्थित सुरु आहेत. पण रायपूर येथे 100, ताऊबांधा 100, सेमाडोह ढाण 150, कामापुर 50, ताऊबांधा 100, भुलोरी 60, फेशरपुर 50, अंबापाटी 60, खोगडा 50, सलोना 200, बेला 60 अशा जवळजवळ 200 गावातील लोकांनी स्थलांतर केलेले आहे. हे सर्व सत्य आहे. येथे असत्य माहिती देऊन आम्हाला काय करावयाचे आहे ? आम्हाला राजकीय आरोप करावयाचे नाहीत. तर या परिस्थितीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने आम्ही सांगत आहोत. आपली देखील तशीच इच्छा असेल तर मग या आदिवासी जिल्हयांसाठी अधिक निधी का दिला नाही ? या आदिवासी समाजामध्ये पोस्ट ग्रॅज्युएशनचे शिक्षण

. . . .3 पी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

घेणारी, डिग्रीपर्यंतचे शिक्षण घेतलेली किती मुले आहेत ? तर ही संख्या केवळ 1500 इतकी आहे. आता त्यांच्या निर्वाह भत्त्यामध्ये वाढ केली असून, हा भत्ता आता 190 रुपयावरुन 500 ते 700 रुपयापर्यंत वाढणार आहे. पण येथेच तर आपले अपयश आहे. या सर्व जिल्हयामधील फक्त 1500 मुले पोस्ट ग्रॅज्युएशनचे शिक्षण घेत आहेत. यामध्ये कोणी वैद्यकीय शिक्षण घेत आहेत, तर कोणी अभियांत्रिकी शिक्षण घेत आहेत, यामध्ये पदवी आणि पदविका शिक्षण घेणारेही आहेत. महाराष्ट्र राज्य स्थापन होऊन इतकी वर्षे झाली तरी या आदिवासींचा प्रश्न सातत्याने मांडला जात आहे. या आदिवासी भागातील फक्त 1500 मुले पोस्ट ग्रॅज्युएशनचे शिक्षण घेत आहेत किंवा डिग्रीचे शिक्षण घेतलेली आहेत ही महाराष्ट्राची शोकांतिका आहे.

सभापती महोदय, मोखाडा तालुक्यामध्ये 500 पेक्षा अधिक बालके कुपोषित आहेत. तेथील ग्रामीण रुग्णालयाचे काम अर्धवट अवस्थेत आहे. तेथे टायलींग आणि फ्लोअरींगचे काम झाले असून अजून इमारतीला रंग देण्याचे काम शिल्लक आहे. त्यामुळे ही इमारत आज नुतनीकरणाच्या प्रतिक्षेत आहे. कोकणात पर्यटनाच्या विकासाच्या नावाखाली आपण तेथे 84 ॲम्ब्युलन्स दिल्या. पण मोखाडा येथे एकही ॲम्ब्युलन्स दिली नाही. तसेच जेव्हा प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी डॉक्टर नेमले जातात, तेव्हा ज्यादिवशी त्यांची डेट ऑफ जॉईनिंग असेल, तर त्या ऑर्डर बरोबर एक वर्षानंतरची जी तारीख असेल, त्या दिवसाची त्यांना डेट ऑफ रिलीव्हची ऑर्डर दिली तर त्यांना ही शाश्वती राहील की, मला येथे एक वर्षच रहावयाचे आहे आणि मग ते मन लावून काम करतील. तसेच दुसरी गोष्ट म्हणजे पोस्ट ग्रॅज्युएशन करावयाचे असेल तर तीन वर्षे लागतात. अशा वेळी त्यातील दोन वर्षे पोस्ट ग्रॅज्युएशनसाठी द्यावी आणि एक वर्षे त्यांना तेथेच काम करण्यासाठी देण्यात यावे. म्हणजे आपल्याला तेथे डॉक्टर मिळतील आणि ही बाब पेडियाट्री आणि गायनॅकसाठी लागू करावी.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (पुढे चालू...

या डॉक्टरांना विशेष अनुदान द्यायला पाहिजे. सभापती महोदया,शासनाने कोर्टाला कसे फसविले ते मी आपल्याला सांगतो. शासनाने कुपोषणाच्याबाबतीत कोर्टामध्ये एक ॲफीडेव्हीट केलेले होते. कोर्टाने काही प्रश्न विचारले होते. Increase in the budgetary allocation in five tribal districts to the extent of 100 per cent at least this year. यावर शासनाने सांगितले की, आमच्याकडे दहा कोटी आणि साडेचार कोटी एवढे बजेट असल्याचे सांगितले. हे महत्वाचे आहे. नवसंजीवनी योजना राबवविण्यात येत असल्याचे सांगितले. नवसंजीवनी योजनेमध्ये मुलांच्या पालकांना त्यांचा रोजगार बुडतो म्हणून 40 रुपये द्यायचे ठरले होते. परंतु हे 40 रुपये कधीच उपलब्ध करुन देण्याची तरतूद केलेंली नाही. शनिवार आणि रविवारचे 40-40 रुपये केव्हाच मिळत नाहीत. शुक्रवारी ॲडमिट झालेल्या मुलाच्या पालकाला मंगळवारीच 40-40 मिळून 80 रूपये त्याच्या पालकाला मिळतात. यामध्ये आपल्याला सुधारणा केली पाहिजे. अशा अनेक गोष्टी आहेत. आरोग्य विभागाला संपूर्ण बालकांची तपासणी करण्यास कोर्टाने सांगितले होते. त्यापैकी 43 टक्के मुलांची तपासणी केली आणि बाकीच्या मुलांची तपासणी कोर्टाच्या आदेशाने देखील झालेली नाही. कोर्टाने म्हटलेले होते की, "There will be a health check up from 0-6 years periodically in five districts of every village. 5 जिल्ह्यातील मुलांच्या आरोग्याची तपासणी करण्यास सांगितले होते. परंतु शासनाने ऑनरेबल कोर्टाला विनंती केली की, "Therefore, it is requested that hon. High Court to allow the health department for a quarterly health examination. म्हणजे कोर्टाला देखील सुचवितात की,दर महिन्याला बालकांची तपासणी करण्याचे बंधन न घालता तीन महिन्यांनी तपासणी करण्याची परवानगी असावी.

सभापती महोदया, महाराष्ट्र आरोग्य सेवा प्रकल्पाचे काय झाले, ते मी थोडक्यात सांगतो. आरोग्य सेवेसाठी प्रचंड करोडो रुपये केंद्रामार्फत मिळतात. 24 फेब्रुवारी 1999 पासून महाराष्ट्र आरोग्य प्रकल्प सुरु झाला. त्या प्रोजेक्ट पूर्ण होण्याची तारीख मार्च 2005 अशी आहे. यासाठी 750 कोटी रुपये आलेले होते. यामध्ये 31 मार्च 2002 ला किती कामे पूर्ण झाली, याचा आढावा घेतला असे दिसेल की, एकूण 144 करावयाची होती, 31 मार्च 2002 पर्यत 15 कामे पूर्ण झाली होती, 31 मार्च 2003 ला 60 कामे पूर्ण झाली होती, 31 मार्च 2004 ला 123 कामे पूर्ण व्हावयाची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (पुढे चालू.....

होती. ती झाली नाहीत. 144 कामे पूर्ण करावयाची होती, परंतु त्यापैकी या 123 कामाच्या वर आपण गेलो नाही.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड साहेबांनी सांगितले की, जीवनदायी योजनेमध्ये 70 हजार रुपये दिले जातात. हे 70 हजार रुपये फार कमी आहेत, हे पैसे खरोखरच कमी आहेत ही वस्तुस्थिती आहे. पंचतारांकित हॉस्पिटलमध्ये जीवनदायी योजना राबविली जात नाही, परंतु त्यांना शासनाकडून याबाबतच्या सगळया सवलती मिळवितात. या हॉस्पिटलची मी नावे सांगू शकतो. बॉम्बे हॉस्पिटलपासून लिलावती हॉस्पिटल, हिंदुजा हॉस्पिटलमध्ये, जीवनदायी योजनेखाली शस्त्रक्रिया होत नाहीत. त्या ठिकाणी ही योजना राबाविली जात नाही. शासन ही योजना पंचतारांकित हॉस्पिटलमध्ये राबविली जात आहेत असे सांगते. तसे असेल तर त्याबाबतची सभागृहाला आकडेवारी द्यावी. या बजेटमध्ये सांगितले होते की, 'महिला दिन' म्हणून साजरा करण्यात येईल. या सभागृहामध्ये आम्ही अनेकदा प्रश्न उपस्थित केला की, स्त्रियांची संख्या ही पुरुषांच्या संख्येच्या मानाने अतिशय कमी आहे. 1901 मध्ये 972 होती ती आज 933 झालेली आहे.

या अर्थसंकल्पामध्ये स्त्रियांसाठी कोणत्याही प्रकारची ठोस अशी उपलब्धी या अर्थसंकल्पामध्ये नाही. आपण जो गर्भलिंग चिकित्सा कायदा केला होता, तो कायदा देखील आज धाब्यावर बसविलेला आहे. त्याबाबत कडकपणाने अंमलात आणत नाही, त्याबाबत ऑब्जर्व्ह केले जात नाही. त्यामुळे हा अर्थसंकल्प केवळ मुंगेरी लाल के सुहाने सपने आहे, एवढे सांगून मी रजा घेता. जयहिंद जय महाराष्ट्र.

--

तालिका सभापती (श्रीमती फौजिया खान) : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक, मंगळवार, दिनांक 29 मार्च 2004 रोजी दुपारी 1-00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक 7 वाजून 59 मिनिटांनी मंगळवार, दिनांक 29 मार्च 2004 रोजी दुपारी 1-00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही